# वामन मल्हार जोशी


गोविंद मल्हार कुलकर्णी




MR
891.460 92
J 78 K
MR

भारतीय
साहित्याचे

MR
891.460
92
J 78 K



INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA



*Waman Malhar Joshi* : (वामन मल्हार जोशी) Monograph on Marathi novelist in Marathi by G. M. Kulkarni
Sahitya Akademi, New Delhi (1986), **SAHITYA AKADEMI**
R REVISED PRICE Rs. 15.00

© Sahitya Akademi
First Edition : 1986

MR
891.460 92
J 78 K

**Publisher :**
Sahitya Akademi,
Rabindra Bhavan,
35, Ferozeshah Road,
New Delhi 110 001

Library IIAS, Shimla
MR 891.460 92 J 78 K
00117058

**Regional Offices :**
172, Mumbai Marathi Grantha Sangrahalya Marg,
Dadar (East), Bombay 400 014
Block V-B, Rabindra Sarobar Stadium, Calcutta 700 029
29, Eldams ~~Road, Teynampeth~~ Madras 600 018

117058
9/12/04

**Printer :**
Satish Bhide
Anuradha Publications Pvt. Ltd.
Prop. of Shree ~~Sanjay Mudranalaya~~
Swastik House, Senapati Bapat Marg, Dadar, Mumbai 400 028

**SAHITYA AKADEMI**
मूल्य : REVISED PRICE Rs. 15.00

# अनुक्रमणिका


1. वा. म. जोशी : जीवित, काळ व व्यक्तित्व 1

2. तत्त्वचिंतन 17

3. कादंबरीलेखन 31

4. समीक्षालेखन 48

5. स्फुट ललित-लेखन 56

6. समारोप 65

7. वाङ्मयसूची 67

# प्रकरण पहिले

# वामन मल्हार जोशी : व्यक्तित्व व कार्य

## : 1 :

वामन मल्हार जोशी यांचा जन्म कोकणातील 'तळे' या गावी 22 जानेवारी 1882 रोजी झाला. त्यांचे वडील एक मोठे विद्वान ब्राह्मण आणि उत्तम ज्योतिषी होते. त्यांच्या वडिलांकडे गोरेगाव आणि आसपासच्या सातआठ खेड्यातील जोशीपण होते. त्यांच्या वडिलांची राहाणी साधी होती. वामनरावांच्या घरातले वातावरण सुसंस्कृत व प्रेमळ होते. त्यांच्या साहित्यात कुटुंबातील प्रेमळपणाची जी चित्रे दिसतात, त्याचे मूळ त्यांच्या घरातील या वातावरणातच असावे.

वामनरावांना दोन भाऊ आणि चार वहिणी होत्या. त्यांना एक मोठा सावत्र भाऊ होता. तो कोकणातच राहिला. वामनरावांचे सर्वांत मोठे सख्खे भाऊ महादेव हे सर्वप्रथम पुण्यात शिक्षणासाठी आले. त्यांच्या पाठोपाठ वामनरावांचे दुसरे भाऊ नारायणराव आणि नारायणरावांच्या पाठोपाठ स्वतः वामनरावही काही दिवसांच्या अंतरांनी पुण्यात शिक्षणाकरिता आले. महादेव जोशी त्यावेळी नव्याने स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक झाले. नंतर ते डेक्कन कॉलेजमधून बी. ए. व एम्. ए. झाले. त्यांना प्रत्येक परीक्षेत संस्कृत विषयातील पारितोषिके व शिष्यवृत्ती मिळालेल्या होत्या. नारायणराव हेही पुण्यात शिक्षण घेऊन बी. ए. झाले. त्यांनी सुरुवातीस रत्नागिरी येथे शिक्षकाचे काम केले. पण नंतर निवृत्तीपर्यंत त्यांनी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे काम पाहिले.

वामनरावांची मुंज झाली आणि त्यांचे वडील वारले. त्यांचे इयत्ता पाचवीपर्यंत शिक्षण गोरेगाव मुक्कामीच झाले. पुढील शिक्षणासाठी ते आपले मोठे भाऊ महादेव ऊर्फ अण्णा यांच्याकडे पुण्यास आले. वामनरावांचे मॅट्रिकच्या वर्गापर्यंतचे शिक्षण पुण्यातील लवाटे-पांगारकरांच्या क्लासेसमधून झाले. याच

वेळी त्यांचे थोरले भाऊ अण्णा यांनी अहमदनगर येथील हायस्कूलमध्ये नोकरी पत्करली. त्यामुळे मॅट्रिकच्या वर्गात असतानाच वामनरावही आपल्या बंधूंबरोबर अहमदनगरला गेले. मॅट्रिक परीक्षेच्या पहिल्या प्रयत्नात इंग्रजी निबंधच लिहिण्यात सगळा वेळ खर्ची घातल्याने ते नापास झाले. मात्र पुढील वर्षी म्हणजे सन 1900 मध्ये ते चांगले गुण मिळवून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. अहमदनगर येथेच वामनरावांना डॉ. गुणे आणि श्री. पा. मं. ऊर्फ सेनापती बापट हे चांगले सहाध्यायी-मित्र लाभले होते.

मॅट्रिकनंतर त्यांनी आपल्या वडील बंधूंप्रमाणे डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळचे डेक्कन कॉलेज "निसर्गरमणीय, कलाकमनीय अथएव शिष्यस्पृहणीय" असे होते. वामनराव डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थिवसतिगृहात राहात. ते 1904 साली बी. ए. आणि 1906 साली एम्. ए. झाले. एम्. ए. ला त्यांनी तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हे विषय घेतले होते. त्यांचे संपूर्ण शिक्षण अर्थातच शिष्यवृत्त्यांवर झाले. बी. ए. परीक्षेत त्यांचा कॉलेजमधील पहिल्या तीन विद्यार्थ्यांत क्रमांक लागला. त्यामुळे त्यांना 'दक्षिणा फेलोशिप' मिळाली होती. बी. ए. ला असतानाच वामनरावांना उत्कृष्ट इंग्रजी निबंध लिहिल्याबद्दल 'हॅवलॉक प्राइज' मिळाले.

कॉलेजमध्ये असताना ते टेनिस अतिशय आवडीने खेळत. मात्र त्यांच्या खेळात शैलीदारपणापेक्षा उत्साहाचेच अधिक प्रदर्शन असे. एका इंटरकॉलेजिएट सामन्यात त्यांनी फर्गसन कॉलेजविरुद्धचा सामना जिंकलाही होता. त्या सामन्याची हकीकत प्रिन्सिपल शार्प यांनी विचारली. त्यावेळी वामनरावांनी त्यांना अत्यंत निर्भीडपणे सांगितले की, "फर्गसन कॉलेजातील प्रोफेसर विद्यार्थ्यांत आपलेपणाने मिसळतात, तसे येथील मिसळत नाहीत. येथले युरोपियन प्रोफेसर काही झाले तरी परकेच. त्यांना हिंदी विद्यार्थ्यांविषयी स्नेहभाव व आत्मीयता कोठून वाटणार! इंग्रजांच्या राज्यामुळे हिंदुस्थानचा मुळीच फायदा झालेला नाही. एक वेळ अराजकता पत्करेल पण ब्रिटिश राजवटीतील ही शांतता आणि सुव्यवस्था नको." या त्यांच्या स्पष्टोक्तीचे प्रतिबिंब 'नलिनी' व 'सुशीलेचा देव' या कादंबऱ्यांत पाहावयास मिळते.

डेक्कन कॉलेजमध्येच वामनरावांना वाचनालेखनाची गोडी लागली. कॉलेजमध्ये असताना त्यांनी अभ्यास बाजूला ठेवून मनसोक्त वाचन केले. कॉलेज मॅगेझिनमध्ये त्यांनी 'वामन' या नावाने पुष्कळ इंग्रजी व मराठी

छोटेछोटे लेख लिहिले. वामन मल्हारांच्या वाङमयीन व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत डेक्कन कॉलेजचा फार महत्त्वाचा वाटा आहे.

पुण्यातील वातावरणामुळे आणि अंगी असलेल्या स्वतंत्र प्रज्ञेमुळे वामनरावांच्या अंगी सहाजिकच राष्ट्रीय वृत्ती वळावली. याचा परिणाम म्हणजे एम्. ए. झाल्यावर सहजशक्य असूनही सरकारी नोकरीत ते शिरले नाहीत. वास्तविक एका इंग्रज प्राध्यापकामुळे वामनरावांना 'पोस्टल सुपरिन्टेंन्डेन्ट'ची नोकरी चालून आली होती. पण वामनरावांनी ती नाकारली. त्यांनी प्राध्यापक होण्याची महत्त्वाकांक्षा धरली. ती पुरी होण्यास त्यांना पुढे जवळजवळ एक तप वाट पाहावी लागली.

वामन मल्हार एम. ए. उत्तीर्ण झाले त्याच वर्षी ते काँग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनास सहज म्हणून उपस्थित राहिले. हे अधिवेशन अनेक कारणांनी गाजले. याच अधिवेशनात महर्षी दादाभाई नौरोजी यांनी हिंदुस्थानच्या जनतेला स्वराज्याचा मंत्रोपदेश दिला. स्वदेशी वस्तुवापराचा, परदेशी वस्तुवापरावरील वहिष्काराचा आणि राष्ट्रीय शिक्षणाचा असे ठराव संमत करण्यात आले ते याच अधिवेशनात. कोल्हापूरच्या 'समर्थ विद्यालया'चे संस्थापक, राष्ट्रीय शिक्षणाचे कैवारी आणि स्वदेश–स्वधर्म–स्वभाषा या त्रिसूत्रीचे कट्टर पुरस्कर्ते प्रोफेसर अण्णासाहेव विजापूरकर यांच्याशी वामन मल्हारांचा या अधिवेशनात परिचय झाला. प्रो. विजापूरकरांची राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना वामन मल्हारांना आवडली आणि 1907 मध्ये ते 'समर्थ विद्यालया'स येऊन मिळाले.

प्रा. विजापूरकर 'विश्ववृत्त' नावाचे मासिक-पुस्तक काढीत. 1908 पासून या मासिकाची संपूर्ण जवावदारी वामनरावांकडे आली. वामनराव 'विश्ववृत्त'चे सगळे काम पाहात. पण संपादक म्हणून विजापूरकरांचेच नाव छापलेले असे. 'विश्ववृत्ता'च्या एका अंकात पंडित श्री. दा. सातवळेकर यांचा "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता" हा लेख प्रसिद्ध झाला आणि 'विश्ववृत्त' कोल्हापूर सरकारच्या रोषास कारणीभूत झाले. संपादक प्रो. विजापूरकर, सहसंपादक वामन मल्हार आणि मुद्रक श्री. जोशीराव या तिघांवर खुनास चिथावणी देण्याचा व राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात येऊन तिघांनाही अटक झाली. या खटल्याला त्यावेळी गाजत असलेल्या वेदोक्त प्रकरणाची पार्श्वभूमी होती. कोल्हापूरचे त्या वेळेचे शाहू महाराज हे वेदोक्त विधींचे अधिकारी होत की पुराणोक्त विधींचे असा वाद त्यावेळी उपस्थित झाला होता. शाहूंच्या

राजघराण्याने आपला वेदोक्त विधींचा अधिकार गमावला आहे असें काही ब्राह्मणांचें मत होतें. या पार्श्वभूमीवर पंडित सातवळेकरांच्या लेखातील "जे क्षत्रिय शत्रूंच्या सैन्याचा, दुनियेतील गुलामीचा बीमोड करीत नाहीत त्यांच्या छत्रपतित्वाचा, समशेरबहादूरत्वाचा त्यांच्या राष्ट्राला काय उपयोग आहे ?' हे वाक्य कोल्हापूरच्या महाराजांना खटकले आणि त्यातून खटला उभा राहिला.

'विश्ववृत्ता'तील वादग्रस्त लेखाची जबाबदारी प्रो. विजापूरकरांनी नाकारावी आणि वामनरावांनी ती स्वतःवर घ्यावी असें ठरले. कारण असें केल्याने दोघेही सुटतील अशी अपेक्षा होती. या योजनेनुसार वामनरावांनी "सातवळेकरांचा लेख त्यात बदल करून मी छापला" अशी जबानीही दिली. परंतु या खटल्याचा निकाल विजापूरकर–वामनरावांच्या विरुद्ध लागला. (1909). वामनरावांना तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. सुरुवातीचें काही दिवस कोल्हापूर व पन्हाळा येथील तुरुंगांत ठेवल्यावर वामनरावांची रवानगी सिंध-हैदराबाद येथील तुरुंगात झाली. जानेवारी 1909 ते ऑक्टोबर 1911 इतक्या कालावधीचा खडतर तुरुंगवास वामनरावांना घडला.

कोल्हापूरच्या तुरुंगात असताना महाराजांनी वामनरावांना 'दशकुमार-चरिता'चें भाषांतर करण्याची आज्ञा केली. वामनरावांनी अर्धेमुर्धे भाषांतर केलेही होते. आज ते उपलब्ध नाही.या भाषांतराच्या निमित्ताने वामनरावांनी आपणास हवी ती पुस्तके मागवून घेतली व वाचून काढली.

सिंध-हैदराबाद येथील तुरुंगात वामनरावांना सक्त मजुरीचा कैदी या नात्याने चक्की पिसणे, चरख्यावर सूत कातणे, बुटाचें तळवे तयार करणे इत्यादी शारीरिक कष्टांची कामे करावी लागली. पण तेथील इंग्रजी अधिकारी व त्यांच्यावर देखरेख करणारा मुसलमान कैदी मुकादम गोमल यांच्यामुळे त्यांना या कामातही वेळप्रसंगी बरीच सवलत मिळाली. वामनरावांविषयी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांचें चांगले मत झाल्याने व ते सुशिक्षित, सज्जन कैदी असल्याने तें अधिकारी वामनरावांना स्वतःच्या जबाबदारीवर खासगी पुस्तके वाचावयास देत. या काळातच वामनरावांनी 'बायबल' आणि शेक्स्पीयरच्या कृती यांचें वाचन केले.

वामनरावांवर देखरेख करणारा मुस्लिम मुकादम गोमल हा कट्टर धर्माभिमानी होता. गोमल आणि वामनराव धर्माबद्दल व आचारांबद्दल

एकमेकाशी आपापल्या मोडक्या–तोडक्या हिंदीतून वाद घालीत. अशा वेळी गोमल वामनरावांवर खूप चिडे व रुसूनही वसे. परंतु अंतःकरणाने दयाळू असणाऱ्या या गोमलने वामनरावांना अनेक प्रकारे मदत करून त्यांचे तेथील जीवन त्यातल्या त्यात सुसह्य केले. याच कृतज्ञतेतून वामनरावांनी त्याच्या-बद्दलच्या आठवणी मोठ्या हृद्यतेने लिहिल्या आहेत.

वामनराव तुरुंगात असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले होते. पण त्यांच्या बंधूंनी ही वार्ता त्यांची सुटका होईपर्यंत त्यांना कळू दिली नव्हती. तुरुंगातून सुटताना वामनरावांना ही वार्ता कळली व मातृवियोगाने त्यांचे अंतःकरण विद्ध झाले.

तुरुंगातून सुटल्यावर 'पुढे काय' हा प्रश्न वामनरावांसमोर उभा राहिला. एव्हाना सरकारी रोषाचा व्हायचा तो परिणाम होऊन 'समर्थ विद्यालय' बंद पडले होते. याच वेळी पुण्याच्या आर्यभूषण छापखान्यात 'इंग्रजी–मराठी कोश' तयार करण्याचे काम चालू होते. वामनराव तेथे मदतनीस म्हणून 1912च्या अखेरीपर्यंत होते. यानंतरचे त्यांचे सातआठ महिने बेकारीत गेले. या काळात वामनरावांनी किरकोळ लिखाण तर केलेच पण 'सॉक्रेटिसाचे संवाद' आणि 'रागिणी' या पुढे गाजलेल्या दोन पुस्तकांचे लेखनही केले. पुढे 1914 पासून 'रागिणी' 'मासिक मनोरंजन' मधून क्रमशः प्रसिद्ध झाली.

सरकारी रोषामुळे ज्यांना इतरत्र नोकरी मिळणे कठीण होई अशांना आपल्या संस्थेत आश्रय देण्याचे 'केसरी–मराठा' संस्थेचे धोरण असे. त्यानुसार न. चिं. केळकरांनी वामन मल्हारांना 'मराठा'त मदतनीस म्हणून घेतले. 'मराठा'चे त्यांनी दोन वर्षे सहसंपादक म्हणून काम पाहिले. याच वेळी म्हणजे 1915 त त्यांनी 'केसरी'त "पक्षभेद आणि पक्षद्वेष" ही विचारप्रवर्तक लेखमाला लिहिली. 'केसरी–मराठी'त काम करताना वामनरावांना टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे जवळून अवलोकन करण्याची संधी मिळाली. संपादकांनी पुण्यात भरणाऱ्या नेमस्त पक्षाच्या परिषदेस वातमीदार म्हणून जाण्यास सांगितल्याचे वामनरावांना आवडले नाही आणि त्यांनी 'मराठा'तील नोकरीचा राजीनामा दिला.

'मराठा' सोडल्यावर वामनरावांनी मुंबईत अ. ब. कोल्हटकर यांच्या 'मेसेंज' या इंग्रजी दैनिकात सहसंपादक म्हणून काम स्वीकारले. येथे त्यांनी

साधारणतः दीडेक वर्षे काम केले. कोल्हटकरांचा आर्थिक व्यवहार घोळदारच होता. त्यामुळे वामनरावांसारख्या सरळमार्गी माणसाला कोल्हटकरांकडून आपला पगार कोर्टकचेरी करून मिळवावा लागला. त्यांनी 1917त 'मेसेंज' मधील नोकरी सोडली. याच वेळेस महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या महिला विद्यापीठाची स्थापना झाली आणि तेथे जून 1918 पासून वामन मल्हार मराठी व मानसशास्त्र या विषयांचे प्राध्यापक म्हणून लागले. वामनरावांच्या आयुष्याला स्थिरता प्राप्त झाली.

अशा रीतीने एम्. ए. झाल्यापासून जवळजवळ बारा वर्षे वामनराव नोकरीच्या बाबतीत अस्थिर होते. अशी अस्थिरता असूनही ज्यामुळे वामनरावांचा लौकिक वाढला, ज्यामुळे ते अव्वल साहित्यिक आणि गाढे तत्त्वचिंतक म्हणून प्रसिद्धीला आले ते त्यांचे महत्त्वपूर्ण लिखाण याच कालखंडात झाले आहे, हे मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. लो. टिळकांच्या 'गीतारहस्य' या बहुप्रसिद्ध ग्रंथावरील 'A Gist of Gita–Rahasya' हा त्यांचा विवेचक निबंध याच काळात प्रसिद्ध झाला. त्यांचे थोरले बंधू प्रो. म. म. जोशी यांनी 'केसरी'त लिहिलेल्या "आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त" या लेखमालेवरील वामनरावांच्या "जिज्ञासूच्या शंका" याच काळात प्रसिद्ध झाल्या होत्या. 'नवपुष्पकरंडक' या कथासंग्रहाचे तसेच 'आश्रमहरिणी' व 'रागिणी' या कादंबऱ्यांचे लेखन याच काळातले आहे. 'सॉक्रेटिसाचे संवाद' (प्रसिद्धी 1922) या पुस्तकाचे प्रत्यक्ष लेखन याच काळातले.

'मेसेज'मधील नोकरीबरोबरच वामनरावांची पत्रकारिता संपुष्टात आली. वृत्तपत्रासारख्या केवळ तात्कालिकास महत्त्व देणाऱ्या व्यवसायात वामनराव रमणे शक्यच नव्हते. 'सॉक्रेटिसाचे संवाद'च्या प्रस्तावनेत ते लिहितात, "सुमारे सहासात वर्षांपूर्वी वर्तमानपत्राच्या धंद्यात असता त्या धंद्याला आवश्यक असे जे लेखनवाचन करावे लागते ते बहुधा क्षणमात्र महत्त्वाचे असते, हे अनुभवास येऊन मनाला असमाधान वाटू लागले, व उच्चतर आणि अधिक महत्त्वाचे लेखनवाचन करण्याचे प्रयत्न पुष्कळ दिवसपर्यंत काळाच्या अभावामुळे व शारीरिक अस्वास्थ्यामुळे व स्वभावसिद्ध आलस्यामुळे व्यर्थ गेले." त्यामुळे 'मराठा' व 'मेसेज'मधील अनुभवांमुळे नव्हे तर वाचनलेखनाच्या आंतरिक ओढीमुळे वामनरावांनी वृत्तपत्रव्यवसाय सोडला, हे स्पष्ट आहे.

महिला विद्यापीठ हिंगणे, येथील वातावरण वामनरावांना आवडेल असेच

होते. त्यांच्या सुरुवातीच्या विद्यार्थिनींमध्ये कमलाबाई देशपांडे, गोदावरी केतकर, गंगूबाई पटवर्धन, मालतीबाई बेडेकर इत्यादी पुढे नावारूपाला आलेल्या मुली होत्या. या सर्व मुलींनाही 'रागिणी'कर्ते वामन मल्हार आपले शिक्षक आहेत याचे अप्रूप वाटत होते. वामन मल्हार हिंगण्याच्या वातावरणात अगदी रमून गेले.

शिक्षक म्हणून वामन मल्हार विद्यार्थिनींमध्ये लगेच लोकप्रिय झाले. याचे मुख्य कारण म्हणजे विद्यार्थिनींना समजून घेण्याचा ते प्रयत्न करीत. त्यांचे शिकवणेही विद्यार्थिनींना विषय मुळातून समजावा अशाच पद्धतीचे असे. त्यांचा अध्यापनाचा भर सॉक्रेटिस-पद्धतीच्या संवादांवर असे. वर्गात प्रश्नोत्तरे चालत, प्रश्नांतून प्रश्न निघत. त्यामुळे विद्यार्थिनी आपोआप अभ्यास-विषयात गुंतून जात. "अगदी सावकाश मध्येमध्ये थांबून ते शिकवायचे. डोळ्यात स्निग्धता, आवाजात मार्दव, चेहऱ्यावर वात्सल्य आणि बुद्धीची प्रगल्भता यांमुळे त्यांचा तास कधीच नीरस वाटला नाही." असे त्यांच्या विद्यार्थिनी सांगतात. वामनराव वर्गात खेळीमेळीचे वातावरण ठेवीत. ते मुलींवर क्वचितच रागावत. मुली वसतिगृहातच राहात असल्याने अध्यापनकाम वगळता इतर वेळीही वामनराव त्यांच्यात मिसळत. त्यांच्याकडून बागकाम करवून घेत. अशा अभ्यासक्रमेतर कामाच्या वेळीही विद्यार्थिनींमधली जिज्ञासू वृत्ती कशी वाढेल याकडेच त्यांचे लक्ष असे. विद्यार्थिनींना शिक्षा करणे वामनरावांच्या अगदी जिवावर येई. ते शिक्षा सांगत आणि लगेच ती माफही करीत. हिंगणे येथे काही वर्षे त्यांनी मुख्याध्यापकाचेही काम पाहिले. संस्थेच्या कारभाराचा एक भाग म्हणून वामनरावांना संस्थेतील नोकरांवर देखरेख करावी लागे. वामनरावांचा मऊ स्वभाव पाहून नोकर हलगर्जी वा कामचुकारपणा करीत. पण अशा प्रकारांतही वामनराव न रागावता मृदू राहात. ते म्हणत, "गडीमाणसांनी लबाडी केली तरी त्यांचे अज्ञान आणि दारिद्र्य याच्या मुळाशी आहे. त्यांना बोलण्यात काय अर्थ आहे ! तसे पाहिले तर मोठमोठी सुशिक्षित आणि श्रीमंत माणसे काय कमी अप्रामाणिक असतात ! सगळी समाजरचनाच सदोष आहे." संस्थेसाठी देणग्या गोळा करताना अपमान होण्याचे प्रसंग येत व सहकारी चिडत. अशा वेळी वामनराव म्हणत, "अहो, चिडून कसं चालेल ! प्रचारकाला निंदा, अपमान वगैरेंसारख्या गोष्टींविषयी उदासीन बनून जगातील व्यवहाराकडे विनोदबुद्धीने पाहाता यायला हवे." वामन मल्हारांचे जनमानसात कादंबरीकार म्हणून स्थान होते. याचा फायदा देणग्या

मिळताना होत असे. कधीकधी काही माणसे प्रथम संस्था पाहायला येत व मगच देणगी देत. अशा पाहुण्यांशी वामनराव काहीशा दुटप्पीपणाने व धोरणीपणाने वागत. याबाबत ते म्हणत, "अहो, ही खासगी संस्था आहे. तिला सुधारक, सनातनी सर्वांच्या सहानुभूतीची आवश्यकता आहे. इथे सर्वांनाच खूष ठेवावे लागते."

वामन मल्हार हिंगण्यास येईपर्यंतचा काळ त्यांच्या आयुष्यातील अस्थिरतेचा व दगदगीचा काळ होता. या काळात त्यांना कौटुंबिक सौख्य नीट मिळू शकले नाही. सुरुवातीचा तुरुंगवास आणि नंतरची नोकरीतली अस्थिरता यांमुळे त्यांना व्यवस्थितपणे बिऱ्हाड करून कुटुंबासह राहाता आले नाही. बेकारीच्या काळात तर पत्नीला मुलाबाळांसह माहेरीच जाऊन राहावे लागले. पैशाची चणचण तर नेहमीच असे. मनःस्वास्थही ठीक नसे. हिंगण्यास आल्यावर मात्र ही स्थिती संपुष्टात आली. मनासारखे काम, निसर्गरम्य वातावरण आणि प्रेमळ व आदर्श शेजारी-शिक्षकांचा सहवास यामुळे वामनरावांना सौख्य अनुकूल झाले. त्यामुळेच "हिंगण्याच्या आश्रमातील 16 वर्षांचा काळ आपल्या जीवनातील सर्वात सुखाचा काळ होय" असे स्वतः वामन मल्हार म्हणत. हिंगण्यास आल्यावर आरंभी काही वर्षे वामनरावांच्या लेखनात खंड पडला. पण या काळातच अगोदर लिहून पडलेली 'नलिनी' ही कादंबरी आणि 'सॉक्रेटिसाचे संवाद' हे पुस्तक यांचे प्रकाशन झाले. त्यांनी नंतर निबंध वा परीक्षणे या स्वरूपाचे स्फुटलेखन केले. 1927 मध्ये 'विचारविलास' या त्यांच्या स्फुट-लेखसंग्रहाचे प्रकाशन झाले. 1927–28 मध्ये 'रत्नाकर' मासिकातून त्यांची 'सुशीलेचा देव' ही कादंबरी क्रमशः प्रकाशित होऊ लागली. 'रागिणी'-कर्त्यांच्या याही कादंबरीकडे वाचक आकृष्ट झालेले होतेच. 1930 त ही कादंबरी पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. देवास संस्थानच्या अधिपतींतर्फे उत्कृष्ट ग्रंथास दिले जाणारे 'भोजराज पारितोषिक' या कादंबरीला मिळाले. 1930 मध्ये मडगांव (गोवे) येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे वामनराव अध्यक्ष म्हणून निवडले गेले. 1934 मध्ये त्यांची 'इन्दू काळे व सरला भोळे' ही अखेरची कादंबरी प्रकाशित झाली.

1934 तच वामनराव हिंगण्याचा परिसर सोडून जिमखान्यावर आपल्या पुतण्याकडे राहायला आले. ते जिमखान्यावर राहात असताना त्यांच्याकडे अनेक तरुण मंडळी गप्पागोष्टी व चर्चा करण्यासाठी येत. त्यांत वा. सी.

मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये, पु. शि. रेगे इत्यादी पुढे नावलौकिक मिळवलेली मंडळी असत. त्यांच्या मार्क्सवाद, फ्रॉइडचे मानसशास्त्र, नवमतवाद, कलानीतिवाद इत्यादी विषयांवर चर्चा झडत, संवाद होत. मर्ढेकरांबद्दल "फार बुद्धिमान मनुष्य आहे" असे वामनराव म्हणत. मर्ढेकरांच्या बुद्धीबद्दल असा आदर असल्यामुळेच वामन मल्हारांनी पुढे त्यांच्या 'वाङमयीन महात्म्यता' या पुस्तकास प्रस्तावना लिहिली. 1937 त उज्जयिनी येथील महाराष्ट्र वाङमय मंडळ साहित्य संमेलनाचे वामन मल्हार अध्यक्ष झाले.

एक अध्यापक आणि एक साहित्यसेवक म्हणून वामनरावांचे जीवन असे रसपूर्ण चालले होते. पण या काळातले त्यांचे कौटुंबिक जीवन मात्र समाधानकारक नव्हते, असे म्हणावे लागते. हिंगण्यास राहावयास आल्यावर 1919 च्या आरंभीच त्यांची पत्नी वारली. या धक्क्याने वामनराव खूप खचले. हिंगण्याच्या शिक्षकांच्या चाळीतले वातावरण एखाद्या मोठ्या कुटुंबासारखे होते. त्यामुळे त्यांची चार मुले व ते अगदीच उघडे पडले असे मात्र झाले नाही. मे 1924 त वामनरावांची थोरली मुलगी गंगू हिचा विवाह तात्यासाहेब केळकरांचे चुलत भाऊ श्री. द. के. केळकर (पुढे 'काव्यालोचन'-कार) यांच्याशी झाला. 1934 त वामन मल्हार हिंगण्याचा परिसर सोडून जिमखान्यावर आपल्या पुतण्याकडे राहायला आले. याच वेळी ते ॲनिमियाने आजारी झाले होते. त्यावर त्यांना मुंबईस जाऊन उपचार करून घ्यावे लागले 1937 मध्ये त्यांची दुसरी मुलगी शकुंतला हिचा विवाह प्रसिद्ध समाज सुधारक सीतारामपंत देवधर यांचे चिरंजीव विद्याधरपंत यांच्याशी झाला. शकुंतलेच्या विवाहानंतर वामनरावांना फार एकटे एकटे वाटू लागले. याच सुमारास त्यांचा मोठा मुलगा बंडू यास वेड लागले. त्यास येरवडा येथील वेड्यांच्या इस्पितळात ठेवावे लागले. हा धक्का तर इतका जबरदस्त होता की वामनराव त्याला भेटायलाही जात नसत. तीन वर्षांनी म्हणजे 1940 मध्ये बंडू येरवडा येथेच मरण पावला. वामन मल्हारांनी त्यांच्या अंत्यविधीसाठी इस्पितळाच्या अधिकाऱ्याकडे पैसे दिले व ते घरी निघून आले. वामन मल्हार हे जितके स्थितप्रज्ञ होते तितकेच ते मनाने हळवेही होते, हे येथे कळते.

1940 मध्ये वामनरावांचे 'विचारसौंदर्य' हे मौलिक पुस्तक प्रसिद्ध झाले. पण कादंबरीलेखन मात्र आता पूर्णपणे थांबले. स्वत: वामनरावांनाही त्याची नीट जाणीव होती. प्रकाशक कादंबरीची मागणी करीत आणि ते नकार देत. एका प्रकाशकाने तर ग. त्र्यं. माडखोलकरांसारख्या मोठ्या लेखकाला

मध्यस्थी घालून कादंबरीची मागणी केली होती. यावेळी वामन मल्हार माडखोलकरांना म्हणाले, "अहो, नवीन कादंबरी लिहायची म्हणजे डोक्यात काही विषय तर घोळत असायला पाहिजे ना ? सध्या माझ्याजवळ काही नवीन सांगण्यासारखं नाही. मग लिहू काय ?" मात्र याच काळात त्यांनी काही स्फुट ललित लेख लिहिले. ते बहुतांशी आत्मपर होते. हेच लेख 'स्मृतिलहरी' संग्रहात आलेले आहेत.

1937 ते 1942 या काळात वामन मल्हार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष होते. 1843 त ते परिषदेचे अध्यक्षही झालेले होते याच वर्षी मे महिन्यात इतिहासकार गो. स. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली 'इतिहास परिषद' भरली होती. वामन मल्हार या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. या प्रसंगी त्यांनी केलेले भाषण हे त्यांच्या आयुष्यातले अखेरचे भाषण होय.

जून 1941 मध्ये वामन मल्हार हे महर्षी कर्वे यांच्या महिला कॉलेजचे प्राचार्य झाले. त्यामुळे ते जिमखान्याहून पुन्हा हिंगण्यास प्राचार्यांच्या बंगल्यात राहायला आले. वामन मल्हारांना प्राचार्यपद स्वीकारावे लागले ते काहीशा कठीण परिस्थितीतच. कारण त्यांच्या अगोदरच्या प्राचार्य पदावर असलेल्या व्यक्तीने या पदाचा राजीनामा दिला होता. या पार्श्वभूमीवर जेव्हा वामन मल्हारांनी एका प्राध्यापिकेच्या कामाबद्दल प्रतिकूल अभिप्राय दिला तेव्हा वादंग निर्माण झाले; परंतु वामन मल्हारांनी स्वतःची भूमिका स्पष्ट करणारे पत्र तर संस्थेकडे पाठविलेच. पण स्वतःचा राजीनामाही पाठविला. वामन मल्हारांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे संस्थेने त्यांच्या कृतीस सन्मानपूर्वक पाठिंबा दिला. तरीही वामन मल्हारांची प्राचार्य म्हणून कारकीर्द संघर्षमयच होऊ लागली. इतके दिवसांचे त्यांचे स्नेहीसहकारी त्यांचे शत्रू बनू लागले. जे वामन मल्हार आजपर्यंत अजातशत्रू, सुजन, सर्वसंग्राहक वगैरे होते, ते आता दुर्जन, दुष्ट, आपमतलबी गणले जाऊ लागले. वामन मल्हारांना हे सगळे अनपेक्षित होते. त्यामुळे प्राचार्य झाल्यापासून दोन वर्ष त्यांना सतत मानसिक त्रासच भोगावा लागला. ते अस्वस्थ झाले. असह्य मानसिक ताण, कमी झालेली झोप आणि धूम्रपानाचे वाढलेले व्यसन यांचा त्यांच्या प्रकृती-वरही परिणाम झाला. ॲनिमिया व मूळव्याध हे त्यांचे जुने विकार बळावले.

1943 च्या जानेवारीत वामनरावांच्या वयाला 61 वर्षे पूर्ण झाल्याने महाराष्ट्रात त्यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले. पण कॉलेजतर्फे साधा हारही

मिळाला नाही. संस्थेतले वातावरण किती प्रतिकूल व दूषित झाले होते, हे यावरून लक्षात येते.

1943 च्या जुलै महिन्यात त्यांची प्रकृती ठीक नसतानाही ते विद्यापीठ सिंडिकेटच्या बैठकीसाठी पुण्याहून मुंबईस निघाले. निघाले ते प्रवासातच बेशुद्ध पडले. बरोबरच्या मंडळींनी त्यांना त्यांचे बंधू श्री. ना. म. जोशी यांच्या घरी पोचविले. डॉक्टरच्या सल्ल्यावरून वामनरावांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. पण आजारास उतार न पडता 19 जुलै 1943 रोजी त्यांचे मुंबईत निधन झाले. 'रागिणी'कर्त्या वामन मल्हारांच्या निधनाचे वृत्त ऐकून मराठी वाचक शोकसागरात बुडाला. त्यांच्या "घरचा तत्त्वज्ञानी" हरपला होता.

## काल

वामन मल्हारांची आयुर्मर्यादा (1882–1943) आणि मर्ढेकरपूर्व आधुनिक मराठी वाङ्मयाचा काळ समानच आहेत. वामन मल्हारांचे लेखन 1915 ते 1942/43 या कालखंडातील आहे. हा कालखंड म्हणजे टिळकयुगाचा उत्कर्षबिंदू ते अस्त (1915–20) आणि गांधीयुगाचा उदय ते उत्कर्षबिंदू (1920–42). असा आहे. टिळकयुगात फार मोठ्या प्रमाणावर राजकीय व सामाजिक घडामोडी होत होत्या. शहरी मध्यमवर्ग शिक्षित झाला होता, होत होता. शिक्षणामुळे नवे ज्ञान, नवे विचार त्याच्या थेट जवळ आले होते. ते त्याच्या चिंतनाचा, क्वचित आचरणाचा भाग होऊन बसले होते. रानडे-आगरकरां-सारख्यांच्या विचारप्रवाहामुळे सुधारणेचे वारे वाहात होतेच. यातूनच स्त्रीविषयक विविध प्रश्न पुढे आले. त्यातच धोंडो केशव कर्व्यांसारख्यांनी स्त्रीशिक्षणाची एक व्रतस्थ चळवळ सुरू केली. या साऱ्यांचा परिणाम होऊन स्त्रीकडे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून पाहाण्याचा दृष्टिकोण हळूहळू तयार झाला. या दृष्टिकोणाचा परिणाम केवळ 'स्त्री'वरच झाला नाही तर तिच्याबरोबर तिचे संपूर्ण कुटुंब आणि समाज यांवरही झाला. स्त्रीचे कुटुंबातील स्थान केवळ नातेसंबंध सांगण्यापुरते नाही तर ते त्याच्या पलीकडचे आहे, हे लोकांच्या ध्यानात येऊ लागले. अशा रीतीने नवी स्त्री घडण्याओळखण्याचा हा काळ होता, असे म्हणता येईल. वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांतून जी 'नवी स्त्री' जन्माला घातली, तिची वैचारिक पार्श्वभूमी वरीलप्रमाणे आहे.

नव्या शिक्षणाचा परिणाम म्हणून आणखी एक गोष्ट घडून आली. ती म्हणजे अनेक पाश्चिमात्य तत्त्वचिंतकांची ओळख शिक्षित पिढीला झाली. त्यांनी प्रसृत केलेल्या नवविचारांच्या धारेत भारतीय परंपरेतील तत्त्वज्ञान तपासून पाहाण्याची, प्रसंगी घासूनपुसून घेण्याची ऊर्मी अनिवार झाली. राजकीय आकांक्षा बाळगणाऱ्या भारतीयांना अशा तत्त्वज्ञानाची गरज भासत होती. असे तत्त्वज्ञान एकाच वेळी नवे असायला हवे होते आणि पुन्हा ते शंभर टक्के आयात केलेले नसावे, ते भारतीय परंपरेतले असावे, निदान भारतीय परंपरेत मिसळून जाईल असे असावे, असेही वाटत होते. यातूनच तत्त्वज्ञानाच्या मागोव्याची एक प्रक्रियाच सुरू झाली. एका बाजूने 'गीतारहस्य' उकलले जात होते तर दुसऱ्या बाजूने 'सॉक्रेटिसाचे संवाद' आकलन केले जात होते. आचार्य जावडेकरांनी या काळाला 'भारतीय संस्कृतीच्या तत्त्वमंथनाचा काळ' म्हणून संबोधिले आहे, ते यासाठीच.

हा काळ व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्र अशा वेगवेगळ्या पातळ्यांवरील अनेक लहानमोठ्या बौद्धिक वादांनी गजबजलेला दिसतो. सनातनी राष्ट्रवादी आणि सुधारक उदारमतवादी यांच्यात तर जणू उघड युद्धच सुरू होते. सुधारणापंथ स्वीकारायचा की राजकीय हालचालींत सामील व्हायचे, असा तरुण सुशिक्षितांपुढे प्रश्न उभा होता.

1920 नंतर भारतीय राजकारणाच्या मंचावर टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा उदय झाला. गांधींकडे भारतीय राजकारणाची सूत्रे जाताच हिंदुस्थानच्या राजकीय व सामाजिक जीवनात पुन्हा एकदा महत्त्वपूर्ण घडामोडी झाल्या. याच सुमारास नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान प्रबळ झालेले दिसते. महात्मा गांधींनी हे तत्त्वज्ञान भारतीय अध्यात्मपरंपरेत बसवून दिले. यामुळे सनातनी राष्ट्रवादी आणि सुधारक उदारमतवादी यांच्यातील अंतर कमी होण्यास मदत झाली. गांधींच्या उदयाबरोबर सनातनी राष्ट्रवादी विरुद्ध सुधारक उदारमतवादी यांसारखे अनेक वादविवाद मागे पडले. जीवनाच्या व्यापक संदर्भात व्यक्तीच्या आत्मोन्नतीला आणि संसिद्धीला विशेष प्राधान्य आले. समूह आणि व्यक्ती यांच्या परस्परसंबंधांकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले.

1917 त रशियात क्रांती झाली आणि त्याचे सादपडसाद जगभर उमटले. हिंदुस्थानातही 1930 च्या आसपास बोल्शेव्हिझम आला. येथील अनेक विचारवंत, ललित लेखक, राजकीय कार्यकर्ते विश्वकुटुंबवादाकडे आकर्षित

झाले. मार्क्सचा समग्र अभ्यास करण्याच्या दृष्टीने येथे अभ्यासमंडळे स्थापन झाली, अभ्यासवर्ग चालविले जाऊ लागले, इतकेच काय, पण हे नवे तत्त्वज्ञान आचाराच्या पातळीवर स्वीकारण्याच्या दृष्टीने काही काळ येथे 'कॉम्यून्स'ही अस्तित्वात आली.

एका बाजूने गांधीवाद व दुसऱ्या बाजूने मार्क्सवाद या दोन तत्त्व-प्रणालींनी हा कालखंड (1920–42) व्यापलेला आहे. टिळकयुगापेक्षा या कालखंडात एक नवी दृष्टी प्राप्त झाल्याचे दिसते. टिळकयुगात जीवनविषयक विविध प्रश्नांकडे समग्रतेने न पाहाता सुटयासुटया स्वरूपात पाहिले गेले. गांधीयुगात गांधीवादाने (आणि मार्क्सवादानेही) जीवनविषयक प्रश्न असा अलग काढून न पाहाता समग्र मानवी जीवनाच्या संदर्भात त्याचा विचार सुरू केला. आगरकर-टिळकयुगातील मिल्लस्पेन्सरचें तत्त्वज्ञान मागे पडून मार्क्स-एंजल्सचें समाजवादी तत्त्वज्ञान पुढे आले. पण या समाजवादी तत्त्व-ज्ञानापेक्षाही गांधीप्रणीत 'सत्याग्रही क्रांतिशास्त्रा'ने सर्वसामान्य भारतीय जनता अधिक प्रभावित झाली होती. कारण "सत्याग्रह हे एक राष्ट्रीय क्रांतिशास्त्र आहे, त्याचप्रमाणे ते सर्वांगीण क्रांतिशास्त्र आणि समाजसंघटनाशास्त्र अगर समाजधारणाशास्त्रही आहे. भारतीय संस्कृतीचें ते परिपक्व फळ आहे" अशी विचारप्रणाली प्रसृत होत होती. अहिंसेचें अधिष्ठान असलेल्या, आत्मक्लेशात बळ शोधणाऱ्या, सत्याग्रहाचे शस्त्र पुरस्कारणाऱ्या आणि राजकीय स्वातंत्र्या-पलीकडेही समाजाच्या आत्मिक उन्नतीचें ध्येय ठेवणाऱ्या गांधीप्रणीत 'रामराज्य कल्पने' ने केवळ हिंदुस्थानातच नव्हे तर हिंदुस्थानाबाहेरही अनेक व्यक्ती आकर्षित झाल्या होत्या.

1915–42 मधील राजकीय व सामाजिक जीवनात अशा घडामोडी वेगाने होत असतानाच जगातील विचारवंतांची वैचारिक बैठकच बदलून टाकणारे काही शोध-सिद्धान्त सामाजिक शास्त्रांत आकारत होते. फ्रॉइड आणि यूंग यांचे मानवी मनोव्यापारांसंबंधीचें अभिनव सिद्धान्त, रसेलची नवनीती इत्यादींमुळे पारंपरिक विचारप्रणालीतील स्थितिशीलता तर नाहीशी झालीच, पण तिची बैठकच बदलून गेली. या नवप्रवाहांच्या धारेत आपली मते, आपले सिद्धान्त तपासून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. माणूस आणि त्याचे जीवन याबाबतच्या आकलनाची नवी दिशा गवसली.

अशा रीतीने वामन मल्हार ज्या कालखंडात उमेदीने कादंबरीलेखन

करीत होते तो कालखंड अनेक पातळ्यांवरील घटनाविचारांनी गजबजून गेलेला कालखंड होता. या कालखंडात घडलेल्या घटनांनी आणि प्रसृत झालेल्या विचारप्रवाहांनी आधुनिक सुशिक्षित मनात अनेकविध प्रश्नचिन्हे निर्माण केली होती. व्यक्तिमनात एक प्रकारचा गोंधळ, एक संदेह, एक कर्तव्याकर्तव्य-विचार उद्भवलेला होता. थोडक्यात म्हणजे आधुनिक शिक्षित व्यक्तींची अवस्था युद्धपूर्व अर्जुनाप्रमाणे शंकाकुल झालेली होती. वामन मल्हारांच्या जीवनदृष्टीत या साऱ्यांचे सादपडसाद उमटलेले आढळून येतात.

## व्यक्तित्व

वास्तविक पाहाता यापुढे येणाऱ्या 'तत्त्वचिंतन' व 'कादंबरीलेखन' या प्रकरणांतून वामन मल्हारांच्या व्यक्तिमत्त्वाची आपोआपच यथोचित ओळख होणार आहे. तरीही वामन मल्हारांचे व्यक्तिमत्त्व चिंतनशील का बनले, तसेच ते सहृदय आणि संवेदनशील कसे बनले, याची येथेच ओळख करून घ्यायला हवी.

वामन मल्हारांचे शिक्षण पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये झाले. या कॉलेज-मधील त्या काळच्या वातावरणाचा त्यांच्या व्यक्तित्त्वाच्या घडणीत महत्त्वाचा वाटा आहे. कॉलेजमधील मोकळे वातावरण, युरोपीय अध्यापकांचा उदार-मतवादी आणि विचारशील दृष्टिकोण यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर होई; तसा तो वामन मल्हारांच्या मनावरही झाला. तसेच कॉलेजमधील वातावरणामुळेच वामन मल्हारांना वाचनाची जबरदस्त सवय लागली. त्याचा परिणाम म्हणून त्यांचा वैचारिक व वाङमयीन पिंड पोसला गेला.

पुण्यात 19 व्या शतकाच्या अखेरीस आणि 20 व्या शतकाच्या प्रारंभी जे सामाजिक, राजकीय व शैक्षणिक वातावरण होते, त्याचाही परिणाम वामन मल्हारांच्या व्यक्तित्वघडणीत निश्चित रूपाने झाला. पुण्यात सुधारक व सनातनी या दोन्ही पक्षांचा जोर होता. दोन्ही पक्ष कडोविकडीच्या युक्तिवादाच्या साहाय्याने, शास्त्रप्रामाण्याच्या सय्याने वाद खेळत होते. राजकीय चळवळींना कमालीचा जोर आला होता. या साऱ्यांचा परिणाम होऊन सुरुवातीच्या काळात वामन मल्हारांचा पिंड राष्ट्रवादी बनला. काही काळ ते विजापूरकरांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते, ते यामुळेच. वेदोक्त प्रकरणी भोगलेल्या तुरुंगवासानंतर वामन मल्हार काही वर्षे 'केसरी-मराठा' संस्थेत व कोल्हटकरांच्या 'मेसेंज' मध्ये होते. या पत्रकारितेनेही त्यांना काही काही शिकवले.

त्यानंतर ते कर्वे यांच्या हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेत स्थिरावले. महिलांच्या संस्थेत राहिल्याने, तरुण सुशिक्षित मुलींत मिसळल्यामुळे त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण बदलत गेला, तो अधिकाधिक उदार होत गेला.

वामन मल्हार हे तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी व प्राध्यापक होते. त्यामुळेच की काय 'विचार' हा त्यांच्या प्रवृत्तीचा महत्त्वाचा विशेष बनला. हा विचार पुन्हा पारमार्थिक किंवा पलीकडच्या जगाचा न राहाता माणूस आणि त्याची सृष्टी यांच्या-संबंधीचाच विचार राहिला, हे महत्त्वाचे. मानवी जीवनाच्या अपूर्णतेकडून पूर्णतेकडे होणारा प्रवास ही त्यांच्या विचाराची कक्षा राहिली. याच वेळी हेही लक्षात घेतले पाहिजे की त्यांचे व्यक्तिमत्त्व ज्ञानलोभी होते. त्याचा परिणाम असा झाला की वामन मल्हार कोणत्याही एका विचारसरणीला बांधील राहिले नाही.त उलट एका विशिष्ट संदर्भात पटलेला विचार, मान्य झालेला विचार दुसऱ्या संदर्भात, वेगळ्या परिस्थितीत तितक्याच यथार्थतेने पटतो का ? लागू होतो का ? याचा शोध घेण्याची त्यांची सवय होती. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यामुळेच 'क्वेस्ट फॉर नॉलेज'ने युक्त होते; एखाद्या पुराण ज्ञानपिपासू, जिज्ञासू ऋषीप्रमाणे होते. साहजिकच कोणत्याही एका विचाराच्या बाबतीत ते कधीही आग्रही नव्हते. उलट विचाराची अधिकाधिक शुद्धता राखण्याच्या त्यांच्या अनाग्रही व प्रांजळ वृत्तीमुळे आणि कोणत्याही विचाराच्या साऱ्याच कक्षा सारख्याच सहानुभूतीने तपासण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांचे प्रतिपादन ठाशीव होत नसे. सत्यान्वेषी वृत्तीमुळे त्यांना असे ठाशीव किंवा घाईगर्दीचे निष्कर्ष काढणे मानवत नसे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सत्य, सौजन्य व सौंदर्य या त्यांनी स्वतःच प्रतिपादिलेल्या तत्त्वत्रयीचा आढळ होतो. या त्रयीच्या शोधामुळेच उपलब्ध जीवनवास्तवाच्या आधारे एक उच्च जीवनादर्श निर्माण करण्याची त्यांची सततची भूमिका राहिली. त्यांच्या ललितलेखनात या भूमिकेचे प्रतिबिंब सरळपणे दिसते. त्यांची भूमिका गुरुकुलातील आचार्यांसारखी सत्यान्वेषी नीतिचिकित्सकाची राहिली. त्या भूमिकेला समग्रलक्षी आकलनाची जोड देणेही त्यांना महत्त्वाचे वाटे. ज्ञान हे अमृत आहे, विष नव्हे, हे त्यांचे म्हणणे येथे मुद्दाम आठवावे.

वामन मल्हारांची स्वतःची अशी सौंदर्यकल्पना होती. तीत बाह्यांग सौंदर्यापेक्षा अंतरंग सौंदर्याला ते अग्रस्थान देताना दिसतात. हे त्यांचे अंतरंग सौंदर्य, विदग्ध कोटिक्रम, खेळकर वातावरण, प्रौढ विचार, प्रगल्भ धारणा,

सूक्ष्म अव्याज-मनोहर विनोद इत्यादींतून सतत पाझरत असे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व वैचारिक असून, पिंड तत्त्वचिंतकाचा असूनही ते कधी तर्ककर्कश, कठोर व करकरीत झाले नाही. उलट त्यांचे व्यक्तिमत्त्व रुचिर होते, काव्य-शास्त्रविनोदाने संपन्न होते, नवनवीन प्रवाहांबद्दलचे एक कुतूहल त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून सतत लुकलुकताना दिसे. त्यामुळे त्यांचे ललित व वैचारिक असे दोन्ही प्रकारचे लेखन मराठी वाचकाला सतत आस्वाद्य बनले आहे.

# प्रकरण दुसरे
# तत्त्वचिंतन

'एक थोर तत्त्वचिंतक', 'विचारवत', 'महाराष्ट्राचे सॉक्रेटीस' यासारखी बिरुदे महाराष्ट्राने वामन मल्हारांच्या लेखनारंभापासूनच त्यांना बहाल केलेली आहेत, इतकेच नव्हे, तर "वामन मल्हारांनी महाराष्ट्राला विचार करावयास शिकवले" असेही पुष्कळदा म्हणण्यात येते. महाराष्ट्रात तसे बरेच विचारवंत होऊन गेले. महाराष्ट्राला विचारवंतांचा प्रांत असेही म्हटले जाते. तथापि 'विचारवंत' ही पदवी प्रेमादराने व कौतुकाने वामन मल्हारांनाच का प्रदान करण्यात येते याचे रहस्य शोधल्याखेरीज विचारवंत किंवा तत्त्ववेत्ते या नात्याने त्यांनी केलेल्या कार्याचे मर्म व महत्त्व लक्षात येणार नाही.

इंग्रजी राजवटीच्या आगमनामुळे महाराष्ट्रात जी वैचारिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्रांती झाली, पारंपरिक तत्त्वविचारांना जी आव्हाने मिळाली, त्यातून वैचारिक क्षेत्रात बरीच खळबळ माजून राहिली. वामन मल्हारांच्या अगोदरच्या काळात आणि त्यांच्या समकालात पारमार्थिक भारतीय तत्त्वपरंपरा आणि इहवादी पाश्चात्य ज्ञानपरंपरा यांच्यात संघर्ष निर्माण झाला. प्रपंच–परमार्थ, इहवाद–पारलौकिकतावाद, नवे–जुने, व्यक्ती–समाज, राजकारण–समाजकारण, बुद्धी–भावना, साध्य–साधन, क्रांती–उत्क्रांती, प्रयत्नवाद-दैववाद, राष्ट्रवाद–विश्वकुटुंबवाद, नवी नीती–जुनी नीती, परंपरा–नवता यांसारखी द्वंद्वे उभी राहिली. यातून मार्ग काढण्यासाठी पारंपरिक भारतीय विचारांच्या जोडीने पाश्चात्य तत्त्वविचारांचाही परामर्श घेतला जाऊ लागला. शंकराचार्यांच्या जोडीने ॲरिस्टॉटल, सॉक्रेटीस, हेगेल, कांट किंवा मिल–स्पेन्सर यांचे तत्त्वज्ञान पारखले जाऊ लागले. पुढे या विचारमिश्रणाला रसेल, फ्रॉइड, मार्क्स यांच्या विचारांची जोड मिळाली.

या साऱ्याच जुन्यानव्या विचारवंतांच्या विचारांकडे वामन मल्हार जिज्ञासेने, कौतुकादराने व्रतस्थपणे पाहात. त्यातील आपल्या दृष्टीने, विशिष्ट

देशकालपरिस्थितीत योग्य ठरणारा जो भाग असेल, मग तो कितीही का क्रांतिकारक असेना, त्याचा ते निर्मळपणे व विवेकबुद्धीने स्वीकार करीत. या बाबतीत त्यांची वृत्ती स्फटिकाप्रमाणे शुभ्र व स्वच्छ होती. तीत आग्रही. पणाचा किंवा सांप्रदायिकतेचा अंशही नव्हता. होता होईल तों विविध विचारांचा वा वृत्तींचा समतोल किंवा समन्वय साधण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती; पण या बाबतीत पुर्नविचार करण्याची संधी मिळाल्यास ते तत्परतेने पुढे होत. ते एका बाजूने जेवढे आदर्शवादी होते तेवढेच दुसऱ्या बाजूने वास्तववादी व व्यक्तिवादीही होते. आत्मशोधाची, आत्मज्ञानाची, आत्मविकासाची ध्वजा उंचवर नेऊन फडकत ठेवण्यावर त्यांचा भर होता. विचारांच्या तात्त्विक काथ्याकुटापेक्षा त्या विचारांतील जीवनव्यवहाराला पोषक ठरणारी द्रव्ये ते तारतम्याने उचलीत. ते बहुश्रुत होते. पण पुस्तकी पांडित्यापेक्षा जीवनव्यवहाराला सुकर, सुभग करण्याकडे त्यांचा ओढा असे. त्यांचे साहित्य म्हणजे विचारक्षेत्रांतील एक यात्राच आहे. या यात्रेत त्यांना जे जे दिसले, भावले, जाणवले, प्रतीत झाले, ते ते त्यांनी सहृदयतेने, चिकित्सकपणे, स्वतःची व मानव-जातीची विचारग्रहणाची एकंदर मर्यादा लक्षात घेऊन नम्रपणे जिज्ञासूंसमोर ठेवले. याकरिता त्यांनी आपल्या वाचकांशी प्रांजळ संवाद साधण्याचा प्रयत्न केला.

वामन मल्हारांच्या लेखी विचारांच्या सामर्थ्याइतकेच विचारांच्या सौंदर्यालाही महत्त्व आहे. 'विचारसौंदर्य', 'विचारविलास' 'विचारविहार' यांसारखी त्यांच्या वैचारिक स्फुट–लेखसंग्रहांची नावे हेच सूचित करतात.

वामन मल्हारांच्या विचारांचा एकंदर पल्ला विश्वकुटुंबवादाला भिडत होता. तथापि त्यांच्यासमोर विचारविनिमयासाठी जो वाचकवर्ग होता, श्रोतृवर्ग होता, तो मुख्यतः समकालीन, सुशिक्षित, तत्त्वजिज्ञासू, सुसंस्कृत, सहृदय मनाचा महाराष्ट्रीय तरुण स्त्रीपुरुष वर्ग. या महाराष्ट्रीय सुशिक्षित समाजाच्या कौटुंबिक व सामाजिक अशा विविध प्रश्नांची तात्त्विक पातळीवरून त्यांनी आपल्या लेखनातून, भाषणांसंवादांतून सातत्याने चर्चा व चिकित्सा केली आहे.

वामन मल्हारांचा तत्त्वविचार हा 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त' किंवा आधुनिक सुशिक्षितांसाठी सांगितलेली गीता आहे. 'किंकर्मकिम्कर्मेति'च्या संदर्भात तत्कालीन विचारी सुशिक्षितांसमोर जी प्रश्नचिन्हे उभी होती, त्यातून मार्ग काढण्याच्या वृत्तीतून स्वकर्तव्याचें, 'स्वधर्मा'चें स्वरूप निश्चित करण्याच्या

वृत्तीतून वामन मल्हारांचे सारे लेखन व चिंतन प्रवाहित झालेले आहे. त्यांची या बाबतीतली भूमिका ही कठोर वृत्तीच्या गुरूची नसून स्नेहस्निग्ध मित्राची व डोळस मार्गदर्शकाची आहे. त्यांच्या या मार्गदर्शनपर लेखनात विश्लेषणाइतकाच संश्लेषणावरही भर आहे. विचारांच्या मार्गक्रमणाची निश्चित दिशा त्यांना प्राप्त झाली होती; किंवा सत्याचे अंतिम रहस्य त्यांना गवसले होते असे नाही. त्यांचा स्वतःचाही तसा दावा नाही. किंबहुना वामन मल्हारांची ख्याती विचारवंत म्हणून जशी आहे, तशीच 'संशयात्मे' म्हणूनही आहे. वामन मल्हारांच्या या विचारसंचलनाचे जे महत्त्व आहे ते विशिष्ट प्रकारच्या वैचारिक निष्कर्षांच्या संदर्भात नसून विचारप्रक्रियेचे त्यांनी जे स्वरूप स्पष्ट केले आहे, त्या प्रक्रियादर्शनात आहे. आपण निश्चित स्वरूपाचा एकही विचार देऊ शकलो नसलो, तरी विचार कसा करावा, या बाबतीत काही सांगू शकलो याचा त्यांना एक प्रकारचा अभिमान वाटतो व तो सार्थही आहे.

कोणताही विचारवंत किंवा तत्त्ववेत्ता घेतला तरी त्याच्या तत्त्वविचारांना उपलब्ध ज्ञान–विज्ञानाचा व प्रचलित जीवनसंदर्भाचा पाया असतो. मी कोण? माझे जीवनश्रेय कशात आहे? माझा व विश्वाचा संबंध काय? व्यक्ती या दृष्टीने माझे समाजाशी नाते कोणते? कुटुंबाविषयी माझे कर्तव्य कोणते? इत्यादी स्वरूपाचे जे जीवनसंलग्न प्रश्न उपस्थित होतात, त्यांना उत्तरे देण्याघेण्याच्या दिशेवरून त्या त्या तत्त्ववेत्त्याची वैचारिक दृष्टी व सृष्टी सिद्ध होत असते.

वामन मल्हार हे तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी व अध्यापक होते. त्यांच्या तत्त्वविचारांत भारतीय तत्त्वज्ञानाला योग्य ते स्थान आहे. भारतीय विचार-परंपरेबद्दल, तिच्या पावनत्वाबद्दल त्यांना सार्थ अभिमानही आहे. तरीही त्यांचे तत्त्वविचार मुख्यतः युरोपीय तत्त्ववेत्त्यांच्या व विज्ञाननिष्ठ, इहवादी आधुनिक विचारवंतांच्या जीवनविषयक तात्त्विक धोरणावर परिपुष्ट झालेले आहेत. त्यांना पाश्चात्य तत्त्वज्ञानातील मानवतावाद (त्याची विविध समाजशास्त्रीय अंगे), विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, विकासवाद, गतिशीलता, इतिहासक्रम, Greatest good of the greatest number, समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही इत्यादी विविध घटक मान्य आहेत.

वामन मल्हारांच्या अगोदरच्या काळात महाराष्ट्रात राष्ट्रवादी विचारांना सर्वाधिक प्राधान्य होते. स्वतः वामन मल्हारही आरंभी राष्ट्रवादी प्रवृत्ती-

कडेच झुकलेले होते. राष्ट्रीय चळवळीत ते काही काळ सहभागीही झाले होते; परंतु त्यांच्या राष्ट्रवादात तसा कडवेपणा नव्हता. त्याचे एक अग्र विश्व-कुटुंबवादाशी भिडलेले होते. त्यांच्या या विश्वकुटुंबवादाचे नाते केशवसुतांच्या 'नवा शिपाई' या सुप्रसिद्ध कवितेतील घोषणेशी निगडित करता येईल (अर्थातच 'नवा शिपाई'मधील ठाशीव आक्रमक बाणा वगळून).

वामन मल्हारांच्या तत्त्वविचारात अग्रस्थान आहे, ते व्यक्तीला, तिच्या सर्वांगीण विमोचनाला, वैध विकासाला व विलासाला. याचा अर्थ ही व्यक्तिवादी विचारसरणी अहंकेंद्रित किंवा सुखवादी (Hedonist) स्वरूपाची नाही. तिच्यात त्यागबुद्धीला, कर्तव्यभावनेला, शुद्धमनस्कतेला स्थान आहे. व्यक्तीचें सुख घेतले तरी जोंवर समाज सुखी होणार नाही, तोंवर व्यक्तीही दुःखीच राहाणार, असें वामन मल्हार निक्षून सांगतात. व्यक्तिसापेक्ष व्यक्तिहिताकडे त्यांचा अधिक ओढा आहे, हे खरे. पण त्याचबरोबर ते असेंही मानतात की व्यक्तीने आत्मविमोचनासाठी स्वतः होऊन प्रगल्भ प्रयत्न केल्या-खेरीज समाजाचे विमोचन होणार नाही. यासाठीच ते व्यक्तीच्या समाजसापेक्ष कर्तव्यभावनेला, समाजपरतेला अग्रस्थान देतात. समाजातील दुःखांनी ते व्यथित होतात; (या संदर्भात 'सुशीलेचा देव' या त्यांच्या कादंबरीतील "ही आमची समाज–व्यवस्था" हे प्रकरण पाहावे.) पण समाजविमोचनाचे नाते व्यक्तीच्या आत्मोन्नतीशी जोडतात; तिच्या आत्मोन्नतीवर ते भर देतात. "क्षुद्र सुखाविषयी वैराग्य प्राप्त होऊन सर्व जगताकडे समतेने व प्रेमदृष्टीने पाहणे आणि तदुन्नतीकरिता उत्साहपूर्वक अहर्निश प्रयत्न करणे याचेंच नाव आत्मोन्नती" अशी त्यांची आत्मोन्नतीची व्याख्या आहे.

वामन मल्हारांच्या लेखनातील 'Know thyself' चा सततचा सूर व त्यासाठी त्यांनी गायिलेले ज्ञानस्तोत्र या दृष्टीने महत्त्वाचे आहे. माणूस हा जात्याच जिज्ञासू व ज्ञानप्रवण आहे, यावर त्यांचा विश्वास आहे. त्यांनी वर्णिलेली ज्ञानमहती त्यांच्या "ज्ञान हे विष की अमृत" या लेखात प्रभावीपणे प्रकट झाली आहे. त्यांच्या सर्वच लेखनातून—मग ते ललित असो वा ललितेतर असो—या ज्ञानमहतीचा सातत्याने प्रत्यय येतो. "ज्ञान हेच उच्चतम आनंद देणारे आहे, ते संसाराला रमणीयता आणते, ते नीतिपोषक आहे, ते खऱ्या धर्माशी अविरोधी नव्हे तर अनुकूल आहें अशी माझी कल्पना आहे. आणि समजा, ज्ञान हे आनंददायक नाही, ते धर्माला पोषक नाही, असे ठरले तरी मी म्हणेन, "मला ज्ञान पाहिजे; मग धर्माचें वगैरे काय व्हायचें असेल ते होवो.

अज्ञानावर आधारलेला धर्म मला नको आहे." घोड्याच्या डोळ्यांना झापडी बांधून आणि सभोवती काय आहे, हे त्यापासून लपवून त्याला आखीव रस्त्यावरून आपण चालवितो त्याप्रमाणे माझ्यापासून परिस्थितीचें खरे ज्ञान लपवून मला जर कोणी परंपरेच्या आखीव रस्त्यावर नेऊ लागला, तर त्याविरुद्ध बंड करणे माझे कर्तव्यकर्म आहे असें मी समजेन. 'ज्ञानान्मोक्षः' असें शास्त्र सांगते, पण 'ज्ञानन्नरकः' अशी जरी मला कोणी धमकी दिली, तरी 'त्वमेव शरणं मम' असें मी ज्ञानालाच म्हणणार. अज्ञानात सुख असेल, पण ते सुख कमी दर्जाचें आहे. "Ignorance is bliss हे कोणाला? तर पशूंना. ज्ञानावरोबर जबाबदाऱ्या अधिक येतील, पापांची जाणीव अधिक तीव्र होईल, जाचक प्रश्न अधिक उत्पन्न होतील, तथापि ज्ञान तें ज्ञान; तें सोडून अज्ञानाची कांस धरणें विचारी माणसाला शक्य नाही."

एरवी सौम्य वाटणारे वामन मल्हार ज्ञानाचें स्तोत्र गाताना किती रंगून जातात, तल्लीन होतात, प्रसंगी किती अभिनिवेशपूर्ण बनतात, हें वरील उद्‌गारांवरून स्पष्ट व्हावें. ज्ञानावर घेतल्या जाणाऱ्या विविध आक्षेपांचें खंडन त्यांनी आपल्या या 'ज्ञान हे विष की अमृत?' या लेखात विस्ताराने केले आहे, आणि "ज्ञानापासून होणारा उच्च सात्विक आनंद जो आहे त्याची योग्यता फार मोठी आहे. प्रथमप्रथम कितीही असमाधान वाटले व क्षुद्र मनोविकारांना कितीही तीव्र अंजन मिळाले, तरी ज्ञानाच्या सात्विक आनंदाकरिता हे मूल्य दिलेच पाहिजे." असें या लेखाच्या समारोपात आग्रहपूर्वक प्रतिपादिले आहे.

वामन मल्हारांच्या या ज्ञानकल्पनेत वेदप्रामाण्याला किंवा ग्रंथप्रामाण्याला, आप्तवाक्याला तसें स्थान नाही. लो. टिळकांप्रमाणे त्यांची भूमिका 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' अशी नाही. त्यांचा भर बुद्धिवादावर आहे. मात्र त्यांचा बुद्धिवाद तर्ककर्कश किंवा कोरडा नाही. त्याला ते प्रसंगी प्रेमाची किंवा भावनेची जोड देतात. "अमूक गोष्ट चांगली किंवा वाईट, खरी किंवा खोटी, हे ठरविण्याची अंतिम कसोटी, शास्त्र किंवा आप्तवाक्य न मानता स्वतःची विवेकबुद्धी ही अंतिम कसोटी मानणे म्हणजे बुद्धिवादी असणे होय" असें त्यांना बुद्धिवादाबद्दल म्हटले आहे. पण त्यांच्या तत्त्वविचारात भावनेलाही स्थान होतें. केवळ विचाराने किंवा बुद्धिवादाने जीवनाचें सर्व प्रश्न सुटतील यावर त्यांचा विश्वास नाही. बुद्धिवादाला सात्विक भावनेची, सामाजिक दृष्टिकोणाची ते जोड देतात. त्यांच्या कादंबऱ्यांतून याचें प्रत्यंतर येते. बुद्धिवादाला प्रेमाची, 'Sweetness and light' ची जोड देण्याकडे वामन

11.7058

मल्हारांनी विशेष लक्ष पुरविले आहे.

गीतेतील 'स्थितप्रज्ञ' हा वामन मल्हारांचा आदर्श आहे. या स्थितप्रज्ञाची चित्रे 'आश्रमहरिणी'तील ऋषिमुनींच्या चित्रणातून किंवा 'रागिणी'-तील हिमालयावरील प्रियव्रम्हस्वामींच्या चित्रणातून आढळतात. या ऋषिमुनींची ज्ञानलालसा प्रखर असूनही ती मानवी स्खलनशीलतेकडे - अपूर्णतेकडे करुणार्द्रतेने पाहते. 'To understand all is to pardon all' असेंही एक तत्त्वसूत्र त्यांनी 'इंदू काळे व सरला भोळे' मध्ये प्रकट केले आहे. वामन मल्हार ज्ञानप्राप्ती हे मानवाचें अंतिम ध्येय मानतात. त्याचबरोबर हे ज्ञान कोरडें नाही; त्याला सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांची जोड देणे आवश्यक आहे, असेंही ते म्हणतात. यामुळेच त्यांचें कादंबरीविश्व विचारप्रधान असूनही ललितप्रचुर झाले आहे.

वामन मल्हारांच्या ज्ञानसंकल्पनेच्या वितरणात जरी भारतीय आध्यात्मिक परिभाषेचा अवलंब आढळत असला, तरी त्यांच्या ज्ञानविचारात सांप्रदायिक स्वरूपाच्या पारमार्थिक दृष्टिकोणाला बिलकूल स्थान नाही. दैनंदिन मानवी जीवनात भौतिक सुखसंपन्नता व मानसिक शांती कशी प्रादुर्भुत होईल व हे अपूर्ण जग पूर्णतेच्या दिशेने कशी वाटचाल करील, याचा विचार करण्यावर त्यांचा विशेष कटाक्ष आहे. यासाठी माणसाने कोणत्या ना कोणत्या ध्येयाची उपासना मनःपूर्वकतेने केली पाहिजे, असे ते सुचवितात; किंबहुना ध्येयाचीच देवाच्या ठिकाणी प्राणप्रतिष्ठा करून मोकळे होतात. 'ध्येय हाच देव' असें त्यांनी एका लेखात घोषित केले आहेच. या आपल्या लेखातील विचारांचें उद्घाटन त्यांनी पुढे 'सुशीलेचा देव' या कादंबरीतही केले आहे. वामन मल्हार पारंपरिक वा सांप्रदायिक अर्थाने देव मानत नाहीत. ते स्वतःला या बाबतीत आगरकर पंथातील विवेकवादी म्हणवितात. ते देव मानत नसले तरी त्यांचा मानवी जीवनातील सदांशावर भरवसा आहे. 'ध्येय हाच देव' या लेखात त्यांनी प्राचीन व आधुनिक देवकल्पनांचा परामर्श घेतला आहे आणि सांकेतिक देवकल्पनेमुळे मनुष्य दैववादी, स्थितिशील बनतो; असल्या देवकल्पनेने कधी कधी मानवी उन्नयनात अडथळेच निर्माण होतात; म्हणून मानवी प्रयत्नाला, मानवी जीवनाला उत्तेजित करणारा आणि मानवी सद्गुणांना विकसित करणारा ध्येय नामक देवच त्यांनी संमत मानला आहे. "आपापले जे ध्येय असेल त्याची काया-वाचा-मनेकरून पूजा करणाऱ्यांना किंवा करू पाहाणाऱ्यांना मी आस्तिक समजतों", असें ते म्हणतात. "देवावर विश्वास

असणाऱ्यांना जो सात्त्विक आनंद मिळतो त्या प्रकारचा आनंद ध्येय मानणाऱ्यांनाही होतो; किंबहुना हा आनंद अधिक उच्चतर असतो," असेही त्यांनी त्याच लेखात म्हटलेले आहे. 'ध्येये म्हणजे दुःखे' असे एक विधान 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीत येते. पण तेथेच वामन मल्हारांनी असाही निर्वाळा दिला आहे की ध्येयासाठी दुःख भोगण्यात उच्चतर आनंद आहे. विशिष्ट प्रकारचा देव मानण्यापेक्षा मानवातील "देववृत्ती" जागृत करण्यावर वामन मल्हारांचा भर आहे.

वामन मल्हार हे सांप्रदायिक अर्थाने निरीश्वरवादी असले तरी तुच्छतावादी नाहीत. जगात बरीच दुःखे आहेत, हे जग अपूर्ण आहे, माणूस स्खलनशील प्राणी आहे, हे त्यांना मान्य आहे; पण त्याचबरोबर जग हे विकसनशील, आनंदमय आहे, माणूस मूळचा सत्प्रवृत्त आहे, जिज्ञासू आहे, ज्ञानाभिलाषी आहे, यांवरही त्यांचा दृढ विश्वास आहे. मानवी जीवनातील बरीचशी दुःखे अज्ञानातून, गैरसमजातून, स्वार्थबुद्धीतून निर्माण होतात, असा वामन मल्हारांचा अभिप्राय आहे. ते वृत्तीने विश्वकुटुंबवादी असले तरी या कल्पनेचा विकास देशकालपरिस्थितिसापेक्ष असतो याचें भानही ते बाळगतात. व्यक्तीनें आपले ध्येय किंवा स्वधर्म ठरविताना स्वप्रकृतीबरोबरच देशकालपरिस्थितीचा विचार करून तो नियत केला पाहिजे, असें ते कटाक्षाने सांगतात. त्यांचा विचारांचा केन्द्रबिंदू 'स्वधर्म' हा आहे. त्यांची सर्व विचारसरणी कार्याकार्यविवेकयुक्त अंतःकरणप्रवृत्तीनुसार निवडलेल्या स्वधर्माशी संबंधित आहे. देव=ध्येय=स्वधर्म, असें त्यांच्या विचारांचें समीकरण मांडता येईल. "आपले शुद्ध मन आपल्याला जे कर्तव्य म्हणून सांगते ते करावे; ते नेहमी करीत राहाण्यात जो आनंद, तो खरा आनंद; तोच नित्य, शाश्वत आनंद; तेच निःश्रेयस सुख; तोच स्वर्ग आणि तेच आत्म्याचें अमरत्व," हे 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतील उद्गार वामन मल्हारांची स्वधर्मकल्पना पुरेशी स्पष्ट करणारे आहेत. 'रागिणी'मधील "जीवित आनंदात जाणार की दुःखात हा प्रश्न अगदीच गौण नाही का? कर्तव्यकर्म आपण करतो की नाही, आपले ज्ञान व सौजन्य वृद्धिंगत होत चालले आहे किंवा नाही, हाच मुख्य प्रश्न आहे," हे प्रियब्रह्मस्वामींचे उद्गारही या संदर्भात चिंतनीय आहेत. वामन मल्हारांना अभिप्रेत असलेला 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त' असें ज्याला म्हणता येईल तो हाच.

वामन मल्हारांनी धर्माची व्याख्या शुद्धबुद्धीशी संबंधित केली आहे

आपल्या 'नीतिशास्त्रप्रवेश' या ग्रंथाच्या समारोपात ते म्हणतात, "तार्किक ज्ञान हे धर्मनिष्ठेचें शरीर आहे. भावनेच्या तेजस्वी ज्योतीने हे ज्ञानात्मक शरीर व्यापले व ते आपलेसें करून टाकले, म्हणजे मग या अवस्थेला आपण **धर्म** ही संज्ञा देतो."

वामन मल्हारांचा हा शुद्धबुद्धियुक्त स्वधर्म म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा, त्यांच्या त्यांच्या कर्तव्यपालनाचा धर्म. व्यक्तीने हा 'स्वधर्म' कसा ओळखावयाचा? हा धर्म निश्चित करण्याची गुरुकिल्ली कोणती? कार्याकार्य-विवेक कशाच्या आधारे साधावयाचा? यांसारख्या गोंधळात टाकणाऱ्या प्रश्नांचा विचारही त्यांनी केला आहे. बुद्धी विवेकी, विचारी, शांत, निःस्वार्थ, शुद्ध होण्याच्या व कर्तव्याची दिशा योग्य त्या प्रकारे आत्मसात होण्याच्या दृष्टीने सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांची जी उपासना वामन मल्हारांनी सुचविलेली आहे, ती लक्षणीय आहे. त्यांच्या विचारसृष्टीत व कलोपासनेत या तत्त्वत्रयीला किंवा मूल्यत्रयीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

'Beauty, Truth, Goodness' ही त्रयी सुप्रसिद्धच आहे. या तिन्हींची उपासना ही मानवी जीवनाचें महत्त्वाचें व अंतिम मूल्य मानण्यात येते. या त्रयीपैकी सत्य (Truith) व सौंदर्य (Beauty) यांचा अंतर्भाव वामन मल्हारांनी आपल्या तत्त्वत्रयीमध्ये केलेला आहेच. त्यांच्या सौजन्यकल्पनेचा संदर्भ Goodness शी आहे, असें म्हणता येईल. मात्र या (सत्य–सौजन्य–सौंदर्य) तत्त्वत्रयीला त्यांनी जो विशिष्ट क्रम दिला आहे, तो विचारात घेण्यासारखा आहे. त्यांनी सत्य आणि सौंदर्य यांच्या मध्यभागी सौजन्याची स्थापना केली आहे. वामन मल्हार सत्य, सौजन्य व सौंदर्य या तिन्ही तत्त्वांचें उपासक आहेत. पण सौजन्य हा त्यांच्या प्रकृतीचा स्थायिभाव आहे.

जीवनाचें चिरमंगलत्व, चिररुचिरत्व या तत्त्वत्रयीशी संबंधित आहे. ही तत्त्वत्रयी बाह्यतः वेगवेगळी दिसली तरी ती परस्परपूरक आणि परस्पर-सापेक्ष आहे, अंतिमदृष्ट्या एकच आहे, असें वामन मल्हारांचें प्रतिपादन आहे. यातील प्रत्येकाचा दुसऱ्याशी जिव्हाळ्याचा संबंध येतो, असें ते म्हणतात. पण या तत्त्वत्रयीत सौजन्याला मधले स्थान देण्याचें महत्त्वाचें कारण सौजन्या-मुळे सत्याचें व सौंदर्याचें आकलन होण्यास मदत होते, हे होय. वामन मल्हारांचा तसा दृढ विश्वास आहे. सौजन्यामुळेच सत्य सुंदर बनले व सौंदर्य रुचिर होते, म्हणून वामन मल्हार सौजन्याला विशेष महत्त्व देताना दिसतात.

वामन मल्हारांची ही तत्त्वत्रयी त्यांच्या जीवनविचाराप्रमाणेच त्यांच्या साहित्यविचारातही प्रकट झाली आहे. साहित्याचें प्रयोजन व अंतिम मूल्यही ते या तत्त्वत्रयीच्या उपासनेच्या आधारेच निश्चित करतात.

वामन मल्हारांच्या सत्यविषयक विचारात जरी वैज्ञानिक पद्धतीला आणि बुद्धिप्रामाण्याला प्राधान्य असले तरी शास्त्रांची वाढ अपुरी असल्यामुळे आणि तार्किकतेला स्वतःसिद्ध मर्यादा असल्यामुळे शास्त्र व तर्क यांच्या जोडीने सत्यशोधनाला शुद्ध अंतःकरणप्रवृत्तींचीही जोड दिली पाहिजे असें त्यांचें म्हणणे होते, हे यापूर्वीच सूचित केलेले आहे, सत्यामध्ये स्वतःसिद्ध असें एक पावित्र्य असते, असेंही ते मानतात. प्रतीत झालेल्या सत्याची प्रल्हादाप्रमाणे उपासना करण्याचा आदेश त्यांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून साहित्य-भक्तांना दिला आहे.[7] मात्र या सत्याचें प्रतिपादन करताना देशकालपात्र-परिस्थिती यांचाही विचार केला पाहिजे, असें ते म्हणतात. सत्याचें आकलन अयोग्य प्रकारे झाल्यास तो विस्तवाशी खेळ ठरतो असा एक इषाराही त्यांनी आपल्या 'विस्तवाशी खेळ' या नाटकाद्वारे दिलेला आहे.

सत्य कितीही श्रेष्ठ असले तरी ते पेलण्याची क्षमता समोरच्या व्यक्तीला कितपत आहे, हेही पाहिले पाहिजे. ज्याला जेवढे ओझे सहन होईल तेवढेच त्याला दिले पाहिजे. या विवेकाचेंही वामन मल्हारांना अवधान आहे. सत्य हे अंतिमतः एकात्म व अविभाज्य असते तरी त्यातही तरतमभाव बाळगावा लागतो, पूर्ण सत्य व एकांगी सत्य असें वर्गीकरण करावे लागते, असें वामन मल्हार सुचवितात. "आत्म्याचें पूर्ण समाधान होईल, ते पूर्ण सत्य व ज्याच्या योगाने आत्म्याच्या एकांगाचेंच पूर्ण समाधान होईल ते एकांगी सत्य" असें एक विधान 'नीतिशास्त्रप्रवेशा'मध्ये त्यांनी केलेले आहेच.[8] सत्याला अनेक पैलू असतात, त्याची प्रतीती प्रकृतिभिन्नतेनुसार काही अंशी का होईना, भिन्नभिन्नच राहाणार; हे ओळखूनच त्याप्रमाणे जीवनव्यवहार करणे योग्य, असें वामन मल्हार सुचवितात, सांगतात.

सत्याप्रमाणेच वामन मल्हार शिवत्वाचा, नीतीचा संबंधही शुद्धमनस्कतेशी जोडतात. नीतीचें बीज प्रेम हे आहे, असे त्यांनी म्हटलेले आहे. त्यांच्या 'नीतिशास्त्रप्रवेश' या ग्रंथात नीतीच्या विविध संकल्पनांचा ऊहापोह येतो. या ऊहापोहानंतरच त्यांनी 'नीतीचें बीज प्रेम' हा निष्कर्ष काढलेला आहे. नीतीचा उद्देश आत्मपरीक्षा करून योग्यायोग्य ठरविणे हा आहे. नीतीचा संबंध बाह्य

कर्मकांडांशी नसून तो अंतःशुद्धीशी आहे. नीती कोरडी असू नये; तीत कारुण्यवुद्धी हवी, असे वामन मल्हारांचे म्हणणे.

नैतिकता व रूढ धर्मविचार यांत वामन मल्हार फरक करतात. या संदर्भात जुन्या पारंपरिक नीतिविचारांवरोबरच ते परंपराविरोधी असे जे नीतिविचार 1930 नंतर रसेल–फ्रॉइड–प्रभृतींनी रूढ केले त्यांचाही विचार वामन मल्हारांनी प्रसंगोपात् केला आहे. 'विचार-विहार' या त्यांच्या पुस्तकातील "नवमतवादाविषयी माझे काही विचार" हा त्यांचा लेख या दृष्टीने महत्त्वाचा आहे. नीतिविषयक नव्या कल्पना कितीही क्रांतिकारक असल्या तरी वामन मल्हार त्यांमुळे विचकून जात नाहीत. त्यांचाही ते मनःपूर्वकतेने व प्रांजलपणे विचार करतात. त्यातील योग्यायोग्य ते पारखतात. सांप्रदायिक नीती व उच्चतर नीती असा भेद करून नव्या कल्पना जर उच्चतर नीतीला पोषक असतील, जीवनकल्याणाच्या दृष्टीने इष्ट असतील तर ते त्यांचा थेटपणे स्वीकार करतात. नवनीतिविषयक विचारात स्त्रीपुरुष नात्यासंबंधी जे नवविचार आहेत, त्यांचा योग्य तो आदर व स्वागत वामन मल्हारांनी केले आहे. या नात्यातील खऱ्या नीतीचे सूत्र पुन्हा 'सुशीलेचा देव' या कादंबरीत येते. स्त्रीपुरुष नात्यातील बाह्यतः असांकेतिक वाटणारे धागे खऱ्या नीतीच्या दृष्टीने कसे योग्य असतात, याची दखल त्यांनी आपल्या 'स्मृतिलहरी'तूनही घेतलेली आहे.

मात्र त्यांच्या या नवनीतिसमर्थनात मूर्तिभंजनासाठी मूर्तिभंजन असा पवित्रा नाही. परंपरेतील जे सुंदर, पवित्र किंवा उदात्त आहे, ते त्यांना स्वीकरणीय, आदरणीय वाटते. उदाहरणार्थ, विवाहसंस्था. या संस्थेतील प्रौढविवाह, पुनर्विवाह, प्रेमविवाह इत्यादी प्रकार त्यांना मान्य असले तरी या सर्वांत विवाहसंस्थेचे पावित्र्य जपले पाहिजे असे त्यांना मनःपूर्वक वाटते. 'आश्रमहरिणी'तील सुलोचनेचा दोन पतींशी होणारा संसार वाह्यतः कितीही विचित्र वाटला, तरी विशिष्ट परिस्थितीत तो पवित्र व कल्याणप्रद कसा ठरतो, हे स्पष्ट केले आहे. सामान्य परिस्थितीत वापरावयाचे नियम व अपवादात्मक परिस्थितीत वापरावयाचे नियम असा ते या बाबतीत फरक करतात. प्रसंगी नियमांचे उल्लंघन ते मान्य करतात. पण अकारण मोडतोडीला त्यांची मान्यता नाही. परंपरेच्या विचाराच्या दृष्टीने 'विवाहित स्त्रियांची कर्तव्ये' हा 'विचार-लहरी' तील लेख पाहाण्यासारखा आहे.

वामन मल्हारांना अभिप्रेत असलेल्या सौजन्याबाबत त्यांनी पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत, "सत्याप्रमाणेच सौजन्याचें परमतत्त्व आपणास हस्तगत झालेले नाही. ते देशकालपरिस्थितिसापेक्ष असते. देशकालाप्रमाणे त्याला निरनिराळा आकार व रंग येतो व ते निरनिराळ्या क्रियांच्या द्वारा व्यक्त होते. कधी रक्तस्राव करण्यात सौजन्य प्रतीत होते, तर कधी रक्तस्राव थांबविण्यात. सौजन्याची यामुळे निश्चित अशी एकच एक व्याख्या करता येत नाही. ते खऱ्या नीतीशी, प्रेमाशी संबंधित असते."[9]

वामन मल्हारांची सौंदर्यासंबंधीची भूमिका पाहताना ते स्वतंत्र सौंदर्यमूल्य मानीत नसल्याचें दिसते. सत्य हे जात्या सुंदर नसते, असें जरी काही संदर्भात ते म्हणत असले (उदा. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांचा त्यांनी केलेला विचार) आणि सौंदर्यकल्पनेत प्रमाणबद्धता, सौष्ठव इत्यादी घटकांचा अंतर्भाव ते करीत असले, तरी त्यांच्या सौंदर्यविचारात बाह्याकारापेक्षा आंतरिक शुचितेला महत्त्व आहे. म्हणूनच त्यांना वेश्यावृत्तीची सुंदर स्त्री तिरस्करणीय वाटते. आणि बाह्यतः असुंदर वाटणाऱ्या शीलवतीचें आंतरिक सौंदर्य मोह घालते. त्यांचा कला-नीतिविचारही याच दृष्टीने प्रगत झाला आहे.

वामन मल्हारांच्या तात्त्विक विचारांचा मागोवा घेताना प्राथमिक स्वरूपाच्या काही अडचणी उद्भवतात. त्यांनी आपली विचारसरणी मांडण्यासाठी एकसंध स्वरूपाचें लेखन –'नीतिशास्त्रप्रवेश' हा ग्रंथ वगळता–केलेले नाही. त्यांच्या कादंबऱ्यांतील विचारप्रकटन हे ललितग्रंथांचा भाग असल्याने त्यांचा फार स्वतंत्रपणे विचार करता येत नाही. त्यांचा 'सॉक्रेटिसाचें संवाद' हा ग्रंथ एकसंध असला तरी अनुवादात्मक आहे. त्यांचें थोरले बंधू महादेव मल्हार जोशी यांच्या 'आधुनिक सुशिक्षिताचा वेदान्त' या ग्रंथाच्या पुरवणीत त्यांनी मांडलेले विचार स्वतंत्र म्हणण्यापेक्षा प्रतिक्रियात्मक स्वरूपाचें आहेत. त्यांच्या विचारधनाचें स्वरूप पाहाण्यासाठी 'विचार-विलास', 'विचार-सौंदर्य', 'विचारलहरी' या स्फुटलेखसंग्रहांचाच मुख्यतः आधार घ्यावा लागतो. या संग्रहांतील त्यांचें विचार प्रसंगाप्रसंगाने प्रकट झालेले असल्यामुळे कांही वेळा त्यात पाल्हाळ व पुनरुक्ती डोकावते. तथापि कोणताही जुनानवा विचार असला तरी प्रत्येक वेळी वामन मल्हार त्याचा मूलगामी पद्धतीने व उपलब्ध ताज्या ज्ञानाच्या प्रकाशात विचार करीत असल्यामुळे त्यात काही ना काही नवे आढळतेच. त्यांची विचाराकडे पाहण्याची दृष्टी वेदाभ्यासजड नसून रसिक क्रीडाकौतुकाची असल्यामुळे या विचारदर्शनात एक सौंदर्यही स्वाभाविकपणेच

अवतरते. वामन मल्हारांची चिकित्सावृत्ती इतरांप्रमाणे स्वतःलाही चिकित्सा-विषय बनविते हे विशेष. सॉक्रेटिस हा त्यांचा आवडता लेखक व 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' हा त्यांचा आवडता तत्त्वग्रंथ. तथापि या दोहोंकडे ते कौतुकादराने पण चिकित्साबुद्धीने पाहातात. या त्यांच्या चिकित्सावृत्तीतून लो. टिळकांचें 'गीतारहस्य'ही सुटलेले नाही. ते काही काळ लो. टिळकांच्या सहवासात आले असले, तरी वृत्तितः ते गोपाळ गणेश आगरकरांना जवळचें होते. महाराष्ट्रीय विचारवंतांत त्यांना स्वतःला आगरकर हेच विशेष जवळचें वाटतात. स्वतःला ते आगरकर संप्रदायाचें विवेकवादी म्हणवून घेत. सत्यनिष्ठा, तत्त्वजिज्ञासा, समाजचिंतन, बुद्धिप्रमाण्य, शुद्ध चारित्र्य इत्यादी बाबतीत उभयतांत खूपच साम्य आहे. तथापि आगरकरांच्या जीवनातील आचार-सामर्थ्य वामन मल्हारांजवळ नाही. वामन मल्हारांनी आचारापेक्षा उच्चारावरच स्वतःचें समाधान मानून घेतले. स्वतःच्या मर्यादांचा त्यांना कधीच विसर पडला नाही. 'विचार-सौंदर्य'मधील "मी व माझे टीकाकार" या लेखात ते स्वतःला क्रमवादी क्रांतिकारक म्हणवून घेतात.

वामन मल्हार हे स्वतंत्र तत्त्ववेत्ते नव्हेत; पण निःसंशयपणे ते तत्त्वविचारांचें श्रेष्ठ शिक्षक आहेत, यात शंका नाही. आदर्श शिक्षकाची सर्व गुणवत्ता त्यांच्या ठिकाणी एकवटली आहे. यामुळेच 'वामन मल्हारांनी महाराष्ट्राला विचार करायला शिकवले', असें जे म्हटले जाते, ते सार्थ वाटते. "माझ्या अनुभवांचें व विचारांचें सार" या 'विचार-लहरी'तील आपल्या लेखात वामन मल्हारांनी "ज्याने त्याने आपल्या प्रामाणिक समजुतींना धरून वागावे; इतरांच्या प्रामाणिक समजुतींबद्दल आदर बाळगावा," असें म्हटले आहे. त्यांचें स्वतःचें आचरण आयुष्यभर या सूत्राला धरूनच झाले. त्यांच्या वैचारिक साहित्याच्या वाचनाने तसें करण्यास व स्वतंत्रपणे सत्याचा धीट मागोवा घेण्यास महाराष्ट्राला त्यांनी उद्युक्त केले, हे त्यांचें विचार-क्षेत्रातील कार्य कधीही न विसरण्यासारखे आहे.

या प्रकरणाचा समारोप करताना वामन मल्हारविषयक एका आक्षेपाचाही थोडक्यात विचार करणे इष्ट ठरेल. वामन मल्हारांच्या वैचारिक क्षेत्राकडे पाहाण्याच्या अभिजात, निर्मळ वृत्तीचें कौतुक होऊनही त्यांना 'संशयात्मा' असें दीर्घकाल संबोधिले गेले. पक्षोपपक्षांच्या कडव्या युद्धपवित्र्याच्या काळात वामन मल्हार वावरत होते. पक्षभेद असावेत, पण पक्षद्वेष असू नये असें ते कितीही कंठरवाने सांगत असले तरी त्यांचें हे सांगणे त्या काळातील

मतामतांच्या गलबल्यास मानवण्यासारखे नव्हते. म्हणूनच या मंडळींनी प्रांजळ आत्मपरीक्षण न करता स्ववैगुण्याकडे दुर्लक्ष करून वामन मल्हारांकडेच आपला मोहरा वळविला आणि त्यांनाच संशयवादी ठरविण्याचा प्रयत्न केला. वास्तविक वामन मल्हार विचारांच्या आवर्तात गोंधळून गेलेले नव्हते. त्यांच्या विचारात सांप्रदायिकता नव्हती, हे खरे आहे. ती नसावीच असाच उलट त्यांचा आग्रह होता. विचार करण्याच्या पद्धतीबाबतही त्यांचा संभ्रम केव्हाच झाला नाही. लेखनाच्या आरंभापासून अखेरीपर्यंत त्यांच्या विचारप्रक्रियेत एक सूत्रबद्धता आहे. विचाराच्या सर्वांगीण कक्षा लक्षात घेऊन, त्यातील गुंतागुंत ध्यानी घेऊन निर्णय घ्यावा; कारण नसता कोणतेही निष्कर्ष घाईगर्दीने काढू नयेत, अशी वामन मल्हारांची दृष्टी होती, शिकवण होती. यासाठी त्यांच्यासारख्या प्रांजळ विचारवंताचे कौतुकच केले पाहिजे. संशयवादी ठरवून त्यांची विचार करण्याची दृष्टी दुर्लक्षिणे आत्मघातकीपणाचे ठरते.

वामन मल्हारांच्या या संशयवादाला दुसरीही एक बाजू आहे. प्रचलित ज्ञानाबद्दल शंका घेणे, त्या ज्ञानाच्या अनुषंगाने नवे प्रश्न उपस्थित करणे, त्या ज्ञानाच्या सुप्त वा प्रकट पैलूंचा अधिक ऊहापोह करणे, त्याची दुसरी बाजू पाहाणे, प्रचलित ज्ञानव्यूहातील विसंगती वा मर्यादा स्पष्ट करणे असाही 'संशयवादा'चा अर्थ होतो. या प्रकारची संशयवृत्ती (Questioning attitude) नवज्ञानाला प्रेरक आणि पोषकच ठरत आली आहे. ती नवज्ञानाची गंगोत्री ठरली आहे. नव्या काळातील तरुण विचारवंतांना वामन मल्हार त्यांच्या या वृत्तीमुळेच सर्वाधिक जवळचे वाटत आले आहेत; पुढेही वाटत राहातील. स्वतः वामन मल्हारांनी आपल्यावरील या आक्षेपाचे खंडन पुढील शब्दांत केले आहे :

"कोणत्याही विषयाच्या सर्व बाजूंचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याची व असा विचार करण्यास लावण्याची माझी वृत्ती आहे. तिचे महत्त्व अद्यापि पुष्कळ लोकांना कळलेलेच नाही. 'संशयात्मा विनश्यति' हे मला माहीत आहे. पुष्कळ वेळा निश्चयात्मक वृत्ती स्वीकारावी लागते व त्याप्रमाणे वागावे लागते, हेही मला समजते, इतकेच नव्हे, तर त्याप्रमाणे मी वागतोही. व इतरांस वागण्यास सांगतोही......पण असे काही नसता, अनिर्णित स्थितीच वाईट, सर्वांगीण विचार म्हणजे विकार, अनिश्चय म्हणजे अर्धवटपणा, अशा प्रकारची विचारसरणी स्वीकारून घाईने निश्चय करणे, हे मी पाप समजतो. काही गोष्टी अद्यापि अनिर्णित अवस्थेत आहेत. त्याबद्दल निर्णयात्मक मत

देण्याची जरूर नसता, भरभक्कम पुराव्याअभावी निर्णयात्मक मत ठोकून देणे मी पापस्वरूप समजतो.''[10]

## संदर्भ


1. "ज्ञान हे विष की अमृत?" **विचार-विलास** (आ. 2 री), पुणे. पुणे येथील 'सारस्वत मंडळां'पुढे व मुंबई येथे एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये दिलेल्या व्याख्यानांच्या आधारे लिहिलेला लेख.
2. "नवमतवादाविषयी माझे स्फुट विचार," **विचार-विहार** (आ. 2 री), पुणे, 1954, पृ. 11.
3. "ध्येय हाच देव", **विचार-विहार,** पृ. 58–73.
4. **तत्रैव,** पृ. 67.

   येथेच लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे. 'सुशीलेचा देव' या कादंबरीतील चोविसाव्या प्रकरणात सुशीलेच्या तोंडून या अर्थाचे व्याख्यान आले आहे. 'आम्ही नास्तिक का तुम्ही नास्तिक?' या प्रश्नाला उत्तर देताना "विश्व-कुटुंबाचे ध्येय ठेवणारे, तत्प्रीत्यर्थ परिश्रम करणारेच खरे आस्तिक" असे म्हटले आहे
5. **तत्रैव,** पृ. 69.
6. 
7. **विचारसौंदर्य,** पृ. 69
8. **नीतिशास्त्रप्रवेश,** पृ. 275.
9. **विचारसौंदर्य** पृ. 72.
10. "मी व माझे टीकाकार", **विचारसौंदर्य**.

# प्रकरण तिसरे

# कादंबरीलेखन

एक विचारवंत किंवा तत्त्वज्ञ म्हणून जशी वामन मल्हारांची ख्याती आहे तशीच ती मराठीतील एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणूनही आहे. हरि नारायण आपटे यांच्यानंतरचे ते मराठीतील एक लक्षणीय कादंबरीकार होत. हरि नारायणांच्या पाठोपाठ येणारे युग हे 'रागिणी'कर्त्या वामन मल्हार जोशींच्या नावानेच ओळखले जाते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी वामन मल्हारांना मराठीतील 'तात्त्विक कादंबरीचे जनक' मानले आहे. कारण तत्त्वचर्चात्मक कादंबऱ्यांची सुरुवात वामन मल्हारांपासूनच झालेली आहे.

वामन मल्हारांपूर्वीच हरि नारायण आपटे यांनी मराठी कादंबरीला वाङमयप्रकार म्हणून एक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. "कादंबरीच्या निर्मितीच्या उत्कट इच्छा हरिभाऊंच्या मनात वास करीत असल्यामुळे पाश्चात्य कादंबऱ्या वाचून कादंबरीचें कादंबरीत्व कशात असते ते शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला" आणि त्यात ते यशस्वीही झाले.[1] जे अभिव्यक्त करावयाचें तें सुरूपतेनें अभिव्यक्त करण्यात हरिभाऊंमधील कलावंत जागरूक होता. मराठी कादंबरीच्या ऐन वयात येण्याच्या काळात हरिभाऊंनी तिला आशय-अभिव्यक्तीच्या दृष्टीने रूपवान बनविले. त्यांनी जीवनवास्तवावर भर देणारी कादंबरी लिहिली आणि मराठी कादंबरीतले 'हरिभाऊ युग' सुरू झाले.

परंतु वामन मल्हार या 'हरिभाऊ युगा'च्या छत्राखाली गेले नाहीत. हरिभाऊंनी सिद्ध केलेले मराठी कादंबरीचें रूप न स्वीकारता वामन मल्हारांनी आपल्या कादंबरीलेखनात 'स्व'–तंत्र अवलंबिले. वामन मल्हारांच्या तत्त्वजिज्ञासू व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्यांची वाङमयविषयक धारणाही याला काही प्रमाणात कारणीभूत आहेसें दिसते. "असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणे व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणे." हे वामन मल्हारांना लेखकाचे 'अवतारकृत्य' वाटते.[2] "ज्या कलावंताला काहीएक

सांगावयाचे नाही, ज्याच्याजवळ सांगण्यासारखे काही नाही, त्याची कला लहान मुलाच्या रबरी फुग्यासारखी दिसण्यास सुंदर पण अगदी पोकळ असेल." असा वामन मल्हार दृष्टिकोण बाळगतात.[3] एवढेच नव्हे, तर "वाङ्मयात्मक कलेचा ज्ञानाशी आणि नीतीशी अत्यंत निकट, गुंतागुंतीचा व जिव्हाळ्याचा संबंध आहे", असेही ते निश्चयाने सांगतात.[4] अशा रीतीने 'जगातील दुःखाची कहाणी' समाप्त करणे आणि 'दैवी संपत्ती'चे जगात साम्राज्य निर्माण करणे अशांसारखी वाङ्मयाची ध्येये वामन मल्हार मानतात. ते साहित्यकलेचे महत्त्व निःसंशय जाणतात, पण त्याचबरोबर "जीवन हे केवळ कलात्मक नाही", तर "जीवनात ज्या अत्यंत रम्य आणि वंद्य गोष्टी आहेत, त्यांत कलेबरोबरच नीतीचा आणि सत्याचाही समावेश होतो." अशीही त्यांची धारणा आहे. अशा रीतीने वामन मल्हारांची कादंबरी–लेखनामागील भूमिका ही हरि नारायणांप्रमाणे केवळ जीवनवास्तवावर भर देणारी नाही, तर उच्च जीवनादर्शाची निर्मिती करण्याची, त्यांची चिकित्सा करण्याची आहे.

ज्ञान आणि रंजन ही कादंबरीची दोन वैशिष्ट्ये मराठी कादंबरीच्या जन्मापासूनच मान्यता पावलेली होती; परंतु वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांमध्ये याहूनही अधिक काही आहे. त्यांच्या कादंबऱ्यांत आकर्षकपणा आहे; पण त्याला मनोरंजन असे उथळ नाव देता येणार नाही. त्यांच्या कादंबऱ्यांच्या वाचनाने म्हटले तर ज्ञानप्राप्ती होतेही. पण ही ज्ञानप्राप्ती त्यांच्या पूर्वीच्या किंवा समकालीन मराठी कादंबरीत जशी उपदेशप्रचुरतेतून किंवा आदेशात्मकतेतून येते, तशा स्वरूपाची नाही. ती त्यांच्या कादंबरीच्या अंगभूत चिंतनपरतेतून होते. या चिंतनपरतेतून विचाराला प्राप्त होणारे निरनिराळे पैलू, दिशा, कोन स्पष्ट करून वाचकाला अंतर्मुख करणे, हे वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी त्यांनी गुंतागुंतीच्या तात्त्विक विचारांचा ललित पद्धतीने अनेकांगी परामर्श आपल्या कादंबऱ्यांतून सातत्याने घेतला. यासाठी त्यांनी तंत्राचे नवनवीन प्रयोग केले, नवनवीन युक्त्याप्रयुक्त्यांचा वापर केला. यातूनच त्यांनी हरिभाऊकालीन कादंबरीचे रचनातंत्र बदलले. यामुळे ते स्वाभाविकपणे एक प्रयोगशील कादंबरीकार म्हणून मान्यता पावले.

वामन मल्हारांच्या कादंबरीक्षेत्रातील गौरवाचा हा आलेख मांडत असताना सुरुवातीलाच याची दुसरी बाजूही विचारात घेतली पाहिजे. वामन मल्हारांना वर निर्देशित केल्याप्रमाणे युगप्रवर्तक कादंबरीकार ठरविणारा जसा एक वर्ग आहे, तसाच वा. म. जोशी हे कादंबरीकार नव्हेतच; कादंबरीलेखकाला

लागणारी गुणवत्ता त्यांच्याकडे कधीच नव्हती, त्यांची कादंबरीरचना ढिसाळ असते, वर्णने स्थूल व धोपटमार्गी असतात, तपशील सदोष असतात, त्यांची पात्रे हाडामासांची न वाटता ती केवळ वामन मल्हारांच्या विचारांचें प्रतिनिधित्व करणारी असतात, असें आक्षेप घेणाराही एक वर्ग आहे. एक कादंबरीकार म्हणून वामन मल्हारांविषयी होणाऱ्या या मतभेदांचें मूळ अर्थातच कादंबरीविषयक संकल्पनेतील मतभेदांत आहे. कादंबरीच्या बाह्य सौष्ठवावर भर देणाऱ्यांना वामन मल्हारांचें कादंबरीलेखन फारसें आवडत नाही; उलट कादंबरीच्या अंतःसौंदर्याच्या दृष्टीने विचार करणाऱ्यांना वामन मल्हारांच्या कादंबऱ्या विलक्षण साभिप्राय वाटतात. आपल्या कादंबरीलेखनातील बाह्य दोषांची खुद्द वामन मल्हारांनाही जाणीव होती. "माझ्या कादंबऱ्यांत प्रमाणबद्धतेचा थोडा अभाव आणि तंत्रदृष्ट्या इतर दोष राहिलेले आहेत. . . मला पोषाखाचं, चेहऱ्याचं, हस्तहापादी अवयवव्यापारांचं वर्णन साधत नाही." अशी त्यांनी स्वतःच कबुली दिली आहे.[6] मात्र अशी कबुली दिल्यावर त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतील आंतरसौंदर्याकडेही लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. 'आपलं लक्ष बाह्य पोषाखादी गोष्टींपेक्षा आंतरव्यापाराकडे अधिक आहे आणि या व्यापाराची गुंतागुंत स्पष्ट करण्याच्या दृष्टीने बाह्य वर्णनांची गरज नसते', असेंही त्यांनी म्हटले आहे.

आपली कादंबरी प्रचलित कादंबरीहून अशा रीतीने वेगळ्या स्वरूपाची आहे याची जाण असल्यामुळेच बहुधा त्यांनी आपल्या 'रागिणी' या पहिल्याच कादंबरीला 'काव्यशास्त्रविनोद' ( हे त्या कादंबरीचें उपशीर्षक) असेंही म्हटले आहे. केवळ 'रागिणी'च नव्हे तर त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांत या काव्यशास्त्रविनोदाला अग्रस्थान आहे. किंबहुना असेंही म्हणता येईल. की, काव्यशास्त्रविनोदाला मनसोक्त अवसर मिळावा म्हणूनच त्यांनी कल्पित कथांचें निमित्त करून आपले कादंबरीलेखन केले आहे. वामन मल्हारांच्या कादंबरीलेखनाचे मूल्यमापन करताना कादंबरीलेखनविषयक त्यांची ही भूमिका आणि या प्रकरणाच्या सुरुवातीला निर्दिष्ट केलेली त्यांची ललित वाङ्मय-विषयक दृष्टी विचारात घ्यायला हवी. वामन मल्हारकालीन वाङ्मयसंस्कृतीचा, तत्कालीन सुशिक्षित वाचकांच्या अभिरुचीचा, त्यांच्या कादंबरीवाङ्मयविषयक धारणांचा विचारही असें मूल्यमापन करताना करायला हवा. वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतील पात्रे सुसंस्कृत, उच्चविद्याविभूषित व तत्त्वजिज्ञासू वृत्तीची असतात; यामुळे वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतील तत्त्वचर्चा उपरी

न ठरता तिच्या कलाकृतीचा अंगभूत भाग ठरते हेही ध्यानात ठेवावयास हवे.

वामन मल्हारांनी आपल्यापुरता जो वाचकवर्ग गृहित धरला होता तो तत्कालीन सुशिक्षित, विदग्ध, विचारप्रेमी असा वाचकवर्ग होता. नवशिक्षण व नवसंस्कार यांना हा वाचकवर्ग सामोरा गेला होता. त्याने जुन्याबरोबर नव्याचाही स्वीकार केला होता. स्त्रीशिक्षण, व्यक्तिस्वातंत्र्य, भारतीय अध्यात्म, पाश्चात्य इहवाद, राजकारण–समाजकारणातील विविध प्रवृत्ती व मतप्रवाह, धर्माचें जीवनातील स्थान इत्यादी विचारविषय हे या वाचकवर्गाच्या आस्थेचें विषय होते. या विषयांची विविध अंगे उलगडून पाहाण्यास हा वाचकवर्ग उत्सुक होता.

स्वतःसमोर असा उच्चविद्याविभूषित, विदग्ध, तत्त्वचर्चाप्रवण वाचकवर्ग ठेवल्याचा परिणाम वामन मल्हारांच्या कादंबरीलेखनावर स्वाभाविकपणेच झालेला आहे. यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांतील बहुतेक पात्रे जीवनाच्या श्रेयप्रेयाच्या प्रश्नांनी व्याप्त झालेली आहेत. या पात्रांच्या चर्चाविषयांमुळे वामन मल्हारांच्या कादंबरीला विशिष्ट घाट प्राप्त होतो, गती प्राप्त होते. या चर्चाविषयांमुळेच पुन्हा त्या त्या पात्रांच्या स्वभावांचे, वृत्तिप्रवृत्तींचें दर्शन घडते, त्यांच्या आपसांतल्या संबंधात नाट्य निर्माण होते. त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख व्यक्तिरेखा सुजाण, सुसंस्कृत, विचारप्रवण व सौजन्यपूर्ण प्रकृतीच्या असतात. या साऱ्यांचा परिणाम म्हणून कादंबरीतील वातावरण प्रगल्भ, प्रांजळ नि विश्रब्ध बनते. प्रगाढ तत्त्वचिंतनाबरोबरच चातुर्यपूर्ण कोटिक्रम, नर्म विनोद, प्रसन्न संवाद, खेळकर वादविवाद इत्यादींचें त्यांच्या कादंबऱ्यांतील अस्तित्व याचेच द्योतक आहे. यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये तत्त्वचर्चेचा कोरडेपणा जाऊन तत्त्वचिंतनाची मनोज्ञता येते.

वामन मल्हारांच्या काळातील कादंबरीचा विचार करता असें दृष्टोत्पत्तीस येते की, तत्कालीन कादंबरीला तत्त्वचर्चा वावडी नव्हती; उलट कादंबरीद्वारा तत्त्वचर्चेला उद्युक्त होणे, ही गोष्ट तत्कालीन कादंबरीव्यवहारात मान्यता पावली होती, काहीशी प्रतिष्ठितही झाली होती. हरिभाऊंच्या 'गणपतराव', 'मी', 'यशवंतराव खरे' या कादंबऱ्यांमधून किंवा श्री. कृ. कोल्हटकरांच्या 'दुटप्पी की दुहेरी' व 'श्यामसुंदर' या कादंबऱ्यांतून याचाच प्रत्यय येतो. वामन मल्हारांचे समकालीन म्हणवता येतील असें डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या कादंबऱ्यांत तर चर्चाप्रसंगांची रेलचेलच असते. असें असतानाही वामन

मल्हारांनाच तत्त्वचर्चात्मक कादंबरीच्या जनकत्वाचा मान का दिला जातो? याचे उत्तर वामन मल्हारांची तत्त्वचर्चात्मक कादंबरी आणि इतरांची तत्त्वचर्चात्मक कादंबरी यांच्या पातळ्यांतील फरकात आहे. इतर लेखकांच्या चर्चा वाचकाला एका विशिष्ट दिशेने घेऊन जाऊ इच्छितात, तर वामन मल्हारांची चर्चा वाचकांवर काही लादण्यापेक्षा त्यांना अंतर्मुख करणारी, विचारांच्या विविध बाजू स्पष्ट करणारी असते. ती हेतुप्रधान वा बोधप्रवण नसते. प्रबोधनापेक्षा उद्‌बोधनाकडे तिचा कल असतो. तिच्यातून अनेक प्रश्नोपप्रश्नांची तार छेडली जाते. एक प्रकारे वामन मल्हारांची कादंबरी म्हणजे प्रश्नोपनिषदेच ठरतात.

प्रश्नात्मक तत्त्वचिंतन आणि कथापरता यांची युती ही भारतीय मनाला काही नवी नाही. भारतीय पुराणग्रंथांतून, आख्यानोपाख्यानांतून याची रेलचेल आढळते. जीवनात निर्माण होणारे विविध पेचप्रसंग, येणारी किंकर्तव्यमूढता, श्रेयप्रेमाचा विचार गुरुशिष्यसंवादांतून मांडला—उलगडला जाण्याची परंपरा फार जुनी आहे. तेथे स्थकालादींच्या वास्तवापेक्षा प्रश्नांच्या तत्त्वगर्भतेला, अनादित्वाला महत्त्व असते. हा पुराणांचा ढाचाच वामन मल्हारांनी आधुनिक लेखनतंत्रात बसविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा 'आश्रमहरिणी' या कादंबरीचा सगळा घाट पुराणपोथीचा आहे. 'रागिणी'मधूनही पुराणकृतीचा प्रत्यय येतो. कारण पुराणग्रंथांतील आदर्शतात्मकता व प्रश्नोपप्रश्न 'रागिणी'त आढळतात. शिवाय 'रागिणी'चा उत्तरार्ध हिमालयवर्णन, प्रियव्रह्मस्वामींचा आश्रम इ. पुराणकथेत शोभाव्यात अशा घटनांनी भरलेला आहे. स्वप्ने, आभास, साक्षात्कार, सुभाषिते, योगायोग इत्यादी घटकही पौराणिक आकृतिबंधाच्या जवळचेच होत. वामन मल्हारांनी आपल्या कादंबरीलेखनासाठी आरंभकालात पत्करलेला हा साचा असा पुराणग्रंथरचनेला जवळचा असला तरी त्यांच्या कादंबरीतला आशय मात्र अत्याधुनिक आहे. एखाद्या पुराणपोथीच्या स्वरूपात येणारी 'आश्रमहरिणी' ही त्यांची कादंबरी सच्छील स्त्री एकाच वेळी दोन पतींशी विधियुक्त संसार करू शकेल किंवा नाही, या प्रश्नाने परिवेष्टित झालेली आहे. 1916 त लिहिलेल्या या कादंबरीतील आशय आजच्या स्त्रीमुक्ती—चळवळीच्या काळातही प्रक्षोभक ठरणारा आहे. पण वामन मल्हार हा प्रक्षोभ पचवू शकले, एवढेच नव्हे, तर तर तो रुचिर करू शकले. याचे श्रेय त्यांच्या विषयाच्या विशिष्ट मांडणीत, गुंफणात सापडते.

वामन मल्हार हे निःसंशयपणे मराठीतील एक प्रयोगशील

कादंबरीकार होत. त्यांना आपल्या कादंबरीमधून विशिष्ट प्रकारचा आशय मांडावयाचा असल्यामुळे कादंबरीलेखनाच्या बाबतीत काही नवी उपक्रमशीलता, अपरिहार्यपणे दाखवावी लागली आहे. कारण शैलीचा प्रमुख गुण आशयाचें प्रभावी अनुसरण हा मानला जातो. वामन मल्हारांच्या कादंबऱ्या पाहाता असें दिसते की, त्यांची शैली काळाप्रमाणे व आशयाप्रमाणे स्वाभाविक स्वरूपात बदलत गेली आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील आशय बदलता राहिल्याने शैलीही स्वाभाविकपणे बदलती झालेली आहे. 'रागिणी'तील काव्यशास्त्रविनोदात्मकता, 'आश्रमहरिणी'चा पौराणिक घाट, 'सुशीलेचा देव' मधील आत्मनिवेदनात्मक तंत्राचा केलेला वैविध्यपूर्ण उपयोग आणि 'इंदू काळे...'ची पत्रात्मकता या दृष्टीने लक्षणीय आहे. वामन मल्हारांची शैली कालदृष्ट्या कशी बदलत गेली हे पाहण्यासाठी त्यांची आरंभीची कादंबरी 'रागिणी' व अखेरीची 'इंदू काळे....' यांच्यावर एक सहज तौलनिक नजर टाकावी. 'रागिणी'चा घाट एखाद्या महाकाव्यासारखा दीर्घ आहे, तर 'इंदू काळे.....' चा कमालीचा आटोपशीर आहे.

आत्मकथनपरता हा वामन मल्हारांच्या शैलीचा एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणता येईल. ('स्मृतिलहरी' तही याचा प्रत्यय येतो) 'आश्रमहरिणी' ही धौम्याची आत्मकथाच आहे. 'इंदू काळे....' मधील पत्रे ही त्या त्या व्यक्तींची इंदू, सरला, विनायकराव इत्यादींची विशिष्ट क्षणीची आत्मकथनेच नव्हेत काय ? 'रागिणी'मध्येही अनेक पात्रें दीर्घ आत्मकथने करताना आढळतात. 'सुशीलेचा देव' ही कादंबरी म्हणजे सुशीलेचें आत्मचरित्रच होय, असाही आभास वामन मल्हारांनी हेतुतः निर्माण केलेला आहे. वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांमधून आत्मकथनपर निवेदनपद्धतीचा विविध प्रकारे वापर केल्याचें दिसते. कारण अशा आत्मकथनपद्धतीमुळे निवेदनाला, प्रतीतिगोचरता, आत्मनिष्ठा, प्रांजळपणा, अनौपचारिकता, जिव्हाळा, संवादशीलता, निकटता इत्यादी आवश्यक गुणविशेष स्वाभाविकपणेच लाभतात आणि याच गुणविशेषयुक्त निवेदनांची त्यांना गरज भासत होती. कारण त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून मुख्यतः विचारात्मकतेवर भर दिलेला आहे आणि विचार हा मूलतःच अमूर्त (abstract) असतो. अमूर्तामुळे त्यात येणारा दाठरपणा आत्मकथनपरतेमुळे कमी होऊन, तो रसार्द्र होण्यास साहाय्य होते. त्यांच्या या विशिष्ट प्रांजळ आत्मकथनपर, खेळकर शैलीमुळेच त्यांचे तत्त्वगंभीर विचार दाठर विचारात्म पातळीवर न राहाता ते ललितरम्य रूप धारण करतात. "इंदू काळे..."ची

शैली पत्रात्मक नसती, तर तिला आजचे सौष्ठव प्राप्त झाले नसते. 'आश्रमहरिणी'तील क्रांतिकारक आशय धक्कादायक न ठरता रोचक ठरतो तो वामनरावांनी त्या कादंबरीकरिता स्वीकारलेल्या शैलीमुळेच. या शैली-सौष्ठवाच्या अभावीच त्यांची 'नलिनी' ही कादंबरी अयशस्वी ठरली आहे.

'सुशीलेचा देव' या कादंबरीतील बाल-सुशीलेचे चित्रण करताना जरी वामन मल्हारांनी कादंबरीतील सांकेतिक वर्णनांची चेष्टा केलेली असली तरी त्यांच्या कादंबरीलेखनात काही वेळा जुने संकेत डोकावतात. उदाहरणार्थ, त्यांच्या कादंबऱ्यांतील खलनायकांचे ('रागिणी'तले जनूभाऊ चकणे किंवा 'इंदू काळे.....'तले विदुमाधव) चित्रण, किंवा त्यांच्या कादंबऱ्यांत वारंवार डोकावणारे अपघाती मृत्यू, दरवडेखोर, आत्महत्या, विषप्रयोग, पिस्तुले, जाखिणी, कटाह इ. खरे तर वामन मल्हारांना सांकेतिकतेचा तिटकारा होता. तो त्यांच्या विचारसरणीतून तर प्रकट होतोच, पण, त्याचे प्रत्यंतर त्यांच्या कादंबरीलेखनशैलीतूनही येते. आपल्या लेखनशैलीच्या वेगळेपणाचे भान त्यांना अवश्य होते. ते त्यांनी उल्हासाने जपलेही होते. मात्र त्यांच्या शैलीचे वेगळेपण किंवा प्रयोगशीलता केवळ बाहच-स्वरूपाच्या नावीन्यवेडातून जन्माला आलेली नाही, हे मुद्दाम लक्षात घ्यायला हवे. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे हा वेगळेपणा व ही प्रयोगशीलता ते जो आशय मांडू पाहात होते, त्याच्या आंतरिक गरजेतून निर्माण झालेली आहे. प्रयोगाकरिता प्रयोग किंवा हौसे-खातर नावीन्य असे त्यांच्या शैलीचे रूप नाही. तिच्यात एक अभिजातता व स्वाभाविकता आढळते.

आपल्या कादंबऱ्यांसाठी वामन मल्हारांनी स्वीकारलेल्या विशिष्ट रचनाबंधांमुळे कादंबरीतील विचारमंथनांतील दाटरता कमी होते, गंभीर विचार ललितमधुर होतो आणि लालित्यावर विचारगांभीर्याची कांती चढते. 'रागिणी'सारख्या आपल्या कादंबरीला वामन मल्हार 'काव्यशास्त्रविनोद' असे जे संबोधतात, ते समजून घेता येते. त्यांच्या लेखी काव्य म्हणजे भावमधुरता, शास्त्र म्हणजे तत्त्वप्रचुरता आणि विनोद म्हणजे उल्हसित क्रीडा-वृत्ती अशीच समीकरणे आहेत. या तिन्ही घटकांचा स्वाभाविक असा हृद्य मेळ वामन मल्हारांच्या सर्व कादंबऱ्यांत ('नलिनी' चा अपवाद) बसला आहे. त्यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांना वेदाभ्यासजड तत्त्वचर्चेचे स्वरूप येत नाही; उलट त्यात आवश्यक त्या प्रमाणातला खेळकरपणा, खोडकरपणा व मिष्किल-पणाही डोकावतो. ते रूढार्थाने विनोदी लेखक नव्हते, पण त्यांना श्रेष्ठ

दर्जाच्या विनोदबुद्धीचें देणे लाभलेले होते. त्यांच्या विनोदवृत्तीमुळे त्यांच्या लेखनशैलीत नेहमीच एक तजेलदारपणा, टवटवी आढळते.

वामन मल्हारांची कादंबरीलेखनाची एकूण कारकीर्द 1915 ते 1935 अशी वीस वर्षांची आहे. त्यांनी 'रागिणी' (1915), 'आश्रमहरिणी' (1916), 'नलिनी' (1920), 'सुशीलेचा देव' (1930) व 'इंदू काळे व सरला भोळे' (1934) अशा एकूण पाच कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. यांतील 'नलिनी' वगळता सर्वच कादंबऱ्या प्रथम नियतकालिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाल्या व नंतर पुस्तकरूपाने बाहेर आल्या. 'रागिणी' 1914 पासूनच त्याकाळी प्रतिष्ठित असलेल्या 'मासिक मनोरंजन' मधून क्रमशः प्रसिद्ध होत होती. ती तशी क्रमशः येत असतानाच तिच्यावर वाचकांच्या उड्या पडत होत्या. या पहिल्याच कादंबरीने वामनरावांना कादंबरीक्षेत्रात अढळपद मिळवून दिले. त्यांचा उल्लेखच या काळात (आणि नंतरही) 'रागिणी'कर्ते वा. म. जोशी असा केला जाऊ लागला. 'रागिणी'पाठोपाठच त्यांची 'आश्रमहरिणी' ही कादंबरीदेखील 'मराठा मित्र' या नियतकालिकातून क्रमशः अवतरली. वामन मल्हारांच्या पाचांपैकी चार कादंबऱ्या अशा रीतीने हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध होण्याच्या प्रकारामुळेही त्यांच्या लेखनपद्धतीवर थोडाफार परिणाम झाल्याचे जाणवते. 'रागिणी'त हा परिणाम सर्वाधिक दिसतो. रचनातंत्राच्या दृष्टीने ही कादंबरी सदोष आहे; तथापि तिच्या अंतःसौंदर्याची मोहिनी तत्कालीन वाचकांवर खूपच पडली होती. या वाचकांत सर्वसामान्य वाचकांबरोबरच श्रीपाद कृष्णांसारखे साहित्याचार्यही आहेत. 'रागिणी'च्या या यशाचे रहस्य तिच्यातील रसस्निग्ध पात्रदर्शनात, मोहक वातावरणात व सर्वस्पर्शी नवविचारदर्शनात आहे. या कादंबरीचा एकंदर काल व आटोप लक्षात घेता तिला कादंबरी म्हणण्यापेक्षा बृहत्कादंबरीच म्हणणे अधिक युक्त ठरेल. कादंबरीला पुष्कळदा गद्यरूप महाकाव्य (Epic in prose) म्हटले जाते. या संबोधनाला पात्र ठरेल असाच 'रागिणी'चा एकंदर घाट आहे. या कादंबरीची विभागणी वामन मल्हारांनी तीन खंडांत केलेली असून प्रत्येक खंडात सुमारे 25 प्रकरणे आहेत. कादंबरीतील एकूण प्रकरणांची संख्या खूपच वाटते. या कादंबरीचा बाह्याकार काहीसा अस्ताव्यस्त आहे. हिच्यातील पात्रप्रसंगांचा तसेच स्थलकालांचा पैसही मोठा आहे. कथानकात उपकथानकाचा प्रवेश होतो. शिवाय सुभाषिते, चर्चा, स्वप्ने, आभास, साक्षात्कार, निसर्गवर्णने, हिमालयदर्शन, ऋषींचे आश्रम, रानटी टोळ्या इत्यादी स्वरूपाचा पसाराही मोठ्या प्रमाणावर

आहे. असे असले तरी तिच्या संकल्पनेत, आंतरिक रचनेत, पात्रदर्शनात, विचारदिशेत एक संगति-सूत्र आहे. या कादंबरीतील प्रकरणांची 'नगाधिराज हिमालय', 'रम्य औदासीन्य', 'सन्मित्राचा सत्कलह' 'दैवाचा घाला' यांसारखी नावे जरी सांकेतिकतेचा प्रत्यय देणारी असली तरी या कादंबरीचा आशय आणि तिच्यातील स्वभावदर्शन आधुनिक महाराष्ट्रातील वैचारिक आंदोलनांची तदनुषंगिक स्थितिगतींची निदर्शक आहे. कवच जुनाट पण गाभा आधुनिक अशी या कादंबरीची रचना झालेली आहे.

'रागिणी'तील पुरुषपात्रांपेक्षा स्त्रीपात्रे विशेष लक्षणीय आहेत. नवशिक्षित स्त्रीच्या मनाचा मागोवा वामन मल्हारांनी ज्या असोशीने घेतला, ती असोशी इतर मराठी कादंबऱ्यांत (डॉ. केतकरांचा अपवाद वगळता) आढळत नाही. 'हिंदू सेफरेजेट' हे 'रागिणी'मधील पहिलेच प्रकरण पाहाण्यासारखे आहे. कादंबरीच्या आरंभीच 'The old order changeth giving plaee to new' ही टेनिसनची काव्यपंक्ती येते. या पंक्तीवरून ही कादंबरी जीवनातील गतिशीलतेवर बोट ठेवणारी असल्याची जाणीव होते. या कादंबरीतील प्रमुख पात्रे—स्त्री व पुरुषपात्रे —सहृदय, विचारशील वृत्तीची, प्रगल्भ मनाची, तत्त्वजिज्ञासू अशी आहेत. नानासाहेब, भाऊसाहेब, शास्त्रीबोवा ही जुन्या पिढीची किंवा भैय्यासाहेब, आनंदराव ही नव्या पिढीची पात्रे एका उच्च बौद्धिक वातावरणात रमणारी आहेत. उत्तरा व रागिणी या तरुणींच्या मनातही या नव्या वृत्तीचा, नव्या जीवनार्थाचा प्रादुर्भाव झालेला आहे. वामन मल्हारपूर्व कादंबरीतील स्त्री सामान्यतः घरगुती वातावरणात वावरणारी, इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारापासून अलिप्त असलेली, पुरुषांशी धीटपणे चर्चा न करू शकणारी अशी होती. 'रागिणी' या कादंबरीत प्रथमच 'नव्या स्त्रीचे' दर्शन घडते. या कादंबरीतील तरुण स्त्रिया पुरुषांबरोबर सहलीला जाणाऱ्या, पुरुषांशी खेळीमेळीने बौद्धिक वाद करणाऱ्या, क्वचित त्यांना वादविवादात नामोहरमही करणाऱ्या, प्रगल्भ वृत्तीच्या, काहीशा धीट व बऱ्याचशा मनमोकळ्या अशा आहेत.

उत्तरा व रागिणी ही 'रागिणी' या कादंबरीतील दोन प्रमुख स्त्रीपात्रे. त्यांच्या एकंदर जीवनावर ही कादंबरी आधारलेली आहे. या दोघींचे स्वभाव बाह्यतः भिन्न असले तरी दोघींकडेही एक प्रगल्भ विकसित मन आहे. "शिक्षणाने सुसंस्कृत व स्वतंत्र विचाराच्या झालेल्या दोन मुली व त्यांच्या-

मोवती गुंफले जाणारे दोन तऱ्हेचे कौटुंबिक जीवन हा या कादंवरीतील मुख्य प्रवाह आहे.[7] तत्कालीन सुशिक्षित वाचकवर्गाने 'रागिणी' व 'रागिणी'कर्ते वामन मल्हार यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन ठेवले होते. "प्रत्येक रसिक या कादंवरीचा रसास्वाद घेतल्यानंतर 'रागिणी'ची संगती गंगेसारखी, साधुसंगतीसारखी, कविसंगतीसारखी मला पावन वाटते' असे उद्‌गार काढील" अशा शब्दांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी या कादंवरीचा गौरव केलेला आहे.[8]

'आश्रमहरिणी' ही 'रागिणी'च्या पाठोपाठ जन्माला आलेली वामन मल्हारांची दुसरी कादंवरी. पण या दोन्ही कादंवऱ्यांमध्ये रचनातंत्र व. वाह्याकार या दोन्ही बावतींत फारच फरक आहे. 'आश्रमहरिणी'ची रचना अत्यंत आटोपशीर आणि विलक्षण रेखीव आहे. ही एक आपल्याला सापडलेली पोथी आहे, हा विभ्रमयुक्त आभास किंवा चकवा वामन मल्हारांनी आरंभापासून शेवटपर्यंत कौशल्याने खेळविलेला आहे. या कादंवरीतील व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली एखाद्या पुराणपोथीला शोभेल अशीच ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी केलेला आहे. या कादंवरीचे आवरण प्राचीन असले तरी आशय विलक्षण नवा, प्रक्षोभक असल्याचा उल्लेख यापूर्वी आलेला आहेच. पुराणकालाच्या आभासामुळे हा नवा धक्कादायक आशय वामन मल्हार आपल्या वाचकांच्या पचनी पाडू शकले, हे महत्त्वाचे आहे.

'आश्रमहरिणी' मधील सुलोचनेच्या संदर्भात द्विपतिकत्वाचा प्रश्न उपस्थित होतो. द्विपतिकत्वाचा सूचक पुरस्कार करणारी कादंबरी लिहून वामन मल्हारांनी एक क्रांतिकारी विचार आपल्या वाचकांच्या मनात नेऊन सोडला. "विवाहविषयक स्त्रीधर्म काय?" किंवा 'स्त्री ही ईश्वराने पुरुषाच्या सुखाकरिता निर्माण केली आहे काय?' 'तिच्या आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व नाही का?' यांसारखे मूलगामी प्रश्न या कादंबरीद्वारे वामन मल्हार वाचकांच्या चिंतनासाठी उपस्थित करतात.

'आश्रमहरिणी'च्या पहिल्या आवृत्तीत गभस्तिगती व सुलोचना यांचा सर्पदंशामुळे मृत्यू होतो असे दाखवून सुलोचनेच्या द्विपतिकत्वाचा प्रश्न टाळला होता; परंतु पुढील आवृत्तीत वामन मल्हारांनी धीटपणे ही मृत्यूची घटना काढून टाकली आणि सुलोचनेबरोबर धौम्य आणि गभस्तिगती हे तिचे दोन्ही पती शांतपणे, आनंदाने आपले राहिलेले आयुष्य क्रमून आत्मोन्नती साधतात, असे दाखविले आहे. प्रथमावृत्तीत आपल्याला हे धैर्य झाले नव्हते

अशी स्पष्ट कबुली वामन मल्हारांनी दिली आहे. ही कबुली त्यांच्या प्रांजळपणावर प्रकाश टाकणारीच आहे.

'आश्रमहरिणी'च्या मनोज्ञतेबाबत कुसुमावती देशपांडे लिहितात, "पूर्ण विकसित कथानक, स्वभावचित्रण व कथेशी एकजीव झालेले, कथेच्या प्रकृतीने निर्मिले गेलेले वातावरण या तंत्रविषयक अंगांच्या दृष्टीने पाहिले तर ती एक स्वयंपूर्ण व यशस्वी कादंबरी आहे. आश्रमाचें वातावरण निर्माण करण्यात, धौम्य, गभस्तिगती आदिकरून बालगोपालांच्या लीलांचें वर्णन करण्यात, वाढत्या वयाचें त्यांचें प्रश्नोपप्रश्न सहृदयतेने मांडण्यात वामन मल्हारांचें चित्त रंगून जाते. या कार्यासाठी ते वेगळीच शब्दकळा वापरतात; वेगळ्या प्रतिमासृष्टीचा व वाणीच्या अलंकारांचा अवलंब करतात व प्रारंभापासून अखेरपर्यंत हे वेगळेपणाचें विश्व कायम ठेवतात. . . .तिच्यातील प्रसन्न व दूरस्थ वातावरणाने मन भुलून जातें . . . . या निर्मितीत कल्पना वास्तवापासून पळून जात नाही. उलट येथे वास्तवता व कल्पना यांचा सौंदर्यपूर्ण संगम होतो. कल्पनेच्या प्रकाशानें वास्तवता उजळून निघतें व वास्तवाच्या दर्शनाने कल्पनेत आशय भरला जातो.[9]

वामन मल्हारांची 'नलिनी' 1920 त प्रकाशित झाली. परंतु रचनाबंध व आशय या दोन्ही दृष्टींनी नलिनी आरंभीच्या दोन कादंबऱ्यांच्या तुलनेने फारच थिटी व फिकी वाटते. स्वतः वामन मल्हारांनी तिचें वर्णन 'नकटी' असें केलेले आहे. जिच्यात वामन मल्हारांचें कलाविद्पण अंशतःही आढळत नाही अशा या अयशस्वी कृतीचा विचार न करता त्यांच्या ऊर्वरित दोन कादंबऱ्यांकडे ('सुशीलेचा देव' आणि 'इंदू काळे आणि सरला भोळे') वळणे इष्ट ठरेल. 'सुशीलेचा देव' ही कादंबरी वामन मल्हारांच्या वैचारिक क्षेत्रातील गतिशीलतेची झेप दर्शविते, तर 'इंदू काळे आणि सरला भोळे' ही कादंबरी त्यांच्या नवशोधक तंत्राची साक्ष देते. 'रागिणी' व 'आश्रमहरिणी' यांच्या बाबतीत जो प्रकार घडला, तोच या दोन कादंबऱ्यांबाबतीतही घडला आहे. 'रागिणी' आशयदृष्ट्या संपन्न असली तरी आविष्कारदृष्ट्या तशी कच्ची आहे. तुलनेने 'आश्रमहरिणी' कितीतरी सरस ठरते. 'सुशीलेचा देव'ची 'इंदू काळे......'शी अशीच तुलना करता येते.

केवळ आशयदृष्ट्या विचार करता 'सुशीलेचा देव'ची वैचारिक झेप फार उंच आहे. सुशीला ही या कादंबरीची नायिका किंवा केंद्रवर्ती व्यक्तिरेखा

असून तिची वैचारिक उत्क्रांती हा या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. सुशीलेच्या बाल्यावस्थेपासून तिच्या मनाची वाढ कोणकोणत्या घटनाप्रसंगांमुळे वा व्यक्तींमुळे कसकशी घडून आली, दगडालाच देव मानणारी बालसुशीला प्रौढपणी 'ध्येय हाच देव' का मानू लागली, याचा ऊहापोह प्रस्तुत कादंबरीत आढळतो. या कादंबरीतील घटनाप्रसंगांची योजना काहीशी स्वैर व ठोकळेबाज आहे. रावजी व सुशीला यांच्यातील प्रेमभावनेचा उदय, रावजीशी सुशीलेने मांडलेला संसार व रावजीच्या मृत्यूने या संसाराचा होणारा शेवट येथपर्यंतचा भाग लक्षवेधी ठरत नाही. रावजीच्या मृत्यूनंतर सुशीलेच्या मनात होत गेलेली वैचारिक आंदोलने व विश्वकुटुंबवादापर्यंत तिच्या मनाने केलेला प्रवास हा पुढचा भाग मात्र खास लक्षणीय आहे. ध्येयालाच देव मानण्याच्या कल्पनेचे उद्घाटन वामन मल्हारांनी 'ध्येय हाच देव' या आपल्या निबंधात पूर्वीच केलेले होते; त्या आपल्या विचारालाच त्यांनी आपल्या या कादंबरीत पुन्हा एकवार हात घातला आहे. शेवटी 'ध्येय हाच देव' या विचाराची आजची परिणती विश्वकुटुंबवादात होणे, अपरिहार्य असल्याचे दाखविले आहे. यामुळेच अभिव्यक्तीपेक्षाही आशयदृष्ट्या 'सुशीलेचा देव' सकस व महत्त्वपूर्ण कादंबरी ठरते. हीतील विचार देशकाल, जातधर्म यांची क्षितिजे ओलांडून त्यापलीकडे झेपावताना दिसतो. पूर्वीच्या तुलनेने या कादंबरीतील वातावरणही बदललेले दिसते. यातील बहुसंख्य पात्रे ही इतर कादंबऱ्यांत भेटणाऱ्या पात्रांसारखीच म्हणजे प्रगल्भ विचारांची, सुसंस्कृत वृत्तीची व वादपटू अशीच आहेत; परंतु त्यांच्या इतर कादंबऱ्यांतल्याप्रमाणे ती मध्यमवर्गीय सुशिक्षितांच्या जगापुरतीच संबंधित राहात नाहीत. 'सुशीलेचा देव' मध्ये त्यांचे लक्ष समाजातील तळागाळाकडे वेधू लागले आहे. या दृष्टीने या कादंबरीतील 'ही आमची समाजव्यवस्था' हे प्रकरण पाहाण्यासारखे आहे. या प्रकरणात सुशीलेचा या स्थितीबाबत होणारा मनःक्षोभ वामन मल्हारांनी पुढील शब्दांत व्यक्त केला आहे : "कादंबऱ्या–नाटकांना प्रेमाशिवाय विषयच नाहीत; राजकारणी पुरुषांना स्वराज्याशिवाय दुसरे काही सुचतच नाही; समाजसुधारकांना विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, ब्राह्मणब्राह्मणेतर असलेलच विषय सुचतात! गरीब महार-मांग, वडारी-डोंबारी यांची स्थिती कशी असेल, ही स्थिती अशी का, ती कशी सुधारावयाची यांचा कोणी विचार करीत नाही. सर्व समाज किडलेला, सडलेला 'rotten' झालेला आहे." सुशीलेचे हे उद्गार म्हणजे एक प्रकारे खुद्द वामन मल्हारांचेच विचार आहेत. वामन मल्हारांच्या विचारांची क्षितिजे कसकशी विस्तारत गेली, ते यावरून स्पष्ट होते. या rottenessच्या छाया-

पडछाया आजही अधिक गडदपणे आपल्या भोवती आहेत ! ‘सुशीलेचा देव’-मधील आदर्शात्मक ध्येयवादात जीवनवास्तवाचे कठोरपणही कसे मिसळले आहे याची यावरून कल्पना यावी.

‘इंदू काळे आणि सरला भोळे’ ही वामन मल्हारांची शेवटची कादंबरी. म्हणजे त्यांच्या कादंबरीक्षेत्रातील शेंडेफळ. या कादंबरीमुळे त्यांनी मराठी पत्रात्मक कादंबरीचा पायाच घातला, इतकेच नव्हे, तर कळसही गाठला. वामन मल्हारांच्या कादंबरीविश्वात कलादृष्ट्या ही कादंबरी सर्वोत्कृष्ट मानणारे खूपजण आहेत. वामन मल्हारांची यशस्वी कलाकृती म्हणून ‘आश्रमहरिणी’नंतर याच कादंबरीकडे अंगुलिनिर्देश करावा लागेल. या कादंबरीचे स्वरूप पत्रसंग्रहात्मक आहे. पत्रात्मक तंत्राचा यात वामन मल्हारांनी चातुर्याने उपयोग केला आहे. त्यामुळे त्यांच्या पूर्वीच्या कादंबऱ्यांतून आढळणारी काही ठिकाणची ढोबळ वर्णनात्मकता, निवेदनपरता या कादंबरीत अजिबात नाही. एकमेकांशी जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या स्त्रीपुरुषांनी पत्ररूपाने परस्परांशी साधलेला संवाद, केलेला विचारविनिमय, व्यक्तविलेल्या भावभावना, सांगितलेली सुखदुःखे असा या कादंबरीचा घाट आहे. पत्रात्मक तंत्रामुळे या कादंबरीतील निवेदनाला एक सहजस्वाभाविकता, प्रांजळपणा व अनौपचारिकता लाभलेली आहे. पत्रे ही एक प्रकारची आत्मकथनेच असतात. त्यामुळे येथे आत्मकथनांतील प्रत्ययपूर्णताही अवतरते. पत्रात्मक तंत्राचा हा लाभ विशेष महत्त्वाचा. अर्थात कादंबरीत व्यक्त होणाऱ्या सर्वच प्रकारच्या आशयाला हे तंत्र पोषक ठरेलच असे नाही. तथापि वामन मल्हार आपल्या कादंबऱ्यांतून जी तत्त्वचर्चा करू पाहात होते, जी प्रश्नोपनिषदे उलगडू पाहात होते, त्याला हे तंत्र निश्चितच उपकारक ठरले.

ही कादंबरी आकाराने छोटी आहे. छोटीमोठी मिळून साठ पत्रे या कादंबरीत समाविष्ट झाली आहेत. तथापि कादंबरीतील कथेने व्यापलेला कालखंड खूपच दीर्घ म्हणजे 1919 ते 1934 असा आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक प्रवासाच्या दृष्टीने हा कालखंड महत्त्वाचा आहे. पहिल्या महायुद्धाचा शेवट, टिळकयुगाचा अस्त, महात्मा गांधींचा उदय, सत्याग्रह, कायदेभंग, इ. आंदोलने, मार्क्सवादी विचारांचा आरंभ, बहुजनसमाजातील जागृती, ब्राह्मणब्राह्मणेतर वाद, तिरंगी नवमतवाद, कलेबद्दल नव्याने निर्माण झालेली आस्था, तदनुषंगिक कला-नीतिवाद, स्त्रीपुरुष नात्याबद्दलच्या नव समस्या, नवी

नीती इत्यादींनी हा कालखंड गजबजलेला आहे. या साऱ्यांचे पडसाद कमी-अधिक प्रमाणात 'इंदू काळे आणि सरला भोळे' मध्ये उमटलेले आहेत. विनायकराव भोळे ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा. अत्यंत बुद्धिमान पण त्यागी वृत्तीचा हा तरुण जीवनातील सुखासीनता ठोकरून महात्मा गांधींनी सुरू केलेल्या चळवळीत जातो. तुरुंगवास भोगतो; आणि तुरुंगातून सुटून आल्यावरही एक आश्रम स्थापन करून सार्वजनिक कार्याला स्वतःला वाहून घेण्याचा निश्चय करतो. त्यासाठी तो खूप दुःख सोसतो; परंतु आकस्मिक मृत्यू येऊन विनायकरावांचे सर्व मनोरथ अर्धेच राहातात. त्याची पत्नी सरला त्याचे व्रत पुढे चालविते. वामन मल्हारांच्या सर्व नायकांप्रमाणे हा नायकही विलक्षण बुद्धिवान, सुसंस्कृत मनाचा, संवेदनशील वृत्तीचा, तत्त्वजिज्ञासू व वादकुशल तरुण आहे. कादंबरीतील सर्व व्यक्तींना याच्याबद्दल आदर आहे. सर्वजण त्याला निरनिराळ्या अनुषंगाने आपल्या मनातील भावना पत्राने लिहून कळवतात. विनायकरावही त्यांना तत्परतेने जिव्हाळ्याचा प्रतिसाद देतो. अशा रीतीने विनायकरावांसह सर्वांच्या भावभावना व विचारकल्पना यांचे कादंबरीभर प्रकटीकरण होत राहाते. या दृष्टीने ही कादंबरी म्हणजे भावभावना, कल्पनाविचार, संकल्पविकल्प यांचा एक संकुल पटच ठरते. हा पट वाचकांना खूप वैचारिक खाद्य पुरवितो.

मात्र वचारिकदृष्ट्या ही कादंबरी 'सुशीलेचा देव'इतकी क्रांतिकारक नाही. तीत आदर्शापेक्षा जीवनवास्तवाचे आणि जीवनाच्या शोकान्त घाटाचेच अधिक दर्शन घडते. वामन मल्हारांच्या अन्य कादंबऱ्यांत शोकाचे एवढे गहिरेपण नाही. यातील 'ध्येये म्हणजे दुःखे' यासारखी वाक्ये किंवा 'देशभक्त मेला—.. शाळेला सुट्टी' यासारखे प्रसंग जीवनाच्या कठोर वास्तवाची जाण व भान आणून देतात, आपल्याला अंतर्मुख करतात. यातच या कादंबरीचे यश आहे.

या कादंबरीचा विचार काही टीकाकारांनी कलानीतिवादाच्या संदर्भातही केलेला आहे. हा कलानीतिवादाचा प्रश्न इंदू काळे या पात्राच्या संदर्भात उद्‌भवतो. पण तो आनुषंगिकच आहे. या कादंबरीत खरा प्रश्न आहे तो स्वधर्मविषयक. हा स्वधर्मविषयक प्रश्न वामन मल्हारांनी आपल्या प्रत्येकच कादंबरीत उपस्थित केलेला आहे, इतकेच नव्हे, तर तो त्यांच्या इतरही लेखन-विश्वाला व्यापून राहिलेला दिसतो. 'ध्येये म्हणजे दुःखे' असे जरी असले तरी

या दुःखांतच एक उच्चतर आनंद नांदतो. ही धारणा वामन मल्हार या कादंबरीतून अभिव्यक्त करतात. याच कादंबरीतून त्यांनी व्यक्त केलेले 'To understand all is to pardon all' हे दुसरे सूत्रही या उच्चतर आनंदाचाच पाठपुरावा करणारे आहे.

या कादंबरीत वामन मल्हारांनी आपले तत्त्वचिंतन विनायकराव या पात्राच्या आश्रयाने व्यक्त केलेले आहे. त्यांच्या इतर कादंबऱ्यांत मात्र त्यांनी स्त्रीमनाच्या प्रकटीकरणावर भर दिलेला आहे. नवशिक्षणाने उदित झालेल्या स्त्रीच्या नवभावभावनांचे, नवकल्पनांचे, नवविचारांचे आलेखन वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांतून विविध पातळ्यांवरून मांडले आहे. त्यामुळेच वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांतून एक 'नवी स्त्री' जन्माला घातली असे म्हटले जाते. या स्त्रीत त्यांनी नव्याजुन्याचा एक सुंदर समन्वय साधला आहे, हेही लक्षणीय आहे. मात्र असे करताना भारतीय परंपरेला अनुसरून वामन मल्हारांनी भोगापेक्षा त्यागावर, विलासापेक्षा कारुण्यावर अधिक भर दिलेला आहे. वामन मल्हारांच्या मनात समग्र स्त्रीजातीबद्दल अतीव आदर आणि कमालीचा जिव्हाळा आहे. कदाचित हिंगणे येथील स्त्रीशिक्षण संस्थेत दीर्घकाल राहिल्यामुळे त्यांना नव्या स्त्रीच्या मनाचा सुगावा अधिक प्रमाणात लागला, असे म्हणण्यास हरकत नाही. 1915 ते 1935 मधील नव्या स्त्रीचे मन ज्याला समजून घ्यावयाचे असेल त्याला वामन मल्हारांच्या कादंबरीविश्वाकडे वळल्याखेरीज गत्यंतर नाही. किंबहुना ज्याला म्हणून या कालखंडातील सुशिक्षित मराठी मनाची स्पंदने टिपावयाची असतील त्याला वामन मल्हारांचे कादंबरीविश्व न्याहाळावेच लागेल. मराठी संस्कृतिविश्वात वामन मल्हारांच्या कादंबरीलेखनाची अशी मातब्बरी आहे. वामन मल्हारांच्या जोडीने डॉ. केतकरांनी मराठी जीवनातील स्थित्यंतरांकडे जे लक्ष वेधले, तेही महत्त्वाचे ठरते. पण वृत्तितः केतकर समाजशास्त्रज्ञ आहेत. शास्त्रज्ञाच्या दृष्टिकोणातून ते साऱ्या जीवनव्यवहाराकडे पाहातात. याउलट वामन मल्हारांची भूमिका शास्त्रज्ञाची नसून सहृदय तत्त्वचिंतकाची आहे. आणि म्हणूनच त्यांच्या लेखनात प्रतीतिगोचरता अधिक प्रमाणात अवतरली आहे.

कादंबरीकार म्हणून वामन मल्हारांचा उदय हरि नारायण आपटे यांच्या उत्तरकालात झाला. वामन मल्हारपूर्व काळात सामाजिक मराठी कादंबरीची एक वास्तववादी बैठक हरिभाऊंच्या कादंबरीलेखनाने सिद्ध झालेली होती.

तत्कालीन मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेत निर्माण होऊ घातलेली स्थित्यंतरे हरि-भाऊंनी आपल्या कादबऱ्यांतून चित्रित करण्याचा उपक्रम केला होता. हरिभाऊंनी चितारलेले हे प्रश्न नवजागृत समाजाच्या प्रारंभकालातील होते. वामन मल्हारांच्या समोर जो मध्यमवर्ग होता तो हरिभाऊंसमोरील मध्यमवर्गाच्या तुलनेने पुढच्या पिढीतला, आर्थिक-शैक्षणिक सुविधा प्राप्त झालेला, सांस्कृतिकदृष्टचा अधिक वरच्या स्तरावरला असा होता. विशेषतः वामन मल्हारांच्या कादंबरीतील स्त्री हरिभाऊंच्या कादंबरीतील स्त्रीच्या तुलनेने अधिक प्रगमनशील बनलेली होती, ती एकत्र कुटुंब. पद्धतीच्या कोंडमाऱ्यातून, अशिक्षितपणातून, असंस्कृत-पणातून मुक्त झालेली होती; आचार-विचारदृष्टचा ती स्वतंत्र बनलेली होती; स्वातंत्र्याबरोबरच समतेचें तत्त्व अंगीकारून पुढे जाऊ इच्छिणारी होती. प्रत्यक्ष वास्तवात या प्रकारच्या स्त्रीचें प्रमाण अत्यल्पच होते. पण अपवादाने का होईना, एक नवी स्त्री उदयाला येत होती आणि तिच्या आगमनाची द्वाही वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतून पुकारली जात होती.

तंत्रदृष्टचाही वामन मल्हारांनी पूर्वकालीन किंवा समकालीन कादंबरीकारांच्या तुलनेने कितीतरी पुढे पाऊल टाकले होतें. आत्मकथनपर निवेदन हा त्यांच्या शैलीचा खास विशेष. हा त्यांनी नव्याने अस्तित्वात आणला होता असें नाही. बाबा पदमनजीलिखित 'यमुना पर्यटन' या पहिल्या मराठी कादंबरीत आत्मनिवेदनाचेंच अवलंबन आढळते. पुढे हरिभाऊंची अव्वल दर्जाची म्हणून जी गणली गेली त्या 'पण लक्षात कोण घेतो!' या कादंबरीचा घाटही आत्मचरित्रपरच आहे. अशा परिस्थितीत वामन मल्हारांच्या आत्मचरित्रपर तंत्राचें वैशिष्टच काय?—हा प्रश्न उपस्थित होतो. हे वैशिष्टच दोन प्रकारे स्पष्ट करता येतें. एक म्हणजे वामन मल्हारांनी आत्मकथनाचें विविध प्रकार, विविध पद्धती हाताळल्या. (उदा. पोथी, आत्मचरित्र, पत्रे, तारा इ.) दुसरे म्हणजे त्यांनी आत्मलेखनाला अधिक अंतर्मुख केले. या बाबतीत वामन मल्हारांनी हरिभाऊंचीच परंपरा एका परीने समृद्ध केली. फडकेयुगात ती मागासली. पण आज पुन्हा ती नव्याने पुढारते आहे असें दिसते. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला', 'बिढार', 'जरीला', 'झूल' या कादंबऱ्या याचीच साक्ष देतात. आत्मकथनापरता, संवादात्मकता, विदग्धता, विश्लेषणात्मकता, संसृतिटीका इत्यादी गोष्टी वामन मल्हारांच्या कादंबरीप्रमाणे नेमाडे यांच्या कादंबऱ्यांतही आढळतात. या दृष्टीने वामन मल्हारांचा वारसा समृद्ध करू शकेल अशी नवी पिढी पुढे येते आहे, असें

दिसते. या पिढीला वामन मल्हारांचे अनुसरण करायचे नसले तरी कृतज्ञ स्मरण करावे लागेल, करणे न्याय्य ठरेल.

## संदर्भ


1. उषा हस्तक आणि वा. ल. कुळकर्णी "कादंबरी", **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड 5, भाग पहिला, (संपा. रा. श्री. जोग), पुणे, 1973, पृ. 433.
2. "वाङ्मयाची प्रवृत्ती आणि ध्येये", **विचारसौन्दर्य**, मुंबई, 1940, पृ. 90.
3. "वाङ्मयविषयक माझी दृष्टी", **तत्रैव**, पृ. 107.
4. "नवमतवादाविषयी माझे काही स्फुट विचार", **विचार-विहार**, पृ. 23.
5. "वाङ्मयविषयक माझी दृष्टी", **पूर्वोक्त**, पृ. 105.
6. "मी आणि माझी पुस्तके", **विचारलहरी** (आ. 2 री), पुणे, 1952, पृ. 54
7. कुसुमावती देशपांडे, **मराठी कादंबरीचे पहिले शतक** (आ. 2 री), मुंबई, 1975, पृ. 128.
8. श्री. कृ. कोल्हटकर, "रागिणी व तिची भावंडे", **कोल्हटकरांचा लेखसंग्रह**, (संपा. खांडेकर—माडखोलकर–खानोलकर), मुंबई, 1932, पृ. 582.
9. कुसुमावती देशपांडे, **पूर्वोक्त**, पृ. 130.

# प्रकरण चौथे
# समीक्षालेखन

अव्वल दर्जाच्या साहित्यसमीक्षकाला आवश्यक असलेले सर्व गुणविशेष वामन मल्हारांच्या ठिकाणी एकवटलेले होते. त्यांनी जी काही समीक्षा केलेली आहे, तीमधून त्यांची साहित्याविषयीची जिवंत आस्था, चोखंदळपणा, बहुश्रुतता, मर्मज्ञता, सहृदयता, प्रगल्भ सौंदर्यदृष्टी, न्यायबुद्धी प्रकट होते. ते जुन्यानव्याकडे सारख्याच स्वागतशील वृत्तीने पाहातात. प्रकृतितः तत्त्वचिंतक असल्यामुळे ते साहित्यव्यवहाराचा मूलात्म पद्धतीने विचार करतात. या संदर्भात ते काही नवे प्रश्न उपस्थित करतात किंवा जुन्या प्रश्नाच्या उपेक्षित राहिलेल्या बाजूकडे ते लक्ष वेधतात. त्यांच्या अनाग्रही, प्रांजळ, जिज्ञासू आणि रसिक वृत्तीमुळे ही समीक्षा जशी उद्बोधक होते, तशीच रोचकही. त्यांनी जे साहित्यसमीक्षात्मक लेखन केलेले आहे, ते बहुतांशी स्वान्तसुखार्थ आहे. आपली वाङ्मयविषयक समजूत आपल्यालाच आपल्या समीक्षेतून अधिक ज्ञात व्हावी, अशी ते भूमिका घेतात. त्यामुळे त्यांच्या या समीक्षेत खंडन-मंडनात्मक भाग प्रमाणतः कमी आहे. जो आहे तो मुख्यतः कला-नीती किंवा कला-जीवन यांसारख्या विषयांच्या संदर्भात. वामन मल्हारांच्या काळात कला-नीतिवादाला तसेच कला-जीवनवादाला विशेष जोर आला होता. (त्याचे पडसाद वामन मल्हारांच्या 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतही उमटलेले आहेत). कला-नीतिवादात वामन मल्हार नीतिवादाचा पक्ष उचलून धरण्यात प्रमुख असल्यामुळे स्वाभाविकच त्यांनी या बाबतीत पुनःपुन्हा आणि कटाक्षानेही लिहिले आहे. ते स्वतः त्या काळचे एक नामवंत सर्जनशील लेखक असल्यामुळे त्यांच्या समीक्षात्मक लेखनात आत्मप्रत्ययाचाही काही भाग उतरला आहे. त्यांच्या वृत्तीत पूर्वकालिनांबद्दल आदर, समकालिनां-बद्दल आस्था आणि नवकालिनांबद्दल प्रेम असल्यामुळे नवे-जुने सर्वच लेखक त्यांच्या समीक्षेकडे विशेष औत्सुक्याने पाहात असत. नव्याकडे पाहाण्याच्या त्यांच्या स्वागतशील वृत्तीमुळेच मराठी कवितेत नवे युग निर्माण करणाऱ्या

वा. सी. मर्ढेकरांनाही आपल्या पहिल्यावहिल्या समीक्षात्मक पुस्तकाला ('वाङ्मयीन महात्मता'ला) वामन मल्हारांची प्रस्तावना घ्यावी असे वाटते.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि न. चिं. केळकर हे वामन मल्हारांना समकालीन असलेले नामवंत समीक्षक. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर किंवा ग. त्र्यं. माडखोलकर ही वामन मल्हारांच्यात्र काळची, पण नंतर उदयाला आलेली समीक्षकांची नवी पिढी. या नव्या व जुन्या दोन्ही पिढीतील साहित्यसमीक्षेशी वामन मल्हारांचे अनुसंधान आहे. तथापि कोल्हटकर व केळकर हे समकालिनत्वामुळें अधिक जवळचे. या दोहोंच्याही साहित्यकृतींचें वामन मल्हारांनी समीक्षणही केले आहे. कोल्हटकरांची साहित्यसमीक्षा मुख्यत: विश्लेषण-प्रधान आहे, तर केळकरांची आस्वादक. वामन मल्हारांमध्ये या दोघांचेही संतुलन आढळेल. कोल्हटकर किंवा केळकर यांच्याइतके वामन मल्हार साहित्योपजीवी नाहीत. साहित्यापेक्षा जीवनव्यवहारात, विचारविहारात त्यांना अधिक रस आहे; परंतु यामुळेच त्यांच्या साहित्यचिंतनाला अधिक गहिरेपणही प्राप्त झाले आहे. वामन मल्हारांच्या उत्तरकालात वाङ्मयसमीक्षेत तंत्रप्रधानतेचा जोरदार प्रवेश झालेला होता. स्वतः वामन मल्हारांनीही कादंबरीलेखनाच्या तंत्रात बरेच नवनवे प्रयोग केलेले दिसतात. तथापि त्यांना वाङ्मयीन तंत्रामध्ये तंत्राकरिता तंत्र या स्वरूपाचा रस नाही. तंत्रापेक्षा वाङ्मयातील मंत्राकडे ते अधिक आकृष्ट होतात. तंत्रापेक्षा कलावंताच्या विशिष्ट प्रकारच्या व्यक्तित्वाला, त्याच्या निर्मितीमागील प्रयोजनाला ते अधिक महत्त्व देतात. तंत्राकडे संपूर्ण दुर्लक्ष करून केलेले लेखन त्यांना अर्थातच अमान्य असते. यासाठीच त्यांनी केतकरांच्या कादंबऱ्यांवर काही आक्षेपही घेतले आहेत. सत्य हे कितीही महत्त्वाचे असले तरी ते साहित्यातून अभिव्यक्त होताना लक्षणीय, कमनीय, साभिप्राय बनले पाहिजे, असे ते आग्रहाने सांगतात. कलेत मतप्रचाराला ते मज्जाव करीत नाहीत; पण हा मतप्रचार कलेचे नियम पाळूनच आला पाहिजे, अशी अटही ते घालतात. याचाच अर्थ त्यांची समीक्षा कला आणि जीवन यांचा संतुलित विचार करू इच्छीत असलेली दिसते. तथापि वामन मल्हारांचा, एकंदर समीक्षाव्यूह लक्षात घेतल्यास ती कलावादी असण्यापेक्षा अधिकतर प्रमाणात जीवनवादी आहे, असे म्हणावे लागेल. त्यांचा कला-नीतिविचारही या अनुषंगानेच प्रवाहित झालेला आहे. कलाकृतीच्या विचारात वामन मल्हारांच्या मते कलावंताच्या व्यक्तित्वाला अधिक महत्त्व असते. कलावंताच्या मनाची खोली, प्रगल्भता, विवेकशीलता, मार्मिकता

इत्यादींचा प्रत्यय कलाकृतीतून तीव्रतेने जागवण्यावरच कलाकृतीची महती अवलंबून असते, असे त्यांचे मत आहे.

वामन मल्हारांची साहित्यविषयक भूमिका समजून घेण्याच्या दृष्टीने "वाङ्मय–कलाविषयक माझी दृष्टी" हा त्यांचा लेख महत्त्वाचा आहे. "कलेचा आणि साहित्यकलेचा मी भक्त असलो, तरी मी अनन्य भक्त नाही. मला केव्हाही हे विसरता येत नाही की, मनुष्याचा जन्म केवळ कलेचा आनंद लुटण्याकरिता नाही. कला नसेल तर मनुष्याच्या जीवनात ते मोठेच वैगुण्य होईल, पण जीवन हे केवळ कलात्मक नाही. जीवनात ज्या अत्यंत रम्य आणि वंद्य गोष्टी आहेत, त्यांत कलेबरोबर नीतीचा आणि सत्याचाही समावेश होतो आणि यांचे जर एकमेकांत पटले नाही, तर जीवनातील ती मोठीच आपत्ती म्हटली पाहिजे.[1] यासाठीच साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना त्यांनी वाङ्मयलेखकांना आदेश दिला की, "असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणे व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचे संकल्पन करणे हे आपले अवतारकृत्य आहे."[2] वामन मल्हारांचा साहित्यविचार मूलतः आदर्शवादी स्वरूपाचा असला तरी वास्तववादाचे किंवा सौंदर्यवादाचे त्यांना वावडे नाही; किंबहुना त्यांच्या तत्त्वविचारातील व्यक्तिमहात्म्य व व्यक्तिस्वातंत्र्य आणि असांप्रदायिकता व नावीन्यप्रेम लक्षात घेतल्यावर ते सौंदर्यवादीही ठरतात. त्यांना असलेले जीवनवास्तवाचे भानही "ही आमची समाजव्यवस्था" या 'सुशीलेचा देव' या कादंबरीतील प्रकरणातून किंवा 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीच्या शेवटावरून स्पष्ट होते.

वामन मल्हारांच्या साहित्यसमीक्षेचे तात्त्विक आणि उपयोजित असे दोन भाग करता येतील. त्यांची साहित्यसमीक्षा तशी स्फुट स्वरूपाची आहे. ती मुख्यतः त्यांच्या 'विचार-सौंदर्य' या स्फुटलेखसंग्रहात समाविष्ट झालेली आहे. 'विचार-विहार' मध्येही काही वाङ्मयविषयक लेख समाविष्ट आहेत.

वामन मल्हारांच्या वाङ्मयविषयक तत्त्वविचारात पुढीलसारख्या विषयांचा समावेश होतो: वाङ्मयाची प्रवृत्ती व ध्येये, वाङ्मय कालनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ? मतप्रचार आणि कला, वाङ्मय बोधपूर्व की अबोधपूर्व? अलीकडे महाकाव्ये का निर्माण होत नाहीत? आत्मनिष्ठा आणि आत्माविष्कार, कलाकृती रसिकार्थ की स्वान्तसुखार्थ?, काव्यानंदमीमांसा, ॲरिस्टॉटलच्या 'कॅथार्सिस'चा अन्वयार्थ, कला आणि नीती, कला आणि नीतिसंबंध, वाङ्मयीन महात्मतेची कारणे.

वामन मल्हारांच्या या साहित्यविचाराचा पाया संस्कृत साहित्यशास्त्रा-पेक्षा पाश्चात्य साहित्यशास्त्राशी अधिक संबंधित आहे त्यामध्ये आधुनिक ज्ञानविज्ञानाचा, मानसशास्त्राचा अवलंब आहे. त्यांच्या साहित्यसमीक्षेने मुख्यतः गद्य साहित्यप्रकारांचाच विचार केलेला आहे. हे लक्षात घ्यायला हवे की वामन मल्हारकालीन साहित्यसमीक्षा प्रामुख्याने काव्यकेंद्रित होती व संस्कृत साहित्यशास्त्राची परिभाषा अवलंबीत होती. या पार्श्वभूमीवर वामन मल्हारांच्या समीक्षेचे आधुनिकत्व अधिक नजरेत भरते. साहित्य–चर्चेची त्यांची परिभाषाही आधुनिक आहे. तीत मुख्यतः नवमानसशास्त्राचा अवलंब आहे.

वामन मल्हार हे सामान्यतः जीवनवादी मानले जात असले तरी त्यांच्या या जीवनवादात कलेला फार महत्वाचे स्थान आहे. सौदर्याचे महत्त्व विशद करताना ते सत्त्वविलासाचे व आत्मप्राप्तीचे (Self realisation चे) एक अंग आहे, इतकेच नव्हे, तर प्रमुख अंगांपैकी एक अंग आहे, असे म्हणतात. कलायोगी हा ज्ञानयोग्याच्या पातळीवर जाऊ शकतो. कारण आत्मातीत व आत्मरत वृत्ती दोन्हीकडे कार्यकर असते, असेही ते म्हणतात.

वामन मल्हारांनी आपली काव्यानंदमीमांसा स्वतंत्रपणे न मांडता, न. चिं. केळकरांच्या काव्यानंदमीमांसेच्या–सविकल्प समाधी कल्पनेच्या–अनुषंगाने मांडली आहे. 'आपली बैठक तर सोडायची नाही; पण बसल्या बैठकीत इतर भूमिकांचाही आनंद सेवायचा' अशी आत्मौपम्याची भूमिका केळकरांनी काव्यानंदाबाबत घेतली आहे. केळकरांच्या सविकल्प समाधीचा हा गाभा आहे. वामन मल्हारांनी या भूमिकेवर अनेक आक्षेप घेतलेले आहेत. आणि काव्या–नंदाबाबत 'कारणानाम् अनेकता'चे तत्त्व मांडले आहे. कवीचा व आपला अनुभव जुळणे, विचारसाहचर्याने अनेक प्रिय वस्तूंची वा व्यक्तींची आठवण होणे, रम्योदात्त देखावे वा प्रसंग पाहिल्याने मनाला उदात्त अवस्था प्राप्त होणे, आपल्या भावनांचे विरेचन होणे, यांसारखे घटक काव्यानंदाला कारणीभूत असतात, असे वामन मल्हारांनी या संदर्भात म्हटले आहे.[3] करुणरसापासून होणाऱ्या आनंदाचा संबंध ते करुणभावनेमुळे होणाऱ्या विविध संस्कारांशी जोडतात.

वामन मल्हारांच्या साहित्यचर्चेत कलेचा नीतीशी असणारा संबंध, हा एक महत्त्वाचा विषय आहे. कला, नीती व सत्य यांचे परस्परसंबंध स्पष्ट करताना ते म्हणतात, "कला, नीती व सत्य ही सामान्यतः आपापल्या परीने स्वतंत्र असली तरी अंतिमतः ती एकरूप आहेत. ज्ञानप्रिय, नीतिप्रिय व

कलाप्रिय असे जे आपल्या मनाचे तीन विभाग आपण सोयीसाठी मानतो, ते विभाग विभिन्न नाहीत, तर अन्योन्यसापेक्ष, अन्योन्याश्रयी व अन्योन्यसंस्कारक आहेत." पण याच वेळी कला, नीती व सत्य याबाबतची ही अंतिम स्वरूपाची भूमिका मांडताना यातील प्रत्येक घटकाला आपापल्या क्षेत्रात शक्य तों स्वातंत्र्य दिले पाहिजे, असेही म्हटले आहे.[4]

कलावंताची निर्मिती या ना त्या स्वरूपात नीतिसापेक्ष राहिली पाहिजे, असा युक्तिवाद करण्याने कलावंताच्या निर्मितिस्वातंत्र्यावर बंधने पडत नाहीत का?—असा एक प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचा विचार करताना वामन मल्हारांनी कलावंताचे स्वातंत्र्य मान्य केले आहे; प्रसंगी प्रचलित नीतीचा त्याग करण्यांसही त्यांनी अनुमती दिली आहे. पण हा त्याग करण्यामागील कलावंताचे प्रयोजन प्रचलित नीतीहून भिन्न पण मानवकल्याणाच्या दृष्टीने उच्चतर नीतीचा पुरस्कार करणारे असले पाहिजे अशी अटही घातली आहे. पण अशी कोणतीही गरज नसेल तर कलावंताने अकारण औचित्यभंग करू नये, असेही म्हटलेले आहे. कारण कलावंत हाही अखेरतः समाजाचा एक घटक असतो, हे ते विसरत नाहीत. कला—नीतीचा प्रश्न वामन मल्हारांच्या मते अंतिमतः तारतम्याने आणि शुद्ध अंतःकरणाने सोडवावयाचा प्रश्न आहे. कलाविचार असो वा जीवनविचार असो, वामन मल्हारांच्या लेखी या शुद्ध अंतःकरणात्मक तारतम्यबुद्धीला, विवेकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

वामन मल्हारांच्या वाङ्मयविषयक तात्विक विचाराच्या दृष्टीने त्यांचा "वाङ्मय कालनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ?" हा लेखही महत्त्वाचा आहे. 1930 नंतर महाराष्ट्राला मार्क्सवादाची तोंडओळख होऊ लागली. जीवनाकडे व साहित्याकडे त्यांच्या परस्पर अनुबंधांनिशी पाहाण्याची एक नवी दृष्टी तीतून जन्माला आली. ही दृष्टी महत्त्वाची होती; पण तिचा महाराष्ट्रात जो प्रसार झाला तो ओबडधोबड व धोपट स्वरूपाचा होता. वाङ्मयनिर्मितीचा जीवनाशी जखडबंद संबंध जोडला जाऊ लागला. वामन मल्हारांना मार्क्सवाद वर्ज्य नव्हता. तथापि साहित्य आणि जीवनव्यवहार यांची ही जखडबंद सांगड 'कारणानाम् अनेकता' मानणाऱ्या त्यांच्यासारख्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारवंताला मान्य होण्यासारखी नव्हती. "कला काय, नीती काय किंवा सत्यप्रीती काय, पूर्ण स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेतच फुलते, फोफावते" असे ते म्हणतात.[5] त्यांचे हे म्हणणे युक्तच आहे. पण साहित्य आणि समाज

यांच्या परस्परसंबंधांबाबतची त्यांची भूमिका तत्कालीन इतर विचारवंतांप्रमाणे द्विधा स्वरूपाची आहे, याचा प्रत्यय त्यांच्या " अलीकडे महाकाव्ये का निर्माण होत नाहीत ?" (विचार–सौंदर्य) या लेखावरूनही येतो. आजच्या काळातील महाकाव्यांच्या अनिर्मितीचा विचार करताना ते फुरसतीचा अभाव, अभिरुचीतील बदल, सामाजिक परिवर्तने इत्यादींसारखी कारणे सयुक्तिक मानतात, आणि खरी काव्यदृष्टी असेल तर कोणत्याही परिस्थितीत काव्य निर्माण होते असेही ठासून सांगतात. शिवाय महाकाव्याच्या प्रभावाची कारणे ते प्रतिभेच्या आजच्या अभावात शोधतात; परंतु प्रतिभेच्या आजच्या अभावाची मीमांसा करताना मात्र जीवनातील अस्थिरता, ढासळती जीवनमूल्ये, लहानसहान प्रश्नांतच गुंतून पडण्याची आजची वृत्ती इत्यादींसारखा सामाजिक कारणांकडे बोट दाखवितात. पूर्वीच्या महाकाव्याची जागा आता कादंबरीने घेतलेली आहे, हा मुद्दा 'रागिणी'-कर्त्या वामन मल्हारांना वास्तविक सहज सुचण्यासारखा होता; पण तसा तो सुचला नाही. किंवा सुचूनही त्यांनी मांडला नाही.

वाङ्मयविषयक तात्त्विक प्रश्नांच्या अनुरोधाने विचार करता वामन मल्हारांनी मर्ढेकरांच्या 'वाङ्मयीन महात्मते' ला लिहिलेली प्रस्तावना महत्त्वाची ठरते. तात्त्विक स्वरूपाची वाङ्मयमीमांसा करणारा हा त्यांचा बहुधा शेवटचाच महत्त्वाचा लेख. या लेखात त्यांनी वाङ्मयातील आत्मनिष्ठा, कलाकृतीतील स्वानुभवाचे स्थान इत्यादींसंबंधी केलेले विवेचन त्यांची विचक्षण समीक्षावृत्ती व साहित्यविषयक अभिज्ञता अखेरपर्यंत कशी टवटवीत होती, याची साक्ष देतात.

वामन मल्हारांची उपयोजित समीक्षा बव्हंशी पुस्तक–परीक्षणांच्या स्वरूपाची आहे. तीमध्ये काव्य किंवा कथेपेक्षा कादंबरीविषयक परीक्षणांना अग्रस्थान आहे. स्वतः ते कादंबरीकार असल्यामुळेही असे झाले असेल. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या, श्रीपाद कृष्णांची 'दुटप्पी की दुहेरी', गो. चिं. भाटे यांची 'प्रेम की लौकिक' या समकालीन कादंबऱ्यांचा व ग. त्र्यं. माडखोलकरांची 'भंगलेले देऊळ', पु. य. देशपांडे यांची 'बंधनाच्या पलीकडे' यांसारख्या उत्तरकालीन कादंबऱ्यांचा त्यांनी परामर्श घेतलेला आहे. याशिवाय त्यांच्या परीक्षणविषयक लेखांमध्ये कृ. प्र. खाडिलकरांचे 'सत्त्वपरीक्षा' हे नाटक, न. चिं. केळकरांचे 'गतगोष्टी' हे आत्मचरित्र व कृष्णाबाई या लेखिकेचा 'अनिरुद्ध प्रवाह' हा कथासंग्रह यांचा अंतर्भाव होतो.

वामन मल्हारांच्या काळात ग्रंथपरीक्षण हा महत्त्वाचा समीक्षाप्रांत गणला जात होता. विस्तृत व व्यासंगपूर्ण परीक्षण लिहिणाऱ्या लेखकांचा मोठा वर्ग त्या काळी अस्तित्वात होता. ग्रंथकार–परिचय, प्रशस्ती, त्यांच्या विशिष्ट कृतींचे स्वरूप, आशयकथन, तदनुषंगिक अनुकूल–प्रतिकूल प्रतिक्रिया, गुणदोष-दर्शन, भाषाविचार असा या परीक्षणलेखांचा ढाचा होता. वामन मल्हारांनीही बव्हंशी याचाच अवलंब केलेला आहे. आत्मनिवेदनपर पुस्तकांबाबत वामन मल्हारांना विशेष आस्था आहे, असे त्यांचे एकूण ग्रंथपरीक्षणविषयक लेख पाहाता दिसते. कारण तो त्यांचा विशेष आवडता कथन-प्रकार आहे. त्यांच्या परीक्षणातील गुणदोषविवेचनात सौम्यपणा असला तरी स्पष्टपणा आहे. परीक्षणाच्या अनुषंगाने ते तात्त्विक प्रश्नांचा ऊहापोही करतात. या दृष्टीने त्यांचा केतकरांच्या कादंबऱ्यांचे परीक्षण करणारा लेख विशेष महत्त्वाचा आहे.

समीक्षक वामन महारांच्या कार्याचे मूल्यमापन करताना मराठी समीक्षेचा एकूण आढावा घेणाऱ्या आपल्या लेखात डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी जे लिहिले आहे ते लक्षणोय आहे. ते लिहितात, "वामन मल्हारांनी स्वतंत्र वृत्तीने साहित्यविमर्श कसा करता येतो, ते दाखवून दिले. त्यांनी संस्कृत साहित्यशात्राला, तसेच अर्वाचीन मराठी वाङ्मयीन वादांना अवास्तव महत्त्व न देता साहित्य-शास्त्रातील मूलभूत विचारांनाच हात घातला. . .कलाविचारातील एकांगीपणा किंवा अभिनिवेशी वातावरण दूर करण्यास वामन मल्हारांच्या 'कारणानाम् अनेकता' या तत्त्वाने आणि 'विचारसौंदर्या' च्या भूमिकेने पुष्कळच साहाय्य केले. वामन मल्हारांनी केलेले साहित्यचिंतन म्हणजे अर्वाचीन तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाने केलेले मराठीतले स्वतंत्र साहित्यचिंतन होय. त्यात संस्कृत साहित्यशास्त्रीय रसिकनिष्ठ भूमिकेपेक्षा पाश्चात्य साहित्यशास्त्रातील कला-निर्मितिप्रक्रियेवरच भर दिलेला आढळतो. यामुळे खरोखर आधुनिक म्हणजे आजच्या नवसाहित्य विचाराची वाट वामन मल्हारांनी घालून दिली, असे म्हणणे योग्य ठरेल."[6]

## संदर्भ

1. **विचार–सौंदर्य**, पृ. 105–106
2. **तत्रैव**, पृ. 90
3. **तत्रैव**, पृ. 33–35

4. वा. ल. कुळकर्णी, **वामन मल्हार वाङ्मयदर्शन** (आ. 4 थी), पृ. 96
5. **विचारसौन्दर्य** पृ. 102
6. डॉ. व. दि. कुलकर्णी, "साहित्यविचार" **प्रदक्षिणा** (आ. 5 वी), पुणे 1972, पृ. 244–45

# प्रकरण पाचवे

# स्फुट ललित–लेखन

वामन मल्हारांच्या तत्त्वचर्चात्मक लेखनाचा व कादंबरीलेखनाचा विचार केल्यानंतर येथे त्यांच्या ऊर्वरित ललित–लेखनाचा विचार करावयाचा आहे. यांमध्ये त्यांचे कथात्म साहित्य (' नवपुष्पकरंडक ' 1916), स्मृति–लेखात्म साहित्य ('स्मृतिलहरी' 1942) आणि नाट्यात्म साहित्य (' विस्तवाशी खेळ ' 1937 हे नाटक आणि इतर काही छोट्या नाटिका) यांचा समावेश होतो. वामन मल्हारांचे तत्त्वचर्चात्मक लेखन, त्यांच्या कादंबऱ्या, त्यांचे येथे उल्लेखिलेले ललित–लेखन याखेरीज विविध विषयांवरील स्फुट स्वरूपाचे काही लेखन अद्यापीही असंगृहित आहे. ते संगृहित झाल्यास मराठी साहित्यातील तत्त्वचर्चात्मक विचारात, व्यक्तिविचारात, ग्रंथसमीक्षणपर वाङ्मयात चांगली भर पडेल, हे मुद्दाम जाता जाता नमूद करायला हवे. येथे प्रथम त्यांच्या नाट्यात्म व कथात्म वाङ्मयाचा विचार करू. त्यांचे 'स्मृतिलहरी' हे पुस्तक महत्त्वाचे व मौलिक असल्याने त्याचा शेवटी थोडाशा विस्ताराने विचार करावयाचा आहे.

**' विस्तवाशी खेळ '**

' विस्तवाशी खेळ ' हे वामन मल्हारांनी 1937 मध्ये लिहिलेले ' स्वतंत्र सामाजिक नाटक ' होय. वामन मल्हारांनी लिहिलेले हे एकमेव नाटक. निष्क्रिय पुरुषपात्रे, तंत्रदोष, पुरातन पद्धतीची नाट्यशून्य रचना आणि सदोष कथानक यामुळे वामन मल्हारांची ही ललितकृती चांगलीच डावी ठरली आहे. तथापि या नाटकाचे महत्त्व आहे ते त्यातून वामन मल्हारांनी त्या काळी बहुचर्चित असलेल्या ' नवमतवादा ' च्या स्वीकाराबाबत दिलेल्या सावधानतेच्या इशाऱ्यासाठी.

या नाटकातील नवमतवादाच्या विचारामुळेच प्रा. वा. ल. कुळकर्णी

म्हणतात त्याप्रमाणे हे नाटक ..."थोडेफार लक्षात राहिले तर त्यातील 'विजया' ह्या नवमतवादी स्त्रीच्यां चित्रासाठी व त्या चित्रद्वारे वामनरावांनी थोड्याफार प्रमाणात साधलेल्या समाजदर्शनासाठी...'स्त्री–पुरुषांनी एकत्र बोलावं–चालावं, समाजाला भिऊ नये, विवाहसंस्थेची आता जरुरी नाही' असली मते स्थळ, काळ व व्यक्ती लक्षात न घेता उतावीळपणे प्रतिपादिणारी, परंतु स्वत्वाला जपणारी, स्वाभिमानी, निष्कपट, फटकळ, थोडीशी अविचारी अशी ती (विजया) स्त्री आहे. आपण वेळीअवेळी प्रतिपादिलेल्या बर्ट्रान्ड रसेलच्या मतांमुळे अडाणी नर्मदेच्या चरित्रावर किती अनिष्ट परिणाम झाला हे लक्षात आल्यावर 'नवमतवादी बोलण्याचा निखारा एखादे वेळी अशी आग लावायचा, ही गोष्ट माझ्या ध्यानात आली नाही...' असे प्रांजळपणे कबूल करण्याइतका विवेक तिच्याजवळ आहे"[1]

या लेखनकाळात नवमतवादाला विशेष भरती आलेली होती. या नवमतवादातील काही भाग स्वतः वामन मल्हारांना लक्षणीय आणि ग्रहणीय वाटत होता. तथापि याबाबतीत तारतम्य बाळगण्याची गरजही दुसऱ्या बाजूने त्यांना वाटत होती. अन्यथा तारतम्यरहित व स्थलकालविचाराला फाटा देणारा नवमतवादाचा पुरस्कार हा एक "विस्तवाशी खेळ" ठरेल, असे वामन मल्हारांना वाटत होते. या बाबतीत असा सावधानतेचा इषारा देण्याच्या भूमिकेतूनच या नाटकाचा जन्म झाला आहे, हे उघड आहे. नवमतवादाकडे पाहाण्याचा वामन मल्हारांचा दृष्टिकोण किती विवेकी होता, हे समजण्याच्या दृष्टीनेच त्यांच्या या नाटकाचे महत्त्व आहे. कोणत्याही नव्या तत्त्वज्ञानाचा, नवविचाराचा स्वीकार डोळसपणे व्हावा ही वामन मल्हारांची नेहमीची तळमळच या नाटकाच्या लेखन मागची प्रेरणा होय.

### संवाद व नाटिका

1940 पूर्वी लिहिले गेलेले छोटेखानी नाट्यवाङ्मय हे मुळात शाळा–कॉलेजमधील सभासंमेलनप्रसंगी करण्याकरिता प्रामुख्याने लिहिले गेलेले आहे. वामन मल्हार हे हिंगण्याच्या शिक्षणसंस्थेत अध्यापन करीत. त्यामुळे संमेलनादी प्रसंगांची उपयुक्तता भागावी म्हणून त्यांनी संवाद व नाटिका लिहिल्या. "अर्थात विशिष्ट नीतितत्त्वांची शिकवणूक हे त्यांचे उद्दिष्ट आहे; असे असले तरी त्यातून वामनरावांच्या लिखाणातील बरीचशी वैशिष्ट्ये व्यक्त झाली आहेत. कोणत्याही विषयाची सर्व अंगे अवलोकण्याची व दर्शविण्याची

त्यांची सवय, कल्पनाविलास व शब्दविलास ह्यावर आधारलेला प्रसंगोचित विनोद, नवनिर्मितिक्षम प्रतिभेचा अभिनव कल्पनाविलास, स्त्रीमनाचे म्हणजेच स्त्रीस्वभावाचे अचूक परंतु सहानुभूतिपूर्ण दर्शन, सर्वच लिखाणाच्या बुडाशी आढळणारी प्रबळ तत्त्वनिष्ठा इत्यादी त्यांच्या सगळयाच लिखाणात आढळणारे गुणविशेष ह्याही संवादांत दिसून येतात"[2] या नाटयात्म लिखाणातही वामन मल्हारांची तल्लख कल्पकता सहज कशी चमकून जाते ते पाहाण्यासारखे आहे. 'स्वराज्या–मेळा' या संवादातील पात्रांची नावे राजकारणबाई, सामाजिकबाई, गोरक्षबाई, राष्ट्रीय शिक्षणबाई, एकीकरणबाई, स्वदेशीबाई, सत्याग्रहीबाई इत्यादीप्रमाणे त्यांनी ठेवून प्रत्येक तत्त्वाच्या आग्रहामागे दडलेला एकांगीपणाच वामन मल्हार उघड करू पाहातात. 'लीलारहस्य' हा असाच कल्पनाविलासाने नटलेला संवाद आहे. मात्र या संवादात वामनरावांचा शाब्दिक कोटयांवर फारच भर आहेसे दिसते. 'स्वप्नच नाही तर काय?' ही नाटिका पुन्हा वामन मल्हारांच्या अंगच्या कल्पकतेचे दर्शन घडविणारीच कृती होय. आर्यावर्तातील वर्णद्वेष हा या नाटिकेचा विषय असून "हळूहळू सुधारणा होत जाणार आहे" हा आशावाद वामन मल्हारांनी या नाटिकेच्या अखेरीस प्रकट केला आहे.

सभासंमेलनासारख्या प्रासंगिक गरजांची परिपूर्ती करण्यासाठी वामनरावांनी हे छोटे नाटयात्म लेखन केले. संख्येने व गुणांनी ते मर्यादित आहेच. तथापि त्यातूनही वामन मल्हारांचे तत्त्वचर्चात्मक आणि सहृदय व्यक्तिमत्त्व, सांगोपांग विचार करण्याची त्यांची वृत्ती आणि नावीन्यदर्शनासाठी हपापलेली त्यांची कल्पकप्रतिभा यांचे दर्शन घडते.

**'नवपुष्पकरंडक'**

'नवपुष्पकरंडक' (1916) हा खरे तर वामन मल्हारांच्या ललित लेखनाचा आरंभबिंदू. वामन मल्हारांनी 1916 पूर्वी 'मनोरंजन', 'नवयुग', 'चित्रमय जगत्', 'केरळकोकीळ' इत्यादी नियतकालिकांतून वेळोवेळी जे "मनोरंजक लेख किंवा छोटया गोष्टी" लिहिल्या त्यांतील काहींचा संग्रह 'नवपुष्पकरंडक' मध्ये केलेला आहे. यातील लिखाणासाठी "मनोरंजक गोष्टी किंवा छोटया गोष्टी" हे शब्दप्रयोग 'नवपुष्पकरंडक'च्या पहिल्या आवृत्तीचे संपादक का. र. मित्र यांनी स्वतःच वापरलेले आहेत. या संदर्भात "...वा. म. जोशी यांचे 'मनोरंजक लेख' म्हणजे आजचे

लघुनिबंध व त्यांच्या 'छोटया गोष्टी' म्हणजे आजच्या लधुकथा आहेत"[3] हे डॉ. मा. गो. देशमुख यांचे निरीक्षण सुरुवातीलाच लक्षात घ्यायला हवे. या संग्रहातील 'मनोरंजक लेख' हे आज आपण ज्याला 'ललित–लेखन' म्हणतो त्याचे पूर्वरूप शोभावे अशा स्वरूपाचे आहे हेही मुद्दाम लक्षात घ्यायला हवे.

'नवपुष्पकरंडक' मध्ये ज्या जातीचें, ज्या शैलीचें लिखाण वामन मल्हारांनी केलेले आहे, ती त्यांची डेक्कन कॉलेजमधील विद्यार्थि–दशेतील कमाई होय, असे म्हणण्यास आधार आहे. डेक्कन कॉलेजमध्येच वामन मल्हारांना ललित–लेखनाची गोडी लागली व त्यांनी तसें बरेच लेखन केले. त्याकाळी त्यांनी 'फ्रोझन व्हाइसेस' या इंग्रजी पर्सनल एसेच्या आधारे लिहिलेला "गोठलेले आवाज" हा मनोरंजक लेख त्यांच्या सहाध्यायांना खूप आवडला होता. 'वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही' ही कथाही त्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये असतानाच लिहिलेली आहे. वामनरावांच्या या लेखनात त्यांची प्रसन्न विनोद–बुद्धी (वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही), खोचक उपहास (दुसरा एक शोध), असाधारण कल्पकता (अप्रकाश–किरणांचा दिव्य प्रकाश), मनुष्यस्वभावदर्शन (अहंकार) इत्यादी लेखनविशेष नजरेत भरतात.

'वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही' हा लेख केवळ कल्पना-विलासात्मक नाही. कल्पनाविलास तर येथे प्रामुख्याने आहेच परंतु लेखाच्या शेवटी जी कलाटणी दिली आहे आणि 'वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही' हा शोध लावणाऱ्या विश्वनाथपंतांनाच स्वतःला उजव्या डोळयाने दिसत नसावे, असे जे अनुमान काढले आहे ते मोठे मनोज्ञ आहे. 'दुसरा एक शोध' या लेखाचा रोख सरळसरळ सुधारकांवर कसेंही करून टीकास्त्र सोडणाऱ्या सनातन्यांवर आहे. "'वर' यायचे असेल तर 'वरवर' पाहावे", "...टीका करताना सदसद्विवेकबुद्धीचा खोल विचार टाकून टीका करण्यास आरंभ करावा, म्हणजे लेखणी जलद चालते, तिला थोडासा तिखटपणा येतो व लोकांत लवकर मानमान्यता येते" इत्यादी स्वरूपाचा उपदेश करणाऱ्या मानलोभ्यांचे एक उपहासपूर्ण व्यक्तिचित्रच वामन मल्हारांनी येथे रंगविले आहे. नाटच क्षेत्रातील असेच एक व्यक्तिचित्र त्यांनी रेखाटले आहे. समकालीन नाटचलेखनावर वामन मल्हारांनी केलेली ही कथारूप टीकाच म्हणावी लागेल. नाटचलेखनात विषय व व्यक्तिचित्रण यांबाबत आलेला साचेबंदपणा

हा अर्थात त्यांच्या टीकेचा विषय होय. 'चारित्र्यकांती' ही हिंदुस्थानात वास्तव्य करणाऱ्या एका युरोपियन पतिपत्नींची कथा आहे. या कथेत वामनरावांचा एकूण स्त्रीजातिविषयक सहानुभूतीचा दृष्टिकोण अभिव्यक्त झालेला आहे. 'दोन स्वदेशींचा लढा' ही एक वैशिष्टयपूर्ण गोष्ट म्हणावी लागेल. इंग्रजी स्त्री आणि तिचा भारतीय पती या दोघांचे स्वदेशप्रेम त्यांच्या परस्परप्रेमाच्या आड येऊन त्यांची विवाहविच्छेदनापर्यंत मजल जाते इत्यादी कथाभागाचें चित्रण करून वामन मल्हार स्वदेशीच्या तत्त्वाचा एकांगीपणाच लक्षात आणून देतात. 'दोन स्वदेशींचा लढा' या गोष्टीची रचना पाहता ती आजच्या लघुकादंबरीचे पूर्वरूप ठरावी. या गोष्टीची मांडणीही त्यांनी सात प्रकरणांतून केलेली आहे. 'अप्रकाश–किरणांचा दिव्य प्रकाश' या कथेची मांडणी विज्ञानसंकल्पनेच्या आधारे केलेली आहे. मराठीत आज कुठे विज्ञानकथा अंग धरत आहे. अशा परिस्थितीत सत्तरएक वर्षापूर्वी वामन मल्हारांनी नकळत विज्ञानसंकल्पनेवर आधारित गोष्ट लिहिली हे कौतुकास्पद होय. वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतील 'नवी स्त्री' त्यांच्या आरंभीच्या कथात्म वाङमयातही आहे हे 'नाव बदलीन' मधील पुरुषांच्या बरोबरीने युद्धविषयक चर्चा करणाऱ्या यमुना खरे या पात्राकडे पाहाता आपल्या लक्षात येते.

या 'नवपुष्पकरंडका'तील पुष्पांचे रंगरूप हे असे विविध प्रकारचे आहे. यात एकसंधपणा नसला तरी वामन मल्हारांच्या वृत्तिप्रवृत्तींची व लेखनशैलीची गंगोत्री समजून घेण्याच्या दृष्टीने हा संग्रह महत्त्वाचा ठरतो. जीवनाकडे अधिकाधिक बुद्धिनिष्ठ चिकित्सेने पाहाण्याची त्यांची दृष्टी आणि तात्त्विक चिकित्सा करण्याची त्यांच्या प्रतिभेची खास आवड यांचे दर्शन त्यांच्या या आरंभकालीन लेखनातूनही प्रकटते.

### स्मृतिलहरी

'नवपुष्पकरंडक' आणि 'स्मृतिलहरी' ही वामन मल्हारांची दोन पुस्तके लेखनकालदृष्टया दोन टोकांवर उभी आहेत. 'नवपुष्पकरंडक' मधील लेखन अगोदर म्हटल्याप्रमाणे 1916 पूर्वीचे आहे, तर 'स्मृतिलहरी'चे लेखन 1935 नंतरचें. 'नवपुष्पकरंडक'मध्ये वामन मल्हारांच्या लेखनक्षेत्रातील उमेदवारीचा भाग प्रकट होतो, तर 'स्मृतिलहरी'त त्यांच्या लेखनकलेचें परिपक्व फळ दृग्टिपथात येते. या दोहोंना समानपणे एकत्र बांधणारे एकच

सूत्र आहे आणि ते म्हणजे वामन मल्हारांच्या लेखनातून नेहमीच प्रत्ययास येणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची काव्यशास्त्रविनोदात रमणारी वृत्ती. वामन मल्हारांचे कोणतेही लेखन घेतले तरी त्यात त्यांच्या त्या वृत्तीचा सातत्याने प्रयत्न येतो. 'नवपुष्पकरंडक' ला जर वामनरावांच्या लेखनाची गंगोत्री मानले तर या गंगेच्या प्रवाही शुद्धतेचा, शुभ्रतेचा आणि पावित्र्याचा स्पर्श 'स्मृति-लहरीं'ना झाला आहे, असे म्हणावे लागेल. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'रागिणी'ची तुलना गंगेशी केलेली आहे. ती तितक्याच यथार्थपणे त्यांच्या 'स्मृतिलहरी' तील तरंगांनाही लागू पडेल. वामन मल्हारांची अत्युकृष्ट पुस्तके कोणती ?–या प्रश्नाचे उत्तर रुचिवैचित्र्यामुळे कितीही भिन्न भिन्न झाले तरी 'स्मृतिलहरी' हे त्यांचे पुस्तक आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी श्रेष्ठ आहे, असाच कौल कोणताही चोखंदळ वाचक देईल. वामन मल्हारांच्या परिणत प्रज्ञेचा दरवळ 'स्मृतिलहरी' त सर्वच भरून राहिलेला आहे. येथे त्यांच्या व्यक्तित्वाची, विचारांची, काव्यशास्त्रविनोदप्रचुर शैलीची विविध अंगे संयमाने, सूचकतेने अनौपचारिकपणे प्रकट झाली आहेत, आणि ती मोठी हृद्य आहेत.

'स्मृतिलहरी' हा मराठीतील एक उत्कृष्ट ललितनिबंधसंग्रह आहे. ललितनिबंधाचे लेखन हे स्वैर भ्रमणासारखे असते, त्यात एक प्रकारची प्रांजळ आत्मनिष्ठा व्यक्त होते; त्याला विषयाच्या आखीवरेखीवपणाचे बंधन पाळण्याची आवश्यकता नसते. त्याचा घाट चार मित्रांशी सहजसंवाद साधावा अशा स्वरूपाचा असतो. त्यात निर्हेतुकता, निर्व्याजता प्रतिबिंबित झालेली असते. त्यात काव्यात्मकतेला, विनोदबुद्धीला तसेच क्रीडावृत्तीला फार मोठा अवसर असतो. या सर्व गोष्टींमुळे चांगला ललितनिबंध वाचकाला अगदी सहजपणे चिंतनाच्या पातळीवर नेतो, असे म्हटले जाते; पण वास्तवात या प्रकारची यशस्वी ललितनिबंधरचना फारच क्वचित दृष्टोत्पत्तीस येते. 'स्मृतिलहरी' हा संग्रह या दृष्टीने अपवादात्मक म्हणायचा.

सहा आणे किंमतीच्या तांब्यापासून "जगात सर्वंकष क्रांती कशी होईल ?" या विषयापर्यंत अनेक विषयांचा परामर्श 'स्मृतिलहरी'त येतो. हे विषय वामनराव अत्यंत सहजपणे, अनौपचारिकपणे मांडतात. सूचकतेने त्यातून हळूच गहन विचारांकडे घेऊन जातात. 'स्मृतिलहरी'मध्ये आलेले विचारविषय किती विविध आहेत हे मुद्दाम पाहाण्यासारखे आहे. स्त्री श्रेष्ठ की पुरुष ?

वधूपरीक्षेची जुनी पद्धत सदोष की निर्दोष ? आजच्या स्त्रीला आजन्म अविवाहित राहाता येईल का ? वायकांचा अलीकडचा स्वातंत्र्यवाद समाजास मारक आहे की तारक ? आजची कुटुंबव्यवस्था त्याज्य आहे का ? भांडवलदारांचे हृदयपरिवर्तन करून समाजाची सुधारणा घडविणे शक्य होईल का ? खासगी मालमत्ता नाहीशी करण्याने समाजात नवा मनू आणणे शक्य आहे का ? आजच्या लोकशाहीला भांडवलशाहीपासून कोणते धोके आहेत ? नैतिक सद्‌गुण हे दुर्गुण कसे ठरतात ? सालसपणा व सात्विकपणा हे दुर्गुण ठरू शकतात का ? लोकमताला कितपत किंमत द्यावी ! आजच्या वैज्ञानिक युगात घातवारांसारख्या शकुनापशकुनांवर किती विश्वास ठेवावा ? अमूक धर्माचे लोक चांगले व तमूक धर्मांचे लोक वाईट असे निश्चयाने म्हणता येईल का ? गुळमुळीतपणा गोड दिसतो पण तो व्यवहारात फोल ठरतो हे खरे आहे का ?

वामन मल्हारांनी ‘स्मृतिलहरी’ मध्ये मांडलेले वरील विचारविषय नुसतेच महत्त्वाचे होते असे नव्हे तर ते समकालीनही होते. यातले वरेचसे विषय हे तरुण पिढीचे नित्यचिंतनाचे विषय होते (व काही आजही आहेत). हे विषय जरी पूर्णपणे वैचारिक स्वरूपाचे असले तरी वामन मल्हारांनी तरुण–मनांशी, त्यांच्या वृत्तिप्रवृत्तींशी लाघवीपणाने संवाद साधत, गप्पागोष्टी करीत सहजतेने या विषयांचे सूचन केलेले आहे. सहज बोलण्यातून खेळकरपणाने केलेला हितोपदेश–तोही तुम्हाला पटत असेल तर स्वीकारा अशा स्वरूपाचा हितोपदेश, असे ‘स्मृतिलहरी’ तील लेखनाचे स्वरूप राहिलेले आहे.

‘स्मृतिलहरी’ तील लेखन त्यातील खेळकरपणामुळे, गप्पागोष्टींमुळे, लाघवीपणामुळे स्वाभाविकपणेच कथात्म झालेले आहे. साहजिकच कथात्म लेखनाकरिता आवश्यक असणाऱ्या व्यक्तिरेखाही वामन मल्हारांनी निर्माण केल्या आहेत, चितारल्या आहेत. ‘स्मृतिलहरी’ तील सर्व लेखांमधून येणारी धोंडोपंत बर्वे ही मराठी साहित्यातील एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहे. धोंडोपंत बर्वे आणि त्यांचा विद्यार्थि–परिवार वामन मल्हारांनी कल्पनेने निर्माण केलेला आहे. तथापि महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध समाजसुधारक धोंडोपंत कर्वे यांच्याप्रमाणे धोंडोपंत बर्वे हेही खरोखरीचे कुणी प्राध्यापक होते अशी वाचकमनात खात्री व्हावी म्हणून वामन मल्हार प्रस्तावनेमध्ये सहेतुकपणे लिहितात, “ते माझे मित्र होते, आम्ही त्यांना आपल्या आठवणी लिहून काढण्यास सांगत होतो;

परंतु त्यांना त्याचा कंटाळा होता. शेवटी त्यांनी सांगितलेल्या आठवणी मीच लिहून संपादित करावयाचे ठरविले." वाचकांची विश्वसनीयता प्राप्त करून घेण्याची 'आश्रमहरिणी' च्या प्रस्तावनेत अशाच स्वरूपाची युक्ती वापरल्याचे मुद्दाम आठवावे. या आभासनिर्मितीमुळे 'स्मृतिलहरी' चें लेखन म्हणजे आठवणींचे जिवंत जगच झाले आहे.

धोंडोपंत वर्वे हे अत्यंत गोष्टीवेल्हाळ प्राध्यापक आहेत. ते संस्कृत प्राध्यापक असले तरी तत्त्वज्ञान हाही विषय त्यांचा आवडता आहे. साहित्याची त्यांना मनोमन आवड असून त्यांनी काही टीकालेख लिहिलेले आहेत. विद्यार्थ्यांशी ते अतिशय मोकळेपणाने वागतात, प्रेमळपणाने त्यांना वागवितात. विद्यार्थ्यांशी उलटसुलट चर्चा करून, त्यांना एखाद्या प्रश्नाच्या सर्व अंगांकडे लक्ष वेधायला लावायचे, हा धोंडोपंत वर्व्यांचा स्वभाव आहे. त्यांचे बोलणे स्पष्टवक्तेपणाचे आहे, त्यांचे विचार काटेकोर आहेत पण त्यांत आग्रहीपणा नाही. साधा पोषाख, भिडस्त स्वभाव आणि अंगचा विसराळूपणा हे त्यांचे सहज ध्यानात येण्यासारखे विशेष होते. अनेकदा त्यांचे विद्यार्थी व सहकारी प्राध्यापक त्यांच्या एखाददुसऱ्या वागण्याबोलण्यातून गैरसमज करून घेत, पण धोंडोपंतांच्या मूळच्या ऋजू व प्रांजळ स्वभावामुळे हे गैरसमज जसे निर्माण होतात तसेच नाहीसेही होतात.

प्रा. धोंडोपंत वर्वे यांचे हे स्वभावविशेष पाहाता धोंडोपंत आणि स्वतः वामन मल्हार यांच्यामध्येही विलक्षण साम्य असल्याचे आपल्या लक्षात येते. (पहिली आवृत्तीला धोंडोपंत वर्वे यांचे म्हणून जे चित्र सुरुवातीस घातले आहे, ते वामन मल्हारांच्या व्यक्तिरेखेशीच जुळणारे आहे, हेही लक्षात घेण्यासारखे आहे.) तथापि 'स्मृतिलहरी' म्हणजे वामन मल्हारांनी आपल्या स्वतःच्या आयुष्यातील काही घटनाप्रसंगांची रेखाटलेली 'स्मृतिचित्रे' नव्हेत. एवढे मात्र खरे की त्यांचा दर्जा अव्वल स्मृतिचित्रांसारखा आहे. 'स्मृतिलहरी'मध्ये वामन मल्हारांच्या स्वैर प्रतिभेने अगदी मुक्तपणे संचार केलेला आहे. त्यामुळे हे त्यांचे छोटे पुस्तक अगदी रमणीय उतरले आहे. 'स्मृतिलहरी'चे कौतुक वि. स. खांडेकरांनी पुढील शब्दांत केले आहे :

"या चिमुकल्या पुस्तकात विविध अनुभव आहेत, हृद्य कथाप्रसंग आहेत, मजेदार स्वभावचित्रे आहेत, मार्मिक तत्त्वचर्चा आहे, खुसखुशीत संभाषणे आहेत, रम्य विनोदस्थळे आहेत, सुविचार आहेत, सुभाषिते आहेत, निवेदनाच्या व संभाषणाच्या किंवा चर्चेच्या ओघात सहजासहजी या साऱ्या गोष्टी आपल्याला

भेटतात व आपला बौद्धिक आणि भावनात्मक आनंद वृद्धिगत करतात. एखाद्या झऱ्याच्या काठाने गमतीने फिरत फिरत जावे आणि फुले, पाखरे, वनश्री वगैरेंच्या दर्शनाने मन उल्हसित व्हावे तसे हे पुस्तक वाचून वाचकाला वाटते. या सर्व स्मृतींवर मार्मिक सांसारिक तत्त्वज्ञानाची जी सौम्य सोनेरी सावली पसरली आहे ती दीर्घकाल आपल्याभोवती रेंगाळत राहाते. 'स्मृतिलहरी'चे वाचन आपल्याला अंतर्मुख करते, क्षणभर उदात्त पातळीवर नेते."[4]

("प्रस्तावना", **स्मृतिलहरी,** (आ. 4 थी), पुणे 1959, पृ. 14)

कोणत्याही अव्वल दर्जाच्या साहित्याचे यापरते श्रेय कोणते असणार ? हे श्रेय मिळावे असे प्रत्येक साहित्यनिर्मात्याला वाटत असले तरी ते सहजसाध्य नसते. त्याला एक वेगळ्या प्रकारची व्रतस्थ वृत्ती धारण करावी लागते; जीवनार्थाचा शोध एका उंच पातळीवरून घ्यावा लागतो. त्याला सत्याची, सौंदर्याची व सौजन्याची जोड द्यावी लागते. वामन मल्हारांनी ती आपल्या लेखनाला, चिंतन–मननाला दिलेली असल्यामुळेच त्यांचे 'स्मृतिलहरी'सारखे चिमुकले पुस्तकही श्रेष्ठ पदवीस पोहोचते.

## संदर्भ

1. वा. ल. कुळकर्णी, **वामन मल्हार : वाङ्मयदर्शन**, (आ. 3 री), मुंबई, 1974, पृ. 38
2. **तत्रैव**, पृ. 67
3. डॉ. मा. गो. देशमुख "प्रस्तावना", **नवपुष्पकरंडक** (आ. 4 थी), पुणे 1964, पृ. 5
4. वि. स. खांडेकर, "प्रस्तावना" **स्मृतिलहरी** (आ. 4 थी), पुणे, 1959, पृ. 14

# प्रकरण सहावे

# समारोप

वामन मल्हारांच्या व्यक्तित्वाचा व कर्तृत्वाचा सौम्य, सुखद सुगंध मराठी साहित्याच्या व संस्कृतीच्या क्षेत्रात दरवळत राहिला आहे. साहित्य आणि संस्कृती हे दोन शब्द येथे वापरले खरे, परंतु वामन मल्हारांच्या लेखी ते भिन्न नव्हतेच. साहित्याच्या व संस्कृतीच्या भिन्न रूपांचा विचार करूनही अंतिमतः ते या सर्वांना एकरूपच मानतात. या दोहोंच्या संलग्न विकासाची दिशा स्पष्ट करतात.

वामन मल्हार महाराष्ट्राला श्रेष्ठ प्राध्यापक, तत्त्वचिंतक, कादंबरीकार, विचक्षण साहित्यसमीक्षक, ललित निबंधकार, साहित्यसेवक इत्यादी नात्यांनी सुपरिचित आहेत; परंतु त्यांच्या व्यक्तित्वाला व कर्तृत्वाला व्यापून राहणारा एकमेव घटक म्हणजे त्यांचे जीवन–चिंतन. या जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचा त्यांचा प्रयत्न, हे जीवन उन्नत कसे होईल याचा त्यांना लागलेला ध्यास, या ध्यासातून स्वकर्तव्याचा, स्वधर्माचा, श्रेयाचा त्यांनी चालविलेला शोध आणि हा शोध देशकालपरिस्थितीप्रमाणे कसा घ्यावा यांबद्दल त्यांनी केलेले स्वाभाविक मार्गदर्शन दुर्मिळ आहे म्हणूनच विशेष मोलाचेही आहे.

वामन मल्हारांना 'महाराष्ट्राचे तत्त्ववेत्ते', 'महाराष्ट्राचे सॉक्रेटीस' इत्यादी पदव्या दिल्या जातात. तथापि त्यांचे तत्त्वचिंतन घटपटादी स्वरूपाचे नव्हते. ते जीवनातील विविध रसरूपरंगांनी समृद्ध, रुचिर व सौंदर्यपूर्ण असे झालेले आहे. कारण त्यांना तत्त्वज्ञानाच्या कोरड्या शाब्दिक चर्चेत रस नव्हता. स्वतः वामन मल्हार तत्त्वज्ञान घेऊन एम्. ए. झालेले होते आणि तत्त्वज्ञानाचे प्राध्यापकही होते. असे असूनही त्यांनी तत्त्वप्रतिपादनाचा आग्रही अभिनिवेश बाळगला नाही. जीवनातील घटनाप्रसंग असोत की जीवनाचे तत्त्वज्ञान, असो, ते सर्व अंगांनी, त्याच्या सर्व प्रश्नोपप्रश्नांनिशी समजून घेणे हीच त्यांची सततची भूमिका असे.

विश्व हे आरंभी कसे होते, यापेक्षा आज ते कसे आहे व भविष्यात ते कसे असेल किंवा कसे असायला हवे, याकडे वामन मल्हारांचे अधिक लक्ष असे. हा दृष्टिकोण ठेवूनच ते मनुष्याच्या ऐतिहासिक कर्तव्याचे स्वरूप आणि दिशा निश्चित करण्याचा प्रयत्न करतात. या त्यांच्या प्रयत्नांची फलश्रुती म्हणजेच त्यांची ललित व ललितेतर वाङमयनिर्मिती.

या आपल्या ललित व ललितेतर निर्मितीत 'विचार' या घटकालाच सर्वाधिक महत्त्वाचे स्थान वामन मल्हार देतात. कारण मनुष्य हा विचारशील प्राणी आहे, असा कितीही उद्‌घोष केला तरी विचार कसा करावा ? विचाराची योग्यायोग्यता कशाच्या आधारे निश्चित करावी ? इत्यादी गोष्टी सामान्य माणसाला समजत नाहीत. विचाराची योग्य ती आत्मज्ञानपूर्ण दिशा न स्वीकारल्यामुळेच जगात दुःखे, गैरसमज, दुर्जनता, दैन्य इत्यादींचा प्रादुर्भाव झालेला आहे, याची मनोमन खात्री वामन मल्हारांना पटलेली होती. म्हणूनच त्यांनी विचार या घटकावरच आपले सारे लक्ष केंद्रित केले. या विचाराचे व्यावहारिक आणि तात्त्विक पदर उलगडून पाहिले, इतरांना उलगडून दाखविले. त्यांनी शुद्ध विचारयुक्त आचाराचे महत्त्व व मांगल्य स्पष्टपणे, स्वच्छपणे पण विनम्र भावाने मराठी सुशिक्षितांसमोर परोपरीने विशद केले; 'सर्वांमुखी मंगल बोलविण्या'ची गुरुकिल्ली कशात आहे, हे दाखवून दिले.

आधुनिक मराठी साहित्याच्या क्षेत्रात विचारवंत, कवी, तत्त्ववेत्ते, ललित लेखक या नात्याने विख्यात झालेल्या व्यक्ती अनेक आहेत. त्यांनी आपापल्या क्षेत्रात केलेले कार्यही मोलाचे आहे. पण या साऱ्या मराठी साहित्यकारांच्या पंक्तीतच वामन मल्हार बसलेले असूनही ते वेगळे वाटतात. याचे कारण त्यांच्या असाधारण व्यक्तित्वात आहे आणि त्यांच्या या विलोभनीय व्यक्तित्वाचेच रसायन त्यांच्या ग्रंथलेखनातून प्रकटलेले आहे. मराठीत तरी हे सारे दुर्मिळ आहे, अनन्यसाधारण आहे. "वामन मल्हारांचे लिखाण वाचल्यानंतर चित्तवृत्ती स्थिरावतात, मनाला प्रसन्नता येते, अंतःकरणातील सत्प्रवृत्तींना नवी पालवी फुटू लागते, जीवनावरील विश्वास वृद्धिंगत होतो, वृत्ती अंतर्मुख पण आशायुक्त बनते" असे वा. ल. कुळकर्णी म्हणतात ते यथार्थच होय.[1]

## संदर्भ

1. वा. ल. कुळकर्णी, **वामन मल्हार : वाङमयदर्शन** (आ. 3 री), पृ. 8

# वामन मल्हार जोशी : वाङ्मयसूची

**कादंबरी**

: रागिणी (पूर्वार्ध 1915, उत्तरार्ध 1916)
: आश्रमहरिणी (1916)
: नलिनी (1919)
: सुशीलेचा देव (1930)
: इंदू काळे व सरला भोळे (1935)

**इतर ललित साहित्य**

(अ) कथात्म : नवपुष्पकरंडक (1916)
देशसेविकेचे रहस्य (1921) (सहकार्याने)
(आ) ललित निबंध : स्मृतिलहरी (1942)
(इ) नाटक : विस्तवाशी खेळ (1937)

**टीकाग्रंथ**

: A Gist of the Gita-Rahasya (1916)
(डॉ. विलास खोले संपादित 'वा. म. जोशी : जीवनदृष्टी आणि साहित्य विचार', पुणे, 1983 त समाविष्ट)

**वैचारिक/चर्चात्मक**

: आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त (पुरवणी), 1915
(प्रो. महादेव मल्हार यांच्या 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त व स्वामी सच्चिदानंदांचे विचार', मूंबई 1936 या ग्रंथात समाविष्ट)
: नीतिशास्त्रप्रवेश (1919)
: सॉक्रेटिसाचे संवाद (1922)
: विचार–विलास (1927)
: ठाणे ग्रंथसंग्रहालय वार्षिक समारंभ : अध्यक्षीय भाषण (1932)
: विचार–सौंदर्य (1940)
: विचार–लहरी (1943)
: विचार–विहार (1944)

## वा. म. जोशी यांच्यावरील महत्त्वपूर्ण लेखन

### चरित्रपर व व्यक्तिवेधात्मक


: कानिटकर रा. प्र., **वामन मल्हार जोशी**, एन्. भिडे अँड कं., पुणे, 1930

: जोशी अ. म., **वडिलांचे सेवेसी**, प्रका. अ. म. जोशी, पुणे, 1960

: पटवर्धन ना. म., **वामन मल्हार जोशी यांचे चरित्र**, पुणे, (कालनिर्देश नाही)

: पाध्ये प्रभाकर, **तीन तपस्वी**, स्कूल अॅण्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर, 1946


### टीकात्मक


: कुळकर्णी वा. ल. **वामन मल्हार वाङ्मयदर्शन**, 1944

: खोले विलास (संपा.), **वा. म. जोशी : जीवनदृष्टी आणि साहित्य-विचार**, पुणे, 1983

: पाध्ये प्रभाकर, **वामन मल्हार आणि विचारसौंदर्य**, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, 1978


### संपादने


: खांडेकर वि. स. (संपा.) **वामन मल्हार जोशी : व्यक्ती आणि विचार**, 1948

: कुळकर्णी वा. ल. आणि कुलकर्णी गो. म. (संपा.), **वा. म जोशी : साहित्यदर्शन** साहित्य अकादमी, 1985

: डॉ. अ. ना. देशपांडे व श्री. ग. वा. जोशी (संपा.), **साहित्यातील विवेक** (वा. म. जोशी यांच्या साहित्यशास्त्रीय लेखांचा संग्रह), पुणे, 1962



Indian Institute of Advance Study
117058
9/12/84

वामन मल्हार जोशी ही आधुनिक मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वाची व्यक्ती. त्यांच्या व्यक्तित्वाचा आणि विचारांचा सौम्य, सुखद, सुगंध त्यांच्या साहित्यविश्वात सातत्याने दरवळत असतो—मग ते लेखन ललित असो की ललितेतर.

थोर तत्त्वचिंतक, श्रेष्ठ विचारवंत, 'महाराष्ट्राचे सॉक्रेटिस' यासारख्या पदव्या महाराष्ट्राने त्यांना कौतुकाने आणि प्रेमादराने बहाल केलेल्या आहेत, मराठीतील काव्यशास्त्रविनोदप्रचुर तत्त्व-चिंतनात्मक कादंबरीच्या जनकत्वाचा मानही त्यांनाच दिला जातो. चोखंदळ समीक्षक, मर्मज्ञ ललितनिबंध लेखक, सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रयीचे अनन्य उपासक म्हणूनही ते ओळखले जातात. त्यांनी निर्माण केलेली साहित्यनिर्मिती मोजकीच असली तरी मौलिक स्वरूपाची आहे. तीमधून वामन मल्हारकालीन सुशिक्षितपर तरुण स्त्री-पुरुष मनाचे त्यातील वैचारिक आणि भावनिक गुंता-गुंतीचे प्रशस्त आणि प्रसन्न दर्शन घडते. ते रसज्ञ वाचकाचे चातुर्य शहाणे करते, आणि त्यांच्यासमोर असलेली विविध प्रमेये ते त्याना खेळकरपणे उलगडून दाखविते.

आधुनिक मराठी साहित्याच्या क्षेत्रात विचारवंत कवी, तत्त्ववेत्ते, ललित लेखक या नात्याने विख्यात असलेल्या व्यक्ती अनेक आहेत. पण या साऱ्या मराठी साहित्यकारांच्या पंक्तीतच वामन मल्हार बसलेले असूनही ते वेगळे वाटतात. याचे कारण त्यांच्या असाधारण व्यक्तित्वाला आहे आणि त्यांच्या या विलोभनीय व्यक्तित्वाचेच रसायन त्यांच्या ग्रंथलेखनातून प्रकटलेले आहे. [illegible] तरी हे सारे दुर्मिळ आणि अनन्य [illegible]

या पुस्तकाचे लेखक प्रा. गो[illegible] समीक्षक व मराठीचे सेवानिवृत्त [illegible] मल्हार जोशी यांच्या वाङ्मयाचा [illegible] साहित्य अकादेमीने अलिकडेच '[illegible] म. जोशी साहित्य दर्शन' (निवडक वेचे) प्रसिद्ध केले आहे. ज्याचे संपादन प्रा. वा. ल. कुळकर्णी प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी केले आहे.

Waman Malhar Joshi (Marathi),

Library IIAS, Shimla
MR 891.460 92 J 78 K
00117058

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 15.00

# वामन मल्हार जोशी


गोविंद मल्हार कुलकर्णी




MR
891.460 92
J 78 K
MR

भारतीय
साहित्याचे

MR
891.460
92
J 78 K



INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA



*Waman Malhar Joshi* : (वामन मल्हार जोशी) Monograph on Marathi novelist in Marathi by G. M. Kulkarni
Sahitya Akademi, New Delhi (1986), **SAHITYA AKADEMI**
R REVISED PRICE Rs. 15.00

© Sahitya Akademi
First Edition : 1986

MR
891.460 92
J 78 K

**Publisher :**
Sahitya Akademi,
Rabindra Bhavan,
35, Ferozeshah Road,
New Delhi 110001

Library IIAS, Shimla
MR 891.460 92 J 78 K
00117058

**Regional Offices :**
172, Mumbai Marathi Grantha Sangrahalya Marg,
Dadar (East), Bombay 400 014
Block V-B, Rabindra Sarobar Stadium, Calcutta 700 029
29, Eldams ~~Road, Teynampeth~~ Madras 600 018

117058.
9/12/84

**Printer :**
Satish Bhide
Anuradha Publications Pvt. Ltd.
Prop. of Shree ~~Sanjay Mudranalaya~~
Swastik House, Senapati Bapat Marg, Dadar, Mumbai 400 028

**SAHITYA AKADEMI**
मूल्य : REVISED PRICE Rs. 15.00

# अनुक्रमणिका


1. वा. म. जोशी : जीवित, काळ व व्यक्तित्व 1

2. तत्त्वचिंतन 17

3. कादंबरीलेखन 31

4. समीक्षालेखन 48

5. स्फुट ललित-लेखन 56

6. समारोप 65

7. वाङ्मयसूची 67

# प्रकरण पहिले

# वामन मल्हार जोशी : व्यक्तित्व व कार्य

## : 1 :

वामन मल्हार जोशी यांचा जन्म कोकणातील 'तळे' या गावी 22 जानेवारी 1882 रोजी झाला. त्यांचे वडील एक मोठे विद्वान ब्राह्मण आणि उत्तम ज्योतिषी होते. त्यांच्या वडिलांकडे गोरेगाव आणि आसपासच्या सातआठ खेड्यातील जोशीपण होते. त्यांच्या वडिलांची राहाणी साधी होती. वामनरावांच्या घरातले वातावरण सुसंस्कृत व प्रेमळ होते. त्यांच्या साहित्यात कुटुंबातील प्रेमळपणाची जी चित्रे दिसतात, त्याचे मूळ त्यांच्या घरातील या वातावरणातच असावे.

वामनरावांना दोन भाऊ आणि चार बहिणी होत्या. त्यांना एक मोठा सावत्र भाऊ होता. तो कोकणातच राहिला. वामनरावांचे सर्वात मोठे सख्खे भाऊ महादेव हे सर्वप्रथम पुण्यात शिक्षणासाठी आले. त्यांच्या पाठोपाठ वामनरावांचे दुसरे भाऊ नारायणराव आणि नारायणरावांच्या पाठोपाठ स्वतः वामनरावही काही दिवसांच्या अंतरांनी पुण्यात शिक्षणाकरिता आले. महादेव जोशी त्यावेळी नव्याने स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक झाले. नंतर ते डेक्कन कॉलेजमधून बी. ए. व एम्. ए. झाले. त्यांना प्रत्येक परीक्षेत संस्कृत विषयातील पारितोषिके व शिष्यवृत्ती मिळालेल्या होत्या. नारायणराव हेही पुण्यात शिक्षण घेऊन बी. ए. झाले. त्यांनी सुरुवातीस रत्नागिरी येथे शिक्षकाचे काम केले. पण नंतर निवृत्तीपर्यंत त्यांनी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे काम पाहिले.

वामनरावांची मुंज झाली आणि त्यांचे वडील वारले. त्यांचे इयत्ता पाचवीपर्यंत शिक्षण गोरेगाव मुक्कामीच झाले. पुढील शिक्षणासाठी ते आपले मोठे भाऊ महादेव ऊर्फ अण्णा यांच्याकडे पुण्यास आले. वामनरावांचे मॅट्रिकच्या वर्गापर्यंतचे शिक्षण पुण्यातील लवाटे-पांगारकरांच्या क्लासेसमधून झाले. याच

वेळी त्यांचे थोरले भाऊ अण्णा यांनी अहमदनगर येथील हायस्कूलमध्ये नोकरी पत्करली. त्यामुळे मॅट्रिकच्या वर्गात असतानाच वामनरावही आपल्या बंधूबरोबर अहमदनगरला गेले. मॅट्रिक परीक्षेच्या पहिल्या प्रयत्नात इंग्रजी निबंधच लिहिण्यात सगळा वेळ खर्ची घातल्याने ते नापास झाले. मात्र पुढील वर्षी म्हणजे सन 1900 मध्ये ते चांगले गुण मिळवून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. अहमदनगर येथेच वामनरावांना डॉ. गुणे आणि श्री. पा. मं. ऊर्फ सेनापती बापट हे चांगले सहाध्यायी-मित्र लाभले होते.

मॅट्रिकनंतर त्यांनी आपल्या वडील बंधूप्रमाणे डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळचे डेक्कन कॉलेज "निसर्गरमणीय, कलाकमनीय अथएव शिष्यस्पृहणीय" असे होते. वामनराव डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थिवसतिगृहात राहात. ते 1904 साली बी. ए. आणि 1906 साली एम्. ए. झाले. एम्. ए. ला त्यांनी तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हे विषय घेतले होते. त्यांचे संपूर्ण शिक्षण अर्थातच शिष्यवृत्त्यांवर झाले. बी. ए. परीक्षेत त्यांचा कॉलेजमधील पहिल्या तीन विद्यार्थ्यांत क्रमांक लागला. त्यामुळे त्यांना 'दक्षिणा फेलोशिप' मिळाली होती. बी. ए. ला असतानाच वामनरावांना उत्कृष्ट इंग्रजी निबंध लिहिल्याबद्दल 'हॅवलॉक प्राइज' मिळाले.

कॉलेजमध्ये असताना ते टेनिस अतिशय आवडीने खेळत. मात्र त्यांच्या खेळात शैलीदारपणापेक्षा उत्साहाचेच अधिक प्रदर्शन असे. एका इंटरकॉलेजिएट सामन्यात त्यांनी फर्गसन कॉलेजविरुद्धचा सामना जिंकलाही होता. त्या सामन्याची हकीकत प्रिन्सिपल शार्प यांनी विचारली. त्यावेळी वामनरावांनी त्यांना अत्यंत निर्भीडपणे सांगितले की, "फर्गसन कॉलेजातील प्रोफेसर विद्यार्थ्यांत आपलेपणाने मिसळतात, तसे येथील मिसळत नाहीत. येथले युरोपियन प्रोफेसर काही झाले तरी परकेच. त्यांना हिंदी विद्यार्थ्यांविषयी स्नेहभाव व आत्मीयता कोठून वाटणार! इंग्रजांच्या राज्यामुळे हिंदुस्थानचा मुळीच फायदा झालेला नाही. एक वेळ अराजकता पत्करेल पण ब्रिटिश राजवटीतील ही शांतता आणि सुव्यवस्था नको." या त्यांच्या स्पष्टोक्तीचे प्रतिबिंब 'नलिनी' व 'सुशीलेचा देव' या कादंबऱ्यांत पाहावयास मिळते.

डेक्कन कॉलेजमध्येच वामनरावांना वाचनालेखनाची गोडी लागली. कॉलेजमध्ये असताना त्यांनी अभ्यास बाजूला ठेवून मनसोक्त वाचन केले. कॉलेज मॅगेझिनमध्ये त्यांनी 'वामन' या नावाने पुष्कळ इंग्रजी व मराठी

छोटेछोटे लेख लिहिले. वामन मल्हारांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत डेक्कन कॉलेजचा फार महत्त्वाचा वाटा आहे.

पुण्यातील वातावरणामुळे आणि अंगी असलेल्या स्वतंत्र प्रज्ञेमुळे वामनरावांच्या अंगी सहाजिकच राष्ट्रीय वृत्ती वळावली. याचा परिणाम म्हणजे एम्. ए. झाल्यावर सहजशक्य असूनही सरकारी नोकरीत ते शिरले नाहीत. वास्तविक एका इंग्रज प्राध्यापकामुळे वामनरावांना 'पोस्टल सुपरिन्टेंन्डेन्ट'ची नोकरी चालून आली होती. पण वामनरावांनी ती नाकारली. त्यांनी प्राध्यापक होण्याची महत्त्वाकांक्षा धरली. ती पुरी होण्यास त्यांना पुढे जवळजवळ एक तप वाट पाहावी लागली.

वामन मल्हार एम. ए. उत्तीर्ण झाले त्याच वर्षी ते काँग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनास सहज म्हणून उपस्थित राहिले. हे अधिवेशन अनेक कारणांनी गाजले. याच अधिवेशनात महर्षी दादाभाई नौरोजी यांनी हिंदुस्थानच्या जनतेला स्वराज्याचा मंत्रोपदेश दिला. स्वदेशी वस्तुवापराचा, परदेशी वस्तुवापरावरील वहिष्काराचा आणि राष्ट्रीय शिक्षणाचा असे ठराव संमत करण्यात आले ते याच अधिवेशनात. कोल्हापूरच्या 'समर्थ विद्यालया'चे संस्थापक, राष्ट्रीय शिक्षणाचे कैवारी आणि स्वदेश–स्वधर्म–स्वभाषा या त्रिसूत्रीचे कट्टर पुरस्कर्ते प्रोफेसर अण्णासाहेब विजापूरकर यांच्याशी वामन मल्हारांचा या अधिवेशनात परिचय झाला. प्रो. विजापूरकरांची राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना वामन मल्हारांना आवडली आणि 1907 मध्ये ते 'समर्थ विद्यालया'स येऊन मिळाले.

प्रा. विजापूरकर 'विश्ववृत्त' नावाचे मासिक-पुस्तक काढीत. 1908 पासून या मासिकाची संपूर्ण जबाबदारी वामनरावांकडे आली. वामनराव 'विश्ववृत्त'चे सगळे काम पाहात. पण संपादक म्हणून विजापूरकरांचेच नाव छापलेले असे. 'विश्ववृत्ता'च्या एका अंकात पंडित श्री. दा. सातवळेकर यांचा "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता" हा लेख प्रसिद्ध झाला आणि 'विश्ववृत्त' कोल्हापूर सरकारच्या रोषास कारणीभूत झाले. संपादक प्रो. विजापूरकर, सहसंपादक वामन मल्हार आणि मुद्रक श्री. जोशीराव या तिघांवर खुनास चिथावणी देण्याचा व राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात येऊन तिघांनाही अटक झाली. या खटल्याला त्यावेळी गाजत असलेल्या वेदोक्त प्रकरणाची पार्श्वभूमी होती. कोल्हापूरचे त्या वेळेचे शाहू महाराज हे वेदोक्त विधींचे अधिकारी होत की पुराणोक्त विधींचे असा वाद त्यावेळी उपस्थित झाला होता. शाहूंच्या

राजघराण्याने आपला वेदोक्त विधींचा अधिकार गमावला आहे असे काही ब्राह्मणांचे मत होते. या पार्श्वभूमीवर पंडित सातवळेकरांच्या लेखातील "जे क्षत्रिय शत्रूंच्या सैन्याचा, दुनियेतील गुलामीचा वीमोड करीत नाहीत त्यांच्या छत्रपतित्वाचा, समशेरबहाद्दूरत्वाचा त्यांच्या राष्ट्राला काय उपयोग आहे ?' हे वाक्य कोल्हापूरच्या महाराजांना खटकले आणि त्यातून खटला उभा राहिला.

'विश्ववृत्ता'तील वादग्रस्त लेखाची जबाबदारी प्रो. विजापूरकरांनी नाकारावी आणि वामनरावांनी ती स्वत:वर घ्यावी असे ठरले. कारण असे केल्याने दोघेही सुटतील अशी अपेक्षा होती. या योजनेनुसार वामनरावांनी "सातवळेकरांचा लेख त्यात बदल करून मी छापला" अशी जबानीही दिली. परंतु या खटल्याचा निकाल विजापूरकर–वामनरावांच्या विरुद्ध लागला. (1909). वामनरावांना तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. सुरुवातीचे काही दिवस कोल्हापूर व पन्हाळा येथील तुरुंगांत ठेवल्यावर वामनरावांची रवानगी सिंध-हैदराबाद येथील तुरुंगात झाली. जानेवारी 1909 ते ऑक्टोबर 1911 इतक्या कालावधीचा खडतर तुरुंगवास वामनरावांना घडला.

कोल्हापूरच्या तुरुंगात असताना महाराजांनी वामनरावांना 'दशकुमार-चरिता'चे भाषांतर करण्याची आज्ञा केली. वामनरावांनी अर्धेमुर्धे भाषांतर केलेही होते. आज ते उपलब्ध नाही.या भाषांतराच्या निमित्ताने वामनरावांनी आपणास हवी ती पुस्तके मागवून घेतली व वाचून काढली.

सिंध-हैदराबाद येथील तुरुंगात वामनरावांना सक्त मजुरीचा कैदी या नात्याने चक्की पिसणे, चरख्यावर सूत कातणे, बुटाचे तळवे तयार करणे इत्यादी शारीरीक कष्टांची कामे करावी लागली. पण तेथील इंग्रजी अधिकारी व त्यांच्यावर देखरेख करणारा मुसलमान कैदी मुकादम गोमल यांच्यामुळे त्यांना या कामातही वेळप्रसंगी बरीच सवलत मिळाली. वामनरावांविषयी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांचे चांगले मत झाल्याने व ते सुशिक्षित, सज्जन कैदी असल्याने ते अधिकारी वामनरावांना स्वत:च्या जबाबदारीवर खासगी पुस्तके वाचावयास देत. या काळातच वामनरावांनी 'बायबल' आणि शेक्स्पीयरच्या कृती यांचे वाचन केले.

वामनरावांवर देखरेख करणारा मुस्लिम मुकादम गोमल हा कट्टर धर्माभिमानी होता. गोमल आणि वामनराव धर्माबद्दल व आचारांबद्दल

एकमेकाशी आपापल्या मोडक्या–तोडक्या हिंदीतून वाद घालीत. अशा वेळी गोमल वामनरावांवर खूप चिडे व रुसूनही वसे. परंतु अंतःकरणाने दयाळू असणाऱ्या या गोमलने वामनरावांना अनेक प्रकारे मदत करून त्यांचे तेथील जीवन त्यातल्या त्यात सुसह्य केले. याच कृतज्ञनेतून वामनरावांनी त्याच्या-वद्दलच्या आठवणी मोठ्या हृद्यतेने लिहिल्या आहेत.

वामनराव तुरुंगात असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले होते. पण त्यांच्या वंधूंनी ही वार्ता त्यांची सुटका होईपर्यंत त्यांना कळू दिली नव्हती. तुरुंगातून सुटताना वामनरावांना ही वार्ता कळली व मातृवियोगाने त्यांचे अंतःकरण विद्ध झाले.

तुरुंगातून सुटल्यावर 'पुढे काय' हा प्रश्न वामनरावांसमोर उभा राहिला. एव्हाना सरकारी रोषाचा व्हायचा तो परिणाम होऊन 'समर्थ विद्यालय' वंद पडले होते. याच वेळी पुण्याच्या आर्यभूषण छापखान्यात 'इंग्रजी–मराठी कोश' तयार करण्याचे काम चालू होते. वामनराव तेथे मदतनीस म्हणून 1912च्या अखेरीपर्यंत होते. यानंतरचे त्यांचे सातआठ महिने वेकारीत गेले. या काळात वामनरावांनी किरकोळ लिखाण तर केलेच पण 'सॉक्रेटिसाचे संवाद' आणि 'रागिणी' या पुढे गाजलेल्या दोन पुस्तकांचे लेखनही केले. पुढे 1914 पासून 'रागिणी' 'मासिक मनोरंजन' मधून क्रमशः प्रसिद्ध झाली.

सरकारी रोषामुळे ज्यांना इतरत्र नोकरी मिळणे कठीण होई अशांना आपल्या संस्थेत आश्रय देण्याचे 'केसरी–मराठा' संस्थेचे धोरण असे. त्यानुसार न. चिं. केळकरांनी वामन मल्हारांना 'मराठा'त मदतनीस म्हणून घेतले. 'मराठा'चे त्यांनी दोन वर्षे सहसंपादक म्हणून काम पाहिले. याच वेळी म्हणजे 1915 त त्यांनी 'केसरी'त "पक्षभेद आणि पक्षद्वेष" ही विचारप्रवर्तक लेखमाला लिहिली. 'केसरी–मराठी'त काम करताना वामनरावांना टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे जवळून अवलोकन करण्याची संधी मिळाली. संपादकांनी पुण्यात भरणाऱ्या नेमस्त पक्षाच्या परिषदेस वातमीदार म्हणून जाण्यास सांगितल्याचे वामनरावांना आवडले नाही आणि त्यांनी 'मराठा'तील नोकरीचा राजीनामा दिला.

'मराठा' सोडल्यावर वामनरावांनी मुंवईत अ. व. कोल्हटकर यांच्या 'मेसेंज' या इंग्रजी दैनिकात सहसंपादक म्हणून काम स्वीकारले. येथे त्यांनी

साधारणतः दीडेक वर्षे काम केले. कोल्हटकरांचा आर्थिक व्यवहार घोळदारच होता. त्यामुळे वामनरावांसारख्या सरळमार्गी माणसाला कोल्हटकरांकडून आपला पगार कोर्टकचेरी करून मिळवावा लागला. त्यांनी 1917त 'मेसेंज' मधील नोकरी सोडली. याच वेळेस महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या महिला विद्यापीठाची स्थापना झाली आणि तेथे जून 1918 पासून वामन मल्हार मराठी व मानसशास्त्र या विषयांचे प्राध्यापक म्हणून लागले. वामनरावांच्या आयुष्याला स्थिरता प्राप्त झाली.

अशा रीतीने एम्. ए. झाल्यापासून जवळजवळ बारा वर्षे वामनराव नोकरीच्या बाबतीत अस्थिर होते. अशी अस्थिरता असूनही ज्यामुळे वामनरावांचा लौकिक वाढला, ज्यामुळे ते अव्वल साहित्यिक आणि गाढे तत्त्वचिंतक म्हणून प्रसिद्धीला आले ते त्यांचे महत्त्वपूर्ण लिखाण याच कालखंडात झाले आहे, हे मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. लो. टिळकांच्या 'गीतारहस्य' या बहुप्रसिद्ध ग्रंथावरील 'A Gist of Gita–Rahasya' हा त्यांचा विवेचक निबंध याच काळात प्रसिद्ध झाला. त्यांचे थोरले बंधू प्रो. म. म. जोशी यांनी 'केसरी'त लिहिलेल्या "आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त" या लेखमालेवरील वामनरावांच्या "जिज्ञासूच्या शंका" याच काळात प्रसिद्ध झाल्या होत्या. 'नवपुष्पकरंडक' या कथासंग्रहाचे तसेच 'आश्रमहरिणी' व 'रागिणी' या कादंबऱ्यांचे लेखन याच काळातले आहे. 'सॉक्रेटिसाचे संवाद' (प्रसिद्धी 1922) या पुस्तकाचे प्रत्यक्ष लेखन याच काळातले.

'मेसेज'मधील नोकरीबरोबरच वामनरावांची पत्रकारिता संपुष्टात आली. वृत्तपत्रासारख्या केवळ तात्कालिकास महत्त्व देणाऱ्या व्यवसायात वामनराव रमणे शक्यच नव्हते. 'सॉक्रेटिसाचे संवाद'च्या प्रस्तावनेत ते लिहितात, "सुमारे सहासात वर्षांपूर्वी वर्तमानपत्राच्या धंद्यात असता त्या धंद्याला आवश्यक असे जे लेखनवाचन करावे लागते ते बहुधा क्षणमात्र महत्त्वाचे असते, हे अनुभवास येऊन मनाला असमाधान वाटू लागले, व उच्चतर आणि अधिक महत्त्वाचे लेखनवाचन करण्याचे प्रयत्न पुष्कळ दिवसपर्यंत काळाच्या अभावामुळे व शारीरिक अस्वास्थ्यामुळे व स्वभावसिद्ध आलस्यामुळे व्यर्थ गेले." त्यामुळे 'मराठा' व 'मेसेंज'मधील अनुभवांमुळे नव्हे तर वाचनलेखनाच्या आंतरिक ओढीमुळे वामनरावांनी वृत्तपत्रव्यवसाय सोडला, हे स्पष्ट आहे.

महिला विद्यापीठ हिंगणे, येथील वातावरण वामनरावांना आवडेल असेच

होते. त्यांच्या सुरुवातीच्या विद्यार्थिनींमध्ये कमलाबाई देशपांडे, गोदावरी केतकर, गंगूबाई पटवर्धन, मालतीबाई बेडेकर इत्यादी पुढे नावारूपाला आलेल्या मुली होत्या. या सर्व मुलींनाही 'रागिणी'कर्ते वामन मल्हार आपले शिक्षक आहेत याचे अप्रूप वाटत होते. वामन मल्हार हिंगण्याच्या वातावरणात अगदी रमून गेले.

शिक्षक म्हणून वामन मल्हार विद्यार्थिनींमध्ये लगेच लोकप्रिय झाले. याचे मुख्य कारण म्हणजे विद्यार्थिनींना समजून घेण्याचा ते प्रयत्न करीत. त्यांचे शिकवणेही विद्यार्थिनींना विषय मुळातून समजावा अशाच पद्धतीचे असे. त्यांचा अध्यापनाचा भर सॉक्रेटिस-पद्धतीच्या संवादांवर असे. वर्गात प्रश्नोत्तरे चालत, प्रश्नांतून प्रश्न निघत. त्यामुळे विद्यार्थिनी आपोआप अभ्यास-विषयात गुंतून जात. "अगदी सावकाश मध्येमध्ये थांबून ते शिकवायचे. डोळ्यात स्निग्धता, आवाजात मार्दव, चेहऱ्यावर वात्सल्य आणि बुद्धीची प्रगल्भता यांमुळे त्यांचा तास कधीच नीरस वाटला नाही." असे त्यांच्या विद्यार्थिनी सांगतात. वामनराव वर्गात खेळीमेळीचे वातावरण ठेवीत. ते मुलींवर क्वचितच रागावत. मुली वसतिगृहातच राहात असल्याने अध्यापनकाम वगळता इतर वेळीही वामनराव त्यांच्यात मिसळत. त्यांच्याकडून बागकाम करवून घेत. अशा अभ्यासक्रमेतर कामाच्या वेळीही विद्यार्थिनींमधली जिज्ञासू वृत्ती कशी वाढेल याकडेच त्यांचे लक्ष असे. विद्यार्थिनींना शिक्षा करणे वामनरावांच्या अगदी जिवावर येई. ते शिक्षा सांगत आणि लगेच ती माफही करीत. हिंगणे येथे काही वर्षे त्यांनी मुख्याध्यापकाचेही काम पाहिले. संस्थेच्या कारभाराचा एक भाग म्हणून वामनरावांना संस्थेतील नोकरांवर देखरेख करावी लागे. वामनरावांचा मऊ स्वभाव पाहून नोकर हलगर्जी वा कामचुकारपणा करीत. पण अशा प्रकारांतही वामनराव न रागावता मृदू राहात. ते म्हणत, "गडीमाणसांनी लबाडी केली तरी त्यांचे अज्ञान आणि दारिद्र्य याच्या मुळाशी आहे. त्यांना बोलण्यात काय अर्थ आहे ! तसे पाहिले तर मोठमोठी सुशिक्षित आणि श्रीमंत माणसे काय कमी अप्रामाणिक असतात ! सगळी समाजरचनाच सदोष आहे." संस्थेसाठी देणग्या गोळा करताना अपमान होण्याचे प्रसंग येत व सहकारी चिडत. अशा वेळी वामनराव म्हणत, "अहो, चिडून कसं चालेल ! प्रचारकाला निंदा, अपमान वगैरेंसारख्या गोष्टींविषयी उदासीन बनून जगातील व्यवहाराकडे विनोदबुद्धीने पाहाता यायला हवे." वामन मल्हारांचे जनमानसात कादंबरीकार म्हणून स्थान होते. याचा फायदा देणग्या

मिळताना होत असे. कधीकधी काही माणसे प्रथम संस्था पाहायला येत व मगच देणगी देत. अशा पाहुण्यांशी वामनराव काहीशा टुटप्पीपणाने व धोरणीपणाने वागत. याबाबत ते म्हणत, "अहो, ही खासगी संस्था आहे. तिला सुधारक, सनातनी सर्वांच्या सहानुभूतीची आवश्यकता आहे. इथे सर्वांनाच खूष ठेवावे लागते."

वामन मल्हार हिंगण्यास येईपर्यंतचा काळ त्यांच्या आयुष्यातील अस्थिरतेचा व दगदगीचा काळ होता. या काळात त्यांना कौटुंबिक सौख्य नीट मिळू शकले नाही. सुरुवातीचा तुरुंगवास आणि नंतरची नोकरीतली अस्थिरता यांमुळे त्यांना व्यवस्थितपणे बिऱ्हाड करून कुटुंबासह राहाता आले नाही. बेकारीच्या काळात तर पत्नीला मुलाबाळांसह माहेरीच जाऊन राहावे लागले. पैशाची चणचण तर नेहमीच असे. मनःस्वास्थही ठीक नसे. हिंगण्यास आल्यावर मात्र ही स्थिती संपुष्टात आली. मनासारखे काम, निसर्गरम्य वातावरण आणि प्रेमळ व आदर्श शेजारी-शिक्षकांचा सहवास यामुळे वामनरावांना सौख्य अनुकूल झाले. त्यामुळेच "हिंगण्याच्या आश्रमातील 16 वर्षांचा काळ आपल्या जीवनातील सर्वात सुखाचा काळ होय" असे स्वतः वामन मल्हार म्हणत. हिंगण्यास आल्यावर आरंभी काही वर्षे वामनरावांच्या लेखनात खंड पडला. पण या काळातच अगोदर लिहून पडलेली 'नलिनी' ही कादंबरी आणि 'सॉक्रेटिसाचे संवाद' हे पुस्तक यांचे प्रकाशन झाले. त्यांनी नंतर निबंध वा परीक्षणे या स्वरूपाचे स्फुटलेखन केले. 1927 मध्ये 'विचारविलास' या त्यांच्या स्फुट-लेखसंग्रहाचे प्रकाशन झाले. 1927–28 मध्ये 'रत्नाकर' मासिकातून त्यांची 'सुशीलेचा देव' ही कादंबरी क्रमशः प्रकाशित होऊ लागली. 'रागिणी'-कर्त्याच्या याही कादंबरीकडे वाचक आकृष्ट झालेले होतेच. 1930 त ही कादंबरी पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. देवास संस्थानच्या अधिपतींतर्फे उत्कृष्ट ग्रंथास दिले जाणारे 'भोजराज पारितोषिक' या कादंबरीला मिळाले. 1930 मध्ये मडगांव (गोवे) येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे वामनराव अध्यक्ष म्हणून निवडले गेले. 1934 मध्ये त्यांची 'इन्दू काळे व सरला भोळे' ही अखेरची कादंबरी प्रकाशित झाली.

1934 तच वामनराव हिंगण्याचा परिसर सोडून जिमखान्यावर आपल्या पुतण्याकडे राहायला आले. ते जिमखान्यावर राहात असताना त्यांच्याकडे अनेक तरुण मंडळी गप्पागोष्टी व चर्चा करण्यासाठी येत. त्यांत वा. सी.

मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये, पु. शि. रेगे इत्यादी पुढे नावलौकिक मिळवलेली मंडळी असत. त्यांच्या मार्क्सवाद, फ्रॉइडचें मानसशास्त्र, नवमतवाद, कलानीतिवाद इत्यादी विषयांवर चर्चा झडत, संवाद होत. मर्ढेकरांबद्दल "फार बुद्धिमान मनुष्य आहे" असें वामनराव म्हणत. मर्ढेकरांच्या बुद्धीबद्दल असा आदर असल्यामुळेच वामन मल्हारांनी पुढे त्यांच्या 'वाङ्मयीन महात्म्यता' या पुस्तकास प्रस्तावना लिहिली. 1937 त उज्जयिनी येथील महाराष्ट्र वाङ्मय मंडळ साहित्य संमेलनाचें वामन मल्हार अध्यक्ष झाले.

एक अध्यापक आणि एक साहित्यसेवक म्हणून वामनरावांचे जीवन असे रसपूर्ण चालले होते. पण या काळातले त्यांचे कौटुंबिक जीवन मात्र समाधानकारक नव्हते, असें म्हणावे लागते. हिंगण्यास राहावयास आल्यावर 1919 च्या आरंभीच त्यांची पत्नी वारली. या धक्क्याने वामनराव खूप खचले. हिंगण्याच्या शिक्षकांच्या चाळीतले वातावरण एखाद्या मोठ्या कुटुंबासारखे होते. त्यामुळे त्यांची चार मुले व ते अगदीच उघडे पडले असें मात्र झाले नाही. मे 1924 त वामनरावांची थोरली मुलगी गंगू हिचा विवाह तात्यासाहेब केळकरांचें चुलत भाऊ श्री. द. के. केळकर (पुढे 'काव्यालोचन'-कार) यांच्याशी झाला. 1934 त वामन मल्हार हिंगण्याचा परिसर सोडून जिमखान्यावर आपल्या पुतण्याकडे राहायला आले. याच वेळी ते ॲनिमियाने आजारी झाले होते. त्यावर त्यांना मुंबईस जाऊन उपचार करून घ्यावे लागले 1937 मध्ये त्यांची दुसरी मुलगी शकुंतला हिचा विवाह प्रसिद्ध समाज सुधारक सीतारामपंत देवधर यांचे चिरंजीव विद्याधरपंत यांच्याशी झाला. शकुंतलेच्या विवाहानंतर वामनरावांना फार एकटे एकटे वाटू लागले. याच सुमारास त्यांचा मोठा मुलगा बंडू यास वेड लागले. त्यास येरवडा येथील वेडयांच्या इस्पितळात ठेवावे लागले. हा धक्का तर इतका जबरदस्त होता की वामनराव त्याला भेटायलाही जात नसत. तीन वर्षांनी म्हणजे 1940 मध्ये बंडू येरवडा येथेच मरण पावला. वामन मल्हारांनी त्यांच्या अंत्यविधीसाठी इस्पितळाच्या अधिकाऱ्याकडे पैसें दिले व ते घरी निघून आले. वामन मल्हार हे जितके स्थितप्रज्ञ होते तितकेच ते मनाने हळवेही होते, हे येथे कळते.

1940 मध्ये वामनरावांचें 'विचारसौंदर्य' हे मौलिक पुस्तक प्रसिद्ध झाले. पण कादंबरीलेखन मात्र आता पूर्णपणे थांबले. स्वतः वामनरावांनाही त्याची नीट जाणीव होती. प्रकाशक कादंबरीची मागणी करीत आणि ते नकार देत. एका प्रकाशकाने तर ग. त्र्यं. माडखोलकरांसारख्या मोठ्या लेखकाला

मध्यस्थी घालून कादंबरीची मागणी केली होती. यावेळी वामन मल्हार माडखोलकरांना म्हणाले, "अहो, नवीन कादंबरी लिहायची म्हणजे डोक्यात काही विषय तर घोळत असायला पाहिजे ना ? सध्या माझ्याजवळ काही नवीन सांगण्यासारखं नाही. मग लिहू काय ?" मात्र याच काळात त्यांनी काही स्फुट ललित लेख लिहिले. ते बहुतांशी आत्मपर होते. हेच लेख 'स्मृतिलहरी' संग्रहात आलेले आहेत.

1937 ते 1942 या काळात वामन मल्हार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष होते. 1843 त ते परिषदेचे अध्यक्षही झालेले होते याच वर्षी मे महिन्यात इतिहासकार गो. स. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली 'इतिहास परिषद' भरली होती. वामन मल्हार या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. या प्रसंगी त्यांनी केलेले भाषण हे त्यांच्या आयुष्यातले अखेरचे भाषण होय.

जून 1941 मध्ये वामन मल्हार हे महर्षी कर्वे यांच्या महिला कॉलेजचे प्राचार्य झाले. त्यामुळे ते जिमखान्याहून पुन्हा हिंगण्यास प्राचार्यांच्या बंगल्यात राहायला आले. वामन मल्हारांना प्राचार्यपद स्वीकारावे लागले ते काहीशा कठीण परिस्थितीतच. कारण त्यांच्या अगोदरच्या प्राचार्य पदावर असलेल्या व्यक्तीने या पदाचा राजीनामा दिला होता. या पार्श्वभूमीवर जेव्हा वामन मल्हारांनी एका प्राध्यापिकेच्या कामाबद्दल प्रतिकूल अभिप्राय दिला तेव्हा वादंग निर्माण झाले; परंतु वामन मल्हारांनी स्वतःची भूमिका स्पष्ट करणारे पत्र तर संस्थेकडे पाठविलेच. पण स्वतःचा राजीनामाही पाठविला. वामन मल्हारांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे संस्थेने त्यांच्या कृतीस सन्मानपूर्वक पाठिंबा दिला. तरीही वामन मल्हारांची प्राचार्य म्हणून कारकीर्द संघर्षमयच होऊ लागली. इतके दिवसांचे त्यांचे स्नेहीसहकारी त्यांचे शत्रू बनू लागले. जे वामन मल्हार आजपर्यंत अजातशत्रू, सुजन, सर्वसंग्राहक वगैरे होते, ते आता दुर्जन, दुष्ट, आपमतलबी गणले जाऊ लागले. वामन मल्हारांना हे सगळे अनपेक्षित होते. त्यामुळे प्राचार्य झाल्यापासून दोन वर्ष त्यांना सतत मानसिक त्रासच भोगावा लागला. ते अस्वस्थ झाले. असह्य मानसिक ताण, कमी झालेली झोप आणि धूम्रपानाचे वाढलेले व्यसन यांचा त्यांच्या प्रकृती-वरही परिणाम झाला. अॅनिमिया व मूळव्याध हे त्यांचे जुने विकार बळावले.

1943 च्या जानेवारीत वामनरावांच्या वयाला 61 वर्षं पूर्ण झाल्याने महाराष्ट्रात त्यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले. पण कॉलेजतर्फे साधा हारही

मिळाला नाही. संस्थेतले वातावरण किती प्रतिकूल व दूषित झाले होते, हे यावरून लक्षात येते.

1943 च्या जुलै महिन्यात त्यांची प्रकृती ठीक नसतानाही ते विद्यापीठ सिंडिकेटच्या बैठकीसाठी पुण्याहून मुंबईस निघाले. निघाले ते प्रवासातच बेशुद्ध पडले. बरोबरच्या मंडळींनी त्यांना त्यांचे बंधू श्री. ना. म. जोशी यांच्या घरी पोचविले. डॉक्टरच्या सल्ल्यावरून वामनरावांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. पण आजारास उतार न पडता 19 जुलै 1943 रोजी त्यांचे मुंबईत निधन झाले. 'रागिणी'कर्त्या वामन मल्हारांच्या निधनाचे वृत्त ऐकून मराठी वाचक शोकसागरात बुडाला. त्यांच्या "घरचा तत्त्वज्ञानी" हरपला होता.

## काल

वामन मल्हारांची आयुर्मर्यादा (1882–1943) आणि मर्ढेकरपूर्व आधुनिक मराठी वाङ्मयाचा काळ समानच आहेत. वामन मल्हारांचे लेखन 1915 ते 1942/43 या कालखंडातील आहे. हा कालखंड म्हणजे टिळकयुगाचा उत्कर्षबिंदू ते अस्त (1915–20) आणि गांधीयुगाचा उदय ते उत्कर्षबिंदू (1920–42). असा आहे. टिळकयुगात फार मोठ्या प्रमाणावर राजकीय व सामाजिक घडामोडी होत होत्या. शहरी मध्यमवर्ग शिक्षित झाला होता, होत होता. शिक्षणामुळे नवे ज्ञान, नवे विचार त्याच्या थेट जवळ आले होते. ते त्याच्या चिंतनाचा, क्वचित आचरणाचा भाग होऊन बसले होते. रानडे-आगरकरां-सारख्यांच्या विचारप्रवाहामुळे सुधारणेचे वारे वाहात होतेच. यातूनच स्त्रीविषयक विविध प्रश्न पुढे आले. त्यातच धोंडो केशव कर्व्यांसारख्यांनी स्त्रीशिक्षणाची एक व्रतस्थ चळवळ सुरू केली. या साऱ्यांचा परिणाम होऊन स्त्रीकडे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून पाहाण्याचा दृष्टिकोण हळूहळू तयार झाला. या दृष्टिकोणाचा परिणाम केवळ 'स्त्री'वरच झाला नाही तर तिच्याबरोबर तिचे संपूर्ण कुटुंब आणि समाज यांवरही झाला. स्त्रीचे कुटुंबातील स्थान केवळ नातेसंबंध सांगण्यापुरते नाही तर ते त्याच्या पलीकडचे आहे, हे लोकांच्या ध्यानात येऊ लागले. अशा रीतीने नवी स्त्री घडण्याओळखण्याचा हा काळ होता, असे म्हणता येईल. वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांतून जी 'नवी स्त्री' जन्माला घातली, तिची वैचारिक पार्श्वभूमी वरीलप्रमाणे आहे.

नव्या शिक्षणाचा परिणाम म्हणून आणखी एक गोष्ट घडून आली. ती म्हणजे अनेक पाश्चिमात्य तत्त्वचिंतकांची ओळख शिक्षित पिढीला झाली. त्यांनी प्रसृत केलेल्या नवविचारांच्या धारेत भारतीय परंपरेतील तत्त्वज्ञान तपासून पाहाण्याची, प्रसंगी घासूनपुसून घेण्याची ऊर्मी अनिवार झाली. राजकीय आकांक्षा वाळगणाऱ्या भारतीयांना अशा तत्त्वज्ञानाची गरज भासत होती. असे तत्त्वज्ञान एकाच वेळी नवे असायला हवे होते आणि पुन्हा ते शंभर टक्के आयात केलेले नसावे, ते भारतीय परंपरेतले असावे, निदान भारतीय परंपरेत मिसळून जाईल असे असावे, असेही वाटत होते. यातूनच तत्त्वज्ञानाच्या मागोव्याची एक प्रक्रियाच सुरू झाली. एका बाजूने 'गीतारहस्य' उकलले जात होते तर दुसऱ्या बाजूने 'सॉक्रेटिसाचे संवाद' आकलन केले जात होते. आचार्य जावडेकरांनी या काळाला 'भारतीय संस्कृतीच्या तत्त्वमंथनाचा काळ' म्हणून संबोधिले आहे, ते यासाठीच.

हा काळ व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्र अशा वेगवेगळ्या पातळ्यांवरील अनेक लहानमोठ्या बौद्धिक वादांनी गजबजलेला दिसतो. सनातनी राष्ट्रवादी आणि सुधारक उदारमतवादी यांच्यात तर जणू उघड युद्धच सुरू होते. सुधारणापंथ स्वीकारायचा की राजकीय हालचालींत सामील व्हायचे, असा तरुण सुशिक्षितांपुढे प्रश्न उभा होता.

1920 नंतर भारतीय राजकारणाच्या मंचावर टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा उदय झाला. गांधींकडे भारतीय राजकारणाची सूत्रे जाताच हिंदुस्थानच्या राजकीय व सामाजिक जीवनात पुन्हा एकदा महत्त्वपूर्ण घडामोडी झाल्या. याच सुमारास नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान प्रबळ झालेले दिसते. महात्मा गांधींनी हे तत्त्वज्ञान भारतीय अध्यात्मपरंपरेत बसवून दिले. यामुळे सनातनी राष्ट्रवादी आणि सुधारक उदारमतवादी यांच्यातील अंतर कमी होण्यास मदत झाली. गांधींच्या उदयाबरोबर सनातनी राष्ट्रवादी विरुद्ध सुधारक उदारमतवादी यांसारखे अनेक वादविवाद मागे पडले. जीवनाच्या व्यापक संदर्भात व्यक्तीच्या आत्मोन्नतीला आणि संसिद्धीला विशेष प्राधान्य आले. समूह आणि व्यक्ती यांच्या परस्परसंबंधांकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले.

1917 त रशियात क्रांती झाली आणि त्याचे सादपडसाद जगभर उमटले. हिंदुस्थानातही 1930 च्या आसपास बोल्शेव्हिझम आला. येथील अनेक विचारवंत, ललित लेखक, राजकीय कार्यकर्ते विश्वकुटुंबवादाकडे आकर्षित

झाले. मार्क्सचा समग्र अभ्यास करण्याच्या दृष्टीने येथे अभ्यासमंडळे स्थापन झाली, अभ्यासवर्ग चालविले जाऊ लागले, इतकेच काय, पण हे नवे तत्त्वज्ञान आचाराच्या पातळीवर स्वीकारण्याच्या दृष्टीने काही काळ येथे 'कॉम्यून्स'ही अस्तित्वात आली.

एका बाजूने गांधीवाद व दुसऱ्या बाजूने मार्क्सवाद या दोन तत्त्व-प्रणालींनी हा कालखंड (1920–42) व्यापलेला आहे. टिळकयुगापेक्षा या कालखंडात एक नवी दृष्टी प्राप्त झाल्याचे दिसते. टिळकयुगात जीवनविषयक विविध प्रश्नांकडे समग्रतेने न पाहाता सुटचासुटचा स्वरूपात पाहिले गेले. गांधीयुगात गांधीवादाने (आणि मार्क्सवादानेही) जीवनविषयक प्रश्न असा अलग काढून न पाहाता समग्र मानवी जीवनाच्या संदर्भात त्याचा विचार सुरू केला. आगरकर-टिळकयुगातील मिल्लस्पेन्सरचे तत्त्वज्ञान मागे पडून मार्क्स-एंजल्सचे समाजवादी तत्त्वज्ञान पुढे आले. पण या समाजवादी तत्त्व-ज्ञानापेक्षाही गांधीप्रणीत 'सत्याग्रही क्रांतिशास्त्रा'ने सर्वसामान्य भारतीय जनता अधिक प्रभावित झाली होती. कारण "सत्याग्रह हे एक राष्ट्रीय क्रांतिशास्त्र आहे, त्याचप्रमाणे ते सर्वांगीण क्रांतिशास्त्र आणि समाजसंघटनाशास्त्र अगर समाजधारणाशास्त्रही आहे. भारतीय संस्कृतीचे ते परिपक्व फळ आहे" अशी विचारप्रणाली प्रसृत होत होती. अहिंसेचे अधिष्ठान असलेल्या, आत्मक्लेशात बळ शोधणाऱ्या, सत्याग्रहाचे शस्त्र पुरस्कारणाऱ्या आणि राजकीय स्वातंत्र्या-पलीकडेही समाजाच्या आत्मिक उन्नतीचे ध्येय ठेवणाऱ्या गांधीप्रणीत 'रामराज्य कल्पने' ने केवळ हिंदुस्थानातच नव्हे तर हिंदुस्थानाबाहेरही अनेक व्यक्ती आकर्षित झाल्या होत्या.

1915–42 मधील राजकीय व सामाजिक जीवनात अशा घडामोडी वेगाने होत असतानाच जगातील विचारवंतांची वैचारिक बैठकच बदलून टाकणारे काही शोध-सिद्धान्त सामाजिक शास्त्रांत आकारत होते. फ्रॉइड आणि यूंग यांचे मानवी मनोव्यापारासंबंधीचे अभिनव सिद्धान्त, रसेलची नवनीती इत्यादींमुळे पारंपरिक विचारप्रणालीतील स्थितिशीलता तर नाहीशी झालीच, पण तिची बैठकच बदलून गेली. या नवप्रवाहांच्या धारेत आपली मते, आपले सिद्धान्त तपासून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. माणूस आणि त्याचे जीवन याबाबतच्या आकलनाची नवी दिशा गवसली.

अशा रीतीने वामन मल्हार ज्या कालखंडात उमेदीने कादंबरीलेखन

करीत होते तो कालखंड अनेक पातळ्यांवरील घटनाविचारांनी गजबजून गेलेला कालखंड होता. या कालखंडात घडलेल्या घटनांनी आणि प्रसृत झालेल्या विचारप्रवाहांनी आधुनिक सुशिक्षित मनात अनेकविध प्रश्नचिन्हे निर्माण केली होती. व्यक्तिमनात एक प्रकारचा गोंधळ, एक संदेह, एक कर्तव्याकर्तव्य-विचार उद्‌भवलेला होता. थोडक्यात म्हणजे आधुनिक शिक्षित व्यक्तींची अवस्था युद्धपूर्व अर्जुनाप्रमाणे शंकाकुल झालेली होती. वामन मल्हारांच्या जीवनदृष्टीत या साऱ्यांचे सादपडसाद उमटलेले आढळून येतात.

## व्यक्तित्व

वास्तविक पाहाता यापुढे येणाऱ्या 'तत्त्वचिंतन' व 'कादंबरीलेखन' या प्रकरणांतून वामन मल्हारांच्या व्यक्तिमत्त्वाची आपोआपच यथोचित ओळख होणार आहे. तरीही वामन मल्हारांचे व्यक्तिमत्त्व चिंतनशील का बनले, तसेच ते सहृदय आणि संवेदनशील कसे बनले, याची येथेच ओळख करून घ्यायला हवी.

वामन मल्हारांचे शिक्षण पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये झाले. या कॉलेज-मधील त्या काळच्या वातावरणाचा त्यांच्या व्यक्तित्त्वाच्या घडणीत महत्त्वाचा वाटा आहे. कॉलेजमधील मोकळे वातावरण, युरोपीय अध्यापकांचा उदार-मतवादी आणि विचारशील दृष्टिकोण यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर होई; तसा तो वामन मल्हारांच्या मनावरही झाला. तसेच कॉलेजमधील वातावरणामुळेच वामन मल्हारांना वाचनाची जबरदस्त सवय लागली. त्याचा परिणाम म्हणून त्यांचा वैचारिक व वाङ्मयीन पिंड पोसला गेला.

पुण्यात 19 व्या शतकाच्या अखेरीस आणि 20 व्या शतकाच्या प्रारंभी जे सामाजिक, राजकीय व शैक्षणिक वातावरण होते, त्याचाही परिणाम वामन मल्हारांच्या व्यक्तित्वघडणीत निश्चित रूपाने झाला. पुण्यात सुधारक व सनातनी या दोन्ही पक्षांचा जोर होता. दोन्ही पक्ष कडोविकडीच्या युक्तिवादाच्या साहाय्याने, शास्त्रप्रामाण्याच्या सय्याने वाद खेळत होते. राजकीय चळवळींना कमालीचा जोर आला होता. या साऱ्यांचा परिणाम होऊन सुरुवातीच्या काळात वामन मल्हारांचा पिंड राष्ट्रवादी बनला. काही काळ ते विजापूरकरांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते, ते यामुळेच. वेदोक्त प्रकरणी भोगलेल्या तुरुंगवासानंतर वामन मल्हार काही वर्षे 'केसरी-मराठा' संस्थेत व कोल्हटकरांच्या 'मेसेंज' मध्ये होते. या पत्रकारितेनेही त्यांना काही काही शिकवले.

त्यानंतर ते कर्वे यांच्या हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेत स्थिरावले. महिलांच्या संस्थेत राहिल्याने, तरुण सुशिक्षित मुलींत मिसळल्यामुळे त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण बदलत गेला, तो अधिकाधिक उदार होत गेला.

वामन मल्हार हे तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी व प्राध्यापक होते. त्यामुळेच की काय 'विचार' हा त्यांच्या प्रवृत्तीचा महत्त्वाचा विशेष बनला. हा विचार पुन्हा पारमार्थिक किंवा पलीकडच्या जगाचा न राहाता माणूस आणि त्याची सृष्टी यांच्या-संबंधीचाच विचार राहिला, हे महत्त्वाचे. मानवी जीवनाच्या अपूर्णतेकडून पूर्णतेकडे होणारा प्रवास ही त्यांच्या विचाराची कक्षा राहिली. याच वेळी हेही लक्षात घेतले पाहिजे की त्यांचे व्यक्तिमत्त्व ज्ञानलोभी होते. त्याचा परिणाम असा झाला की वामन मल्हार कोणत्याही एका विचारसरणीला बांधील राहिले नाहीत उलट एका विशिष्ट संदर्भात पटलेला विचार, मान्य झालेला विचार दुसऱ्या संदर्भात, वेगळ्या परिस्थितीत तितक्याच यथार्थतेने पटतो का? लागू होतो का? याचा शोध घेण्याची त्यांची सवय होती. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यामुळेच 'क्वेस्ट फॉर नॉलेज'ने युक्त होते; एखाद्या पुराण ज्ञानपिपासू, जिज्ञासू ऋषीप्रमाणे होते. साहजिकच कोणत्याही एका विचाराच्या बाबतीत ते कधीही आग्रही नव्हते. उलट विचाराची अधिकाधिक शुद्धता राखण्याच्या त्यांच्या अनाग्रही व प्रांजळ वृत्तीमुळे आणि कोणत्याही विचाराच्या साऱ्याच कक्षा सारख्याच सहानुभूतीने तपासण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांचे प्रतिपादन ठाशीव होत नसे. सत्यान्वेषी वृत्तीमुळे त्यांना असे ठाशीव किंवा घाईगर्दीचे निष्कर्ष काढणे मानवत नसे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सत्य, सौजन्य व सौंदर्य या त्यांनी स्वतःच प्रतिपादिलेल्या तत्त्वत्रयीचा आढळ होतो. या त्रयीच्या शोधामुळेच उपलब्ध जीवनवास्तवाच्या आधारे एक उच्च जीवनादर्श निर्माण करण्याची त्यांची सततची भूमिका राहिली. त्यांच्या ललितलेखनात या भूमिकेचे प्रतिबिंब सरळपणे दिसते. त्यांची भूमिका गुरुकुलातील आचार्यांसारखी सत्यान्वेषी नीतिचिकित्सकाची राहिली. त्या भूमिकेला समग्रलक्षी आकलनाची जोड देणेही त्यांना महत्त्वाचे वाटे. ज्ञान हे अमृत आहे, विष नव्हे, हे त्यांचे म्हणणे येथे मुद्दाम आठवावे.

वामन मल्हारांची स्वतःची अशी सौंदर्यकल्पना होती. तीत बाह्यांग सौंदर्यापेक्षा अंतरंग सौंदर्याला ते अग्रस्थान देताना दिसतात. हे त्यांचे अंतरंग सौंदर्य, विदग्ध कोटिक्रम, खेळकर वातावरण, प्रौढ विचार, प्रगल्भ धारणा,

सूक्ष्म अव्याज - मनोहर विनोद इत्यादींतून सतत पाझरत असे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व वैचारिक असून, पिंड तत्त्वचिंतकाचा असूनही ते कधी तर्ककर्कश, कठोर व करकरीत झाले नाही. उलट त्यांचें व्यक्तिमत्त्व रुचिर होतें, काव्य-शास्त्रविनोदाने संपन्न होते, नवनवीन प्रवाहांबद्दलचें एक कुतूहल त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून सतत लुकलुकताना दिसे. त्यामुळे त्यांचें ललित व वैचारिक असें दोन्ही प्रकारचें लेखन मराठी वाचकाला सतत आस्वाद्य बनले आहे.

# प्रकरण दुसरे
# तत्त्वचिंतन

'एक थोर तत्त्वचिंतक', 'विचारवत', 'महाराष्ट्राचे सॉक्रेटीस' यासारखी बिरुदे महाराष्ट्राने वामन मल्हारांच्या लेखनारंभापासूनच त्यांना बहाल केलेली आहेत, इतकेच नव्हे, तर "वामन मल्हारांनी महाराष्ट्राला विचार करावयास शिकवले" असेही पुष्कळदा म्हणण्यात येते. महाराष्ट्रात तसे बरेच विचारवंत होऊन गेले. महाराष्ट्राला विचारवंतांचा प्रांत असेही म्हटले जाते. तथापि 'विचारवंत' ही पदवी प्रेमादराने व कौतुकाने वामन मल्हारांनाच का प्रदान करण्यात येते याचे रहस्य शोधल्याखेरीज विचारवंत किंवा तत्त्ववेत्ते या नात्याने त्यांनी केलेल्या कार्याचे मर्म व महत्त्व लक्षात येणार नाही.

इंग्रजी राजवटीच्या आगमनामुळे महाराष्ट्रात जी वैचारिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्रांती झाली, पारंपरिक तत्त्वविचारांना जी आव्हाने मिळाली, त्यातून वैचारिक क्षेत्रात बरीच खळबळ माजून राहिली. वामन मल्हारांच्या अगोदरच्या काळात आणि त्यांच्या समकालात पारमार्थिक भारतीय तत्त्वपरंपरा आणि इहवादी पाश्चात्य ज्ञानपरंपरा यांच्यात संघर्ष निर्माण झाला. प्रपंच–परमार्थ, इहवाद–पारलौकिकतावाद, नवे–जुने, व्यक्ती–समाज, राजकारण–समाजकारण, बुद्धी–भावना, साध्य–साधन, क्रांती–उत्क्रांती, प्रयत्नवाद-दैववाद, राष्ट्रवाद–विश्वकुटुंबवाद, नवी नीती–जुनी नीती, परंपरा–नवता यांसारखी द्वंद्वे उभी राहिली. यातून मार्ग काढण्यासाठी पारंपरिक भारतीय विचारांच्या जोडीने पाश्चात्य तत्त्वविचारांचाही परामर्श घेतला जाऊ लागला. शंकराचार्यांच्या जोडीने ॲरिस्टॉटल, सॉक्रेटीस, हेगेल, कांट किंवा मिल–स्पेन्सर यांचे तत्त्वज्ञान पारखले जाऊ लागले. पुढे या विचारमिश्रणाला रसेल, फ्रॉइड, मार्क्स यांच्या विचारांची जोड मिळाली.

या साऱ्याच जुन्यानव्या विचारवंतांच्या विचारांकडे वामन मल्हार जिज्ञासेने, कौतुकादराने व्रतस्थपणे पाहात. त्यातील आपल्या दृष्टीने, विशिष्ट

देशकालपरिस्थितीत योग्य ठरणारा जो भाग असेल, मग तो कितीही का क्रांतिकारक असेना, त्याचा ते निर्मळपणे व विवेकबुद्धीने स्वीकार करीत. या बाबतीत त्यांची वृत्ती स्फटिकाप्रमाणे शुभ्र व स्वच्छ होती. तीत आग्रही. पणाचा किंवा सांप्रदायिकतेचा अंशही नव्हता. होता होईल तों विविध विचारांचा वा वृत्तींचा समतोल किंवा समन्वय साधण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती; पण या बाबतीत पुनर्विचार करण्याची संधी मिळाल्यास ते तत्परतेने पुढे होत. ते एका बाजूने जेवढे आदर्शवादी होते तेवढेच दुसऱ्या बाजूने वास्तववादी व व्यक्तिवादीही होते. आत्मशोधाची, आत्मज्ञानाची, आत्मविकासाची ध्वजा उंचवर नेऊन फडकत ठेवण्यावर त्यांचा भर होता. विचारांच्या तात्त्विक काथ्याकुटापेक्षा त्या विचारांतील जीवनव्यवहाराला पोषक ठरणारी द्रव्ये ते तारतम्याने उचलीत. ते बहुश्रुत होते. पण पुस्तकी पांडित्यापेक्षा जीवनव्यवहाराला सुकर, सुभग करण्याकडे त्यांचा ओढा असे. त्यांचे साहित्य म्हणजे विचारक्षेत्रांतील एक यात्राच आहे. या यात्रेत त्यांना जे जे दिसले, भावले, जाणवले, प्रतीत झाले, ते ते त्यांनी सहृदयतेने, चिकित्सकपणे, स्वतःची व मानव-जातीची विचारग्रहणाची एकंदर मर्यादा लक्षात घेऊन नम्रपणे जिज्ञासूंसमोर ठेवले. याकरिता त्यांनी आपल्या वाचकांशी प्रांजळ संवाद साधण्याचा प्रयत्न केला.

वामन मल्हारांच्या लेखी विचारांच्या सामर्थ्याइतकेच विचारांच्या सौंदर्यालाही महत्त्व आहे. 'विचारसौंदर्य', 'विचारविलास' 'विचारविहार' यांसारखी त्यांच्या वैचारिक स्फुट–लेखसंग्रहांची नावे हेच सूचित करतात.

वामन मल्हारांच्या विचारांचा एकंदर पल्ला विश्वकुटुंबवादाला भिडत होता. तथापि त्यांच्यासमोर विचारविनिमयासाठी जो वाचकवर्ग होता, श्रोतृवर्ग होता, तो मुख्यतः समकालीन, सुशिक्षित, तत्त्वजिज्ञासू, सुसंस्कृत, सहृदय मनाचा महाराष्ट्रीय तरुण स्त्रीपुरुष वर्ग. या महाराष्ट्रीय सुशिक्षित समाजाच्या कौटुंबिक व सामाजिक अशा विविध प्रश्नांची तात्त्विक पातळीवरून त्यांनी आपल्या लेखनातून, भाषणांसंवादांतून सातत्याने चर्चा व चिकित्सा केली आहे.

वामन मल्हारांचा तत्त्वविचार हा 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त' किंवा आधुनिक सुशिक्षितांसाठी सांगितलेली गीता आहे. 'किंकर्मकिम्कर्मेति'च्या संदर्भात तत्कालीन विचारी सुशिक्षितांसमोर जी प्रश्नचिन्हे उभी होती, त्यातून मार्ग काढण्याच्या वृत्तीतून स्वकर्तव्याचें, 'स्वधर्मा'चें स्वरूप निश्चित करण्याच्या

वृत्तीतून वामन मल्हारांचे सारे लेखन व चिंतन प्रवाहित झालेले आहे. त्यांची या बाबतीतली भूमिका ही कठोर वृत्तीच्या गुरूची नसून स्नेहस्निग्ध मित्राची व डोळस मार्गदर्शकाची आहे. त्यांच्या या मार्गदर्शनपर लेखनात विश्लेषणाइतकाच संश्लेषणावरही भर आहे. विचारांच्या मार्गक्रमणाची निश्चित दिशा त्यांना प्राप्त झाली होती; किंवा सत्याचे अंतिम रहस्य त्यांना गवसले होते असे नाही. त्यांचा स्वतःचाही तसा दावा नाही. किंबहुना वामन मल्हारांची ख्याती विचारवंत म्हणून जशी आहे, तशीच 'संशयात्मे' म्हणूनही आहे. वामन मल्हारांच्या या विचारसंचलनाचे जे महत्त्व आहे ते विशिष्ट प्रकारच्या वैचारिक निष्कर्षांच्या संदर्भात नसून विचारप्रक्रियेचे त्यांनी जे स्वरूप स्पष्ट केले आहे, त्या प्रक्रियादर्शनात आहे. आपण निश्चित स्वरूपाचा एकही विचार देऊ शकलो नसलो, तरी विचार कसा करावा, या बाबतीत काही सांगू शकलो याचा त्यांना एक प्रकारचा अभिमान वाटतो व तो सार्थही आहे.

कोणताही विचारवंत किंवा तत्त्ववेत्ता घेतला तरी त्याच्या तत्त्वविचारांना उपलब्ध ज्ञान–विज्ञानाचा व प्रचलित जीवनसंदर्भाचा पाया असतो. मी कोण ? माझे जीवनश्रेय कशात आहे ? माझा व विश्वाचा संबंध काय ? व्यक्ती या दृष्टीने माझे समाजाशी नाते कोणते ? कुटुंबाविषयी माझे कर्तव्य कोणते ? इत्यादी स्वरूपाचे जे जीवनसंलग्न प्रश्न उपस्थित होतात, त्यांना उत्तरे देण्याघेण्याच्या दिशेवरून त्या त्या तत्त्ववेत्त्याची वैचारिक दृष्टी व सृष्टी सिद्ध होत असते.

वामन मल्हार हे तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी व अध्यापक होते. त्यांच्या तत्त्वविचारांत भारतीय तत्त्वज्ञानाला योग्य ते स्थान आहे. भारतीय विचार-परंपरेबद्दल, तिच्या पावनत्वाबद्दल त्यांना सार्थ अभिमानही आहे. तरीही त्यांचे तत्त्वविचार मुख्यतः युरोपीय तत्त्ववेत्त्यांच्या व विज्ञाननिष्ठ, इहवादी आधुनिक विचारवंतांच्या जीवनविषयक तात्त्विक धोरणावर परिपुष्ट झालेले आहेत. त्यांना पाश्चात्य तत्त्वज्ञानातील मानवतावाद (त्याची विविध समाजशास्त्रीय अंगे), विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, विकासवाद, गतिशीलता, इतिहासक्रम, Greatest good of the greatest number, समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही इत्यादी विविध घटक मान्य आहेत.

वामन मल्हारांच्या अगोदरच्या काळात महाराष्ट्रात राष्ट्रवादी विचारांना सर्वाधिक प्राधान्य होते. स्वतः वामन मल्हारही आरंभी राष्ट्रवादी प्रवृत्ती-

कडेच झुकलेले होते. राष्ट्रीय चळवळीत ते काही काळ सहभागीही झाले होते; परंतु त्यांच्या राष्ट्रवादात तसा कडवेपणा नव्हता. त्याचे एक अग्र विश्व-कुटुंबवादाशी भिडलेले होते. त्यांच्या या विश्वकुटुंबवादाचे नाते केशवसुतांच्या 'नवा शिपाई' या सुप्रसिद्ध कवितेतील घोषणेशी निगडित करता येईल (अर्थातच 'नवा शिपाई'मधील ठाशीव आक्रमक बाणा वगळून).

वामन मल्हारांच्या तत्त्वविचारात अग्रस्थान आहे, ते व्यक्तीला, तिच्या सर्वांगीण विमोचनाला, वैध विकासाला व विलासाला. याचा अर्थ ही व्यक्तिवादी विचारसरणी अहंकेंद्रित किंवा सुखवादी (Hedonist) स्वरूपाची नाही. तिच्यात त्यागबुद्धीला, कर्तव्यभावनेला, शुद्धमनस्कतेला स्थान आहे. व्यक्तीचें सुख घेतले तरी जोंवर समाज सुखी होणार नाही, तोंवर व्यक्तीही दुःखीच राहाणार, असें वामन मल्हार निक्षून सांगतात. व्यक्तिसापेक्ष व्यक्तिहिताकडे त्यांचा अधिक ओढा आहे, हे खरे. पण त्याचबरोबर ते असेंही मानतात की व्यक्तीने आत्मविमोचनासाठी स्वतः होऊन प्रगल्भ प्रयत्न केल्या-खेरीज समाजाचे विमोचन होणार नाही. यासाठीच ते व्यक्तीच्या समाजसापेक्ष कर्तव्यभावनेला, समाजपरतेला अग्रस्थान देतात. समाजातील दुःखांनी ते व्यथित होतात; (या संदर्भात 'सुशीलेचा देव' या त्यांच्या कादंबरीतील "ही आमची समाज–व्यवस्था" हे प्रकरण पाहावे.) पण समाजविमोचनाचे नाते व्यक्तीच्या आत्मोन्नतीशी जोडतात; तिच्या आत्मोन्नतीवर ते भर देतात. "क्षुद्र सुखाविषयी वैराग्य प्राप्त होऊन सर्व जगताकडे समतेने व प्रेमदृष्टीने पाहणे आणि तदुन्नतीकरिता उत्साहपूर्वक अहर्निश प्रयत्न करणे याचेंच नाव आत्मोन्नती" अशी त्यांची आत्मोन्नतीची व्याख्या आहे.

वामन मल्हारांच्या लेखनातील 'Know thyself' चा सततचा सूर व त्यासाठी त्यांनी गायिलेले ज्ञानस्तोत्र या दृष्टीने महत्त्वाचे आहे. माणूस हा जात्याच जिज्ञासू व ज्ञानप्रवण आहे, यावर त्यांचा विश्वास आहे. त्यांनी वर्णिलेली ज्ञानमहती त्यांच्या "ज्ञान हे विष की अमृत" या लेखात प्रभावीपणे प्रकट झाली आहे. त्यांच्या सर्वच लेखनातून—मग ते ललित असो वा ललितेतर असो—या ज्ञानमहतीचा सातत्याने प्रत्यय येतो. "ज्ञान हेच उच्चतम आनंद देणारे आहे, ते संसाराला रमणीयता आणते, ते नीतिपोषक आहे, ते खऱ्या धर्माशी अविरोधी नव्हे तर अनुकूल आहे अशी माझी कल्पना आहे. आणि समजा, ज्ञान हे आनंददायक नाही, ते धर्माला पोषक नाही, असे ठरले तरी मी म्हणेन, "मला ज्ञान पाहिजे; मग धर्माचें वगैरे काय व्हायचे असेल ते होवो.

अज्ञानावर आधारलेला धर्म मला नको आहे." घोड्याच्या डोळ्यांना झापडी बांधून आणि सभोवती काय आहे, हे त्यापासून लपवून त्याला आखीव रस्त्यावरून आपण चालवितो त्याप्रमाणे माझ्यापासून परिस्थितीचें खरे ज्ञान लपवून मला जर कोणी परंपरेच्या आखीव रस्त्यावर नेऊ लागला, तर त्याविरुद्ध बंड करणे माझें कर्तव्यकर्म आहे असें मी समजेन. 'ज्ञानान्मोक्षः' असें शास्त्र सांगते, पण 'ज्ञानन्नरकः' अशी जरी मला कोणी धमकी दिली, तरी 'त्वमेव शरणं मम' असें मी ज्ञानालाच म्हणणार. अज्ञानात सुख असेल, पण ते सुख कमी दर्जाचें आहे. "Ignorance is bliss हे कोणाला? तर पशूंना. ज्ञानाबरोबर जबाबदाऱ्या अधिक येतील, पापांची जाणीव अधिक तीव्र होईल, जाचक प्रश्न अधिक उत्पन्न होतील, तथापि ज्ञान तें ज्ञान; तें सोडून अज्ञानाची कास धरणें विचारी माणसाला शक्य नाही."

एरवी सौम्य वाटणारे वामन मल्हार ज्ञानाचें स्तोत्र गाताना किती रंगून जातात, तल्लीन होतात, प्रसंगी किती अभिनिवेशपूर्ण बनतात, हें वरील उद्गारांवरून स्पष्ट व्हावें. ज्ञानावर घेतल्या जाणाऱ्या विविध आक्षेपांचें खंडन त्यांनी आपल्या या 'ज्ञान हे विष की अमृत?' या लेखात विस्ताराने केले आहे, आणि "ज्ञानापासून होणारा उच्च सात्विक आनंद जो आहे त्याची योग्यता फार मोठी आहे. प्रथमप्रथम कितीही असमाधान वाटले व क्षुद्र मनोविकारांना कितीही तीव्र अंजन मिळाले, तरी ज्ञानाच्या सात्विक आनंदाकरिता हे मूल्य दिलेच पाहिजे." असें या लेखाच्या समारोपात आग्रहपूर्वक प्रतिपादिले आहे.

वामन मल्हारांच्या या ज्ञानकल्पनेत वेदप्रामाण्याला किंवा ग्रंथप्रामाण्याला, आप्तवाक्याला तसें स्थान नाही. लो. टिळकांप्रमाणे त्यांची भूमिका 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' अशी नाही. त्यांचा भर बुद्धिवादावर आहे. मात्र त्यांचा बुद्धिवाद तर्ककर्कश किंवा कोरडा नाही. त्याला ते प्रसंगी प्रेमाची किंवा भावनेची जोड देतात. "अमूक गोष्ट चांगली किंवा वाईट, खरी किंवा खोटी, हे ठरविण्याची अंतिम कसोटी, शास्त्र किंवा आप्तवाक्य न मानता स्वतःची विवेकबुद्धी ही अंतिम कसोटी मानणे म्हणजे बुद्धिवादी असणे होय" असें त्यांना बुद्धिवादाबद्दल म्हटले आहे. पण त्यांच्या तत्त्वविचारात भावनेलाही स्थान होतें. केवळ विचाराने किंवा बुद्धिवादाने जीवनाचें सर्व प्रश्न सुटतील यावर त्यांचा विश्वास नाही. बुद्धिवादाला सात्विक भावनेची, सामाजिक दृष्टिकोणाची तें जोड देतात. त्यांच्या कादंबऱ्यांतून याचें प्रत्यंतर येतें. बुद्धिवादाला प्रेमाची, 'Sweetness and light' ची जोड देण्याकडे वामन

Indian Institute of Advanced Study
11.7058

मल्हारांनी विशेष लक्ष पुरविले आहे.

गीतेतील 'स्थितप्रज्ञ' हा वामन मल्हारांचा आदर्श आहे. या स्थित-प्रज्ञाची चित्रे 'आश्रमहरिणी'तील ऋषिमुनींच्या चित्रणातून किंवा 'रागिणी'-तील हिमालयावरील प्रियव्रम्हस्वामींच्या चित्रणातून आढळतात. या ऋषि-मुनींची ज्ञानलालसा प्रखर असूनही ती मानवी स्खलनशीलतेकडे - अपूर्णतेकडे करुणार्द्रतेने पाहते. 'To understand all is to pardon all' असेही एक तत्त्वसूत्र त्यांनी 'इंदू काळे व सरला भोळे' मध्ये प्रकट केले आहे. वामन मल्हार ज्ञानप्राप्ती हे मानवाचें अंतिम ध्येय मानतात. त्याचबरोबर हे ज्ञान कोरडें नाही; त्याला सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांची जोड देणे आवश्यक आहे, असेंही ते म्हणतात. यामुळेच त्यांचें कादंबरीविश्व विचारप्रधान असूनही ललितप्रचुर झाले आहे.

वामन मल्हारांच्या ज्ञानसंकल्पनेच्या वितरणात जरी भारतीय आध्यात्मिक परिभाषेचा अवलंब आढळत असला, तरी त्यांच्या ज्ञानविचारात सांप्रदायिक स्वरूपाच्या पारमार्थिक दृष्टिकोणाला बिलकूल स्थान नाही. दैनंदिन मानवी जीवनात भौतिक सुखसंपन्नता व मानसिक शांती कशी प्रादुर्भुत होईल व हे अपूर्ण जग पूर्णतेच्या दिशेने कशी वाटचाल करील, याचा विचार करण्यावर त्यांचा विशेष कटाक्ष आहे. यासाठी माणसाने कोणत्या ना कोणत्या ध्येयाची उपासना मनःपूर्वकतेने केली पाहिजे, असे ते सुचवितात; किंबहुना ध्येयाचीच देवाच्या ठिकाणी प्राणप्रतिष्ठा करून मोकळे होतात. 'ध्येय हाच देव' असें त्यांनी एका लेखात घोषित केले आहेच. या आपल्या लेखातील विचारांचें उद्‌घाटन त्यांनी पुढे 'सुशीलेचा देव' या कादंबरीतही केले आहे. वामन मल्हार पारंपरिक वा सांप्रदायिक अर्थाने देव मानत नाहीत. ते स्वतःला या बाबतीत आगरकर पंथातील विवेकवादी म्हणवितात. ते देव मानत नसले तरी त्यांचा मानवी जीवनातील सदांशावर भरवसा आहे. 'ध्येय हाच देव' या लेखात त्यांनी प्राचीन व आधुनिक देवकल्पनांचा परामर्श घेतला आहे आणि सांकेतिक देवकल्पनेमुळे मनुष्य दैववादी, स्थितिशील बनतो; असल्या देवकल्पनेने कधी कधी मानवी उन्नयनात अडथळेच निर्माण होतात; म्हणून मानवी प्रयत्नाला, मानवी जीवनाला उत्तेजित करणारा आणि मानवी सद्‌गुणांना विकसित करणारा ध्येय नामक देवच त्यांनी संमत मानला आहे. "आपापले जे ध्येय असेल त्याची काया-वाचा-मनेकरून पूजा करणाऱ्यांना किंवा करू पाहाणाऱ्यांना मी आस्तिक समजतो", असें ते म्हणतात. "देवावर विश्वास

असणाऱ्यांना जो सात्त्विक आनंद मिळतो त्या प्रकारचा आनंद ध्येय मानणाऱ्यांनाही होतो; किंबहुना हा आनंद अधिक उच्चतर असतो," असेही त्यांनी त्याच लेखात म्हटलेले आहे. 'ध्येये म्हणजे दुःखे' असे एक विधान 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीत येते. पण तेथेच वामन मल्हारांनी असाही निर्वाळा दिला आहे की ध्येयासाठी दुःख भोगण्यात उच्चतर आनंद आहे. विशिष्ट प्रकारचा देव मानण्यापेक्षा मानवातील "देववृत्ती" जागृत करण्यावर वामन मल्हारांचा भर आहे.

वामन मल्हार हे सांप्रदायिक अर्थाने निरीश्वरवादी असले तरी तुच्छतावादी नाहीत. जगात बरीच दुःखे आहेत, हे जग अपूर्ण आहे, माणूस स्खलनशील प्राणी आहे, हे त्यांना मान्य आहे; पण त्याचबरोबर जग हे विकसनशील, आनंदमय आहे, माणूस मूळचा सत्प्रवृत्त आहे, जिज्ञासू आहे, ज्ञानाभिलाषी आहे, यांवरही त्यांचा दृढ विश्वास आहे. मानवी जीवनातील बरीचशी दुःखे अज्ञानातून, गैरसमजातून, स्वार्थबुद्धीतून निर्माण होतात, असा वामन मल्हारांचा अभिप्राय आहे. ते वृत्तीने विश्वकुटुंबवादी असले तरी या कल्पनेचा विकास देशकालपरिस्थितिसापेक्ष असतो याचें भानही ते बाळगतात. व्यक्तीने आपले ध्येय किंवा स्वधर्म ठरविताना स्वप्रकृतीबरोबरच देशकालपरिस्थितीचा विचार करून तो नियत केला पाहिजे, असें ते कटाक्षाने सांगतात. त्यांचा विचारांचा केन्द्रबिंदू 'स्वधर्म' हा आहे. त्यांची सर्व विचारसरणी कार्याकार्यविवेकयुक्त अंतःकरणप्रवृत्तीनुसार निवडलेल्या स्वधर्माशी संबंधित आहे. देव=ध्येय=स्वधर्म, असें त्यांच्या विचारांचें समीकरण मांडता येईल. "आपले शुद्ध मन आपल्याला जे कर्तव्य म्हणून सांगते ते करावे; ते नेहमी करीत राहाण्यात जो आनंद, तो खरा आनंद; तोच नित्य, शाश्वत आनंद; तेच निःश्रेयस सुख; तोच स्वर्ग आणि तेच आत्म्याचें अमरत्व," हे 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतील उद्‌गार वामन मल्हारांची स्वधर्मकल्पना पुरेशी स्पष्ट करणारे आहेत. 'रागिणी'मधील "जीवित आनंदात जाणार की दुःखात हा प्रश्न अगदीच गौण नाही का? कर्तव्यकर्म आपण करतो की नाही, आपले ज्ञान व सौजन्य वृद्धिंगत होत चालले आहे किंवा नाही, हाच मुख्य प्रश्न आहे," हे प्रियब्रह्मस्वामींचे उद्‌गारही या संदर्भात चिंतनीय आहेत. वामन मल्हारांना अभिप्रेत असलेला 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त' असें ज्याला म्हणता येईल तो हाच.

वामन मल्हारांनी धर्माची व्याख्या शुद्धबुद्धीशी संबंधित केली आहे

आपल्या 'नीतिशास्त्रप्रवेश' या ग्रंथाच्या समारोपात ते म्हणतात, "तार्किक ज्ञान हे धर्मनिष्ठेचें शरीर आहे. भावनेच्या तेजस्वी ज्योतीनें हे ज्ञानात्मक शरीर व्यापले व ते आपलेसें करून टाकले, म्हणजे मग या अवस्थेला आपण **धर्म** ही संज्ञा देतो."

वामन मल्हारांचा हा शुद्धबुद्धियुक्त स्वधर्म म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा, त्यांच्या त्यांच्या कर्तव्यपालनाचा धर्म. व्यक्तीने हा 'स्वधर्म' कसा ओळखावयाचा? हा धर्म निश्चित करण्याची गुरुकिल्ली कोणती? कार्याकार्यविवेक कशाच्या आधारे साधावयाचा? यांसारख्या गोंधळात टाकणाऱ्या प्रश्नांचा विचारही त्यांनी केला आहे. बुद्धी विवेकी, विचारी, शांत, निःस्वार्थ, शुद्ध होण्याच्या व कर्तव्याची दिशा योग्य त्या प्रकारे आत्मसात होण्याच्या दृष्टीने सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांची जी उपासना वामन मल्हारांनी सुचविलेली आहे, ती लक्षणीय आहे. त्यांच्या विचारसृष्टीत व कलोपासनेत या तत्त्वत्रयीला किंवा मूल्यत्रयीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

'Beauty, Truth, Goodness' ही त्रयी सुप्रसिद्धच आहे. या तिन्हींची उपासना ही मानवी जीवनाचें महत्त्वाचें व अंतिम मूल्य मानण्यात येते. या त्रयीपैकी सत्य (Truith) व सौंदर्य (Beauty) यांचा अंतर्भाव वामन मल्हारांनी आपल्या तत्त्वत्रयीमध्ये केलेला आहेच. त्यांच्या सौजन्यकल्पनेचा संदर्भ Goodness शी आहे, असें म्हणता येईल. मात्र या (सत्य–सौजन्य–सौंदर्य) तत्त्वत्रयीला त्यांनी जो विशिष्ट क्रम दिला आहे, तो विचारात घेण्यासारखा आहे. त्यांनी सत्य आणि सौंदर्य यांच्या मध्यभागी सौजन्याची स्थापना केली आहे. वामन मल्हार सत्य, सौजन्य व सौंदर्य या तिन्ही तत्त्वांचें उपासक आहेत. पण सौजन्य हा त्यांच्या प्रकृतीचा स्थायिभाव आहे.

जीवनाचें चिरमंगलत्व, चिररुचिरत्व या तत्त्वत्रयीशी संबंधित आहे. ही तत्त्वत्रयी बाह्यतः वेगवेगळी दिसली तरी ती परस्परपूरक आणि परस्परसापेक्ष आहे, अंतिमदृष्ट्या एकच आहे, असें वामन मल्हारांचें प्रतिपादन आहे. यातील प्रत्येकाचा दुसऱ्याशी जिव्हाळ्याचा संबंध येतो, असें ते म्हणतात. पण या तत्त्वत्रयीत सौजन्याला मधले स्थान देण्याचें महत्त्वाचें कारण सौजन्यामुळे सत्याचें व सौंदर्याचें आकलन होण्यास मदत होते, हे होय. वामन मल्हारांचा तसा दृढ विश्वास आहे. सौजन्यामुळेच सत्य सुंदर बनले व सौंदर्य रुचिर होते, म्हणून वामन मल्हार सौजन्याला विशेष महत्त्व देताना दिसतात.

वामन मल्हारांची ही तत्त्वत्रयी त्यांच्या जीवनविचाराप्रमाणेच त्यांच्या साहित्यविचारातही प्रकट झाली आहे. साहित्याचें प्रयोजन व अंतिम मूल्यही ते या तत्त्वत्रयीच्या उपासनेच्या आधारेच निश्चित करतात.

वामन मल्हारांच्या सत्यविषयक विचारात जरी वैज्ञानिक पद्धतीला आणि बुद्धिप्रामाण्याला प्राधान्य असले तरी शास्त्रांची वाढ अपुरी असल्यामुळे आणि तार्किकतेला स्वतःसिद्ध मर्यादा असल्यामुळे शास्त्र व तर्क यांच्या जोडीने सत्यशोधनाला शुद्ध अंतःकरणप्रवृत्तींचीही जोड दिली पाहिजे असें त्यांचें म्हणणे होते, हे यापूर्वीच सूचित केलेले आहे, सत्यामध्ये स्वतःसिद्ध असें एक पावित्र्य असते, असेंही ते मानतात. प्रतीत झालेल्या सत्याची प्रल्हादाप्रमाणे उपासना करण्याचा आदेश त्यांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून साहित्य-भक्तांना दिला आहे.[7] मात्र या सत्याचें प्रतिपादन करताना देशकालपात्र-परिस्थिती यांचाही विचार केला पाहिजे, असें ते म्हणतात. सत्याचें आकलन अयोग्य प्रकारे झाल्यास तो विस्तवाशी खेळ ठरतो असा एक इषाराही त्यांनी आपल्या 'विस्तवाशी खेळ' या नाटकाद्वारे दिलेला आहे.

सत्य कितीही श्रेष्ठ असले तरी ते पेलण्याची क्षमता समोरच्या व्यक्तीला कितपत आहे, हेही पाहिले पाहिजे. ज्याला जेवढे ओझे सहन होईल तेवढेच त्याला दिले पाहिजे. या विवेकाचेंही वामन मल्हारांना अवधान आहे. सत्य हे अंतिमतः एकात्म व अविभाज्य असते तरी त्यातही तरतमभाव बाळगावा लागतो, पूर्ण सत्य व एकांगी सत्य असें वर्गीकरण करावे लागते, असें वामन मल्हार सुचवितात. "आत्म्याचें पूर्ण समाधान होईल, ते पूर्ण सत्य व ज्याच्या योगाने आत्म्याच्या एकांगाचेंच पूर्ण समाधान होईल ते एकांगी सत्य" असें एक विधान 'नीतिशास्त्रप्रवेशा'मध्ये त्यांनी केलेले आहेच.[8] सत्याला अनेक पैलू असतात, त्याची प्रतीती प्रकृतिभिन्नतेनुसार काही अंशी का होईना, भिन्नभिन्नच राहाणार; हे ओळखूनच त्याप्रमाणे जीवनव्यवहार करणे योग्य, असें वामन मल्हार सुचवितात, सांगतात.

सत्याप्रमाणेच वामन मल्हार शिवत्वाचा, नीतीचा संबंधही शुद्धमनस्कतेशी जोडतात. नीतीचें बीज प्रेम हे आहे, असे त्यांनी म्हटलेले आहे. त्यांच्या 'नीतिशास्त्रप्रवेश' या ग्रंथात नीतीच्या विविध संकल्पनांचा ऊहापोह येतो. या ऊहापोहानंतरच त्यांनी 'नीतीचें बीज प्रेम' हा निष्कर्ष काढलेला आहे. नीतीचा उद्देश आत्मपरीक्षा करून योग्यायोग्य ठरविणे हा आहे. नीतीचा संबंध बाह्य

कर्मकांडांशी नसून तो अंतःशुद्धीशी आहे. नीती कोरडी असू नये; तीत कारुण्यबुद्धी हवी, असे वामन मल्हारांचे म्हणणे.

नैतिकता व रूढ धर्मविचार यांत वामन मल्हार फरक करतात. या संदर्भात जुन्या पारंपरिक नीतिविचारांवरोबरच ते परंपराविरोधी असे जे नीतिविचार 1930 नंतर रसेल–फ्रॉइड–प्रभृतींनी रूढ केले त्यांचाही विचार वामन मल्हारांनी प्रसंगोपात् केला आहे. 'विचार-विहार' या त्यांच्या पुस्तकातील "नवमतवादाविषयी माझे काही विचार" हा त्यांचा लेख या दृष्टीने महत्त्वाचा आहे. नीतिविषयक नव्या कल्पना कितीही क्रांतिकारक असल्या तरी वामन मल्हार त्यांमुळे विचकून जात नाहीत. त्यांचाही ते मनःपूर्वकतेने व प्रांजलपणे विचार करतात. त्यातील योग्यायोग्य ते पारखतात. सांप्रदायिक नीती व उच्चतर नीती असा भेद करून नव्या कल्पना जर उच्चतर नीतीला पोषक असतील, जीवनकल्याणाच्या दृष्टीने इष्ट असतील तर ते त्यांचा थेटपणे स्वीकार करतात. नवनीतिविषयक विचारात स्त्रीपुरुष नात्यासंबंधी जे नवविचार आहेत, त्यांचा योग्य तो आदर व स्वागत वामन मल्हारांनी केले आहे. या नात्यातील खऱ्या नीतीचे सूत्र पुन्हा 'सुशीलेचा देव' या कादंबरीत येते. स्त्रीपुरुष नात्यातील बाह्यतः असांकेतिक वाटणारे धागे खऱ्या नीतीच्या दृष्टीने कसे योग्य असतात, याची दखल त्यांनी आपल्या 'स्मृतिलहरी'तूनही घेतलेली आहे.

मात्र त्यांच्या या नवनीतिसमर्थनात मूर्तिभंजनासाठी मूर्तिभंजन असा पवित्रा नाही. परंपरेतील जे सुंदर, पवित्र किंवा उदात्त आहे, ते त्यांना स्वीकरणीय, आदरणीय वाटते. उदाहरणार्थ, विवाहसंस्था. या संस्थेतील प्रौढविवाह, पुनर्विवाह, प्रेमविवाह इत्यादी प्रकार त्यांना मान्य असले तरी या सर्वांत विवाहसंस्थेचे पावित्र्य जपले पाहिजे असे त्यांना मनःपूर्वक वाटते. 'आश्रमहरिणी'तील सुलोचनेचा दोन पतींशी होणारा संसार बाह्यतः कितीही विचित्र वाटला, तरी विशिष्ट परिस्थितीत तो पवित्र व कल्याणप्रद कसा ठरतो, हे स्पष्ट केले आहे. सामान्य परिस्थितीत वापरावयाचे नियम व अपवादात्मक परिस्थितीत वापरावयाचे नियम असा ते या बाबतीत फरक करतात. प्रसंगी नियमांचे उल्लंघन ते मान्य करतात. पण अकारण मोडतोडीला त्यांची मान्यता नाही. परंपरेच्या विचाराच्या दृष्टीने 'विवाहित स्त्रियांची कर्तव्ये' हा 'विचार-लहरी' तील लेख पाहाण्यासारखा आहे.

वामन मल्हारांना अभिप्रेत असलेल्या सौजन्याबाबत त्यांनी पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत, "सत्याप्रमाणेच सौजन्याचें परमतत्त्व आपणास हस्तगत झालेले नाही. ते देशकालपरिस्थितिसापेक्ष असते. देशकालाप्रमाणे त्याला निरनिराळा आकार व रंग येतो व ते निरनिराळ्या क्रियांच्या द्वारा व्यक्त होते. कधी रक्तस्राव करण्यात सौजन्य प्रतीत होते, तर कधी रक्तस्राव थांबविण्यात. सौजन्याची यामुळे निश्चित अशी एकच एक व्याख्या करता येत नाही. ते खऱ्या नीतीशी, प्रेमाशी संबंधित असते."[9]

वामन मल्हारांची सौंदर्यासंबंधीची भूमिका पाहताना ते स्वतंत्र सौंदर्यमूल्य मानीत नसल्याचें दिसते. सत्य हे जात्या सुंदर नसते, असें जरी काही संदर्भात ते म्हणत असले (उदा. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांचा त्यांनी केलेला विचार) आणि सौंदर्यकल्पनेत प्रमाणबद्धता, सौष्ठव इत्यादी घटकांचा अंतर्भाव ते करीत असले, तरी त्यांच्या सौंदर्यविचारात बाह्याकारापेक्षा आंतरिक शुचितेला महत्त्व आहे. म्हणूनच त्यांना वेश्यावृत्तीची सुंदर स्त्री तिरस्करणीय वाटते. आणि बाह्यतः असुंदर वाटणाऱ्या शीलवतीचें आंतरिक सौंदर्य मोह घालते. त्यांचा कला-नीतिविचारही याच दृष्टीने प्रगत झाला आहे.

वामन मल्हारांच्या तात्त्विक विचारांचा मागोवा घेताना प्राथमिक स्वरूपाच्या काही अडचणी उद्भवतात. त्यांनी आपली विचारसरणी मांडण्यासाठी एकसंध स्वरूपाचें लेखन –'नीतिशास्त्रप्रवेश' हा ग्रंथ वगळता–केलेले नाही. त्यांच्या कादंबऱ्यांतील विचारप्रकटन हे ललितग्रंथांचा भाग असल्याने त्यांचा फार स्वतंत्रपणे विचार करता येत नाही. त्यांचा 'सॉक्रेटिसाचें संवाद' हा ग्रंथ एकसंध असला तरी अनुवादात्मक आहे. त्यांचें थोरले बंधू महादेव मल्हार जोशी यांच्या 'आधुनिक सुशिक्षिताचा वेदान्त' या ग्रंथाच्या पुरवणीत त्यांनी मांडलेले विचार स्वतंत्र म्हणण्यापेक्षा प्रतिक्रियात्मक स्वरूपाचें आहेत. त्यांच्या विचारधनाचें स्वरूप पाहण्यासाठी 'विचार-विलास', 'विचार-सौंदर्य', 'विचारलहरी' या स्फुटलेखसंग्रहांचाच मुख्यतः आधार घ्यावा लागतो. या संग्रहांतील त्यांचें विचार प्रसंगाप्रसंगाने प्रकट झालेले असल्यामुळे कांही वेळा त्यात पाल्हाळ व पुनरुक्ती डोकावते. तथापि कोणताही जुनानवा विचार असला तरी प्रत्येक वेळी वामन मल्हार त्याचा मूलगामी पद्धतीने व उपलब्ध ताज्या ज्ञानाच्या प्रकाशात विचार करीत असल्यामुळे त्यात काही ना काही नवे आढळतेच. त्यांची विचाराकडे पाहण्याची दृष्टी वेदाभ्यासजड नसून रसिक क्रीडाकौतुकाची असल्यामुळे या विचारदर्शनात एक सौंदर्यही स्वाभाविकपणेच

अवतरते. वामन मल्हारांची चिकित्सावृत्ती इतरांप्रमाणे स्वतःलाही चिकित्सा-विषय बनविते हे विशेष. सॉक्रेटिस हा त्यांचा आवडता लेखक व 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' हा त्यांचा आवडता तत्त्वग्रंथ. तथापि या दोहोंकडे ते कौतुकादराने पण चिकित्साबुद्धीने पाहातात. या त्यांच्या चिकित्सावृत्तीतून लो. टिळकांचें 'गीतारहस्य'ही सुटलेले नाही. ते काही काळ लो. टिळकांच्या सहवासात आले असले, तरी वृत्तितः ते गोपाळ गणेश आगरकरांना जवळचें होते. महाराष्ट्रीय विचारवंतांत त्यांना स्वतःला आगरकर हेच विशेष जवळचें वाटतात. स्वतःला ते आगरकर संप्रदायाचें विवेकवादी म्हणवून घेत. सत्यनिष्ठा, तत्त्वजिज्ञासा, समाजचिंतन, बुद्धिप्रमाण्य, शुद्ध चारित्र्य इत्यादी बाबतीत उभयतांत खूपच साम्य आहे. तथापि आगरकरांच्या जीवनातील आचार-सामर्थ्य वामन मल्हारांजवळ नाही. वामन मल्हारांनी आचारापेक्षा उच्चारावरच स्वतःचें समाधान मानून घेतले. स्वतःच्या मर्यादांचा त्यांना कधीच विसर पडला नाही. 'विचार-सौंदर्य'मधील "मी व माझे टीकाकार" या लेखात ते स्वतःला क्रमवादी क्रांतिकारक म्हणवून घेतात.

वामन मल्हार हे स्वतंत्र तत्त्ववेत्ते नव्हेत; पण निःसंशयपणे ते तत्त्वविचारांचें श्रेष्ठ शिक्षक आहेत, यात शंका नाही. आदर्श शिक्षकाची सर्व गुणवत्ता त्यांच्या ठिकाणी एकवटली आहे. यामुळेच 'वामन मल्हारांनी महाराष्ट्राला विचार करायला शिकवले', असें जे म्हटले जाते, ते सार्थ वाटते. "माझ्या अनुभवांचें व विचारांचें सार" या 'विचार-लहरी'तील आपल्या लेखात वामन मल्हारांनी "ज्याने त्याने आपल्या प्रामाणिक समजुतींना धरून वागावे; इतरांच्या प्रामाणिक समजुतींबद्दल आदर बाळगावा," असें म्हटले आहे. त्यांचें स्वतःचें आचरण आयुष्यभर या सूत्राला धरूनच झाले. त्यांच्या वैचारिक साहित्याच्या वाचनाने तसें करण्यास व स्वतंत्रपणे सत्याचा धीट मागोवा घेण्यास महाराष्ट्राला त्यांनी उद्युक्त केले, हे त्यांचें विचार-क्षेत्रातील कार्य कधीही न विसरण्यासारखे आहे.

या प्रकरणाचा समारोप करताना वामन मल्हारविषयक एका आक्षेपाचाही थोडक्यात विचार करणे इष्ट ठरेल. वामन मल्हारांच्या वैचारिक क्षेत्राकडे पाहाण्याच्या अभिजात, निर्मळ वृत्तीचें कौतुक होऊनही त्यांना 'संशयात्मा' असें दीर्घकाल संबोधिले गेले. पक्षोपपक्षांच्या कडव्या युद्धपवित्र्याच्या काळात वामन मल्हार वावरत होते. पक्षभेद असावेत, पण पक्षद्वेष असू नये असें ते कितीही कंठरवाने सांगत असले तरी त्यांचें हे सांगणे त्या काळातील

मतामतांच्या गलबल्यास मानवण्यासारखे नव्हते. म्हणूनच या मंडळींनी प्रांजळ आत्मपरीक्षण न करता स्ववैगुण्याकडे दुर्लक्ष करून वामन मल्हारांकडेच आपला मोहरा वळविला आणि त्यांनाच संशयवादी ठरविण्याचा प्रयत्न केला. वास्तविक वामन मल्हार विचारांच्या आवर्तात गोंधळून गेलेले नव्हते. त्यांच्या विचारात सांप्रदायिकता नव्हती, हे खरे आहे. ती नसावीच असाच उलट त्यांचा आग्रह होता. विचार करण्याच्या पद्धतीबाबतही त्यांचा संभ्रम केव्हाच झाला नाही. लेखनाच्या आरंभापासून अखेरीपर्यंत त्यांच्या विचारप्रक्रियेत एक सूत्रबद्धता आहे. विचाराच्या सर्वांगीण कक्षा लक्षात घेऊन, त्यातील गुंतागुंत ध्यानी घेऊन निर्णय घ्यावा; कारण नसता कोणतेही निष्कर्ष घाईगर्दीने काढू नयेत, अशी वामन मल्हारांची दृष्टी होती, शिकवण होती. यासाठी त्यांच्यासारख्या प्रांजळ विचारवंताचे कौतुकच केले पाहिजे. संशयवादी ठरवून त्यांची विचार करण्याची दृष्टी दुर्लक्षिणे आत्मघातकीपणाचे ठरते.

वामन मल्हारांच्या या संशयवादाला दुसरीही एक बाजू आहे. प्रचलित ज्ञानाबद्दल शंका घेणे, त्या ज्ञानाच्या अनुषंगाने नवे प्रश्न उपस्थित करणे, त्या ज्ञानाच्या सुप्त वा प्रकट पैलूंचा अधिक ऊहापोह करणे, त्याची दुसरी बाजू पाहाणे, प्रचलित ज्ञानव्यूहातील विसंगती वा मर्यादा स्पष्ट करणे असाही 'संशयवादा'चा अर्थ होतो. या प्रकारची संशयवृत्ती (Questioning attitude) नवज्ञानाला प्रेरक आणि पोषकच ठरत आली आहे. ती नवज्ञानाची गंगोत्री ठरली आहे. नव्या काळातील तरुण विचारवंतांना वामन मल्हार त्यांच्या या वृत्तीमुळेच सर्वाधिक जवळचे वाटत आले आहेत; पुढेही वाटत राहातील. स्वतः वामन मल्हारांनी आपल्यावरील या आक्षेपाचे खंडन पुढील शब्दांत केले आहे :

"कोणत्याही विषयाच्या सर्व बाजूंचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याची व असा विचार करण्यास लावण्याची माझी वृत्ती आहे. तिचे महत्त्व अद्यापि पुष्कळ लोकांना कळलेलेच नाही. 'संशयात्मा विनश्यति' हे मला माहीत आहे. पुष्कळ वेळा निश्चयात्मक वृत्ती स्वीकारावी लागते व त्याप्रमाणे वागावे लागते, हेही मला समजते, इतकेच नव्हे, तर त्याप्रमाणे मी वागतोही. व इतरांस वागण्यास सांगतोही......पण असे काही नसता, अनिर्णित स्थितीच वाईट, सर्वांगीण विचार म्हणजे विकार, अनिश्चय म्हणजे अर्धवटपणा, अशा प्रकारची विचारसरणी स्वीकारून घाईने निश्चय करणे, हे मी पाप समजतो. काही गोष्टी अद्यापि अनिर्णित अवस्थेत आहेत. त्याबद्दल निर्णयात्मक मत

देण्याची जरूर नसता, भरभक्कम पुराव्याअभावी निर्णयात्मक मत ठोकून देणे मी पापस्वरूप समजतो."[10]

## संदर्भ

1. "ज्ञान हे विष की अमृत?" **विचार-विलास** (आ. 2 री), पुणे. पुणे येथील 'सारस्वत मंडळां'पुढे व मुंबई येथे एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये दिलेल्या व्याख्यानांच्या आधारे लिहिलेला लेख.
2. "नवमतवादाविषयी माझे स्फुट विचार," **विचार-विहार** (आ. 2 री), पुणे, 1954, पृ. 11.
3. "ध्येय हाच देव", **विचार-विहार,** पृ. 58–73.
4. **तत्रैव,** पृ. 67.

   येथेच लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे. 'सुशीलेचा देव' या कादंबरीतील चोविसाव्या प्रकरणात सुशीलेच्या तोंडून या अर्थाचे व्याख्यान आले आहे. 'आम्ही नास्तिक का तुम्ही नास्तिक?' या प्रश्नाला उत्तर देताना "विश्व-कुटुंबाचे ध्येय ठेवणारे, तत्प्रीत्यर्थ परिश्रम करणारेच खरे आस्तिक" असे म्हटले आहे
5. **तत्रैव,** पृ. 69.
6. 
7. **विचारसौंदर्य,** पृ. 69
8. **नीतिशास्त्रप्रवेश,** पृ. 275.
9. **विचारसौंदर्य** पृ. 72.
10. "मी व माझे टीकाकार", **विचारसौंदर्य.**

# प्रकरण तिसरे
# कादंबरीलेखन

एक विचारवंत किंवा तत्त्वज्ञ म्हणून जशी वामन मल्हारांची ख्याती आहे तशीच ती मराठीतील एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणूनही आहे. हरि नारायण आपटे यांच्यानंतरचे ते मराठीतील एक लक्षणीय कादंबरीकार होत. हरि नारायणांच्या पाठोपाठ येणारे युग हे 'रागिणी'कर्त्या वामन मल्हार जोशींच्या नावानेच ओळखले जाते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी वामन मल्हारांना मराठीतील 'तात्त्विक कादंबरीचे जनक' मानले आहे. कारण तत्त्वचर्चात्मक कादंबऱ्यांची सुरुवात वामन मल्हारांपासूनच झालेली आहे.

वामन मल्हारांपूर्वीच हरि नारायण आपटे यांनी मराठी कादंबरीला वाङ्मयप्रकार म्हणून एक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. "कादंबरीच्या निर्मितीच्या उत्कट इच्छा हरिभाऊंच्या मनात वास करीत असल्यामुळे पाश्चात्य कादंबऱ्या वाचून कादंबरीचे कादंबरीत्व कशात असते ते शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला" आणि त्यात ते यशस्वीही झाले.[1] जे अभिव्यक्त करावयाचे ते सुरूपतेने अभिव्यक्त करण्यात हरिभाऊंमधील कलावंत जागरूक होता. मराठी कादंबरीच्या ऐन वयात येण्याच्या काळात हरिभाऊंनी तिला आशय-अभिव्यक्तीच्या दृष्टीने रूपवान बनविले. त्यांनी जीवनवास्तवावर भर देणारी कादंबरी लिहिली आणि मराठी कादंबरीतले 'हरिभाऊ युग' सुरू झाले.

परंतु वामन मल्हार या 'हरिभाऊ युगा'च्या छत्राखाली गेले नाहीत. हरिभाऊंनी सिद्ध केलेले मराठी कादंबरीचे रूप न स्वीकारता वामन मल्हारांनी आपल्या कादंबरीलेखनात 'स्व'–तंत्र अवलंबिले. वामन मल्हारांच्या तत्त्वजिज्ञासू व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्यांची वाङ्मयविषयक धारणाही याला काही प्रमाणात कारणीभूत आहेसे दिसते. "असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणे व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचे संस्थापन करणे." हे वामन मल्हारांना लेखकाचे 'अवतारकृत्य' वाटते.[2] "ज्या कलावंताला काहीएक

सांगावयाचे नाही, ज्याच्याजवळ सांगण्यासारखे काही नाही, त्याची कला लहान मुलाच्या रबरी फुग्यासारखी दिसण्यास सुंदर पण अगदी पोकळ असेल." असा वामन मल्हार दृष्टिकोण बाळगतात.[3] एवढेच नव्हे, तर "वाङ्मयात्मक कलेचा ज्ञानाशी आणि नीतीशी अत्यंत निकट, गुंतागुंतीचा व जिव्हाळ्याचा संबंध आहे", असेही ते निश्चयाने सांगतात.[4] अशा रीतीने 'जगातील दुःखाची कहाणी' समाप्त करणे आणि 'दैवी संपत्ती'चे जगात साम्राज्य निर्माण करणे अशांसारखी वाङ्मयाची ध्येये वामन मल्हार मानतात. ते साहित्यकलेचे महत्त्व निःसंशय जाणतात, पण त्याचबरोबर "जीवन हे केवळ कलात्मक नाही", तर "जीवनात ज्या अत्यंत रम्य आणि वंद्य गोष्टी आहेत, त्यांत कलेबरोबरच नीतीचा आणि सत्याचाही समावेश होतो." अशीही त्यांची धारणा आहे. अशा रीतीने वामन मल्हारांची कादंबरी–लेखनामागील भूमिका ही हरि नारायणांप्रमाणे केवळ जीवनवास्तवावर भर देणारी नाही, तर उच्च जीवनादर्शाची निर्मिती करण्याची, त्यांची चिकित्सा करण्याची आहे.

ज्ञान आणि रंजन ही कादंबरीची दोन वैशिष्ट्ये मराठी कादंबरीच्या जन्मापासूनच मान्यता पावलेली होती; परंतु वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांमध्ये याहूनही अधिक काही आहे. त्यांच्या कादंबऱ्यांत आकर्षकपणा आहे; पण त्याला मनोरंजन असे उथळ नाव देता येणार नाही. त्यांच्या कादंबऱ्यांच्या वाचनाने म्हटले तर ज्ञानप्राप्ती होतेही. पण ही ज्ञानप्राप्ती त्यांच्या पूर्वीच्या किंवा समकालीन मराठी कादंबरीत जशी उपदेशप्रचुरतेतून किंवा आदेशात्मकतेतून येते, तशा स्वरूपाची नाही. ती त्यांच्या कादंबरीच्या अंगभूत चिंतनपरतेतून होते. या चिंतनपरतेतून विचाराला प्राप्त होणारे निरनिराळे पैलू, दिशा, कोन स्पष्ट करून वाचकाला अंतर्मुख करणे, हे वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी त्यांनी गुंतागुंतीच्या तात्त्विक विचारांचा ललित पद्धतीने अनेकांगी परामर्श आपल्या कादंबऱ्यांतून सातत्याने घेतला. यासाठी त्यांनी तंत्राचे नवनवीन प्रयोग केले, नवनवीन युक्त्याप्रयुक्त्यांचा वापर केला. यातूनच त्यांनी हरिभाऊकालीन कादंबरीचे रचनातंत्र बदलले. यामुळे ते स्वाभाविकपणे एक प्रयोगशील कादंबरीकार म्हणून मान्यता पावले.

वामन मल्हारांच्या कादंबरीक्षेत्रातील गौरवाचा हा आलेख मांडत असताना सुरुवातीलाच याची दुसरी बाजूही विचारात घेतली पाहिजे. वामन मल्हारांना वर निर्देशित केल्याप्रमाणे युगप्रवर्तक कादंबरीकार ठरविणारा जसा एक वर्ग आहे, तसाच वा. म. जोशी हे कादंबरीकार नव्हेतच; कादंबरीलेखकाला

लागणारी गुणवत्ता त्यांच्याकडे कधीच नव्हती, त्यांची कादंबरीरचना ढिसाळ असते, वर्णने स्थूल व धोपटमार्गी असतात, तपशील सदोष असतात, त्यांची पात्रे हाडामासांची न वाटता ती केवळ वामन मल्हारांच्या विचारांचें प्रतिनिधित्व करणारी असतात, असे आक्षेप घेणाराही एक वर्ग आहे. एक कादंबरीकार म्हणून वामन मल्हारांविषयी होणाऱ्या या मतभेदांचें मूळ अर्थातच कादंबरीविषयक संकल्पनेतील मतभेदांत आहे. कादंबरीच्या बाह्य सौष्ठवावर भर देणाऱ्यांना वामन मल्हारांचें कादंबरीलेखन फारसे आवडत नाही; उलट कादंबरीच्या अंतःसौंदर्याच्या दृष्टीने विचार करणाऱ्यांना वामन मल्हारांच्या कादंबऱ्या विलक्षण साभिप्राय वाटतात. आपल्या कादंबरीलेखनातील बाह्य दोषांची खुद्द वामन मल्हारांनाही जाणीव होती. "माझ्या कादंबऱ्यांत प्रमाणबद्धतेचा थोडा अभाव आणि तंत्रदृष्टचा इतर दोष राहिलेले आहेत. . . मला पोषाखाचं, चेहऱ्याचं, हस्तहापादी अवयवव्यापारांचं वर्णन साधत नाही." अशी त्यांनी स्वतःच कबुली दिली आहे.[6] मात्र अशी कबुली दिल्यावर त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतील आंतरसौंदर्याकडेही लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. 'आपलं लक्ष बाह्य पोषाखादी गोष्टींपेक्षा आंतरव्यापाराकडे अधिक आहे आणि या व्यापाराची गुंतागुंत स्पष्ट करण्याच्या दृष्टीने बाह्य वर्णनांची गरज नसते', असेही त्यांनी म्हटले आहे.

आपली कादंबरी प्रचलित कादंबरीहून अशा रीतीने वेगळ्या स्वरूपाची आहे याची जाण असल्यामुळेच बहुधा त्यांनी आपल्या 'रागिणी' या पहिल्याच कादंबरीला 'काव्यशास्त्रविनोद' ( हे त्या कादंबरीचे उपशीर्षक) असेही म्हटले आहे. केवळ 'रागिणी'च नव्हे तर त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांत या काव्यशास्त्रविनोदाला अग्रस्थान आहे. किंबहुना असेही म्हणता येईल. की, काव्यशास्त्रविनोदाला मनसोक्त अवसर मिळावा म्हणूनच त्यांनी कल्पित कथांचे निमित्त करून आपले कादंबरीलेखन केले आहे. वामन मल्हारांच्या कादंबरीलेखनाचे मूल्यमापन करताना कादंबरीलेखनविषयक त्यांची ही भूमिका आणि या प्रकरणाच्या सुरुवातीला निर्दिष्ट केलेली त्यांची ललित वाङ्मय-विषयक दृष्टी विचारात घ्यायला हवी. वामन मल्हारकालीन वाङ्मयसंस्कृतीचा, तत्कालीन सुशिक्षित वाचकांच्या अभिरुचीचा, त्यांच्या कादंबरीवाङ्मयविषयक धारणांचा विचारही असे मूल्यमापन करताना करायला हवा. वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतील पात्रे सुसंस्कृत, उच्चविद्याविभूषित व तत्त्वजिज्ञासू वृत्तीची असतात; यामुळे वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतील तत्त्वचर्चा उपरी

न ठरता तिच्या कलाकृतीचा अंगभूत भाग ठरते हेही ध्यानात ठेवावयास हवे.

वामन मल्हारांनी आपल्यापुरता जो वाचकवर्ग गृहित धरला होता तो तत्कालीन सुशिक्षित, विदग्ध, विचारप्रेमी असा वाचकवर्ग होता. नवशिक्षण व नवसंस्कार यांना हा वाचकवर्ग सामोरा गेला होता. त्याने जुन्याबरोबर नव्याचाही स्वीकार केला होता. स्त्रीशिक्षण, व्यक्तिस्वातंत्र्य, भारतीय अध्यात्म, पाश्चात्य इहवाद, राजकारण–समाजकारणातील विविध प्रवृत्ती व मतप्रवाह, धर्माचें जीवनातील स्थान इत्यादी विचारविषय हे या वाचकवर्गाच्या आस्थेचें विषय होते. या विषयांची विविध अंगे उलगडून पाहाण्यास हा वाचकवर्ग उत्सुक होता.

स्वतःसमोर असा उच्चविद्याविभूषित, विदग्ध, तत्त्वचर्चाप्रवण वाचकवर्ग ठेवल्याचा परिणाम वामन मल्हारांच्या कादंबरीलेखनावर स्वाभाविकपणेच झालेला आहे. यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांतील बहुतेक पात्रे जीवनाच्या श्रेयप्रेयाच्या प्रश्नांनी व्याप्त झालेली आहेत. या पात्रांच्या चर्चाविषयांमुळे वामन मल्हारांच्या कादंबरीला विशिष्ट घाट प्राप्त होतो, गती प्राप्त होते. या चर्चाविषयांमुळेच पुन्हा त्या त्या पात्रांच्या स्वभावांचे, वृत्तिप्रवृत्तींचें दर्शन घडते, त्यांच्या आपसांतल्या संबंधात नाट्य निर्माण होते. त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख व्यक्तिरेखा सुजाण, सुसंस्कृत, विचारप्रवण व सौजन्यपूर्ण प्रकृतीच्या असतात. या साऱ्यांचा परिणाम म्हणून कादंबरीतील वातावरण प्रगल्भ, प्रांजळ नि विश्रब्ध बनते. प्रगाढ तत्त्वचिंतनाबरोबरच चातुर्यपूर्ण कोटिक्रम, नर्म विनोद, प्रसन्न संवाद, खेळकर वादविवाद इत्यादींचें त्यांच्या कादंबऱ्यांतील अस्तित्व याचेच द्योतक आहे. यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये तत्त्वचर्चेचा कोरडेपणा जाऊन तत्त्वचिंतनाची मनोज्ञता येते.

वामन मल्हारांच्या काळातील कादंबरीचा विचार करता असें दृष्टोत्पत्तीस येते की, तत्कालीन कादंबरीला तत्त्वचर्चा वावडी नव्हती; उलट कादंबरीद्वारा तत्त्वचर्चेला उद्युक्त होणे, ही गोष्ट तत्कालीन कादंबरीव्यवहारात मान्यता पावली होती, काहीशी प्रतिष्ठितही झाली होती. हरिभाऊंच्या 'गणपतराव', 'मी', 'यशवंतराव खरे' या कादंबऱ्यांमधून किंवा श्री. कृ. कोल्हटकरांच्या 'दुटप्पी की दुहेरी' व 'श्यामसुंदर' या कादंबऱ्यांतून याचाच प्रत्यय येतो. वामन मल्हारांचें समकालीन म्हणवता येतील असें डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या कादंबऱ्यांत तर चर्चाप्रसंगांची रेलचेलच असते. असें असतानाही वामन

मल्हारांनाच तत्त्वचर्चात्मक कादंबरीच्या जनकत्वाचा मान का दिला जातो? याचें उत्तर वामन मल्हारांची तत्त्वचर्चात्मक कादंबरी आणि इतरांची तत्त्वचर्चात्मक कादंबरी यांच्या पातळ्यांतील फरकात आहे. इतर लेखकांच्या चर्चा वाचकाला एका विशिष्ट दिशेने घेऊन जाऊ इच्छितात, तर वामन मल्हारांची चर्चा वाचकांवर काही लादण्यापेक्षा त्यांना अंतर्मुख करणारी, विचारांच्या विविध बाजू स्पष्ट करणारी असते. ती हेतुप्रधान वा बोधप्रवण नसते. प्रबोधनापेक्षा उद्‌बोधनाकडे तिचा कल असतो. तिच्यातून अनेक प्रश्नोपप्रश्नांची तार छेडली जाते. एक प्रकारे वामन मल्हारांची कादंबरी म्हणजे प्रश्नोपनिषदेच ठरतात.

प्रश्नात्मक तत्त्वचिंतन आणि कथापरता यांची युती ही भारतीय मनाला काही नवी नाही. भारतीय पुराणग्रंथांतून, आख्यानोपाख्यानांतून याची रेलचेल आढळते. जीवनात निर्माण होणारे विविध पेचप्रसंग, येणारी किंकर्तव्यमूढता, श्रेयप्रेमाचा विचार गुरुशिष्यसंवादांतून मांडला–उलगडला जाण्याची परंपरा फार जुनी आहे. तेथे स्थकालादींच्या वास्तवापेक्षा प्रश्नांच्या तत्त्वगर्भतेला, अनादित्वाला महत्त्व असते. हा पुराणांचा ढाचाच वामन मल्हारांनी आधुनिक लेखनतंत्रात वसविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा 'आश्रमहरिणी' या कादंबरीचा सगळा घाट पुराणपोथीचा आहे. 'रागिणी'मधूनही पुराणकृतीचा प्रत्यय येतो. कारण पुराणग्रंथांतील आदर्शतात्मकता व प्रश्नोपप्रश्न 'रागिणी'त आढळतात. शिवाय 'रागिणी'चा उत्तरार्ध हिमालयवर्णन, प्रियव्रह्मस्वामींचा आश्रम इ. पुराणकथेत शोभाव्यात अशा घटनांनी भरलेला आहे. स्वप्ने, आभास, साक्षात्कार, सुभाषिते, योगायोग इत्यादी घटकही पौराणिक आकृतिबंधाच्या जवळचेच होत. वामन मल्हारांनी आपल्या कादंबरीलेखनासाठी आरंभकालात पत्करलेला हा साचा असा पुराणग्रंथरचनेला जवळचा असला तरी त्यांच्या कादंबरीतला आशय मात्र अत्याधुनिक आहे. एखाद्या पुराणपोथीच्या स्वरूपात येणारी 'आश्रमहरिणी' ही त्यांची कादंबरी सच्छील स्त्री एकाच वेळी दोन पतींशी विधियुक्त संसार करू शकेल किंवा नाही, या प्रश्नाने परिवेष्टित झालेली आहे. 1916 त लिहिलेल्या या कादंबरीतील आशय आजच्या स्त्रीमुक्ती–चळवळीच्या काळातही प्रक्षोभक ठरणारा आहे. पण वामन मल्हार हा प्रक्षोभ पचवू शकले, एवढेच नव्हे, तर तर तो रुचिर करू शकले. याचें श्रेय त्यांच्या विषयाच्या विशिष्ट मांडणीत, गुंफणात सापडते.

वामन मल्हार हे निःसंशयपणे मराठीतील एक प्रयोगशील

कादंबरीकार होत. त्यांना आपल्या कादंबरीमधून विशिष्ट प्रकारचा आशय मांडावयाचा असल्यामुळे कादंबरीलेखनाच्या बाबतीत काही नवी उपक्रमशीलता, अपरिहार्यपणे दाखवावी लागली आहे. कारण शैलीचा प्रमुख गुण आशयाचे प्रभावी अनुसरण हा मानला जातो. वामन मल्हारांच्या कादंबऱ्या पाहाता असे दिसते की, त्यांची शैली काळाप्रमाणे व आशयाप्रमाणे स्वाभाविक स्वरूपात बदलत गेली आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील आशय बदलता राहिल्याने शैलीही स्वाभाविकपणे बदलती झालेली आहे. 'रागिणी'तील काव्यशास्त्रविनोदात्मकता, 'आश्रमहरिणी'चा पौराणिक घाट, 'सुशीलेचा देव' मधील आत्मनिवेदनात्मक तंत्राचा केलेला वैविध्यपूर्ण उपयोग आणि 'इंदू काळे...'ची पत्रात्मकता या दृष्टीने लक्षणीय आहे. वामन मल्हारांची शैली कालदृष्ट्या कशी बदलत गेली हे पाहण्यासाठी त्यांची आरंभीची कादंबरी 'रागिणी' व अखेरीची 'इंदू काळे....' यांच्यावर एक सहज तौलनिक नजर टाकावी. 'रागिणी'चा घाट एखाद्या महाकाव्यासारखा दीर्घ आहे, तर 'इंदू काळे.....' चा कमालीचा आटोपशीर आहे.

आत्मकथनपरता हा वामन मल्हारांच्या शैलीचा एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणता येईल. ('स्मृतिलहरी' तही याचा प्रत्यय येतो) 'आश्रमहरिणी' ही धौम्याची आत्मकथाच आहे. 'इंदू काळे....' मधील पत्रे ही त्या त्या व्यक्तींची इंदू, सरला, विनायकराव इत्यादींची विशिष्ट क्षणीची आत्मकथनेच नव्हेत काय ? 'रागिणी'मध्येही अनेक पात्रे दीर्घ आत्मकथने करताना आढळतात. 'सुशीलेचा देव' ही कादंबरी म्हणजे सुशीलेचे आत्मचरित्रच होय, असाही आभास वामन मल्हारांनी हेतुतः निर्माण केलेला आहे. वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांमधून आत्मकथनपर निवेदनपद्धतीचा विविध प्रकारे वापर केल्याचे दिसते. कारण अशा आत्मकथनपद्धतीमुळे निवेदनाला, प्रतीतिगोचरता, आत्मनिष्ठा, प्रांजळपणा, अनौपचारिकता, जिव्हाळा, संवादशीलता, निकटता इत्यादी आवश्यक गुणविशेष स्वाभाविकपणेच लाभतात आणि याच गुणविशेषयुक्त निवेदनांची त्यांना गरज भासत होती. कारण त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून मुख्यतः विचारात्मकतेवर भर दिलेला आहे आणि विचार हा मूलतःच अमूर्त (abstract) असतो. अमूर्तामुळे त्यात येणारा दाठरपणा आत्मकथनपरतेमुळे कमी होऊन, तो रसार्द्र होण्यास साहाय्य होते. त्यांच्या या विशिष्ट प्रांजळ आत्मकथनपर, खेळकर शैलीमुळेच त्यांचे तत्त्वगंभीर विचार दाठर विचारात्म पातळीवर न राहाता ते ललितरम्य रूप धारण करतात. "इंदू काळे..."ची

शैली पत्रात्मक नसती, तर तिला आजचे सौष्ठव प्राप्त झाले नसते. 'आश्रमहरिणी'तील क्रांतिकारक आशय धक्कादायक न ठरता रोचक ठरतो तो वामनरावांनी त्या कादंबरीकरिता स्वीकारलेल्या शैलीमुळेच. या शैली-सौष्ठवाच्या अभावीच त्यांची 'नलिनी' ही कादंबरी अयशस्वी ठरली आहे.

'सुशीलेचा देव' या कादंबरीतील बाल-सुशीलेचे चित्रण करताना जरी वामन मल्हारांनी कादंबरीतील सांकेतिक वर्णनांची चेष्टा केलेली असली तरी त्यांच्या कादंबरीलेखनात काही वेळा जुने संकेत डोकावतात. उदाहरणार्थ, त्यांच्या कादंबऱ्यांतील खलनायकांचे ('रागिणी'तले जनूभाऊ चकणे किंवा 'इंदु काळे.....'तले विदुमाधव) चित्रण, किंवा त्यांच्या कादंबऱ्यांत वारंवार डोकावणारे अपघाती मृत्यू, दरवडेखोर, आत्महत्या, विषप्रयोग, पिस्तुले, जाखिणी, कटाह इ. खरे तर वामन मल्हारांना सांकेतिकतेचा तिटकारा होता. तो त्यांच्या विचारसरणीतून तर प्रकट होतोच, पण, त्याचे प्रत्यंतर त्यांच्या कादंबरीलेखनशैलीतूनही येते. आपल्या लेखनशैलीच्या वेगळेपणाचे भान त्यांना अवश्य होते. ते त्यांनी उल्हासाने जपलेही होते. मात्र त्यांच्या शैलीचे वेगळेपण किंवा प्रयोगशीलता केवळ बाह्य-स्वरूपाच्या नावीन्यवेडातून जन्माला आलेली नाही, हे मुद्दाम लक्षात घ्यायला हवे. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे हा वेगळेपणा व ही प्रयोगशीलता ते जो आशय मांडू पाहात होते, त्याच्या आंतरिक गरजेतून निर्माण झालेली आहे. प्रयोगाकरिता प्रयोग किंवा हौसे-खातर नावीन्य असे त्यांच्या शैलीचे रूप नाही. तिच्यात एक अभिजातता व स्वाभाविकता आढळते.

आपल्या कादंबऱ्यांसाठी वामन मल्हारांनी स्वीकारलेल्या विशिष्ट रचनाबंधांमुळे कादंबरीतील विचारमंथनांतील दाटरता कमी होते, गंभीर विचार ललितमधुर होतो आणि लालित्यावर विचारगांभीर्याची कांती चढते. 'रागिणी'सारख्या आपल्या कादंबरीला वामन मल्हार 'काव्यशास्त्रविनोद' असे जे संबोधतात, ते समजून घेता येते. त्यांच्या लेखी काव्य म्हणजे भावमधुरता, शास्त्र म्हणजे तत्त्वप्रचुरता आणि विनोद म्हणजे उल्हसित क्रीडा-वृत्ती अशीच समीकरणे आहेत. या तिन्ही घटकांचा स्वाभाविक असा हृद्य मेळ वामन मल्हारांच्या सर्व कादंबऱ्यांत ('नलिनी' चा अपवाद) बसला आहे. त्यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांना वेदाभ्यासजड तत्त्वचर्चेचे स्वरूप येत नाही; उलट त्यात आवश्यक त्या प्रमाणातला खेळकरपणा, खोडकरपणा व मिष्किल-पणाही डोकावतो. ते रूढार्थाने विनोदी लेखक नव्हते, पण त्यांना श्रेष्ठ

दर्जाच्या विनोदबुद्धीचें देणे लाभलेले होते. त्यांच्या विनोदवृत्तीमुळे त्यांच्या लेखनशैलीत नेहमीच एक तजेलदारपणा, टवटवी आढळते.

वामन मल्हारांची कादंबरीलेखनाची एकूण कारकीर्द 1915 ते 1935 अशी वीस वर्षांची आहे. त्यांनी 'रागिणी' (1915), 'आश्रमहरिणी' (1916), 'नलिनी' (1920), 'सुशीलेचा देव' (1930) व 'इंदू काळे व सरला भोळे' (1934) अशा एकूण पाच कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. यांतील 'नलिनी' वगळता सर्वच कादंबऱ्या प्रथम नियतकालिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाल्या व नंतर पुस्तकरूपाने बाहेर आल्या. 'रागिणी' 1914 पासूनच त्याकाळी प्रतिष्ठित असलेल्या 'मासिक मनोरंजन' मधून क्रमशः प्रसिद्ध होत होती. ती तशी क्रमशः येत असतानाच तिच्यावर वाचकांच्या उड्या पडत होत्या. या पहिल्याच कादंबरीने वामनरावांना कादंबरीक्षेत्रात अढळपद मिळवून दिले. त्यांचा उल्लेखच या काळात (आणि नंतरही) 'रागिणी'कर्ते वा. म. जोशी असा केला जाऊ लागला. 'रागिणी'पाठोपाठच त्यांची 'आश्रमहरिणी' ही कादंबरीदेखील 'मराठा मित्र' या नियतकालिकातून क्रमशः अवतरली. वामन मल्हारांच्या पाचांपैकी चार कादंबऱ्या अशा रीतीने हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध होण्याच्या प्रकारामुळेही त्यांच्या लेखनपद्धतीवर थोडाफार परिणाम झाल्याचे जाणवते. 'रागिणी'त हा परिणाम सर्वाधिक दिसतो. रचनातंत्राच्या दृष्टीने ही कादंबरी सदोष आहे; तथापि तिच्या अंतःसौंदर्याची मोहिनी तत्कालीन वाचकांवर खूपच पडली होती. या वाचकांत सर्वसामान्य वाचकांबरोबरच श्रीपाद कृष्णांसारखे साहित्याचार्यही आहेत. 'रागिणी'च्या या यशाचे रहस्य तिच्यातील रसस्निग्ध पात्रदर्शनात, मोहक वातावरणात व सर्वस्पर्शी नवविचारदर्शनात आहे. या कादंबरीचा एकंदर काल व आटोप लक्षात घेता तिला कादंबरी म्हणण्यापेक्षा बृहत्कादंबरीच म्हणणे अधिक युक्त ठरेल. कादंबरीला पुष्कळदा गद्यरूप महाकाव्य (Epic in prose) म्हटले जाते. या संबोधनाला पात्र ठरेल असाच 'रागिणी'चा एकंदर घाट आहे. या कादंबरीची विभागणी वामन मल्हारांनी तीन खंडांत केलेली असून प्रत्येक खंडात सुमारे 25 प्रकरणे आहेत. कादंबरीतील एकूण प्रकरणांची संख्या खूपच वाटते. या कादंबरीचा बाह्याकार काहीसा अस्ताव्यस्त आहे. हिच्यातील पात्रप्रसंगांचा तसेच स्थलकालांचा पैसही मोठा आहे. कथानकात उपकथानकाचा प्रवेश होतो. शिवाय सुभाषिते, चर्चा, स्वप्ने, आभास, साक्षात्कार, निसर्गवर्णने, हिमालयदर्शन, ऋषींचे आश्रम, रानटी टोळ्या इत्यादी स्वरूपाचा पसाराही मोठ्या प्रमाणावर

आहे. असे असले तरी तिच्या संकल्पनेत, आंतरिक रचनेत, पात्रदर्शनात, विचारदिशेत एक संगति-सूत्र आहे. या कादंबरीतील प्रकरणांची 'नगाधिराज हिमालय', 'रम्य औदासीन्य', 'सन्मित्राचा सत्कलह' 'दैवाचा घाला' यांसारखी नावे जरी सांकेतिकतेचा प्रत्यय देणारी असली तरी या कादंबरीचा आशय आणि तिच्यातील स्वभावदर्शन आधुनिक महाराष्ट्रातील वैचारिक आंदोलनांची तदनुषंगिक स्थितिगतींची निदर्शक आहे. कवच जुनाट पण गाभा आधुनिक अशी या कादंबरीची रचना झालेली आहे.

'रागिणी'तील पुरुषपात्रांपेक्षा स्त्रीपात्रे विशेष लक्षणीय आहेत. नवशिक्षित स्त्रीच्या मनाचा मागोवा वामन मल्हारांनी ज्या असोशीने घेतला, ती असोशी इतर मराठी कादंबऱ्यांत (डॉ. केतकरांचा अपवाद वगळता) आढळत नाही. 'हिंदू सेफरेजेट' हे 'रागिणी'मधील पहिलेच प्रकरण पाहाण्यासारखे आहे. कादंबरीच्या आरंभीच 'The old order changeth giving plaee to new' ही टेनिसनची काव्यपंक्ती येते. या पंक्तीवरून ही कादंबरी जीवनातील गतिशीलतेवर बोट ठेवणारी असल्याची जाणीव होते. या कादंबरीतील प्रमुख पात्रे—स्त्री व पुरुषपात्रे —सहृदय, विचारशील वृत्तीची, प्रगल्भ मनाची, तत्त्वजिज्ञासू अशी आहेत. नानासाहेब, भाऊसाहेब, शास्त्रीबोवा ही जुन्या पिढीची किंवा भैय्यासाहेब, आनंदराव ही नव्या पिढीची पात्रे एका उच्च बौद्धिक वातावरणात रमणारी आहेत. उत्तरा व रागिणी या तरुणींच्या मनातही या नव्या वृत्तीचा, नव्या जीवनार्थाचा प्रादुर्भाव झालेला आहे. वामन मल्हारपूर्व कादंबरीतील स्त्री सामान्यतः घरगुती वातावरणात वावरणारी, इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारापासून अलिप्त असलेली, पुरुषांशी धीटपणे चर्चा न करू शकणारी अशी होती. 'रागिणी' या कादंबरीत प्रथमच 'नव्या स्त्रीचे' दर्शन घडते. या कादंबरीतील तरुण स्त्रिया पुरुषांबरोबर सहलीला जाणाऱ्या, पुरुषांशी खेळीमेळीने बौद्धिक वाद करणाऱ्या, क्वचित त्यांना वादविवादात नामोहरमही करणाऱ्या, प्रगल्भ वृत्तीच्या, काहीशा धीट व बऱ्याचशा मनमोकळ्या अशा आहेत.

उत्तरा व रागिणी ही 'रागिणी' या कादंबरींतील दोन प्रमुख स्त्रीपात्रे. त्यांच्या एकंदर जीवनावर ही कादंबरी आधारलेली आहे. या दोघींचे स्वभाव वाह्यतः भिन्न असले तरी दोघींकडेही एक प्रगल्भ विकसित मन आहे. "शिक्षणाने सुसंस्कृत व स्वतंत्र विचाराच्या झालेल्या दोन मुली व त्यांच्या-

भोवती गुंफले जाणारे दोन तऱ्हेचे कौटुंबिक जीवन हा या कादंबरीतील मुख्य प्रवाह आहे.[7] तत्कालीन सुशिक्षित वाचकवर्गाने 'रागिणी' व 'रागिणी'कर्ते वामन मल्हार यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन ठेवले होते. "प्रत्येक रसिक या कादंबरीचा रसास्वाद घेतल्यानंतर 'रागिणी'ची संगती गंगेसारखी, साधुसंगतीसारखी, कविसंगतीसारखी मला पावन वाटते' असे उद्‌गार काढील" अशा शब्दांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी या कादंबरीचा गौरव केलेला आहे.[8]

'आश्रमहरिणी' ही 'रागिणी'च्या पाठोपाठ जन्माला आलेली वामन मल्हारांची दुसरी कादंबरी. पण या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये रचनातंत्र व. बाह्याकार या दोन्ही बाबतींत फारच फरक आहे. 'आश्रमहरिणी'ची रचना अत्यंत आटोपशीर आणि विलक्षण रेखीव आहे. ही एक आपल्याला सापडलेली पोथी आहे, हा विभ्रमयुक्त आभास किंवा चकवा वामन मल्हारांनी आरंभापासून शेवटपर्यंत कौशल्याने खेळविलेला आहे. या कादंबरीतील व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली एखाद्या पुराणपोथीला शोभेल अशीच ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी केलेला आहे. या कादंबरीचे आवरण प्राचीन असले तरी आशय विलक्षण नवा, प्रक्षोभक असल्याचा उल्लेख यापूर्वी आलेला आहेच. पुराणकालाच्या आभासामुळे हा नवा धक्कादायक आशय वामन मल्हार आपल्या वाचकांच्या पचनी पाडू शकले, हे महत्त्वाचे आहे.

'आश्रमहरिणी' मधील सुलोचनेच्या संदर्भात द्विपतिकत्वाचा प्रश्न उपस्थित होतो. द्विपतिकत्वाचा सूचक पुरस्कार करणारी कादंबरी लिहून वामन मल्हारांनी एक क्रांतिकारी विचार आपल्या वाचकांच्या मनात नेऊन सोडला. "विवाहविषयक स्त्रीधर्म काय?" किंवा 'स्त्री ही ईश्वराने पुरुषाच्या सुखाकरिता निर्माण केली आहे काय?' 'तिच्या आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व नाही का?' यांसारखे मूलगामी प्रश्न या कादंबरीद्वारे वामन मल्हार वाचकांच्या चिंतनासाठी उपस्थित करतात.

'आश्रमहरिणी'च्या पहिल्या आवृत्तीत गभस्तिगती व सुलोचना यांचा सर्पदंशामुळे मृत्यू होतो असे दाखवून सुलोचनेच्या द्विपतिकत्वाचा प्रश्न टाळला होता; परंतु पुढील आवृत्तीत वामन मल्हारांनी धीटपणे ही मृत्यूची घटना काढून टाकली आणि सुलोचनेबरोबर धौम्य आणि गभस्तिगती हे तिचे दोन्ही पती शांतपणे, आनंदाने आपले राहिलेले आयुष्य क्रमून आत्मोन्नती साधतात, असे दाखविले आहे. प्रथमावृत्तीत आपल्याला हे धैर्य झाले नव्हते

अशी स्पष्ट कबुली वामन मल्हारांनी दिली आहे. ही कबुली त्यांच्या प्रांजळपणावर प्रकाश टाकणारीच आहे.

'आश्रमहरिणी'च्या मनोज्ञतेबाबत कुसुमावती देशपांडे लिहितात, "पूर्ण विकसित कथानक, स्वभावचित्रण व कथेशी एकजीव झालेले, कथेच्या प्रकृतीने निर्मिले गेलेले वातावरण या तंत्रविषयक अंगांच्या दृष्टीने पाहिले तर ती एक स्वयंपूर्ण व यशस्वी कादंबरी आहे. आश्रमाचें वातावरण निर्माण करण्यात, धौम्य, गभस्तिगती आदिकरून बालगोपालांच्या लीलांचें वर्णन करण्यात, वाढत्या वयाचें त्यांचें प्रश्नोपप्रश्न सहृदयतेने मांडण्यात वामन मल्हारांचें चित्त रंगून जाते. या कार्यासाठी ते वेगळीच शब्दकळा वापरतात; वेगळ्या प्रतिमासृष्टीचा व वाणीच्या अलंकारांचा अवलंब करतात व प्रारंभापासून अखेरपर्यंत हे वेगळेपणाचें विश्व कायम ठेवतात. . . . तिच्यातील प्रसन्न व दूरस्थ वातावरणाने मन भुलून जातें . . . . या निर्मितीत कल्पना वास्तवापासून पळून जात नाही. उलट येथे वास्तवता व कल्पना यांचा सौंदर्यपूर्ण संगम होतो. कल्पनेच्या प्रकाशाने वास्तवता उजळून निघते व वास्तवाच्या दर्शनाने कल्पनेत आशय भरला जातो.[9]

वामन मल्हारांची 'नलिनी' 1920 त प्रकाशित झाली. परंतु रचनाबंध व आशय या दोन्ही दृष्टींनी नलिनी आरंभीच्या दोन कादंबऱ्यांच्या तुलनेने फारच थिटी व फिकी वाटते. स्वतः वामन मल्हारांनी तिचें वर्णन 'नकटी' असें केलेले आहे. जिच्यात वामन मल्हारांचें कलाविद्पण अंशतःही आढळत नाही अशा या अयशस्वी कृतीचा विचार न करता त्यांच्या ऊर्वरित दोन कादंबऱ्यांकडे ('सुशीलेचा देव' आणि 'इंदू काळे आणि सरला भोळे') वळणे इष्ट ठरेल. 'सुशीलेचा देव' ही कादंबरी वामन मल्हारांच्या वैचारिक क्षेत्रातील गतिशीलतेची झेप दर्शविते, तर 'इंदू काळे आणि सरला भोळे' ही कादंबरी त्यांच्या नवशोधक तंत्राची साक्ष देते. 'रागिणी' व 'आश्रमहरिणी' यांच्या बाबतीत जो प्रकार घडला, तोच या दोन कादंबऱ्यांबाबतीतही घडला आहे. 'रागिणी' आशयदृष्ट्या संपन्न असली तरी आविष्कारदृष्ट्या तशी कच्ची आहे. तुलनेने 'आश्रमहरिणी' कितीतरी सरस ठरते. 'सुशीलेचा देव'ची 'इंदू काळे......'शी अशीच तुलना करता येते.

केवळ आशयदृष्ट्या विचार करता 'सुशीलेचा देव'ची वैचारिक झेप फार उंच आहे. सुशीला ही या कादंबरीची नायिका किंवा केंद्रवर्ती व्यक्तिरेखा

असून तिची वैचारिक उत्क्रांती हा या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. सुशीलेच्या बाल्यावस्थेपासून तिच्या मनाची वाढ कोणकोणत्या घटनाप्रसंगांमुळे वा व्यक्तींमुळे कसकशी घडून आली, दगडालाच देव मानणारी बालसुशीला प्रौढपणी 'ध्येय हाच देव' का मानू लागली, याचा ऊहापोह प्रस्तुत कादंबरीत आढळतो. या कादंबरीतील घटनाप्रसंगांची योजना काहीशी स्वैर व ठोकळेबाज आहे. रावजी व सुशीला यांच्यातील प्रेमभावनेचा उदय, रावजीशी सुशीलेने मांडलेला संसार व रावजीच्या मृत्यूने या संसाराचा होणारा शेवट येथपर्यंतचा भाग लक्षवेधी ठरत नाही. रावजीच्या मृत्यूनंतर सुशीलेच्या मनात होत गेलेली वैचारिक आंदोलने व विश्वकुटुंबवादापर्यंत तिच्या मनाने केलेला प्रवास हा पुढचा भाग मात्र खास लक्षणीय आहे. ध्येयालाच देव मानण्याच्या कल्पनेचे उद्घाटन वामन मल्हारांनी 'ध्येय हाच देव' या आपल्या निबंधात पूर्वीच केलेले होते; त्या आपल्या विचारालाच त्यांनी आपल्या या कादंबरीत पुन्हा एकवार हात घातला आहे. शेवटी 'ध्येय हाच देव' या विचाराची आजची परिणती विश्वकुटुंबवादात होणे, अपरिहार्य असल्याचे दाखविले आहे. यामुळेच अभिव्यक्तीपेक्षाही आशयदृष्ट्या 'सुशीलेचा देव' सकस व महत्त्वपूर्ण कादंबरी ठरते. हीतील विचार देशकाल, जातधर्म यांची क्षितिजे ओलांडून त्यापलीकडे झेपावताना दिसतो. पूर्वीच्या तुलनेने या कादंबरीतील वातावरणही बदललेले दिसते. यातील बहुसंख्य पात्रे ही इतर कादंबऱ्यांत भेटणाऱ्या पात्रांसारखीच म्हणजे प्रगल्भ विचारांची, सुसंस्कृत वृत्तीची व वादपटू अशीच आहेत; परंतु त्यांच्या इतर कादंबऱ्यांतल्याप्रमाणे ती मध्यमवर्गीय सुशिक्षितांच्या जगापुरतीच संबंधित राहात नाहीत. 'सुशीलेचा देव' मध्ये त्यांचे लक्ष समाजातील तळागाळाकडे वेधू लागले आहे. या दृष्टीने या कादंबरीतील 'ही आमची समाजव्यवस्था' हे प्रकरण पाहाण्यासारखे आहे. या प्रकरणात सुशीलेचा या स्थितीबाबत होणारा मनःक्षोभ वामन मल्हारांनी पुढील शब्दांत व्यक्त केला आहे : "कादंबऱ्या–नाटकांना प्रेमाशिवाय विषयच नाहीत; राजकारणी पुरुषांना स्वराज्याशिवाय दुसरे काही सुचतच नाही; समाजसुधारकांना विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, ब्राह्मणब्राह्मणेतर असलेलच विषय सुचतात! गरीब महार-मांग, वडारी-डोंबारी यांची स्थिती कशी असेल, ही स्थिती अशी का, ती कशी सुधारावयाची यांचा कोणी विचार करीत नाही. सर्व समाज किडलेला, सडलेला 'rotten' झालेला आहे." सुशीलेचे हे उद्‌गार म्हणजे एक प्रकारे खुद्द वामन मल्हारांचेच विचार आहेत. वामन मल्हारांच्या विचारांची क्षितिजे कसकशी विस्तारत गेली, ते यावरून स्पष्ट होते. या rottenessच्या छाया-

पडछाया आजही अधिक गडदपणे आपल्या भोवती आहेत! 'सुशीलेचा देव'-मधील आदर्शात्मक ध्येयवादात जीवनवास्तवाचे कठोरपणही कसे मिसळले आहे याची यावरून कल्पना यावी.

'इंदू काळे आणि सरला भोळे' ही वामन मल्हारांची शेवटची कादंबरी. म्हणजे त्यांच्या कादंबरीक्षेत्रातील शेंडेफळ. या कादंबरीमुळे त्यांनी मराठी पत्रात्मक कादंबरीचा पायाच घातला, इतकेच नव्हे, तर कळसही गाठला. वामन मल्हारांच्या कादंबरीविश्वात कलादृष्ट्या ही कादंबरी सर्वोत्कृष्ट मानणारे खूपजण आहेत. वामन मल्हारांची यशस्वी कलाकृती म्हणून 'आश्रमहरिणी'नंतर याच कादंबरीकडे अंगुलिनिर्देश करावा लागेल. या कादंबरीचे स्वरूप पत्रसंग्रहात्मक आहे. पत्रात्मक तंत्राचा यात वामन मल्हारांनी चातुर्याने उपयोग केला आहे. त्यामुळे त्यांच्या पूर्वीच्या कादंबऱ्यांतून आढळणारी काही ठिकाणची ढोबळ वर्णनात्मकता, निवेदनपरता या कादंबरीत अजिबात नाही. एकमेकांशी जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या स्त्रीपुरुषांनी पत्ररूपाने परस्परांशी साधलेला संवाद, केलेला विचारविनिमय, व्यक्तविलेल्या भावभावना, सांगितलेली सुखदु:खे असा या कादंबरीचा घाट आहे. पत्रात्मक तंत्रामुळे या कादंबरीतील निवेदनाला एक सहजस्वाभाविकता, प्रांजळपणा व अनौपचारिकता लाभलेली आहे. पत्रे ही एक प्रकारची आत्मकथनेच असतात. त्यामुळे येथे आत्मकथनांतील प्रत्ययपूर्णताही अवतरते. पत्रात्मक तंत्राचा हा लाभ विशेष महत्त्वाचा. अर्थात कादंबरीत व्यक्त होणाऱ्या सर्वच प्रकारच्या आशयाला हे तंत्र पोषक ठरेलच असे नाही. तथापि वामन मल्हार आपल्या कादंबऱ्यांतून जी तत्त्वचर्चा करू पाहात होते, जी प्रश्नोपनिषदे उलगडू पाहात होते, त्याला हे तंत्र निश्चितच उपकारक ठरले.

ही कादंबरी आकाराने छोटी आहे. छोटीमोठी मिळून साठ पत्रे या कादंबरीत समाविष्ट झाली आहेत. तथापि कादंबरीतील कथेने व्यापलेला कालखंड खूपच दीर्घ म्हणजे 1919 ते 1934 असा आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक प्रवासाच्या दृष्टीने हा कालखंड महत्त्वाचा आहे. पहिल्या महायुद्धाचा शेवट, टिळकयुगाचा अस्त, महात्मा गांधींचा उदय, सत्याग्रह, कायदेभंग, इ. आंदोलने, मार्क्सवादी विचारांचा आरंभ, बहुजनसमाजातील जागृती, ब्राह्मणब्राह्मणेतर वाद, तिरंगी नवमतवाद, कलेबद्दल नव्याने निर्माण झालेली आस्था, तदनुषंगिक कला-नीतिवाद, स्त्रीपुरुष नात्याबद्दलच्या नव समस्या, नवी

नीती इत्यादींनी हा कालखंड गजबजलेला आहे. या साऱ्यांचे पडसाद कमी-अधिक प्रमाणात 'इंदू काळे आणि सरला भोळे' मध्ये उमटलेले आहेत. विनायकराव भोळे ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा. अत्यंत बुद्धिमान पण त्यागी वृत्तीचा हा तरुण जीवनातील सुखासीनता ठोकरून महात्मा गांधींनी सुरू केलेल्या चळवळीत जातो. तुरुंगवास भोगतो; आणि तुरुंगातून सुटून आल्यावरही एक आश्रम स्थापन करून सार्वजनिक कार्याला स्वतःला वाहून घेण्याचा निश्चय करतो. त्यासाठी तो खूप दुःख सोसतो; परंतु आकस्मिक मृत्यू येऊन विनायकरावांचे सर्व मनोरथ अर्धेच राहातात. त्याची पत्नी सरला त्याचे व्रत पुढे चालविते. वामन मल्हारांच्या सर्व नायकांप्रमाणे हा नायकही विलक्षण बुद्धिवान, सुसंस्कृत मनाचा, संवेदनशील वृत्तीचा, तत्त्वजिज्ञासू व वादकुशल तरुण आहे. कादंबरीतील सर्व व्यक्तींना याच्याबद्दल आदर आहे. सर्वजण त्याला निरनिराळ्या अनुषंगाने आपल्या मनातील भावना पत्राने लिहून कळवतात. विनायकरावही त्यांना तत्परतेने जिव्हाळ्याचा प्रतिसाद देतो. अशा रीतीने विनायकरावांसह सर्वांच्या भावभावना व विचारकल्पना यांचे कादंबरीभर प्रकटीकरण होत राहाते. या दृष्टीने ही कादंबरी म्हणजे भावभावना, कल्पनाविचार, संकल्पविकल्प यांचा एक संकुल पटच ठरते. हा पट वाचकांना खूप वैचारिक खाद्य पुरवितो.

मात्र वचारिकदृष्ट्या ही कादंबरी 'सुशीलेचा देव'इतकी क्रांतिकारक नाही. तीत आदर्शापेक्षा जीवनवास्तवाचे आणि जीवनाच्या शोकान्त घाटाचेच अधिक दर्शन घडते. वामन मल्हारांच्या अन्य कादंबऱ्यांत शोकाचे एवढे गहिरेपण नाही. यातील 'ध्येये म्हणजे दुःखे' यासारखी वाक्ये किंवा 'देशभक्त मेला–. . शाळेला सुट्टी' यासारखे प्रसंग जीवनाच्या कठोर वास्तवाची जाण व भान आणून देतात, आपल्याला अंतर्मुख करतात. यातच या कादंबरीचे यश आहे.

या कादंबरीचा विचार काही टीकाकारांनी कलानीतिवादाच्या संदर्भातही केलेला आहे. हा कलानीतिवादाचा प्रश्न इंदू काळे या पात्राच्या संदर्भात उद्भवतो. पण तो आनुषंगिकच आहे. या कादंबरीत खरा प्रश्न आहे तो स्वधर्मविषयक. हा स्वधर्मविषयक प्रश्न वामन मल्हारांनी आपल्या प्रत्येकच कादंबरीत उपस्थित केलेला आहे, इतकेच नव्हे, तर तो त्यांच्या इतरही लेखन-विश्वाला व्यापून राहिलेला दिसतो. 'ध्येये म्हणजे दुःखे' असे जरी असले तरी

या दुःखांतच एक उच्चतर आनंद नांदतो. ही धारणा वामन मल्हार या कादंबरीतून अभिव्यक्त करतात. याच कादंबरीतून त्यांनी व्यक्त केलेले 'To understand all is to pardon all' हे दुसरे सूत्रही या उच्चतर आनंदाचाच पाठपुरावा करणारे आहे.

या कादंबरीत वामन मल्हारांनी आपले तत्त्वचिंतन विनायकराव या पात्राच्या आश्रयाने व्यक्त केलेले आहे. त्यांच्या इतर कादंबऱ्यांत मात्र त्यांनी स्त्रीमनाच्या प्रकटीकरणावर भर दिलेला आहे. नवशिक्षणाने उदित झालेल्या स्त्रीच्या नवभावभावनांचें, नवकल्पनांचें, नवविचारांचें आलेखन वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांतून विविध पातळ्यांवरून मांडले आहे. त्यामुळेच वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांतून एक 'नवी स्त्री' जन्माला घातली असें म्हटले जाते. या स्त्रीत त्यांनी नव्याजुन्याचा एक सुंदर समन्वय साधला आहे, हेही लक्षणीय आहे. मात्र असें करताना भारतीय परंपरेला अनुसरून वामन मल्हारांनी भोगापेक्षा त्यागावर, विलासापेक्षा कारुण्यावर अधिक भर दिलेला आहे. वामन मल्हारांच्या मनात समग्र स्त्रीजातीबद्दल अतीव आदर आणि कमालीचा जिव्हाळा आहे. कदाचित हिंगणे येथील स्त्रीशिक्षण संस्थेत दीर्घकाल राहिल्यामुळे त्यांना नव्या स्त्रीच्या मनाचा सुगावा अधिक प्रमाणात लागला, असें म्हणण्यास हरकत नाही. 1915 ते 1935 मधील नव्या स्त्रीचें मन ज्याला समजून घ्यावयाचें असेल त्याला वामन मल्हारांच्या कादंबरीविश्वाकडे वळल्याखेरीज गत्यंतर नाही. किंबहुना ज्याला म्हणून या कालखंडातील सुशिक्षित मराठी मनाची स्पंदने टिपावयाची असतील त्याला वामन मल्हारांचें कादंबरीविश्व न्याहाळावेच लागेल. मराठी संस्कृतिविश्वात वामन मल्हारांच्या कादंबरीलेखनाची अशी मातब्बरी आहे. वामन मल्हारांच्या जोडीने डॉ. केतकरांनी मराठी जीवनातील स्थित्यंतरांकडे जे लक्ष वेधले, तेही महत्त्वाचें ठरते. पण वृत्तितः केतकर समाजशास्त्रज्ञ आहेत. शास्त्रज्ञाच्या दृष्टिकोणातून ते साऱ्या जीवनव्यवहाराकडे पाहातात. याउलट वामन मल्हारांची भूमिका शास्त्रज्ञाची नसून सहृदय तत्त्वचिंतकाची आहे. आणि म्हणूनच त्यांच्या लेखनात प्रतीतिगोचरता अधिक प्रमाणात अवतरली आहे.

कादंबरीकार म्हणून वामन मल्हारांचा उदय हरि नारायण आपटे यांच्या उत्तरकालात झाला. वामन मल्हारपूर्व काळात सामाजिक मराठी कादंबरीची एक वास्तववादी बैठक हरिभाऊंच्या कादंबरीलेखनाने सिद्ध झालेली होती.

तत्कालीन मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेत निर्माण होऊ घातलेली स्थित्यंतरे हरि-भाऊंनी आपल्या कादबऱ्यांतून चित्रित करण्याचा उपक्रम केला होता. हरिभाऊंनी चितारलेले हे प्रश्न नवजागृत समाजाच्या प्रारंभकालातील होते. वामन मल्हारांच्या समोर जो मध्यमवर्ग होता तो हरिभाऊंसमोरील मध्यमवर्गाच्या तुलनेने पुढच्या पिढीतला, आर्थिक-शैक्षणिक सुविधा प्राप्त झालेला, सांस्कृतिकदृष्ट्या अधिक वरच्या स्तरावरला असा होता. विशेषतः वामन मल्हारांच्या कादंबरीतील स्त्री हरिभाऊंच्या कादंबरीतील स्त्रीच्या तुलनेने अधिक प्रगमनशील बनलेली होती, ती एकत्र कुटुंब. पद्धतीच्या कोंडमाऱ्यातून, अशिक्षितपणातून, असंस्कृत-पणातून मुक्त झालेली होती; आचार-विचारदृष्ट्या ती स्वतंत्र बनलेली होती; स्वातंत्र्याबरोबरच समतेचं तत्त्व अंगीकारून पुढे जाऊ इच्छिणारी होती. प्रत्यक्ष वास्तवात या प्रकारच्या स्त्रीचे प्रमाण अत्यल्पच होते. पण अपवादाने का होईना, एक नवी स्त्री उदयाला येत होती आणि तिच्या आगमनाची द्वाही वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतून पुकारली जात होती.

तंत्रदृष्ट्याही वामन मल्हारांनी पूर्वकालीन किंवा समकालीन कादंबरीकारांच्या तुलनेने कितीतरी पुढे पाऊल टाकले होतें. आत्मकथनपर निवेदन हा त्यांच्या शैलीचा खास विशेष. हा त्यांनी नव्याने अस्तित्वात आणला होता असें नाही. बाबा पदमनजीलिखित 'यमुना पर्यटन' या पहिल्या मराठी कादंबरीत आत्मनिवेदनाचेंच अवलंबन आढळते. पुढे हरिभाऊंची अव्वल दर्जाची म्हणून जी गणली गेली त्या 'पण लक्षात कोण घेतो!' या कादंबरीचा घाटही आत्मचरित्रपरच आहे. अशा परिस्थितीत वामन मल्हारांच्या आत्मचरित्रपर तंत्राचें वैशिष्ट्य काय?—हा प्रश्न उपस्थित होतो. हे वैशिष्ट्य दोन प्रकारे स्पष्ट करता येतें. एक म्हणजे वामन मल्हारांनी आत्मकथनाचें विविध प्रकार, विविध पद्धती हाताळल्या. (उदा. पोथी, आत्मचरित्र, पत्रे, तारा इ.) दुसरे म्हणजे त्यांनी आत्मलेखनाला अधिक अंतर्मुख केले. या बाबतीत वामन मल्हारांनी हरिभाऊंचीच परंपरा एका परीने समृद्ध केली. फडकेयुगात ती मागासली. पण आज पुन्हा ती नव्याने पुढारते आहे असें दिसते. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला', 'बिढार', 'जरीला', 'झूल' या कादंबऱ्या याचीच साक्ष देतात. आत्मकथनापरता, संवादात्मकता, विदग्धता, विश्लेषणात्मकता, संसृतिटीका इत्यादी गोष्टी वामन मल्हारांच्या कादंबरीप्रमाणे नेमाडे यांच्या कादंबऱ्यांतही आढळतात. या दृष्टीने वामन मल्हारांचा वारसा समृद्ध करू शकेल अशी नवी पिढी पुढे येते आहे, असें

दिसते. या पिढीला वामन मल्हारांचे अनुसरण करायचे नसले तरी कृतज्ञ स्मरण करावे लागेल, करणे न्याय्य ठरेल.

## संदर्भ

1. उषा हस्तक आणि वा. ल. कुळकर्णी "कादंबरी", **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड 5, भाग पहिला, (संपा. रा. श्री. जोग), पुणे, 1973, पृ. 433.
2. "वाङ्मयाची प्रवृत्ती आणि ध्येये", **विचारसौन्दर्य**, मुंबई, 1940, पृ. 90.
3. "वाङ्मयविषयक माझी दृष्टी", **तत्रैव**, पृ. 107.
4. "नवमतवादाविषयी माझे काही स्फुट विचार", **विचार-विहार**, पृ. 23.
5. "वाङ्मयविषयक माझी दृष्टी", **पूर्वोक्त**, पृ. 105.
6. "मी आणि माझी पुस्तके", **विचारलहरी** (आ. 2 री), पुणे, 1952, पृ. 54
7. कुसुमावती देशपांडे, **मराठी कादंबरीचे पहिले शतक** (आ. 2 री), मुंबई, 1975, पृ. 128.
8. श्री. कृ. कोल्हटकर, "रागिणी व तिची भावंडे", **कोल्हटकरांचा लेखसंग्रह**, (संपा. खांडेकर—माडखोलकर–खानोलकर), मुंबई, 1932, पृ. 582.
9. कुसुमावती देशपांडे, **पूर्वोक्त**, पृ. 130.

## प्रकरण चौथे
# समीक्षालेखन

अव्वल दर्जाच्या साहित्यसमीक्षकाला आवश्यक असलेले सर्व गुणविशेष वामन मल्हारांच्या ठिकाणी एकवटलेले होते. त्यांनी जी काही समीक्षा केलेली आहे, तीमधून त्यांची साहित्याविषयीची जिवंत आस्था, चोखंदळपणा, बहुश्रुतता, मर्मज्ञता, सहृदयता, प्रगल्भ सौंदर्यदृष्टी, न्यायबुद्धी प्रकट होते. ते जुन्यानव्याकडे सारख्याच स्वागतशील वृत्तीने पाहातात. प्रकृतितः तत्त्वचिंतक असल्यामुळे ते साहित्यव्यवहाराचा मूलात्म पद्धतीने विचार करतात. या संदर्भात ते काही नवे प्रश्न उपस्थित करतात किंवा जुन्या प्रश्नाच्या उपेक्षित राहिलेल्या बाजूकडे ते लक्ष वेधतात. त्यांच्या अनाग्रही, प्रांजळ, जिज्ञासू आणि रसिक वृत्तीमुळे ही समीक्षा जशी उद्बोधक होते, तशीच रोचकही. त्यांनी जे साहित्यसमीक्षात्मक लेखन केलेले आहे, ते बहुतांशी स्वान्तसुखार्थ आहे. आपली वाङ्मयविषयक समजूत आपल्यालाच आपल्या समीक्षेतून अधिक ज्ञात व्हावी, अशी ते भूमिका घेतात. त्यामुळे त्यांच्या या समीक्षेत खंडन-मंडनात्मक भाग प्रमाणतः कमी आहे. जो आहे तो मुख्यतः कला-नीती किंवा कला-जीवन यांसारख्या विषयांच्या संदर्भात. वामन मल्हारांच्या काळात कला-नीतिवादाला तसेंच कला-जीवनवादाला विशेष जोर आला होता. (त्याचे पडसाद वामन मल्हारांच्या 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतही उमटलेले आहेत). कला-नीतिवादात वामन मल्हार नीतिवादाचा पक्ष उचलून धरण्यात प्रमुख असल्यामुळे स्वाभाविकच त्यांनी या बाबतीत पुनःपुन्हा आणि कटाक्षानेही लिहिले आहे. ते स्वतः त्या काळचे एक नामवंत सर्जनशील लेखक असल्यामुळे त्यांच्या समीक्षात्मक लेखनात आत्मप्रत्ययाचाही काही भाग उतरला आहे. त्यांच्या वृत्तीत पूर्वकालिनांबद्दल आदर, समकालिनां-बद्दल आस्था आणि नवकालिनांबद्दल प्रेम असल्यामुळे नवे-जुने सर्वच लेखक त्यांच्या समीक्षेकडे विशेष औत्सुक्याने पाहात असत. नव्याकडे पाहाण्याच्या त्यांच्या स्वागतशील वृत्तीमुळेच मराठी कवितेत नवे युग निर्माण करणाऱ्या

वा. सी. मर्ढेकरांनाही आपल्या पहिल्यावहिल्या समीक्षात्मक पुस्तकाला ('वाङ्मयीन महात्मता'ला) वामन मल्हारांची प्रस्तावना घ्यावी असे वाटते.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि न. चिं. केळकर हे वामन मल्हारांना समकालीन असलेले नामवंत समीक्षक. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर किंवा ग. त्र्यं. माडखोलकर ही वामन मल्हारांच्यात्र काळची, पण नंतर उदयाला आलेली समीक्षकांची नवी पिढी. या नव्या व जुन्या दोन्ही पिढीतील साहित्यसमीक्षेशी वामन मल्हारांचे अनुसंधान आहे. तथापि कोल्हटकर व केळकर हे समकालिनत्वामुळे अधिक जवळचे. या दोहोंच्याही साहित्यकृतींचे वामन मल्हारांनी समीक्षणही केले आहे. कोल्हटकरांची साहित्यसमीक्षा मुख्यत: विश्लेषण-प्रधान आहे, तर केळकरांची आस्वादक. वामन मल्हारांमध्ये या दोघांचेही संतुलन आढळेल. कोल्हटकर किंवा केळकर यांच्याइतके वामन मल्हार साहित्योपजीवी नाहीत. साहित्यापेक्षा जीवनव्यवहारात, विचारविहारात त्यांना अधिक रस आहे; परंतु यामुळेच त्यांच्या साहित्यचिंतनाला अधिक गहिरेपणही प्राप्त झाले आहे. वामन मल्हारांच्या उत्तरकालात वाङ्मयसमीक्षेत तंत्रप्रधानतेचा जोरदार प्रवेश झालेला होता. स्वत: वामन मल्हारांनीही कादंबरीलेखनाच्या तंत्रात बरेच नवनवे प्रयोग केलेले दिसतात. तथापि त्यांना वाङ्मयीन तंत्रामध्ये तंत्राकरिता तंत्र या स्वरूपाचा रस नाही. तंत्रापेक्षा वाङ्मयातील मंत्राकडे ते अधिक आकृष्ट होतात. तंत्रापेक्षा कलावंताच्या विशिष्ट प्रकारच्या व्यक्तित्वाला, त्याच्या निर्मितीमागील प्रयोजनाला ते अधिक महत्त्व देतात. तंत्राकडे संपूर्ण दुर्लक्ष करून केलेले लेखन त्यांना अर्थातच अमान्य असते. यासाठीच त्यांनी केतकरांच्या कादंबऱ्यांवर काही आक्षेपही घेतले आहेत. सत्य हे कितीही महत्त्वाचे असले तरी ते साहित्यातून अभिव्यक्त होताना लक्षणीय, कमनीय, साभिप्राय बनले पाहिजे, असे ते आग्रहाने सांगतात. कलेत मतप्रचाराला ते मज्जाव करीत नाहीत; पण हा मतप्रचार कलेचे नियम पाळूनच आला पाहिजे, अशी अटही ते घालतात. याचाच अर्थ त्यांची समीक्षा कला आणि जीवन यांचा संतुलित विचार करू इच्छीत असलेली दिसते. तथापि वामन मल्हारांचा, एकंदर समीक्षाव्यूह लक्षात घेतल्यास ती कलावादी असण्यापेक्षा अधिकतर प्रमाणात जीवनवादी आहे, असे म्हणावे लागेल. त्यांचा कला-नीतिविचारही या अनुषंगानेच प्रवाहित झालेला आहे. कलाकृतीच्या विचारात वामन मल्हारांच्या मते कलावंताच्या व्यक्तित्वाला अधिक महत्त्व असते. कलावंताच्या मनाची खोली, प्रगल्भता, निवेकशीलता, मार्मिकता

इत्यादींचा प्रत्यय कलाकृतीतून तीव्रतेने जागवण्यावरच कलाकृतीची महती अवलंबून असते, असें त्यांचे मत आहे.

वामन मल्हारांची साहित्यविषयक भूमिका समजून घेण्याच्या दृष्टीने "वाङ्मय–कलाविषयक माझी दृष्टी" हा त्यांचा लेख महत्त्वाचा आहे. "कलेचा आणि साहित्यकलेचा मी भक्त असलो, तरी मी अनन्य भक्त नाही. मला केव्हाही हे विसरता येत नाही की, मनुष्याचा जन्म केवळ कलेचा आनंद लुटण्याकरिता नाही. कला नसेल तर मनुष्याच्या जीवनात ते मोठेच वैगुण्य होईल, पण जीवन हे केवळ कलात्मक नाही. जीवनात ज्या अत्यंत रम्य आणि वंद्य गोष्टी आहेत, त्यांत कलेवरोवर नीतीचा आणि सत्याचाही समावेश होतो आणि यांचे जर एकमेकांत पटले नाही, तर जीवनातील ती मोठीच आपत्ती म्हटली पाहिजे.[1] यासाठीच साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना त्यांनी वाङ्मयलेखकांना आदेश दिला की, "असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणे व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचे संकल्पन करणे हे आपले अवतारकृत्य आहे."[2] वामन मल्हारांचा साहित्यविचार मूलतः आदर्शवादी स्वरूपाचा असला तरी वास्तववादाचे किंवा सौंदर्यवादाचे त्यांना वावडे नाही; किंबहुना त्यांच्या तत्त्वविचारातील व्यक्तिमहात्म्य व व्यक्तिस्वातंत्र्य आणि असांप्रदायिकता व नावीन्यप्रेम लक्षात घेतल्यावर ते सौंदर्यवादीही ठरतात. त्यांना असलेले जीवनवास्तवाचे भानही "ही आमची समाजव्यवस्था" या 'सुशीलेचा देव' या कादंबरीतील प्रकरणातून किंवा 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीच्या शेवटावरून स्पष्ट होते.

वामन मल्हारांच्या साहित्यसमीक्षेचे तात्त्विक आणि उपयोजित असे दोन भाग करता येतील. त्यांची साहित्यसमीक्षा तशी स्फुट स्वरूपाची आहे. ती मुख्यतः त्यांच्या 'विचार-सौंदर्य' या स्फुटलेखसंग्रहात समाविष्ट झालेली आहे. 'विचार-विहार' मध्येही काही वाङ्मयविषयक लेख समाविष्ट आहेत.

वामन मल्हारांच्या वाङ्मयविषयक तत्त्वविचारात पुढीलसारख्या विषयांचा समावेश होतो: वाङ्मयाची प्रवृत्ती व ध्येये, वाङ्मय कालनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ? मतप्रचार आणि कला, वाङ्मय बोधपूर्व की अबोधपूर्व? अलीकडे महाकाव्ये का निर्माण होत नाहीत? आत्मनिष्ठा आणि आत्माविष्कार, कलाकृती रसिकार्थ की स्वान्तसुखार्थ?, काव्यानंदमीमांसा, ॲरिस्टॉटलच्या 'कॅथार्सिस'चा अन्वयार्थ, कला आणि नीती, कला आणि नीतिसंबंध, वाङ्मयीन महात्मतेची कारणे.

वामन मल्हारांच्या या साहित्यविचाराचा पाया संस्कृत साहित्यशास्त्रा-पेक्षा पाश्चात्य साहित्यशास्त्राशी अधिक संबंधित आहे त्यामध्ये आधुनिक ज्ञानविज्ञानाचा, मानसशास्त्राचा अवलंब आहे. त्यांच्या साहित्यसमीक्षेने मुख्यतः गद्य साहित्यप्रकारांचाच विचार केलेला आहे. हे लक्षात घ्यायला हवे की वामन मल्हारकालीन साहित्यसमीक्षा प्रामुख्याने काव्यकेंद्रित होती व संस्कृत साहित्यशास्त्राची परिभाषा अवलंबीत होती. या पार्श्वभूमीवर वामन मल्हारांच्या समीक्षेचे आधुनिकत्व अधिक नजरेत भरते. साहित्य-चर्चेची त्यांची परिभाषाही आधुनिक आहे. तीत मुख्यतः नवमानसशास्त्राचा अवलंब आहे.

वामन मल्हार हे सामान्यतः जीवनवादी मानले जात असले तरी त्यांच्या या जीवनवादात कलेला फार महत्वाचे स्थान आहे. सौदर्याचे महत्त्व विशद करताना ते सत्त्वविलासाचे व आत्मप्राप्तीचे (Self realisation चे) एक अंग आहे, इतकेच नव्हे, तर प्रमुख अंगांपैकी एक अंग आहे, असे म्हणतात. कलायोगी हा ज्ञानयोग्याच्या पातळीवर जाऊ शकतो. कारण आत्मातीत व आत्मरत वृत्ती दोन्हीकडे कार्यकर असते, असेही ते म्हणतात.

वामन मल्हारांनी आपली काव्यानंदमीमांसा स्वतंत्रपणे न मांडता, न. चिं. केळकरांच्या काव्यानंदमीमांसेच्या-सविकल्प समाधी कल्पनेच्या-अनुषंगाने मांडली आहे. 'आपली बैठक तर सोडायची नाही; पण बसल्या बैठकीत इतर भूमिकांचाही आनंद सेवायचा' अशी आत्मौपम्याची भूमिका केळकरांनी काव्यानंदाबाबत घेतली आहे. केळकरांच्या सविकल्प समाधीचा हा गाभा आहे. वामन मल्हारांनी या भूमिकेवर अनेक आक्षेप घेतलेले आहेत. आणि काव्या-नंदाबाबत 'कारणानाम् अनेकता'चे तत्त्व मांडले आहे. कवीचा व आपला अनुभव जुळणे, विचारसाहचर्याने अनेक प्रिय वस्तूंची वा व्यक्तींची आठवण होणे, रम्योदात्त देखावे वा प्रसंग पाहिल्याने मनाला उदात्त अवस्था प्राप्त होणे, आपल्या भावनांचे विरेचन होणे, यांसारखे घटक काव्यानंदाला कारणीभूत असतात, असे वामन मल्हारांनी या संदर्भात म्हटले आहे.[3] करुणरसापासून होणाऱ्या आनंदाचा संबंध ते करुणभावनेमुळे होणाऱ्या विविध संस्कारांशी जोडतात.

वामन मल्हारांच्या साहित्यचर्चेत कलेचा नीतीशी असणारा संबंध, हा एक महत्त्वाचा विषय आहे. कला, नीती व सत्य यांचे परस्परसंबंध स्पष्ट करताना ते म्हणतात, "कला, नीती व सत्य ही सामान्यतः आपापल्या परीने स्वतंत्र असली तरी अंतिमतः ती एकरूप आहेत. ज्ञानप्रिय, नीतिप्रिय व

कलाप्रिय असे जे आपल्या मनाचे तीन विभाग आपण सोयीसाठी मानतो, ते विभाग विभिन्न नाहीत, तर अन्योन्यसापेक्ष, अन्योन्याश्रयी व अन्योन्यसंस्कारक आहेत." पण याच वेळी कला, नीती व सत्य याबाबतची ही अंतिम स्वरूपाची भूमिका मांडताना यातील प्रत्येक घटकाला आपापल्या क्षेत्रात शक्य तों स्वातंत्र्य दिले पाहिजे, असेही म्हटले आहे.[4]

कलावंताची निर्मिती या ना त्या स्वरूपात नीतिसापेक्ष राहिली पाहिजे, असा युक्तिवाद करण्याने कलावंताच्या निर्मितिस्वातंत्र्यावर बंधने पडत नाहीत का?–असा एक प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचा विचार करताना वामन मल्हारांनी कलावंताचे स्वातंत्र्य मान्य केले आहे; प्रसंगी प्रचलित नीतीचा त्याग करण्यांसही त्यांनी अनुमती दिली आहे. पण हा त्याग करण्यामागील कलावंताचे प्रयोजन प्रचलित नीतीहून भिन्न पण मानवकल्याणाच्या दृष्टीने उच्चतर नीतीचा पुरस्कार करणारे असले पाहिजे अशी अटही घातली आहे. पण अशी कोणतीही गरज नसेल तर कलावंताने अकारण औचित्यभंग करू नये, असेही म्हटलेले आहे. कारण कलावंत हाही अखेरतः समाजाचा एक घटक असतो, हे ते विसरत नाहीत. कला–नीतीचा प्रश्न वामव मल्हारांच्या मते अंतिमतः तारतम्याने आणि शुद्ध अंतःकरणाने सोडवावयाचा प्रश्न आहे. कलाविचार असो वा जीवनविचार असो, वामन मल्हारांच्या लेखी या शुद्ध अंतःकरणात्मक तारतम्यबुद्धीला, विवेकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

वामन मल्हारांच्या वाङमयविषयक तात्विक विचाराच्या दृष्टीने त्यांचा "वाङमय कालनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ?" हा लेखही महत्त्वाचा आहे. 1930 नंतर महाराष्ट्राला मार्क्सवादाची तोंडओळख होऊ लागली. जीवनाकडे व साहित्याकडे त्यांच्या परस्पर अनुबंधांनिशी पाहाण्याची एक नवी दृष्टी तीतून जन्माला आली. ही दृष्टी महत्त्वाची होती; पण तिचा महाराष्ट्रात जो प्रसार झाला तो ओबडधोबड व धोपट स्वरूपाचा होता. वाङमयनिर्मितीचा जीवनाशी जखडबंद संबंध जोडला जाऊ लागला. वामन मल्हारांना मार्क्सवाद वर्ज्य नव्हता. तथापि साहित्य आणि जीवनव्यवहार यांची ही जखडबंद सांगड 'कारणानाम् अनेकता' मानणाऱ्या त्यांच्यासारख्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारवंताला मान्य होण्यासारखी नव्हती. "कला काय, नीती काय किंवा सत्यप्रीती काय, पूर्ण स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेतच फुलते, फोफावते" असे ते म्हणतात.[5] त्यांचे हे म्हणणे युक्तच आहे. पण साहित्य आणि समाज

यांच्या परस्परसंबंधांबाबतची त्यांची भूमिका तत्कालीन इतर विचारवंतांप्रमाणे द्विधा स्वरूपाची आहे, याचा प्रत्यय त्यांच्या " अलीकडे महाकाव्ये का निर्माण होत नाहीत ?" (विचार–सौंदर्य) या लेखावरूनही येतो. आजच्या काळातील महाकाव्यांच्या अनिर्मितीचा विचार करताना ते फुरसतीचा अभाव, अभिरुचीतील बदल, सामाजिक परिवर्तने इत्यादींसारखी कारणे सयुक्तिक मानतात, आणि खरी काव्यदृष्टी असेल तर कोणत्याही परिस्थितीत काव्य निर्माण होते असेही ठासून सांगतात. शिवाय महाकाव्याच्या प्रभावाची कारणे ते प्रतिभेच्या आजच्या अभावात शोधतात; परंतु प्रतिभेच्या आजच्या अभावाची मीमांसा करताना मात्र जीवनातील अस्थिरता, ढासळती जीवनमूल्ये, लहानसहान प्रश्नांतच गुंतून पडण्याची आजची वृत्ती इत्यादींसारखा सामाजिक कारणांकडे बोट दाखवितात. पूर्वीच्या महाकाव्याची जागा आता कादंबरीने घेतलेली आहे, हा मुद्दा 'रागिणी'-कर्त्या वामन मल्हारांना वास्तविक सहज सुचण्यासारखा होता; पण तसा तो सुचला नाही. किंवा सुचूनही त्यांनी मांडला नाही.

वाङ्मयविषयक तात्त्विक प्रश्नांच्या अनुरोधाने विचार करता वामन मल्हारांनी मर्ढेकरांच्या 'वाङ्मयीन महात्मते' ला लिहिलेली प्रस्तावना महत्त्वाची ठरते. तात्त्विक स्वरूपाची वाङ्मयमीमांसा करणारा हा त्यांचा बहुधा शेवटचाच महत्त्वाचा लेख. या लेखात त्यांनी वाङ्मयातील आत्मनिष्ठा, कलाकृतीतील स्वानुभवाचे स्थान इत्यादींसंबंधी केलेले विवेचन त्यांची विचक्षण समीक्षावृत्ती व साहित्यविषयक अभिज्ञता अखेरपर्यंत कशी टवटवीत होती, याची साक्ष देतात.

वामन मल्हारांची उपयोजित समीक्षा बव्हंशी पुस्तक–परीक्षणांच्या स्वरूपाची आहे. तीमध्ये काव्य किंवा कथेपेक्षा कादंबरीविषयक परीक्षणांना अग्रस्थान आहे. स्वतः ते कादंबरीकार असल्यामुळेही असे झाले असेल. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या, श्रीपाद कृष्णांची 'दुटप्पी की दुहेरी', गो. चिं. भाटे यांची 'प्रेम की लौकिक' या समकालीन कादंबऱ्यांचा व ग. त्र्यं. माडखोलकरांची 'भंगलेले देऊळ', पु. य. देशपांडे यांची 'बंधनाच्या पलीकडे' यांसारख्या उत्तरकालीन कादंबऱ्यांचा त्यांनी परामर्श घेतलेला आहे. याशिवाय त्यांच्या परीक्षणविषयक लेखांमध्ये कृ. प्र. खाडिलकरांचे 'सत्त्वपरीक्षा' हे नाटक, न. चिं. केळकरांचे 'गतगोष्टी' हे आत्मचरित्र व कृष्णाबाई या लेखिकेचा 'अनिरुद्ध प्रवाह' हा कथासंग्रह यांचा अंतर्भाव होतो.

वामन मल्हारांच्या काळात ग्रंथपरीक्षण हा महत्त्वाचा समीक्षाप्रांत गणला जात होता. विस्तृत व व्यासंगपूर्ण परीक्षण लिहिणाऱ्या लेखकांचा मोठा वर्ग त्या काळी अस्तित्वात होता. ग्रंथकार–परिचय, प्रशस्ती, त्यांच्या विशिष्ट कृतींचे स्वरूप, आशयकथन, तदनुषंगिक अनुकूल–प्रतिकूल प्रतिक्रिया, गुणदोष-दर्शन, भाषाविचार असा या परीक्षणलेखांचा ढाचा होता. वामन मल्हारांनीही बव्हंशी याचाच अवलंब केलेला आहे. आत्मनिवेदनपर पुस्तकांबाबत वामन मल्हारांना विशेष आस्था आहे, असे त्यांचे एकूण ग्रंथपरीक्षणविषयक लेख पाहाता दिसते. कारण तो त्यांचा विशेष आवडता कथन-प्रकार आहे. त्यांच्या परीक्षणातील गुणदोषविवेचनात सौम्यपणा असला तरी स्पष्टपणा आहे. परीक्षणाच्या अनुषंगाने ते तात्त्विक प्रश्नांचा ऊहापोही करतात. या दृष्टीने त्यांचा केतकरांच्या कादंबऱ्यांचे परीक्षण करणारा लेख विशेष महत्त्वाचा आहे.

समीक्षक वामन महारांच्या कार्याचे मूल्यमापन करताना मराठी समीक्षेचा एकूण आढावा घेणाऱ्या आपल्या लेखात डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी जे लिहिले आहे ते लक्षणोय आहे. ते लिहितात, "वामन मल्हारांनी स्वतंत्र वृत्तीने साहित्यविमर्श कसा करता येतो, ते दाखवून दिले. त्यांनी संस्कृत साहित्यशात्राला, तसेच अर्वाचीन मराठी वाङमयीन वादांना अवास्तव महत्त्व न देता साहित्य-शास्त्रातील मूलभूत विचारांनाच हात घातला. . .कलाविचारातील एकांगीपणा किंवा अभिनिवेशी वातावरण दूर करण्यास वामन मल्हारांच्या 'कारणानाम् अनेकता' या तत्त्वाने आणि 'विचारसौंदर्या' च्या भूमिकेने पुष्कळच साहाय्य केले. वामन मल्हारांनी केलेले साहित्यचिंतन म्हणजे अर्वाचीन तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाने केलेले मराठीतले स्वतंत्र साहित्यचिंतन होय. त्यात संस्कृत साहित्यशास्त्रीय रसिकनिष्ठ भूमिकेपेक्षा पाश्चात्य साहित्यशास्त्रातील कला-निर्मितिप्रक्रियेवरच भर दिलेला आढळतो. यामुळे खरोखर आधुनिक म्हणजे आजच्या नवसाहित्य विचाराची वाट वामन मल्हारांनी घालून दिली, असे म्हणणे योग्य ठरेल."[6]

## संदर्भ

1. **विचार–सौंदर्य**, पृ. 105–106
2. **तत्रैव**, पृ. 90
3. **तत्रैव**, पृ. 33–35

4. वा. ल. कुळकर्णी, **वामन मल्हार वाङ्मयदर्शन** (आ. 4 थी), पृ. 96
5. **विचारसौन्दर्य** पृ. 102
6. डॉ. व. दि. कुलकर्णी, "साहित्यविचार" **प्रदक्षिणा** (आ. 5 वी), पुणे 1972, पृ. 244–45

## प्रकरण पाचवे

# स्फुट ललित–लेखन

वामन मल्हारांच्या तत्त्वचर्चात्मक लेखनाचा व कादंबरीलेखनाचा विचार केल्यानंतर येथे त्यांच्या ऊर्वरित ललित–लेखनाचा विचार करावयाचा आहे. यांमध्ये त्यांचे कथात्म साहित्य (' नवपुष्पकरंडक ' 1916), स्मृति–लेखात्म साहित्य ('स्मृतिलहरी' 1942) आणि नाट्यात्म साहित्य (' विस्तवाशी खेळ ' 1937 हे नाटक आणि इतर काही छोट्या नाटिका) यांचा समावेश होतो. वामन मल्हारांचे तत्त्वचर्चात्मक लेखन, त्यांच्या कादंबऱ्या, त्यांचे येथे उल्लेखिलेले ललित–लेखन याखेरीज विविध विषयांवरील स्फुट स्वरूपाचे काही लेखन अद्यापीही असंगृहित आहे. ते संगृहित झाल्यास मराठी साहित्यातील तत्त्वचर्चात्मक विचारात, व्यक्तिविचारात, ग्रंथसमीक्षणपर वाङ्मयात चांगली भर पडेल, हे मुद्दाम जाता जाता नमूद करायला हवे. येथे प्रथम त्यांच्या नाट्यात्म व कथात्म वाङ्मयाचा विचार करू. त्यांचे 'स्मृतिलहरी' हे पुस्तक महत्त्वाचे व मौलिक असल्याने त्याचा शेवटी थोडाशा विस्ताराने विचार करावयाचा आहे.

**' विस्तवाशी खेळ '**

' विस्तवाशी खेळ ' हे वामन मल्हारांनी 1937 मध्ये लिहिलेले ' स्वतंत्र सामाजिक नाटक ' होय. वामन मल्हारांनी लिहिलेले हे एकमेव नाटक. निष्क्रिय पुरुषपात्रे, तंत्रदोष, पुरातन पद्धतीची नाट्यशून्य रचना आणि सदोष कथानक यामुळे वामन मल्हारांची ही ललितकृती चांगलीच डावी ठरली आहे. तथापि या नाटकाचे महत्त्व आहे ते त्यातून वामन मल्हारांनी त्या काळी बहुचर्चित असलेल्या ' नवमतवादा ' च्या स्वीकाराबाबत दिलेल्या सावधानतेच्या इषाऱ्यासाठी.

या नाटकातील नवमतवादाच्या विचारामुळेच प्रा. वा. ल. कुळकर्णी

म्हणतात त्याप्रमाणे हे नाटक ..."थोडेफार लक्षात राहिले तर त्यातील 'विजया' ह्या नवमतवादी स्त्रीच्यां चित्रासाठी व त्या चित्राद्वारे वामनरावांनी थोड्याफार प्रमाणात साधलेल्या समाजदर्शनासाठी...'स्त्री–पुरुषांनी एकत्र बोलावं–चालावं, समाजाला भिऊ नये, विवाहसंस्थेची आता जरुरी नाही' असली मते स्थळ, काळ व व्यक्ती लक्षात न घेता उतावीळपणे प्रतिपादिणारी, परंतु स्वत्वाला जपणारी, स्वाभिमानी, निष्कपट, फटकळ, थोडीशी अविचारी अशी ती (विजया) स्त्री आहे. आपण वेळीअवेळी प्रतिपादिलेल्या बर्ट्रान्ड रसेलच्या मतांमुळे अडाणी नर्मदेच्या चरित्रावर किती अनिष्ट परिणाम झाला हे लक्षात आल्यावर 'नवमतवादी बोलण्याचा निखारा एखादे वेळी अशी आग लावायचा, ही गोष्ट माझ्या ध्यानात आली नाही...' असे प्रांजळपणे कबूल करण्याइतका विवेक तिच्याजवळ आहे" [1]

या लेखनकाळात नवमतवादाला विशेष भरती आलेली होती. या नवमतवादातील काही भाग स्वतः वामन मल्हारांना लक्षणीय आणि ग्रहणीय वाटत होता. तथापि याबाबतीत तारतम्य बाळगण्याची गरजही दुसऱ्या बाजूने त्यांना वाटत होती. अन्यथा तारतम्यरहित व स्थलकालविचाराला फाटा देणारा नवमतवादाचा पुरस्कार हा एक "विस्तवाशी खेळ" ठरेल, असे वामन मल्हारांना वाटत होते. या बाबतीत असा सावधानतेचा इषारा देण्याच्या भूमिकेतूनच या नाटकाचा जन्म झाला आहे, हे उघड आहे. नवमतवादाकडे पाहाण्याचा वामन मल्हारांचा दृष्टिकोण किती विवेकी होता, हे समजण्याच्या दृष्टीनेच त्यांच्या या नाटकाचे महत्त्व आहे. कोणत्याही नव्या तत्त्वज्ञानाचा, नवविचाराचा स्वीकार डोळसपणे व्हावा ही वामन मल्हारांची नेहमीची तळमळच या नाटकाच्या लेखन मागची प्रेरणा होय.

## संवाद व नाटिका

1940 पूर्वी लिहिले गेलेले छोटेखानी नाट्यवाङ्मय हे मुळात शाळा–कॉलेजमधील सभासंमेलनप्रसंगी करण्याकरिता प्रामुख्याने लिहिले गेलेले आहे. वामन मल्हार हे हिंगण्याच्या शिक्षणसंस्थेत अध्यापन करीत. त्यामुळे संमेलनादी प्रसंगांची उपयुक्तता भागावी म्हणून त्यांनी संवाद व नाटिका लिहिल्या. "अर्थात विशिष्ट नीतितत्त्वांची शिकवणूक हे त्यांचे उद्दिष्ट आहे; असे असले तरी त्यातून वामनरावांच्या लिखाणातील बरीचशी वैशिष्ट्ये व्यक्त झाली आहेत. कोणत्याही विषयाची सर्व अंगे अवलोकण्याची व दर्शविण्याची

त्यांची सवय, कल्पनाविलास व शब्दविलास ह्यावर आधारलेला प्रसंगोचित विनोद, नवनिर्मितिक्षम प्रतिभेचा अभिनव कल्पनाविलास, स्त्रीमनाचें म्हणजेच स्त्रीस्वभावाचे अचूक परंतु सहानुभूतिपूर्ण दर्शन, सर्वच लिखाणाच्या बुडाशी आढळणारी प्रवळ तत्त्वनिष्ठा इत्यादी त्यांच्या सगळ्याच लिखाणात आढळणारे गुणविशेष ह्याही संवादांत दिसून येतात"[2] या नाटयात्म लिखाणातही वामन मल्हारांची तल्लख कल्पकता सहज कशी चमकून जाते ते पाहाण्यासारखे आहे. 'स्वराज्या–मेळा' या संवादातील पात्रांची नावे राजकारणवाई, सामाजिकवाई, गोरक्षवाई, राष्ट्रीय शिक्षणवाई, एकीकरणवाई, स्वदेशीवाई, सत्याग्रहीवाई इत्यादीप्रमाणे त्यांनी ठेवून प्रत्येक तत्त्वाच्या आग्रहामागे दडलेला एकांगीपणाच वामन मल्हार उघड करू पाहातात. 'लीलारहस्य' हा असाच कल्पनाविलासाने नटलेला संवाद आहे. मात्र या संवादात वामनरावांचा शाब्दिक कोटयांवर फारच भर आहेसे दिसते. 'स्वप्नच नाही तर काय?' ही नाटिका पुन्हा वामन मल्हारांच्या अंगच्या कल्पकतेचे दर्शन घडविणारीच कृती होय. आर्या-वर्तातील वर्णद्वेष हा या नाटिकेचा विषय असून "हळूहळू सुधारणा होत जाणार आहे" हा आशावाद वामन मल्हारांनी या नाटिकेच्या अखेरीस प्रकट केला आहे.

सभासंमेलनासारख्या प्रासंगिक गरजांची परिपूर्ती करण्यासाठी वामनरावांनी हे छोटे नाटयात्म लेखन केले. संख्येने व गुणांनी ते मर्यादित आहेच. तथापि त्यातूनही वामन मल्हारांचे तत्त्वचर्चात्मक आणि सहृदय व्यक्तिमत्त्व, सांगोपांग विचार करण्याची त्यांची वृत्ती आणि नावीन्यदर्शनासाठी हपापलेली त्यांची कल्पकप्रतिभा यांचे दर्शन घडते.

**'नवपुष्पकरंडक'**

'नवपुष्पकरंडक' (1916) हा खरे तर वामन मल्हारांच्या ललित लेखनाचा आरंभबिंदू. वामन मल्हारांनी 1916 पूर्वी 'मनोरंजन', 'नवयुग', 'चित्रमय जगत्', 'केरळकोकीळ' इत्यादी नियतकालिकांतून वेळोवेळी जे "मनोरंजक लेख किंवा छोटया गोष्टी" लिहिल्या त्यांतील काहींचा संग्रह 'नवपुष्पकरंडक' मध्ये केलेला आहे. यातील लिखाणासाठी "मनोरंजक गोष्टी किंवा छोटया गोष्टी" हे शब्दप्रयोग 'नवपुष्पकरंडक'च्या पहिल्या आवृत्तीचे संपादक का. र. मित्र यांनी स्वतःच वापरलेले आहेत. या संदर्भात "...वा. म. जोशी यांचे 'मनोरंजक लेख' म्हणजे आजचे

लघुनिबंध व त्यांच्या ‘छोटया गोष्टी’ म्हणजे आजच्या लधुकथा आहेत”[3] हे डॉ. मा. गो. देशमुख यांचे निरीक्षण सुरुवातीलाच लक्षात घ्यायला हवे. या संग्रहातील ‘मनोरंजक लेख’ हे आज आपण ज्याला ‘ललित–लेखन’ म्हणतो त्याचे पूर्वरूप शोभावे अशा स्वरूपाचे आहे हेही मुद्दाम लक्षात घ्यायला हवे.

‘नवपुष्पकरंडक’ मध्ये ज्या जातीचे, ज्या शैलीचें लिखाण वामन मल्हारांनी केलेले आहे, ती त्यांची डेक्कन कॉलेजमधील विद्यार्थि–दशेतील कमाई होय, असे म्हणण्यास आधार आहे. डेक्कन कॉलेजमध्येच वामन मल्हारांना ललित–लेखनाची गोडी लागली व त्यांनी तसें बरेच लेखन केले. त्याकाळी त्यांनी ‘फ्रोझन व्हाइसेस’ या इंग्रजी पर्सनल एसेच्या आधारे लिहिलेला “गोठलेले आवाज” हा मनोरंजक लेख त्यांच्या सहाध्यायांना खूप आवडला होता. ‘वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही’ ही कथाही त्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये असतानाच लिहिलेली आहे. वामनरावांच्या या लेखनात त्यांची प्रसन्न विनोद–बुद्धी (वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही), खोचक उपहास (दुसरा एक शोध), असाधारण कल्पकता (अप्रकाश–किरणांचा दिव्य प्रकाश), मनुष्यस्वभावदर्शन (अहंकार) इत्यादी लेखनविशेष नजरेत भरतात.

‘वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही’ हा लेख केवळ कल्पना-विलासात्मक नाही. कल्पनाविलास तर येथे प्रामुख्याने आहेच परंतु लेखाच्या शेवटी जी कलाटणी दिली आहे आणि ‘वायकांना उजव्या डोळयाने दिसत नाही’ हा शोध लावणाऱ्या विश्वनाथपंतांनाच स्वतःला उजव्या डोळयाने दिसत नसावे, असे जे अनुमान काढले आहे ते मोठे मनोज्ञ आहे. ‘दुसरा एक शोध’ या लेखाचा रोख सरळसरळ सुधारकांवर कसेंही करून टीकास्त्र सोडणाऱ्या सनातन्यांवर आहे. “‘वर’ यायचे असेल तर ‘वरवर’ पाहावे”, “...टीका करताना सदसद्विवेकबुद्धीचा खोल विचार टाकून टीका करण्यास आरंभ करावा, म्हणजे लेखणी जलद चालते, तिला थोडासा तिखटपणा येतो व लोकांत लवकर मानमान्यता येते” इत्यादी स्वरूपाचा उपदेश करणाऱ्या मानलोभ्यांचे एक उपहासपूर्ण व्यक्तिचित्रच वामन मल्हारांनी येथे रंगविले आहे. नाटच क्षेत्रातील असेच एक व्यक्तिचित्र त्यांनी रेखाटले आहे. समकालीन नाटचलेखनावर वामन मल्हारांनी केलेली ही कथारूप टीकाच म्हणावी लागेल. नाटचलेखनात विषय व व्यक्तिचित्रण यांबाबत आलेला साचेबंदपणा

हा अर्थात त्यांच्या टीकेचा विषय होय. 'चारित्र्यकांती' ही हिंदुस्थानात वास्तव्य करणाऱ्या एका युरोपियन पतिपत्नींची कथा आहे. या कथेत वामनरावांचा एकूण स्त्रीजातिविषयक सहानुभूतीचा दृष्टिकोण अभिव्यक्त झालेला आहे. 'दोन स्वदेशींचा लढा' ही एक वैशिष्टचपूर्ण गोष्ट म्हणावी लागेल. इंग्रजी स्त्री आणि तिचा भारतीय पती या दोघांचे स्वदेशप्रेम त्यांच्या परस्परप्रेमाच्या आड येऊन त्यांची विवाहविच्छेदनापर्यंत मजल जाते इत्यादी कथाभागाचें चित्रण करून वामन मल्हार स्वदेशीच्या तत्त्वाचा एकांगीपणाच लक्षात आणून देतात. 'दोन स्वदेशींचा लढा' या गोष्टीची रचना पाहता ती आजच्या लघुकादंबरीचे पूर्वरूप ठरावी. या गोष्टीची मांडणीही त्यांनी सात प्रकरणांतून केलेली आहे. 'अप्रकाश–किरणांचा दिव्य प्रकाश' या कथेची मांडणी विज्ञानसंकल्पनेच्या आधारे केलेली आहे. मराठीत आज कुठे विज्ञानकथा अंग धरत आहे. अशा परिस्थितीत सत्तरएक वर्षापूर्वी वामन मल्हारांनी नकळत विज्ञानसंकल्पनेवर आधारित गोष्ट लिहिली हे कौतुकास्पद होय. वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांतील 'नवी स्त्री' त्यांच्या आरंभीच्या कथात्म वाङमयातही आहे हे 'नाव बदलीन' मधील पुरुषांच्या बरोबरीने युद्धविषयक चर्चा करणाऱ्या यमुना खरे या पात्राकडे पाहाता आपल्या लक्षात येते.

या 'नवपुष्पकरंडका'तील पुष्पांचे रंगरूप हे असें विविध प्रकारचे आहे. यात एकसंधपणा नसला तरी वामन मल्हारांच्या वृत्तिप्रवृत्तींची व लेखनशैलीची गंगोत्री समजून घेण्याच्या दृष्टीने हा संग्रह महत्त्वाचा ठरतो. जीवनाकडे अधिकाधिक बुद्धिनिष्ठ चिकित्सेने पाहाण्याची त्यांची दृष्टी आणि तात्त्विक चिकित्सा करण्याची त्यांच्या प्रतिभेची खास आवड यांचे दर्शन त्यांच्या या आरंभकालीन लेखनातूनही प्रकटते.

### स्मृतिलहरी

'नवपुष्पकरंडक' आणि 'स्मृतिलहरी' ही वामन मल्हारांची दोन पुस्तके लेखनकालदृष्टचा दोन टोकांवर उभी आहेत. 'नवपुष्पकरंडक' मधील लेखन अगोदर म्हटल्याप्रमाणे 1916 पूर्वीचें आहे, तर 'स्मृतिलहरी' चे लेखन 1935 नंतरचें. 'नवपुष्पकरंडक'मध्ये वामन मल्हारांच्या लेखनक्षेत्रातील उमेदवारीचा भाग प्रकट होतो, तर 'स्मृतिलहरी' त त्यांच्या लेखनकलेचें परिपक्व फळ दृष्टिपथात येते. या दोहोंना समानपणे एकत्र बांधणारे एकच

सूत्र आहे आणि ते म्हणजे वामन मल्हारांच्या लेखनातून नेहमीच प्रत्ययास येणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची काव्यशास्त्रविनोदात रमणारी वृत्ती. वामन मल्हारांचे कोणतेही लेखन घेतले तरी त्यात त्यांच्या त्या वृत्तीचा सातत्याने प्रयत्न येतो. 'नवपुष्पकरंडक' ला जर वामनरावांच्या लेखनाची गंगोत्री मानले तर या गंगेच्या प्रवाही शुद्धतेचा, शुभ्रतेचा आणि पावित्र्याचा स्पर्श 'स्मृति-लहरीं'ना झाला आहे, असे म्हणावे लागेल. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'रागिणी'ची तुलना गंगेशी केलेली आहे. ती तितक्याच यथार्थपणे त्यांच्या 'स्मृतिलहरी' तील तरंगांनाही लागू पडेल. वामन मल्हारांची अत्युत्कृष्ट पुस्तके कोणती ?–या प्रश्नाचे उत्तर रुचिवैचित्र्यामुळे कितीही भिन्न भिन्न झाले तरी 'स्मृतिलहरी' हे त्यांचे पुस्तक आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी श्रेष्ठ आहे, असाच कौल कोणताही चोखंदळ वाचक देईल. वामन मल्हारांच्या परिणत प्रज्ञेचा दरवळ 'स्मृतिलहरी' त सर्वच भरून राहिलेला आहे. येथे त्यांच्या व्यक्तित्वाची, विचारांची, काव्यशास्त्रविनोदप्रचुर शैलीची विविध अंगे संयमाने, सूचकतेने अनौपचारिकपणे प्रकट झाली आहेत, आणि ती मोठी हृद्य आहेत.

'स्मृतिलहरी' हा मराठीतील एक उत्कृष्ट ललितनिबंधसंग्रह आहे. ललितनिबंधाचे लेखन हे स्वैर भ्रमणासारखे असते, त्यात एक प्रकारची प्रांजळ आत्मनिष्ठा व्यक्त होते; त्याना विषयाच्या आखीवरेखीवपणाचे बंधन पाळण्याची आवश्यकता नसते. त्याचा घाट चार मित्रांशी सहजसंवाद साधावा अशा स्वरूपाचा असतो. त्यात निर्हेतुकता, निर्व्याजता प्रतिबिंबित झालेली असते. त्यात काव्यात्मकतेला, विनोदबुद्धीला तसेच क्रीडावृत्तीला फार मोठा अवसर असतो. या सर्व गोष्टींमुळे चांगला ललितनिबंध वाचकाला अगदी सहजपणे चिंतनाच्या पातळीवर नेतो, असे म्हटले जाते; पण वास्तवात या प्रकारची यशस्वी ललितनिबंधरचना फारच क्वचित दृष्टोत्पत्तीस येते. 'स्मृतिलहरी' हा संग्रह या दृष्टीने अपवादात्मक म्हणायचा.

सहा आणे किंमतीच्या तांब्यापासून "जगात सर्वंकष क्रांती कशी होईल ?" या विषयापर्यंत अनेक विषयांचा परामर्श 'स्मृतिलहरी'त येतो. हे विषय वामनराव अत्यंत सहजपणे, अनौपचारिकपणे मांडतात. सूचकतेने त्यातून हळूच गहन विचारांकडे घेऊन जातात. 'स्मृतिलहरी'मध्ये आलेले विचारविषय किती विविध आहेत हे मुद्दाम पाहाण्यासारखे आहे. स्त्री श्रेष्ठ की पुरुष ?

वधूपरीक्षेची जुनी पद्धत सदोष की निर्दोष ? आजच्या स्त्रीला आजन्म अविवाहित राहाता येईल का ? वायकांचा अलीकडचा स्वातंत्र्यवाद समाजास मारक आहे की तारक ? आजची कुटुंबव्यवस्था त्याज्य आहे का ? भांडवलदारांचे हृदयपरिवर्तन करून समाजाची सुधारणा घडविणे शक्य होईल का ? खासगी मालमत्ता नाहीशी करण्याने समाजात नवा मनू आणणे शक्य आहे का ? आजच्या लोकशाहीला भांडवलशाहीपासून कोणते धोके आहेत ? नैतिक सद्‌गुण हे दुर्गुण कसे ठरतात ? सालसपणा व सात्त्विकपणा हे दुर्गुण ठरू शकतात का ? लोकमताला कितपत किंमत द्यावी ! आजच्या वैज्ञानिक युगात घातवारांसारख्या शकुनापशकुनांवर किती विश्वास ठेवावा ? अमूक धर्माचे लोक चांगले व तमूक धर्मांचे लोक वाईट असे निश्चयाने म्हणता येईल का ? गुळमुळीतपणा गोड दिसतो पण तो व्यवहारात फोल ठरतो हे खरे आहे का ?

वामन मल्हारांनी 'स्मृतिलहरी' मध्ये मांडलेले वरील विचारविषय नुसतेच महत्त्वाचे होते असे नव्हे तर ते समकालीनही होते. यातले वरेचसे विषय हे तरुण पिढीचे नित्यचिंतनाचे विषय होते (व काही आजही आहेत). हे विषय जरी पूर्णपणे वैचारिक स्वरूपाचे असले तरी वामन मल्हारांनी तरुण–मनांशी, त्यांच्या वृत्तिप्रवृत्तींशी लाघवीपणाने संवाद साधत, गप्पागोष्टी करीत सहजतेने या विषयांचे सूचन केलेले आहे. सहज बोलण्यातून खेळकरपणाने केलेला हितोपदेश–तोही तुम्हाला पटत असेल तर स्वीकारा अशा स्वरूपाचा हितोपदेश, असे 'स्मृतिलहरी' तील लेखनाचे स्वरूप राहिलेले आहे.

'स्मृतिलहरी' तील लेखन त्यातील खेळकरपणामुळे, गप्पागोष्टींमुळे, लाघवीपणामुळे स्वाभाविकपणेच कथात्म झालेले आहे. साहजिकच कथात्म लेखनाकरिता आवश्यक असणाऱ्या व्यक्तिरेखाही वामन मल्हारांनी निर्माण केल्या आहेत, चितारल्या आहेत. 'स्मृतिलहरी' तील सर्व लेखांमधून येणारी धोंडोपंत बर्वे ही मराठी साहित्यातील एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहे. धोंडोपंत बर्वे आणि त्यांचा विद्यार्थि–परिवार वामन मल्हारांनी कल्पनेने निर्माण केलेला आहे. तथापि महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध समाजसुधारक धोंडोपंत कर्वे यांच्याप्रमाणे धोंडोपंत बर्वे हेही खरोखरीचे कुणी प्राध्यापक होते अशी वाचकमनात खात्री व्हावी म्हणून वामन मल्हार प्रस्तावनेमध्ये सहेतुकपणे लिहितात, "ते माझे मित्र होते, आम्ही त्यांना आपल्या आठवणी लिहून काढण्यास सांगत होतो;

परंतु त्यांना त्याचा कंटाळा होता. शेवटी त्यांनी सांगितलेल्या आठवणी मीच लिहून संपादित करावयाचे ठरविले." वाचकांची विश्वसनीयता प्राप्त करून घेण्याची 'आश्रमहरिणी' च्या प्रस्तावनेत अशाच स्वरूपाची युक्ती वापरल्याचे मुद्दाम आठवावे. या आभासनिर्मितीमुळे 'स्मृतिलहरी' चें लेखन म्हणजे आठवणींचे जिवंत जगच झाले आहे.

धोंडोपंत वर्वे हे अत्यंत गोष्टीवेल्हाळ प्राध्यापक आहेत. ते संस्कृत प्राध्यापक असले तरी तत्त्वज्ञान हाही विषय त्यांचा आवडता आहे. साहित्याची त्यांना मनोमन आवड असून त्यांनी काही टीकालेख लिहिलेले आहेत. विद्यार्थ्यांशी ते अतिशय मोकळेपणाने वागतात, प्रेमळपणाने त्यांना वागवितात. विद्यार्थ्यांशी उलटसुलट चर्चा करून, त्यांना एखाद्या प्रश्नाच्या सर्व अंगांकडे लक्ष वेधायला लावायचें, हा धोंडोपंत वर्व्यांचा स्वभाव आहे. त्यांचें बोलणे स्पष्टवक्तेपणाचे आहे, त्यांचे विचार काटेकोर आहेत पण त्यांत आग्रहीपणा नाही. साधा पोषाख, भिडस्त स्वभाव आणि अंगचा विसराळूपणा हे त्यांचे सहज ध्यानात येण्यासारखे विशेष होते. अनेकदा त्यांचे विद्यार्थी व सहकारी प्राध्यापक त्यांच्या एखाददुसऱ्या वागण्याबोलण्यातून गैरसमज करून घेत, पण धोंडोपंतांच्या मूळच्या ऋजू व प्रांजळ स्वभावामुळे हे गैरसमज जसे निर्माण होतात तसेच नाहीसेही होतात.

प्रा. धोंडोपंत वर्वे यांचे हे स्वभावविशेष पाहाता धोंडोपंत आणि स्वत: वामन मल्हार यांच्यामध्येही विलक्षण साम्य असल्याचे आपल्या लक्षात येते. (पहिली आवृत्तीला धोंडोपंत वर्वे यांचें म्हणून जे चित्र सुरुवातीस घातले आहे, ते वामन मल्हारांच्या व्यक्तिरेखेशीच जुळणारे आहे, हेही लक्षात घेण्यासारखे आहे.) तथापि 'स्मृतिलहरी' म्हणजे वामन मल्हारांनी आपल्या स्वत:च्या आयुष्यातील काही घटनाप्रसंगांची रेखाटलेली 'स्मृतिचित्रे' नव्हेत. एवढे मात्र खरे की त्यांचा दर्जा अव्वल स्मृतिचित्रांसारखा आहे. 'स्मृतिलहरी'मध्ये वामन मल्हारांच्या स्वैर प्रतिभेने अगदी मुक्तपणे संचार केलेला आहे. त्यामुळे हे त्यांचे छोटे पुस्तक अगदी रमणीय उतरले आहे. 'स्मृतिलहरी'चे कौतुक वि. स. खांडेकरांनी पुढील शब्दांत केले आहे :

"या चिमुकल्या पुस्तकात विविध अनुभव आहेत, हृद्य कथाप्रसंग आहेत, मजेदार स्वभावचित्रे आहेत, मार्मिक तत्त्वचर्चा आहे, खुसखुशीत संभाषणे आहेत, रम्य विनोदस्थळे आहेत, सुविचार आहेत, सुभाषिते आहेत, निवेदनाच्या व संभाषणाच्या किंवा चर्चेच्या ओघात सहजासहजी या साऱ्या गोष्टी आपल्याला

भेटतात व आपला बौद्धिक आणि भावनात्मक आनंद वृद्धिगत करतात. एखाद्या झऱ्याच्या काठाने गमतीने फिरत फिरत जावे आणि फुले, पाखरे, वनश्री वगैरेंच्या दर्शनाने मन उल्हसित व्हावे तसे हे पुस्तक वाचून वाचकाला वाटते. या सर्व स्मृतींवर मार्मिक सांसारिक तत्त्वज्ञानाची जी सौम्य सोनेरी सावली पसरली आहे ती दीर्घकाल आपल्याभोवती रेंगाळत राहाते. 'स्मृतिलहरी'चे वाचन आपल्याला अंतर्मुख करते, क्षणभर उदात्त पातळीवर नेते."[4]

("प्रस्तावना", **स्मृतिलहरी**, (आ. 4 थी), पुणे 1959, पृ. 14)

कोणत्याही अव्वल दर्जाच्या साहित्याचे यापरते श्रेय कोणते असणार ? हे श्रेय मिळावे असे प्रत्येक साहित्यनिर्मात्याला वाटत असले तरी ते सहजसाध्य नसते. त्याला एक वेगळ्या प्रकारची व्रतस्थ वृत्ती धारण करावी लागते; जीवनार्थाचा शोध एका उंच पातळीवरून घ्यावा लागतो. त्याला सत्याची, सौंदर्याची व सौजन्याची जोड द्यावी लागते. वामन मल्हारांनी ती आपल्या लेखनाला, चिंतन–मननाला दिलेली असल्यामुळेच त्यांचे 'स्मृतिलहरी'सारखे चिमुकले पुस्तकही श्रेष्ठ पदवीस पोहोचते.

### संदर्भ


1. वा. ल. कुळकर्णी, **वामन मल्हार : वाङ्मयदर्शन**, (आ. 3 री), मुंबई, 1974, पृ. 38
2. **तत्रैव**, पृ. 67
3. डॉ. मा. गो. देशमुख "प्रस्तावना", **नवपुष्पकरंडक** (आ. 4 थी), पुणे 1964, पृ. 5
4. वि. स. खांडेकर, "प्रस्तावना" **स्मृतिलहरी** (आ. 4 थी), पुणे, 1959, पृ. 14

# प्रकरण सहावे
# समारोप

वामन मल्हारांच्या व्यक्तित्वाचा व कर्तृत्वाचा सौम्य, सुखद सुगंध मराठी साहित्याच्या व संस्कृतीच्या क्षेत्रात दरवळत राहिला आहे. साहित्य आणि संस्कृती हे दोन शब्द येथे वापरले खरे, परंतु वामन मल्हारांच्या लेखी ते भिन्न नव्हतेच. साहित्याच्या व संस्कृतीच्या भिन्न रूपांचा विचार करूनही अंतिमतः ते या सर्वांना एकरूपच मानतात. या दोहोंच्या संलग्न विकासाची दिशा स्पष्ट करतात.

वामन मल्हार महाराष्ट्राला श्रेष्ठ प्राध्यापक, तत्त्वचिंतक, कादंबरीकार, विचक्षण साहित्यसमीक्षक, ललित निबंधकार, साहित्यसेवक इत्यादी नात्यांनी सुपरिचित आहेत; परंतु त्यांच्या व्यक्तित्वाला व कर्तृत्वाला व्यापून राहणारा एकमेव घटक म्हणजे त्यांचे जीवन–चिंतन. या जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचा त्यांचा प्रयत्न, हे जीवन उन्नत कसे होईल याचा त्यांना लागलेला ध्यास, या ध्यासातून स्वकर्तव्याचा, स्वधर्माचा, श्रेयाचा त्यांनी चालविलेला शोध आणि हा शोध देशकालपरिस्थितीप्रमाणे कसा घ्यावा यांबद्दल त्यांनी केलेले स्वाभाविक मार्गदर्शन दुर्मिळ आहे म्हणूनच विशेष मोलाचेही आहे.

वामन मल्हारांना 'महाराष्ट्राचे तत्त्ववेत्ते', 'महाराष्ट्राचे सॉक्रेटीस' इत्यादी पदव्या दिल्या जातात. तथापि त्यांचे तत्त्वचिंतन घटपटादी स्वरूपाचे नव्हते. ते जीवनातील विविध रसरूपरंगांनी समृद्ध, रुचिर व सौंदर्यपूर्ण असे झालेले आहे. कारण त्यांना तत्त्वज्ञानाच्या कोरड्या शाब्दिक चर्चेत रस नव्हता. स्वतः वामन मल्हार तत्त्वज्ञान घेऊन एम्. ए. झालेले होते आणि तत्त्वज्ञानाचे प्राध्यापकही होते. असे असूनही त्यांनी तत्त्वप्रतिपादनाचा आग्रही अभिनिवेश बाळगला नाही. जीवनातील घटनाप्रसंग असोत की जीवनाचे तत्त्वज्ञान, असो, ते सर्व अंगांनी, त्याच्या सर्व प्रश्नोपप्रश्नांनिशी समजून घेणे हीच त्यांची सततची भूमिका असे.

विश्व हे आरंभी कसे होते, यापेक्षा आज ते कसे आहे व भविष्यात ते कसे असेल किंवा कसे असायला हवे, याकडे वामन मल्हारांचे अधिक लक्ष असे. हा दृष्टिकोण ठेवूनच ते मनुष्याच्या ऐतिहासिक कर्तव्याचे स्वरूप आणि दिशा निश्चित करण्याचा प्रयत्न करतात. या त्यांच्या प्रयत्नांची फलश्रुती म्हणजेच त्यांची ललित व ललितेतर वाङ्मयनिर्मिती.

या आपल्या ललित व ललितेतर निर्मितीत 'विचार' या घटकालाच सर्वाधिक महत्त्वाचे स्थान वामन मल्हार देतात. कारण मनुष्य हा विचारशील प्राणी आहे, असा कितीही उद्घोष केला तरी विचार कसा करावा ? विचाराची योग्यायोग्यता कशाच्या आधारे निश्चित करावी ? इत्यादी गोष्टी सामान्य माणसाला समजत नाहीत. विचाराची योग्य ती आत्मज्ञानपूर्ण दिशा न स्वीकारल्यामुळेच जगात दुःखे, गैरसमज, दुर्जनता, दैन्य इत्यादींचा प्रादुर्भाव झालेला आहे, याची मनोमन खात्री वामन मल्हारांना पटलेली होती. म्हणूनच त्यांनी विचार या घटकावरच आपले सारे लक्ष केंद्रित केले. या विचाराचे व्यावहारिक आणि तात्त्विक पदर उलगडून पाहिले, इतरांना उलगडून दाखविले. त्यांनी शुद्ध विचारयुक्त आचाराचे महत्त्व व मांगल्य स्पष्टपणे, स्वच्छपणे पण विनम्र भावाने मराठी सुशिक्षितांसमोर परोपरीने विशद केले; 'सर्वामुखी मंगल बोलविण्या'ची गुरुकिल्ली कशात आहे, हे दाखवून दिले.

आधुनिक मराठी साहित्याच्या क्षेत्रात विचारवंत, कवी, तत्त्ववेत्ते, ललित लेखक या नात्याने विख्यात झालेल्या व्यक्ती अनेक आहेत. त्यांनी आपापल्या क्षेत्रात केलेले कार्यही मोलाचे आहे. पण या साऱ्या मराठी साहित्यकारांच्या पंक्तीतच वामन मल्हार बसलेले असूनही ते वेगळे वाटतात. याचे कारण त्यांच्या असाधारण व्यक्तित्वात आहे आणि त्यांच्या या विलोभनीय व्यक्तित्वाचेच रसायन त्यांच्या ग्रंथलेखनातून प्रकटलेले आहे. मराठीत तरी हे सारे दुर्मिळ आहे, अनन्यसाधारण आहे. "वामन मल्हारांचे लिखाण वाचल्यानंतर चित्तवृत्ती स्थिरावतात, मनाला प्रसन्नता येते, अंतःकरणातील सत्प्रवृत्तींना नवी पालवी फुटू लागते, जीवनावरील विश्वास वृद्धिंगत होतो, वृत्ती अंतर्मुख पण आशायुक्त बनते" असे वा. ल. कुळकर्णी म्हणतात ते यथार्थच होय.[1]

## संदर्भ

1. वा. ल. कुळकर्णी, **वामन मल्हार : वाङ्मयदर्शन** (आ. 3 री), पृ. 8

# वामन मल्हार जोशी : वाङ्मयसूची

**कादंबरी**

: रागिणी (पूर्वार्ध 1915, उत्तरार्ध 1916)
: आश्रमहरिणी (1916)
: नलिनी (1919)
: सुशीलेचा देव (1930)
: इंदू काळे व सरला भोळे (1935)

**इतर ललित साहित्य**

(अ) कथात्म : नवपुष्पकरंडक (1916)
देशसेविकेचे रहस्य (1921) (सहकार्याने)
(आ) ललित निबंध : स्मृतिलहरी (1942)
(इ) नाटक : विस्तवाशी खेळ (1937)

**टीकाग्रंथ**

: A Gist of the Gita-Rahasya (1916)
(डॉ. विलास खोले संपादित 'वा. म. जोशी : जीवनदृष्टी आणि साहित्य विचार', पुणे, 1983 त समाविष्ट)

**वैचारिक/चर्चात्मक**

: आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त (पुरवणी), 1915
(प्रो. महादेव मल्हार यांच्या 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त व स्वामी सच्चिदानंदांचे विचार', मुंबई 1936 या ग्रंथात समाविष्ट)
: नीतिशास्त्रप्रवेश (1919)
: सॉक्रेटिसाचे संवाद (1922)
: विचार–विलास (1927)
: ठाणे ग्रंथसंग्रहालय वार्षिक समारंभ : अध्यक्षीय भाषण (1932)
: विचार–सौंदर्य (1940)
: विचार–लहरी (1943)
: विचार–विहार (1944)

## वा. म. जोशी यांच्यावरील महत्त्वपूर्ण लेखन

### चरित्रपर व व्यक्तिवेधात्मक

: कानिटकर रा. प्र., **वामन मल्हार जोशी**, एन्. भिडे अँड कं., पुणे, 1930

: जोशी अ. म., **वडिलांचे सेवेसी**, प्रका. अ. म. जोशी, पुणे, 1960

: पटवर्धन ना. म., **वामन मल्हार जोशी यांचे चरित्र**, पुणे, (कालनिर्देश नाही)

: पाध्ये प्रभाकर, **तीन तपस्वी**, स्कूल अॅण्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर, 1946

### टीकात्मक

: कुळकर्णी वा. ल. **वामन मल्हार वाङ्मयदर्शन**, 1944

: खोले विलास (संपा.), **वा. म. जोशी : जीवनदृष्टी आणि साहित्य-विचार**, पुणे, 1983

: पाध्ये प्रभाकर, **वामन मल्हार आणि विचारसौंदर्य**, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, 1978

### संपादने

: खांडेकर वि. स. (संपा.) **वामन मल्हार जोशी : व्यक्ती आणि विचार**, 1948

: कुळकर्णी वा. ल. आणि कुलकर्णी गो. म. (संपा.), **वा. म जोशी : साहित्यदर्शन** साहित्य अकादमी, 1985

: डॉ. अ. ना. देशपांडे व श्री. ग. वा. जोशी (संपा.), **साहित्यातील विवेक** (वा. म. जोशी यांच्या साहित्यशास्त्रीय लेखांचा संग्रह), पुणे, 1962

Indian Institute of Advanced Study
117058
9/12/94

वामन मल्हार जोशी ही आधुनिक मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वाची व्यक्ती. त्यांच्या व्यक्तित्वाचा आणि विचारांचा सौम्य, सुखद, सुगंध त्यांच्या साहित्यविश्वात सातत्याने दरवळत असतो–मग ते लेखन ललित असो की ललितेतर.

थोर तत्त्वचिंतक, श्रेष्ठ विचारवंत, 'महाराष्ट्राचे सॉक्रेटिस' यासारख्या पदव्या महाराष्ट्राने त्यांना कौतुकाने आणि प्रेमादराने बहाल केलेल्या आहेत, मराठीतील काव्यशास्त्रविनोदप्रचुर तत्त्व–चिंतनात्मक कादंबरीच्या जनकत्वाचा मानही त्यांनाच दिला जातो. चोखंदळ समीक्षक, मर्मज्ञ ललितनिबंध लेखक, सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रयीचे अनन्य उपासक म्हणूनही ते ओळखले जातात. त्यांनी निर्माण केलेली साहित्यनिर्मिती मोजकीच असली तरी मौलिक स्वरूपाची आहे. तीमधून वामन मल्हारकालीन सुशिक्षितपर तरुण स्त्री-पुरुष मनाचे त्यातील वैचारिक आणि भावनिक गुंता–गुंतीचे प्रशस्त आणि प्रसन्न दर्शन घडते. ते रसज्ञ वाचकाचे चातुर्य शहाणे करते, आणि त्यांच्यासमोर असलेली विविध प्रमेये ते त्याना खेळकरपणे उलगडून दाखविते.

आधुनिक मराठी साहित्याच्या क्षेत्रात विचारवंत कवी, तत्त्ववेत्ते, ललित लेखक या नात्याने विख्यात असलेल्या व्यक्ती अनेक आहेत. पण या साऱ्या मराठी साहित्यकारांच्या पंक्तीतच वामन मल्हार बसलेले असूनही ते वेगळे वाटतात. याचे कारण त्यांच्या असाधारण व्यक्तित्वाला आहे आणि त्यांच्या या विलोभनीय व्यक्तित्वाचेच रसायन त्यांच्या ग्रंथलेखनातून प्रकटलेले [illegible] तरी हे सारे दुर्मिळ आणि अनन्य [illegible]

या पुस्तकाचे लेखक प्रा. गोवि[illegible] समीक्षक व मराठीचे सेवानिवृत्त [illegible] मल्हार जोशी यांच्या वाङ्मयाचा [illegible] साहित्य अकादेमीने अलिकडेच '[illegible] जोशी साहित्य दर्शन' (निवडक वेचे) प्रसिद्ध केले आहे. ज्याचे संपादन प्रा. वा. ल. कुळकर्णी प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी केले आहे.

Waman Malhar Joshi (Marathi), SAHITYA AKADEMI

REVISED PRICE Rs. 15.00

Library IIAS, Shimla
MR 891.460 92 J 78 K
00117058